# केतकर लेखसंग्रह

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९७९

संपादक

य. दि. फडके

RFFBK-0023817

साहित्य

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 MAY 1987

11 SEP 1988

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
निबंध
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ निबंध

# केतकर – लेखसंग्रह

संदर्भ निबंध
२९७१
२३८९७
२८/३/८३

# केतकर - लेखसंग्रह

संपादक
य. दि. फडके

REFBK-0023817

साहित्य अकादेमी
नवी दिल्ली

*Ketkar Lekh-Sangraha* ( Selections from the writings of Shreedhar Vyankatesh Ketkar ). Edited by Y. D. Phadke, Sahitya Akademi, New Delhi ( 1977 ). Price Rs. 18-00

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली
प्रथम आवृत्ती १९७७

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय,
२५०, अ, शनिवार पेठ,
पुणे ३०

किंमत : १८ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23696
निबंध
ग्रंथ शाखा

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | निवेदन | १ |
| | प्रस्तावना | ४ |

**विभाग १**

| | | |
|---|---|---|
| १. | माझ्या आयुष्याची वक्रगति | ३१ |
| २. | मी व माझे टीकाकार | ३७ |
| ३. | ज्ञानकोश–रचनेच्या कार्याचा आरंभ | ४२ |
| ४. | राजवाडे यांची जीवनपद्धति | ५० |

**विभाग २**

| | | |
|---|---|---|
| ५. | फेरीबोटीतील संवाद | ५७ |
| ६. | रिप व्हान विंकल | ६७ |
| ७. | शारदाबाई व वैजनाथशास्त्री यांची पहिली भेट | ७२ |
| ८. | वैजनाथशास्त्रांचा पहिला डोस | ८९ |
| ९. | मिसेस कैलासनाथ व त्यांचे धूम्रपान | ९७ |
| १०. | मधुमालतीचा गृहत्याग | १०२ |

## विभाग ३

११. महाराष्ट्राचा विशेष विचार १०९
१२. महाराष्ट्राची काव्यग्राहकता ११६
१३. सामाजिक परिस्थिती, ग्रंथपरीक्षण आणि ग्रंथक्षेप १२४
१४. ज्ञानकोश म्हणजे महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न १३०

## विभाग ४

१५. इतिहास विषयक प्राचीन कल्पना १४३
१६. भारतीय संस्कृतिविकासाचे अवलोकन १५१
१७. समाजशास्त्र आणि धर्म यांचा परस्पर संबंध १५७
१८. राष्ट्रीकरण आणि मतविशिष्ट कायदे १६५
१९. सामाजिक क्रांती आणि तिची तयारी १७१
२०. ‘ वात्स्यायन ’ यांच्या ‘ रतिशास्त्र मीमांसा ’ : या पुस्तकाची प्रस्तावना १७६
२१. स्त्रियांचे वाङ्मय आणि स्त्रियांच्या चळवळी १८३
२२. स्वराज्य कल्पना, लोकजागृति व सरकारची कार्यक्षमता १८८
केतकर-वाङ्मयाची व केतकरविषयक वाङ्मयाची निवडक सूचि १९५

# निवेदन

महाराष्ट्राच्या विचारभांडारात घसघशीत भर घालणाऱ्या विचारवंतांची नामावळी तयार केली तर तीमध्ये ज्ञानकोशकार डॉ. केतकरांचा समावेश डोळे मिटून करावा लागेल. डॉ. केतकरांना अवघे त्रेपन्न वर्षांचे आयुष्य लाभले; पण तेवढ्यात ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांत त्यांनी अप्रतिहत संचार केला. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, वैदिक संशोधन, महाराष्ट्रेतिहास, साहित्यशास्त्र, राजकारण वगैरे क्षेत्रांत त्यांनी केलेले लिखाण क्वचित विवाद्य असले तरी एकंदरीने बहुमोल आहे, याविषयी शका नाही. विशेषतः समाजशास्त्रज्ञ व वैदिक संशोधक म्हणून त्यांनी जी कामगिरी बजावली ती अशा तोलामोलाची झाली की महाराष्ट्राने तिच्याविषयी सदैव अभिमान बाळगावा. त्यांचे सिद्धांत केव्हा केव्हा प्रस्थापित विद्वत्तेला पटण्यासारखे नव्हते, पण ते मांडताना त्यांनी माहितगारांची नि युक्तिवादाची अशी काही करामत दाखविली की प्रस्थापित विद्वत्तेला खडबडून जाग यावी आणि परंपरागत विचारविश्व ढवळून निघावे. ते प्रतिभावंत असण्यापेक्षा प्रज्ञावंत होते. पण प्रतिभावंतांचे जे ललित-साहित्य-क्षेत्र त्यातही आपल्या कादंबऱ्यांनी ते उठून दिसले. त्यांच्या कादंबऱ्या अनेकांना कलादृष्ट्या सदोष वाटल्या असतील; पण त्यांत समाज जीवनाची नि मानवी मनाची जी चित्रे रेखाटली आहेत आणि जीवनविषयक विचारांना जी चालना दिली आहे ती दृष्टीआड करण्यासारखी नाही. काही विद्वान केवळ संशोधनात गढतात आणि भूतकाळात दृष्टी लावून बसतात. पण केतकरांची स्थिती तशी नव्हती. समाजाच्या भूतकाळाएवढाच समाजाचा वर्तमानकाळ नि भविष्यकाळ त्यांच्या विचारांचा विषय होता; आणि म्हणूनच प्रचलित परिस्थितीत मार्गदर्शक होतील असे अनेक मौलिक विचार आपल्या देशबांधवांना ते सांगून गेले. मानवसमूह दूर दूर जाण्याचा जगाच्या इतिहासातील कालखंड संपला आहे आणि आता सामाजिक दृष्ट्या एक होण्याच्या दिशेने जग वाटचाल करीत आहे, हे सत्य आपल्या प्रारंभीच्या ग्रंथातच त्यांनी अचूक हेरले होते. भाषावार प्रांतरचनेची प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर काळात पूर्ण झाली असली तरी तिला १९१५ सालीच त्यांनी भरभक्कम वैचारिक बैठक दिली होती. स्वतःच्या स्वार्थासाठीच इंग्रज राज्यकर्ते एक दिवस चंबूगबाळे आवरून हिंदुस्थानला आपण होऊन रामराम ठोकतील, हे भविष्यही १९२६ सालीच त्यांनी युक्तिवादपूर्वक वर्तवून ठेवले होते. त्यांची शोधक दृष्टी जेवढी मूलगामी तेवढीच भ्रमणशील होती. त्यामुळे, भूतकाळाच्या संदर्भात ते वर्तमानकाळाचा नि भविष्यकाळाचा वेध घेत; वर्तमान कालीन घटनांच्या प्रकाशात भूतकाळाचा उलगडा करू बघत; आणि एका शास्त्रातील

विचारपद्धती दुसऱ्या शास्त्रात लावून तेथे गडबड उडवून देत. निर्णायक सिद्धान्त मांडणारे विचारवंत म्हणून महाराष्ट्रात त्यांचे स्थान मोठे आहेच; पण अर्धकच्चे सिद्धांत मांडीत असतानाही वाचकांना अस्वस्थ करणारे, त्यांच्या विचारशक्तीला जबरदस्त चालना देणारे, आणि भविष्यकालीन बौद्धिक विकासाची पायाभरणी करणारे विचारवंत म्हणून त्यांचे स्थान अधिक मोठे आहे. महाराष्ट्राचे बौद्धिक जीवन ताजे नि वाहते राहावे म्हणून अशा विचारवंताचे लेखन महाराष्ट्रियांच्या नजरेसमोर सदैव राहिले पाहिजे. त्या दृष्टीने डॉ. य. दि. फडके यांनी संपादिलेल्या 'केतकर लेखसंग्रह' या प्रस्तुत ग्रंथाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

एखाद्या लेखकाच्या निवडक लेखनाचा संग्रह तयार करणे हे कार्य वरवर सोपे दिसते; पण वस्तुतः ते तसे नसते. असा संग्रह प्रातिनिधिक व्हावा लागतो. त्यासाठी, लेखकाने ज्या विविध क्षेत्रांत लेखन केले असेल ती क्षेत्रे आधी निश्चित करून घेतली पाहिजेत. ही क्षेत्रे गद्य, पद्य, निबंध, प्रबंध, कथा, कादंबरी अशा बाह्य रूपांवरून ठरतात; पण त्याहूनही आशयाच्या विविधतेवरून किंवा आंतरिक रूपांवरून ठरतात. क्षेत्रे निश्चित झाली की त्या त्या क्षेत्रातील लेखनाचा गाभा कशात आहे, याचा निर्णय घ्यावा लागतो. मग तो गाभा ज्यांत प्रतिबिंबित होईल असे उतारे नेमके हुडकून त्यांचा समावेश संग्रहात करावा लागतो. आशयाच्या तळाशी गेल्याशिवाय, त्यातील तारतम्य जाणल्याशिवाय, आणि त्याचे बाहेरच्या ज्ञानसंग्रहाच्या वा कलाविकासाच्या अनुरोधाने मूल्यमापन केल्याशिवाय हे सारे नीट करता येत नाही. त्यातून लेखकाच्या विचारांत वा साहित्यकलेत जर बरीवाईट परिवर्तने झाली असतील तर संग्रहकाराचे काम आणखी अवघड होते. त्याला ठळक परिवर्तनांचा शोध घ्यावा लागतो आणि तीही संग्रहात प्रतिबिंबित होतील अशा धोरणाने उताऱ्यांची निवड करावी लागते. बरे, लेखनाची विविध क्षेत्रे आणि असली परिवर्तने यांचा वेध घेऊनच भागत नाही. तो वेध अशा रीतीने घ्यावा लागतो, की जो ठसा समग्र लेखन वाचून संग्रहकाराच्या मनावर उमटला असेल तोच किंवा तसाच ठसा संग्रह वाचून वाचकांच्या मनावर उमटावा. म्हणजेच सुट्या उताऱ्यांनी एकेका क्षेत्राचे किंवा परिवर्तनाचे प्रतिनिधित्व जसे केले पाहिजे तसेच प्रतिनिधित्व समग्र लेखनाचे समग्र संग्रहाने केले पाहिजे. थोडक्यात असे म्हणता येईल, की भरपूर अभ्यासानंतर विशिष्ट लेखक स्वतःला जसा भावला तसा उताऱ्यांच्या माध्यमातून तो वाचकांसमोर हुबेहूब उभा करणे हे संग्रहकाराचे कर्तव्य असते. 'निवडक संग्रह' म्हणजे संग्रहकाराचे त्या लेखकावरचे एक मूक भाष्यच होय. त्या भाष्यात मूळ लेखकाच्या प्रतिबिंबाबरोबर संग्रहकाराचेही प्रतिबिंब उमटते आणि त्याचा मगदूर कसाला लागतो.

निवडक संग्रह प्रातिनिधिक नि आदर्शभूत कसा करावा याची अचूक कल्पना संग्रहकाराला असली तरी ती जशीच्या तशी कृतीत उतरविणे त्याला नेहमीच शक्य होते असे नाही. त्याच्या मार्गात काही दुर्लंघ्य नि अनुल्लंघ्य अशा व्यावहारिक अडचणी

उभ्या असतात. पहिली अडचण म्हणजे पृष्ठसंख्येची मर्यादा. प्रातिनिधिक संग्रहाला स्वाभाविकपणे जेवढी पृष्ठे लागतील तेवढी त्याच्या हाताशी असतील तर प्रश्न नसतो. पण नसतील तर मूळ लेखनातील काही लक्षणीय भाग त्याला गाळावा लागतो, किंवा त्याच्या अपुऱ्या दर्शनावर समाधान मानावे लागते, किंवा निवडीचा आपला निकष एकंदरीने अधिक व्यावर्तक ( exclusive ) करावा लागतो. दुसरी अडचण म्हणजे जे लेखन महत्त्वाचे वाटते पण ज्याचे उतारे काढता येत नाहीत असे लेखन. केव्हा केव्हा लेखक आपले प्रतिपाद्य क्रमाक्रमाने ग्रंथभर विकीर्णपणे सांगून टाकतो आणि त्या प्रतिपाद्याचे सारांशाने नि सामग्र्याने दर्शन कोठेच घडवीत नाही. अशा वेळी ते प्रतिपाद्य एखाद्या सलग उताऱ्यातून मांडणे संग्रहकाराला अशक्यप्राय होऊन बसते. मग छोटे छोटे अनेक उतारे एकापुढे एक जोडून किंवा स्वतःच्या प्रास्ताविकात ते प्रतिपाद्य स्वतःच्या शब्दांत सांगून संग्रहकाराला काम भागवावे लागते. याशिवाय, उतारे घेण्याचे अधिकार उपलब्ध नसणे, संग्रह ज्या भाषेत काढावयाचा असेल त्याखेरीज अन्य भाषांत मूळ लेखकाने महत्त्वाचे लेखन केलेले असणे, समूहनिर्मित ग्रंथात आपल्या लेखकाचे नेमके लेखन कोणते यासंबंधी संदिग्धता असणे, यांसारख्याही अनेक अडचणी सांगता येतील. या सर्व अडचणींशी झगडता झगडता संग्रहकाराला आपल्या आदर्श कल्पनेत बरीच काटछाट करावी लागते, आणि शेवटी जे काही हाती उरेल त्यावर समाधान मानावे लागते.

प्रस्तुत संग्रह तयार करताना, तो पूर्णतया प्रातिनिधिक व्हावा अशीच डॉ. य. दि. फडके यांची इच्छा असणार आणि त्यांच्याही मार्गात अनेक व्यावहारिक अडचणी आलेल्या असणार, याविषयी मला संदेह नाही. डॉ. केतकरांनी ' The History of Caste in India ' या ग्रंथाच्या दोन खंडांत हिंदु-समाज-घटनेचा जो उलगडा केला तो त्यांच्या सर्व समाजशास्त्रीय विचारांचा केंद्रबिंदू होता, असे म्हणता येईल. डॉ. फडक्यांनीही तशा अर्थाचे विधान आपल्या प्रस्तावनेत केले आहे. पण हिंदू समाजाच्या घटनेसंबंधी डॉ. केतकरांचा अभिप्राय चांगल्या रीतीने व्यक्त करणारा उतारा या संग्रहात समाविष्ट होऊ शकलेला नाही. डॉ. केतकरांनी एके ठिकाणी अभिमानाने म्हटले आहे, की " वेदांच्या अत्यंत मोठ्या अभ्यासकांत माझे नाव केव्हातरी होईल, ही माझी खात्री आहे. " त्यांचे हे म्हणणे एका विस्तृत अवतरणातून डॉ. फडक्यांनी वाचकांपर्यंत पोचविलेही आहे. पण डॉ. केतकरांच्या वैदिक संशोधनाची कल्पना देणारा उतारा प्रस्तुत संग्रहात आलेला नाही. आयुष्याच्या अखेरीस डॉ. केतकरांनी जे राजकारण केले त्यात त्यांच्या विचारविकासाची एक विचित्र अवस्था प्रतिबिंबित झाली होती, हे कोणाही निःपक्षपाती अभ्यासकाला मान्य होईल. " अखेरच्या वर्षांत ... ते एका अजब कल्पनासृष्टीत रमले होते " असे खुद्द डॉ. फडकेच म्हणतात. पण या राजकारणावर किंवा अजब कल्पनासृष्टीवर प्रकाश टाकील असा उतारा या संग्रहात आढळत नाही. डॉ.

केतकरांनी ' महाराष्ट्रीय वाङ्मयसूची 'ला जी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली तिच्यात भाषा-हिताच्या अभ्यासाचा एक नवा आदर्श महाराष्ट्रापुढे त्यांनी ठेवला. पण त्या प्रस्तावनेची कोणतीच दखल या संग्रहाने घेतलेली नाही. संग्रहाच्या प्रतिनिधिक स्वरूपाला थोडाफार उणेपणा आणणाऱ्या अशा ज्या काही गोष्टी मला जाणवतात त्यांचे मूळ संग्रहकारापुढील पूर्वोक्त व्यावहारिक अडचणीत असावे, असे मी समजतो. शिवाय, जे लेखन डॉ. केत-करांना श्रेय देणारे नाही, सदोष नि शबल आहे, त्या लेखनाचा उतारा शक्यतोवर घेऊ नये, असाही डॉ. फडक्यांचा दृष्टिकोन दिसतो. त्यामुळेच उत्तरकालीन राजकारणासंबंधी किंवा तत्सम उतारे त्यांनी टाळले असावेत. प्रातिनिधिक म्हणजे फक्त चांगल्याचे प्रतिनि-धित्व करणारे, असा त्यामागचा विचार आहे.

डॉ. फडक्यांची प्रदीर्घ प्रस्तावना हे या संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. उताऱ्यांच्या निवडीत ज्या उणिवा अपरिहार्यपणे राहून जातात त्यांची भरपाई प्रस्तावनेने व्हावी अशी व्यवस्था डॉ. फडक्यांनी केली आहे. या प्रस्तावनेत डॉ. केतकरांच्या जीवनाचा नि विशेषतः विचारसृष्टीचा परिचय विहंगम-दृष्टीने ते करून देतात. त्यामुळे, उताऱ्यांतून निसटलेले अनेक महत्त्वाचे दुवे वाचकांच्या हाती लागतात आणि त्यांना पूर्णतेचे समाधान मिळते. विचारसृष्टीचा परिचय करून देताना ते डॉ. केतकरांच्या ग्रंथांचा नुसता सारांश सांगत नाहीत, तर समकालीन विचारधारांशी त्या विचार सृष्टीची तुलना करतात आणि तिच्यावर मूल्यमापनात्मक भाष्यही करतात. यामुळे, महाराष्ट्रांतील विचारवंतांत डॉ. केतकरांचे स्थान निश्चित करण्यास जिज्ञासूंना बहुमोल साह्य मिळेल, हे सांगायला नको.

डॉ. केतकरांच्या स्फुट लेखांचे दोन संग्रह यापूर्वी मराठीत प्रसिद्ध झालेले माझ्या पाहण्यात आहेत. पैकी पहिला संग्रह ज्ञानकोशापूर्वी डॉ. केतकरांच्या हयातीतच प्रसिद्ध झाला आणि त्यात तोपर्यंत त्यांनी लिहिलेल्या काही संकीर्ण लेखांना स्थान मिळाले. दुसरा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनी श्री. गं. दे. खानोलकरांनी काढला आणि त्यात त्यांच्या काही वाङ्मयविषयक लेखांचा समावेश केला. हे दोन्ही संग्रह आपापल्या परीने चांगले आणि उपयुक्त असले तरी डॉ. केतकरांच्या समग्र लेखनाचे विहंगम दर्शन घडवावे असा काही त्यांचा हेतू नव्हता. तसा हेतू पुढे ठेवून तयार केलेला पहिला संग्रह म्हणजे प्रस्तुत संग्रह होय. या संग्रहाने आपला हेतू बऱ्याच प्रमाणात साध्य केलेला आहे असेच त्याच्या वाचनानंतर कोणाच्याही लक्षात येईल. डॉ. केतकरांचे आणि विचारविकासाचे जे कोणी चाहते असतील त्या सर्वांना ह्या संग्रहाच्या संपादनाबद्दल डॉ. फडक्यांचे आणि प्रकाशनाबद्दल साहित्य अकादमीचे खचित अभिनंदन करावे वाटेल.

— द. न. गोखले

कीर्ती महाविद्यालय,
दादर, मुंबई २८
५ सप्टेंबर १९७७

## या पुस्तकाविषयी थोडेसे

या पुस्तकाचे पाच विभाग आहेत. प्रत्येक विभागाच्या आरंभी परिचयात्मक टिपण दिले आहे. या पुस्तकासाठी निवडलेले उतारे हे जसे मुळात प्रसिद्ध झाले तसेच शक्यतो घेतले आहेत. जेथे मुळातल्या मजकुरात सरळसरळ मुद्राराक्षसाचा प्रताप आढळला तेथेच फक्त बदल करण्यात आला आहे. डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकरांचे चरित्र, त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांची विचारसृष्टी व त्यांचे साहित्य यांचा परिचय करून देण्यासाठी मी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. १९७३ च्या 'मौज' वार्षिकाच्या दिवाळी अंकात 'डॉ. केतकरांचे विचारविश्व' हा माझा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यातील काही भाग या पुस्तकातील प्रस्तावनेत समाविष्ट करण्यात आला आहे.

या पुस्तकाचे हस्तलिखित डॉ. द. न. गोखले यांनी काळजीपूर्वक वाचून उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

–य. दि. फडके.

# प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रात आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडून समाज-प्रबोधनासाठी आवश्यक अशी कामे निर्धाराने पार पाडणारी जी थोर माणसे होऊन गेली त्यापैकी डॉ श्रीधर व्यंकटेश केतकर हे एक होत (जन्मदिन २ फेब्रुवारी १८८४). आपल्या आयुष्याची ऐन उमेदीची बारा वर्षे (१९१५–१९२७) महाराष्ट्रीय ज्ञानकोशा-सारख्या मूलतः संकलनात्मक पण प्रचंड ग्रंथाच्या निर्मितीत घालवल्यानंतर केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राचा संगतवार इतिहास लिहिण्याचे जिकीरीचे काम हाती घेतले पण या प्रकांडपंडिताच्या अकाली मृत्यूमुळे (मृत्यूदिन १० एप्रिल १९३७) ते पुरे होऊ शकले नाही. अवघ्या ५३ वर्षांच्या आयुष्यात केतकरांनी विपुल लेखन केले. महाराष्ट्र त्यांना ज्ञानकोशकार म्हणून ओळखीत असला तरी ज्ञानकोशाखेरीज त्यांनी विविध विषयावर विचारास चालना देणारे लेखन केले आहे हे विसरून चालणार नाही. ज्ञानकोशाचे काम हाती घेण्यापूर्वी त्यांनी इंग्रजीत समाजशास्त्रविषयक दर्जेदार लेखन केले आहे. हे त्यांचे आरंभीच्या काळातील संशोधन नंतर लिहिलेल्या ज्ञानकोशासारख्या मराठी ग्रंथात त्यांनी बव्हंशी समाविष्ट केले आहे याची अनेकांना कल्पना नसते. ज्ञानकोश पुरा करीत असतानाच त्यांनी कादंबऱ्याही प्रसिद्ध करावयास प्रारंभ केला होता.

केतकरांच्या या हजारो पृष्ठांच्या विविध व विपुल लेखनातून या संग्रहासाठी एकूण बावीस उतारे निवडले आहेत. त्यांच्या विचारविश्वाचे ओझरते दर्शन घडवावे हे जसे ही निवड करताना उद्दिष्ट ठेवलेले आहे त्याचप्रमाणे त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्याच शब्दात वेध घेण्याचाही प्रयत्न केला आहे. आपले आयुष्य इतर व्यक्तींच्या आयुष्यापेक्षा काहीसे निराळे झाले याची त्यांना जाणीव होती. ते अवघे चार पाच वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले. त्यांच्या चुलत्यांनी किंवा त्यांच्या थोरल्या बंधूंनी केतकरांच्या उमरावतीच्या स्वच्छंदी विद्यार्थीजीवनाला काही वळण लावण्याचा प्रयत्न केला नाही. "या काळांत शाळेला जावे, तेथे ऐकू येईल ते पुराण ऐकावे, मराठी पुस्तके वाचीत बसावे, कविता करावी, देशाभिमानाच्या गोष्टी कराव्यात" असे आपण दिवस घालवल्याचे त्यांनी स्वतःच आपल्या आठवणीत सांगितले आहे. महाविद्यालयात प्रवेश करण्यापूर्वी म्हणजे १९०० साली केतकरांची आई व थोरली बहीणही वारली त्यामुळे जगभर वाटेल तिकडे भटकावयास आपण स्वतंत्र झालो असे त्यांना वाटू लागले. अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या तरुणांच्या पहिल्या पिढीचे केतकर हे एक प्रतिनिधी होते. ते विल्सन कॉलेजात (१९०१ ते १९०५) शिकत असताना आवतीभोवतीच्या राजकीय वातावरणाचे त्यांच्या मनावर जे संस्कार झाले त्यांचे या संग्रहातील पहिल्या उताऱ्यात स्वच्छ प्रतिबिंब उमटले आहे. केतकरांच्या कादंबऱ्यांतील काही पात्रांच्या मुखवट्यामागे

दडलेले केतकरही सहज ओळखता येतात. कादंबऱ्यांतील प्रमुख पात्रांच्या जीवनाचे दर्शन घडवताना केतकरांनी स्वतःच्या आयुष्यातील घटनांचे व अनुभवांचे निवेदन केलेले आहे. या संग्रहातील पाचव्या उताऱ्यात आढळणारा 'परागंदा' कादंबरीतील विष्णु सरंजामे या पात्राचा पूर्ववृत्तान्त केतकरांच्या जीवनकथेशी बराचसा मिळताजुळता आहे. विष्णु सरंजामे हे केतकरांचेच एक रूप आहे. 'आशावादी' कादंबरीतला ब्रह्मगिरी मुंबईस विद्यार्थी असताना एकदोनदा पुण्याला गेला तेव्हा "स्वदेशाभिमानाचे आदिपीठ जे पुणे शहर" ते त्याला कसे दिसले व नंतर तो स्वदेश सोडून अमेरिकेस जाण्यास का प्रवृत्त झाला हे केतकर सांगतात. (पाहा : या संग्रहातील सहावा उतारा) तेव्हाही ते स्वतःचाच अनुभव सांगत आहेत हे उघड दिसते.

अमेरिकेतील जवळजवळ पाच वर्षांच्या वास्तव्यात (२ जून १९०६ ते २ मे १९११) केतकरांनी कॉर्नेल विद्यापीठात समाजशास्त्राचे अध्ययन केले व बी. ए., एम्. ए. व पीएच. डी. या पदव्या मिळवल्या. अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचा जातिसंस्थेच्या इतिहासाबद्दलचा प्रबंध प्रसिद्ध झाला आणि त्या काळच्या विख्यात समाजशास्त्रज्ञांनी व प्राचीन भारतीय संस्कृतीच्या विदेशी अभ्यासकांनी त्यांच्या संशोधनाचा परामर्श घेतला. मात्र त्यांनी केलेली प्रशंसा ही त्यांच्या समाजशास्त्रीय ज्ञानाच्या अल्पत्वावरच रचलेली आहे असे केतकरांनी सदैव मानले. परदेशी पंडितांच्या प्रशंसेला जसे त्यांनी मुळीच महत्त्व दिले नाही तसेच भारतातल्या टीकाकारांनी केलेली टीकाही त्यांनी कधी मनावर घेतली नाही. "समाजशास्त्रीय विषयावर बरीच वर्षे अभ्यास केलेला असा पहिला लेखक मीच असल्यामुळे आणि हिंदुस्थानात त्याप्रकारचे वाचन शिक्षण काहीच नसल्यामुळे" येथील टीकेकडेही आपण दुर्लक्ष केले असे त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. [पाहा- या संग्रहातील दुसरा उतारा]

केतकरांचे हे समर्थन तितकेसे बरोबर नव्हते. त्यांच्या मराठी ग्रंथातील व लेखांतील- विशेषतः ज्ञानकोशातील– काही विधानांबाबत आक्षेप घेणाऱ्या टीकाकारांत धर्मानंद कोसंबी, गो. चिं. भाटे, धनंजयराव गाडगीळ, नानासाहेब पावगी, अप्रबुद्ध, चिं. वि. जोशी, द. के. केळकर, मा. के. काटदरे, श्री. म. वर्दे अशा नामवंत अभ्यासकांचा समावेश होता. प्राचीन महाराष्ट्रासंबंधीच्या त्यांच्या संशोधनातील उणिवा प्रा. अ. स. अळतेकरांसारख्या तज्ज्ञाने दाखवल्या. वा. वि. मिराशी यांनी विदर्भ व कालिदास यासंबंधीच्या केतकरांच्या विवेचनावर आक्षेप घेतले होते. या सर्व टीकाकारांना त्या त्या अभ्यासविषयात काहीच गम्य नाही अशा समजुतीने त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा त्यांच्या टीकेतील ग्राह्याग्राह्यता लक्षात घेऊन आपल्या भूमिकेचा फेरविचार करण्याचा त्यांनी प्रयत्न करावयास हवा होता. 'जितं मया' अशा वृत्तीनेच ते लहानापासून वडिलधाऱ्यापर्यंत सर्व टीकाकारांशी वाद खेळत असावेत असा ग्रह होतो.

खरे म्हणजे स्वतःखेरीज महाराष्ट्रातल्या नव्हे तर साऱ्या देशातल्या फारच थोड्या समकालीन विद्वानांविषयी केतकरांचे मत चांगले होते. या मोजक्या आदरणीय पंडितांमध्ये

लोकमान्य टिळक व इतिहासाचार्य राजवाडे या दोघांचा समावेश होता. लोकमान्यांविषयीची त्यांची आदरभावना ज्ञानकोशातील टिळकांबद्दलच्या विस्तृत नोंदीत व्यक्त झाली आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांच्या प्रखर ज्ञानोपासनेबद्दल व विलक्षण व्यक्तिमत्वाबद्दल केतकरांना वाटणारा आदर राजवाड्यांसंबंधीच्या त्यांच्या लेखनात स्पष्ट दिसतो. या दोघांचे सख्य हे समानशीलांचे सख्य होते. ‘ गोंडवनातील प्रियंवदा ’ व ‘ ब्राह्मणकन्या ’ या कादंबरीतील इतिहाससंशोधक वैजनाथशास्त्री ही सरळसरळ राजवाड्यांची प्रतिमा आहे. ( पाहा– या संग्रहातील सात व आठ क्रमांकांचे उतारे ) राजवाड्यांच्या कार्याचे त्यांनी केलेले यथार्थ मूल्यमापनही लक्षणीय आहे. ( पाहा– उतारा क्रमांक चार ) राजवाड्यांच्या बहुविध उद्योगांचे व विविध विषयाबद्दल त्यांना वाटणाऱ्या आस्थेचे रहस्य उकलून दाखवताना केतकरांनी म्हटले आहे, “ जेव्हा संस्कृतीस चालना देऊ इच्छिणारा एखादा लेखक स्पर्धाक्षेत्राबाहेर जातो, तेव्हा त्यास असे वाटू लागते की अभ्यासक्षेत्र कितीतरी विस्तीर्ण आहे आणि आपल्या राष्ट्रात त्यापैकी कोणत्याच अंगाची कल्पना नाही. तेव्हा त्या अशा लेखकास, निरनिराळ्या दिशांनी प्रयत्न करून व तुडविलेली क्षेत्रे काही अंशी स्वतः तुडवून, आपण पुढे जावे आणि इतरांस, आपल्या पाठोपाठ येऊन, त्या क्षेत्रांचे अधिक पद्धतशीर आक्रमण करण्यास ते क्षेत्र मोकळे ठेवावे, असे वाटू लागते. ” राजवाड्यांच्याबाबत त्यांचे हे म्हणणे जितके खरे होते तितकेच ते त्यांच्याबाबतही खरे होते. राजवाड्यांच्याप्रमाणेच “ महाराष्ट्राच्या बुद्धीस सर्व प्रकारे चालना देण्यासाठी ” केतकरांनीही “ अनेक क्षेत्रांत संशोधन स्वतः आपल्या अंगावर घेतले. ” व राजवाड्यांच्याप्रमाणेच तेही आपल्या आयुष्याकडे “ संस्कृतीविकासप्रवर्तक ” ह्या नात्याने पाहात होते.

केतकरांचे जीवितकार्य, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्यांच्या साहित्याचे व विचारसृष्टीचे स्वरूप समजावून घेण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या विचारजागृतीचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव नीट लक्षात घेणे जरूर आहे. पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट स्थिर झाली. एलफिन्स्टनसारखे राज्यकर्ते एतद्देशियांचा इतिहास, त्यांची विद्या व परंपरा समजावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. बेंटिंक ते डलहौसीपर्यंतच्या गव्हर्नर–जनरलांच्या अमदानीत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या हिरीरीने भारताचे आधुनिकीकरण घडवून आणण्याच्या प्रक्रियेला चालना दिली. बेंथॅम–मिल्लच्या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे, एव्हँगेलिकल या ख्रिस्चन धर्ममताच्या पगड्यामुळे, पाश्चिमात्य संस्कृतीच्या वरचढपणाच्या जाणीवेमुळे आणि इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पहिल्या अवस्थेच्या समाप्तीमुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीच्या दडपणाखाली कंपनीच्या राजवटीत आर्थिक, सामाजिक व शासकीय सुधारणांचा या कालखंडात ( १८२८ ते १८५६ ) राज्यकर्त्यांनी जोरदार पुरस्कार केला. एतद्देशियांच्या धर्मसमजुतींना शक्यतो धक्का न लावता त्यांचा कल लक्षात घेऊन काही बदल त्यांच्या गळी उतरवावयाचे हे एलफिन्स्टनसारख्या मुत्सद्यांचे धोरण या कालखंडात राहिले नाही. देशी भाषांऐवजी इंग्रजी भाषेचा प्रसार होऊ लागला. इंग्रजी विद्येच्या प्रभावामुळे

लोकहितवादीसारख्यांची नवी आंग्लविद्याविभूषित पिढी आपली समाजरचना, आपला धर्म, आपली परंपरा यावर हल्ला चढवू लागली. पाश्चिमात्य संस्कृतीने व विशेषतः इंग्लंडने केलेल्या प्रगतीमुळे हे लोक दिपले असणे स्वाभाविक होते. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी तर येथील आचारविचाराविरुद्ध सतत मोहीम चालवलीच होती.

धार्मिक व सामाजिक बाबतीत हात घालण्याचा उद्योग अंगलट येण्याचा धोका ओळखून सत्तावनच्या उठावानंतर इंग्रजांच्या नव्या राजवटीने भारतीय समाजसुधारकांना त्यांच्या प्रयत्नाबद्दल सदिच्छा व्यक्त करण्यापलीकडे फारसे सक्रीय साहाय्य न करण्याचे धोरण स्वीकारले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विद्यापीठातून बाहेर पडलेल्या पदवीधरांच्या पहिल्या पिढीने–म्हणजे रानडे भांडारकरांच्या–पिढीने धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे कसोशीने प्रयत्न केले. पण त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अव्वल इंग्रजीतल्या सुधारकांनी आपली समाजव्यवस्था, आपला धर्म, आपल्या परंपरा यांच्यावर केलेल्या टीकेचे स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांच्या अभिमानाने प्रेरित होऊन विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आवेशाने खंडन केले. चिपळूणकर व लोकमान्य टिळकांच्या पूर्वगौरववादी जहाल राष्ट्रवादाने इतिहासाचार्य राजवाड्यांप्रमाणेच केतकरही भारले होते हे लक्षात घेतले की सुधारकांची टवाळी करण्याची संधी ते का सोडीत नसत हे समजण्यासारखे आहे.

"महाराष्ट्रातील व त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील इतर भागात प्रमुख असलेल्या सुधारकांच्या लेखांचे अवलोकन केले तर मर्कटवृत्ती आणि पोरटपंचीशिवाय दुसरे काही दिसत नाही" ( संकीर्ण लेख पृ. ८०–८१ ) अशी त्यांची खात्री झाली होती. सुधारकांच्या विषयी केतकरांनी अगदी आरंभीच्या काळात व्यक्त केलेले हे मत त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत कायम होते. ते बदलण्याची त्यांना कधी आवश्यकता वाटली नाही. देवळांच्या द्रव्यावर सार्वजनिक ताबा उत्पन्न करण्यासाठी मद्रास येथे झालेल्या प्रयत्नांचे त्यांनी स्वागत केले पण सामाजिक सुधारणेसाठी कायदे करण्याचे इतर सर्व उद्योग त्यांना आंग्लशूद्रत्व-मूलक आणि त्यामुळे अत्यंत आक्षेपार्ह वाटले. "संमतिवयाचा कायदा, उपवरतेनंतरचे लग्न कायदेशीर करू पाहण्याचा कायदा आणि शारदा यांनी केलेला कायदा हे सर्व समाजात उत्पन्न झालेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नसून विवाहाची मर्यादा मुद्दाम वाढविण्यासाठी इंग्रजांच्या पढिक शिष्यांच्या प्रयत्नाने झालेले किंवा फसलेले कायदे आहेत." ( भारतीय समाजशास्त्र पृ. ५९ ). या शब्दात त्यांनी कायद्यामार्फत सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्यांची संभावना केली आहे.

भारतातील समाजव्यवस्थेचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास न करता मिशनऱ्यांच्या नादाने किंवा इंग्रज राजकर्त्यांच्या मतलबी प्रचाराला बळी पडून हिंदूंची समाजव्यवस्था, त्यांचा धर्म व परंपरा यांवर समाजसुधारक म्हणविणारे कडाडून टीका करतात अशी त्यांची समजूत होती. "तुमचे पुरुष दुष्ट, आमचे युरोपिअन लोक चांगले अशा तऱ्हेच्या गप्पा कित्येक मतलबी इंग्रज मिशनरी पसरवून देत आहेत. त्यांच्या मनात आमच्या ब्राह्मणांत आणि

शूद्रांत वैमनस्य उत्पन्न करावयाचेच आहे आणि आमच्या पुरुषांत आणि बायकांत तेढ उत्पन्न करून देऊन आमचे इंग्रज लोक पाठिराखे आहेत ही भावना आमच्या बायकांत उत्पन्न करावयाची आहे. अलीकडे सुधारक म्हणवून घेणाऱ्यांची जी एक अडाणी टोळी उत्पन्न झाली आहे तीदेखील त्या त्यांच्या हेतूस मदत करीत आहे." (पाहा: या संग्रहातील उतारा क्रमांक ७) शारदाबाईस वैजनाथशास्त्री हे सांगताना दिसत असले तरी त्यांच्या मुखाने केतकरच आपले मत बोलून दाखवीत आहेत हे उघड आहे.

समाजसुधारकांच्या कार्याविषयी केतकरांना वाटणारी अनादराची भावना ज्ञानकोशातील विविध नोंदीतही कळत न कळत व्यक्त झाली आहे. गोपाळराव आगरकरांविषयीच्या ज्ञानकोशातील टिपणात त्यांच्या समाजसुधारणाविषयक तात्त्विक भूमिकेबद्दल त्यांनी कसलाही उल्लेख केलेला नाही. बाळशास्त्री जांभेकरांबद्दल माहिती देतानाही ज्ञानकोशकार जांभेकरांच्या समाजसुधारणेच्या कार्याबद्दल अवाक्षर ते लिहीत नाहीत. जोतीराव फुले यांच्याविषयी स्वतंत्र टिपण ज्ञानकोशाच्या शरीरखंडात आढळत नाही. ही उणिव अर्थपूर्ण आहे. जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाची महाराष्ट्रीय ज्ञानकोशात स्वतंत्रपणे दखल घ्यावी असे केतकरांना वाटले नाही हेदेखील लक्षात घेण्यासारखे आहे.

मात्र जे जे जुने ते ते चांगले असे मानणाऱ्या कर्मठ सनातनी मंडळीपैकी केतकर एक होते असे मानण्याचे कारण नाही. आपले पूर्वज आपल्यापेक्षा निश्चित शहाणे होते, प्राचीन कालातील ऋषीमुनी त्रिकालदर्शी होते असे न समजता त्यांच्याविषयी वाजवी आदर बाळगून त्यांच्या चुका दाखविण्यास हरकत नाही अशी त्यांची भूमिका असल्याचे जातिव्यवस्थेसंबंधीच्या त्यांच्या इंग्रजी प्रबंधावरून दिसते. सध्याची समाजाची रचना बदलावयाची असली तर त्यासाठी एकतर परंपरासंमत मार्गाने जावे लागेल किंवा परंपरापतित मार्गाचा अवलंब करावा लागेल असे त्यांचे मत होते. जैन, बौद्ध, महानुभाव, लिंगायत किंवा ब्राह्मो संप्रदायाच्या अनुयायांचा समावेश त्यांनी परंपरापतित मार्गाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळीत केला आहे तर भागवत संप्रदायाच्या अनुयायांची गणना परंपरा-संमत मार्गाने जाणाऱ्या मंडळीत करावी लागेल असे त्यांनी म्हटले आहे. मात्र परंपरा-पतित मार्गाने जाऊन समाजाची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न केतकरांना अजिबात पसंत नव्हते. परंपरा-संमत मार्गानेच हिंदु समाजाची पुनर्रचना करणे शक्य आहे असा त्यांना विश्वास वाटत असल्याचे हिंदू धर्मातील जातीविषयीच्या प्रबंधावरून स्पष्ट दिसते.

परंपरा-संमत मार्गाचा पुरस्कार करणाऱ्यांनी सध्याची समाजरचना ज्या जातिसंस्थेवर आधारलेली आहे तिचे नेमके स्वरूप लक्षात घेतले पाहिजे व तीत कालमानानुरूप परिस्थितीनुसार असंख्य छोटे बदल घडवून आणले पाहिजेत असे त्यांचे मत होते. स्वतःला सुधारक म्हणवून घेणारे लोक त्यासाठी आवश्यक असे प्रचलित समाजव्यवस्थेचे सर्वांगीण ज्ञान मिळवीत नाहीत अशी त्यांची तक्रार होती. "महाराष्ट्रातील प्रमुख सुधारकात कोणी इतिहासकार नाही, समाजशास्त्री नाही व धर्मशास्त्रवेत्ताही नाही. रानडे व चंदावरकर हे दोघे गृहस्थ सुधारकांचे अग्रणी होते. दोघांनाही धर्मशास्त्राशी अतिशय संबद्ध असलेले जे

कायद्याचे क्षेत्र त्या क्षेत्राशी त्यांचा निकट संबंध आला होता; पण त्या दोघांसही पाश्चिमात्य कायदेशास्त्र अवगत होते असे दिसत नाही व धर्मशास्त्रास ते दोघेही पूर्णपणे पारखे होते. सुधारणेचे जे अग्रणी त्यांची स्थिती या प्रकारची, तर मग इतरेजनांची स्थिती काय असणार ? " (पाहा—या संग्रहातील उतारा क्रमांक सतरा ).

केतकर समाजक्रांतीच्या तयारीची भाषा क्वचित कधीतरी बोलत. (पाहा – या संग्रहातील उतारा क्रमांक एकोणीस ) त्यामुळे चकण्याचे कारण नाही. इंग्रजी राजवटीमुळे भारतात आर्थिक स्थित्यंतर घडून येत होते. " अज्ञानी व अशिक्षित वर्गाची महत्त्वाकांक्षा जागृत " झाली होती. साक्षरतेचा प्रसार होत होता. निकृष्ट समाजास आपल्या प्रयत्नाने आपले राजकीय महत्त्व वाढविण्याची संधी उपलब्ध झाली होती. या घडामोडींचे दूरगामी परिणाम काय होतील हे ओळखून त्यांना ब्राह्मणादि पुढारलेल्या वर्गांनी कसे तोंड द्यावयाचे हे सांगण्याचा केतकरांचा प्रयत्न दिसतो. सर्वसाधारणपणे प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल त्यांना अभिप्रेत होता असे दिसत नाही. त्यांच्या लेखनात क्रांतीपेक्षा सामाजिक उत्क्रांतीच्या संकल्पनेला अधिक महत्त्व आहे हे विसरून चालणार नाही. " जुने जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका " ही भाषा त्यांना हास्यास्पद व वेडगळपणाची वाटली असती हे त्यांचे लेखन वाचणाऱ्यांच्या सहज लक्षात येईल. चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदु-समाजाच्या रचनेतील विषमता नष्ट करण्यासाठी किंवा प्रचलित समाजव्यवस्थेत होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी सध्याची समाजरचना आमूलाग्र बदलून त्याऐवजी सामाजिक व आर्थिक समतेवर आधारलेल्या समाजाची निर्मिती करावी असे त्यांना कधीच वाटलेले दिसत नाही. केतकर हे समाजक्रांतीचे पुरस्कर्ते किंवा जहाल समाजसुधारक होते असे म्हणता येत नाही. श्रेणीबद्ध समाजव्यवस्था ही एक सर्वत्र आढळणारी नैसर्गिक स्थिती आहे आणि अशा समाजाच्या शिरोभागी ब्राह्मणासारखी जात असणार हे त्यांनी गृहीत धरले होते. मूळ चौकट न मोडता बदलत्या कालमानानुरूप आस्ते आस्ते छोटे बदल करावयास त्यांचा विरोध नव्हता पण तेही एकंदर समाजाच्या गळी उतरवताना परंपरेतील जो चांगला भाग आहे तो जतन करण्याची काळजी घ्यावी यावर त्यांचा कटाक्ष असे. केतकरांचा हा मूलतः ' कॉन्झर्व्हेटिव ' दृष्टिकोण लक्षात घेतला की त्यांचे जातिसंस्थे-बाबतचे विवेचन समजावून घेणे सोपे जाते.

१९०९ ते १९१४ या पाच वर्षांच्या काळात केतकरांची चार इंग्रजी पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यापैकी दोन पुस्तके म्हणजे त्यांच्या जातिसंस्थेच्या इतिहासाचे दोन खंड होते. उरलेल्या दोन पुस्तकात भारतीय अर्थशास्त्रासंबंधी व हिंदू कायद्यासंबंधी विवेचन केलेले होते. जातिसंस्थेसंबंधी केतकरांनी केलेला विचार हा त्यांच्या विचारविश्वाच्या केंद्रस्थानी आहे. आपल्या प्रबंधाच्या पहिल्या खंडात त्यांनी मनुस्मृतीचे परीक्षण केले आहे. मनुस्मृती-तील वचनांच्या अर्थाबाबत पाश्चिमात्य अभ्यासकांनी सतत गैरसमज प्रसृत केले असे त्यांना वाटल्याने त्यांनी हे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबरच इसवीसनाच्या तिसऱ्या शतकातील भारतातल्या सामाजिक परिस्थितीवर त्यांनी प्रकाश टाकलेला

आहे. प्रबंधाच्या दुसऱ्या खंडात, जातिव्यवस्थेचे हिंदूधर्माशी कोणते नाते आहे या वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाच्या संदर्भात हिंदुसमाजाची जडणघडण व त्याचे भवितव्य स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. हिंदू कायद्यासंबंधीच्या पुस्तकात हिंदू कायद्याचा इतिहास लिहिण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब केला पाहिजे हे सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी केवळ धर्मशास्त्राचा इतिहास लिहून भागणार नाही. कारण धर्मशास्त्र म्हणजे कायदा नसून कायदा करण्यासाठी धर्मशास्त्राचा उपयोग केला जाई असे त्यांचे म्हणणे होते. भारतीय अर्थशास्त्राविषयीच्या पुस्तकात हिंदूंच्या जातीवर आधारलेल्या समाजरचनेचे, सांस्कृतिक परंपरेचे व परतंत्र अवस्थेचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विशद करून भारतीय अर्थशास्त्राची आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

जातिसंस्थेच्या इतिहासाविषयी त्यांनी लिहिलेल्या प्रबंधाच्या पहिल्या खंडात त्यांनी जात कशास म्हणावे हे सांगितले आहे. जात या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक गटाचे सदस्यत्व जन्माधिष्ठित असते व या गटातील सदस्यांना गटाबाहेरच्या व्यक्तीशी विवाह करण्यास प्रतिबंध केलेला असतो अशी केतकरांनी जातीची व्याख्या केली आहे. सेनार्त, नेसफील्ड किंवा हर्बर्ट रिस्ले या पाश्चिमात्य अभ्यासकांनी केलेल्या जातीच्या व्याख्येपेक्षा केतकरांनी दिलेली व्याख्या अधिक स्पष्ट आहे. डॉ. आंबेडकरांसारख्या, केतकरांपेक्षा वेगळी व विरोधी विचारसरणी असणाऱ्या समाजशास्त्राच्या अभ्यासकानेही हे मान्य केले आहे. मात्र जातीबाहेरच्या विवाहास प्रतिबंध व जन्माधिष्ठित सदस्यत्व या केतकर मानीत होते त्याप्रमाणे दोन भिन्न गोष्टी नसून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे आंबेडकरांचे मत होते. कारण जातीजमातीतील विवाहसंबंधास मनाई केली की जातीचे सदस्यत्व आपोआपच त्या जातीत जन्माला येण्यापुरतेच मर्यादित होते. (बी. आर आंबेडकर, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट ॲंड कास्टस् इन इंडिया, भीमपत्रिका पब्लिकेशन, जलंदर, १९६८ पृ. १३३ ).

हिंदुसमाजात जातींची एक उतरंड रचलेली असते. केतकरांनी तिला 'सोपान-रचना' म्हटले आहे. या सोपानरचनेत धर्मज्ञान असणाऱ्यांना मानाचे स्थान लाभते. मनुस्मृती किंवा मानवधर्मशास्त्र हा धर्मासंबंधीचा ग्रंथ होता. धर्म म्हणजे सार्वभौमसत्तेचा आदेश किंवा कायदा नसून त्याचा अर्थ नैतिक कर्तव्य असे केतकरांचे प्रतिपादन होते. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने वर्ण चारच असतात व जाती मात्र अनेक असतात असे म्हटले आहे. अनेक जाती मिळून एक वर्ण होत असला तरी सबंध वर्ण म्हणजे एक जातही बनू शकते. याचाच अर्थ असा की मनुस्मृतीच्या काळी जात हा शब्द छोट्या, त्याचप्रमाणे मोठ्या सामाजिक गटांच्या संदर्भातही वापरला जात होता. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने आर्यवर्ण किंवा शुद्र वर्ण अशा संज्ञा वापरल्या आहेत हे खरे पण वर्ण म्हणजे वंश असा अर्थ त्याला अभिप्रेत नव्हता. वर्ण व वंश यांची गल्लत पाश्चिमात्य पंडितांनी केली व गोंधळ उडवून दिला असा केतकरांचा पाश्चिमात्य अभ्यासकाविरुद्ध आक्षेप होता.

केतकरांच्या मते मनुस्मृतीच्या काळी म्हणजे इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात सहा

प्रकारचे गट भारतात नांदत होते. १ ) मूळचे चार वर्ण २ ) विशुद्ध व मिश्र जातींच्या मिलाफातून उद्भवलेल्या जाती ३ ) पवित्र धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे ज्यांचा दर्जा कमी झाला आहे अशा जाती ४ ) जातीबाहेर काढलेल्या लोकांच्या जाती ५ ) गुलाम व त्यांचे वारस ६ ) चातुर्वर्ण्याबाहेरचे लोकसमूह हे ते सहा गट होते. तिसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या जातींना व्रात्य म्हणत. ब्राह्मणांची अवज्ञा केल्यामुळे व धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे शूद्र ठरलेल्या लोकांत यवन, शक, द्रविड, किरात वगैरेंचा समावेश होता. या जाती एकेकाळी क्षत्रिय समजल्या जात असत. क्षत्रिय, वैश्य हे वर्ण म्हणजे अनेक जातींचे समूह होते. ब्राह्मणवर्ण ही मात्र एक जात होती असा केतकरांचा निष्कर्ष होता.

शूद्रांसंबंधीच्या मानवधर्मशास्त्रातील वचनांचा अर्थ लावताना किंवा त्यावर भाष्य करताना केतकरांनी मानवधर्मशास्त्रकर्त्याची तरफदारी केली आहे व नानापरीने युक्तिवाद करून मनुस्मृतीतल्या अन्याय्य निर्बंधांचे समर्थन केले आहे. केतकरांचा हा युक्तिवाद कच्चा आहे. समाजात सुव्यवस्था राहावी अशी धर्मशास्त्रज्ञांची इच्छा असल्याने त्यांनी शूद्रांवर निर्बंध घातले. शूद्रांनी हे निर्बंध पाळल्यामुळे समाजाचे जसे हित होते तसेच शूद्रांचेही होते म्हणून शूद्रांनी आपल्या जबाबदाऱ्या ओळखण्यास शिकले पाहिजे असा केतकरांच्या लेखनाचा सूर आहे. जातिसंस्थेवरचे त्यांचे सारेच लेखन वाचताना सारखे जाणवते की हिंदुसमाजरचनेतील विषमतेवर केतकरांनी कधीच प्रहार केले नाहीत. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजात कनिष्ठ किंवा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचा कसा कोंडमारा होतो, त्यांचे कसे सतत शोषण होत राहाते, माणूस म्हणून त्यांना कशी वागणूक मिळत नाही, याविषयी केतकरांनी जवळजवळ काहीच लिहिले नाही.

जातिसंस्थेबाबतच्या केतकरांच्या विचारात स्थूलमानाने तीन अवस्था दिसतात. आरंभीच्या म्हणजे ज्ञानकोशाचे काम हाती घेण्यापूर्वीच्या काळात त्यांनी जातिभेद मोडून एक राष्ट्ररूपी जात तयार करण्याची उमेद बाळगली होती. ज्ञानकोश-रचनेच्या काळात जातिभेद मोडण्याची भाषा ते करीत असले तरी हळूहळू त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यावर व तसे करण्यातील अडचणींवरच ते भर देत असताना दिसतात. अखेरच्या वर्षांत तर सरळ जातिसंस्थेचे गोडवे गाण्याकडेच त्यांचा कल दिसतो. मात्र आरंभापासून अखेरपर्यंत चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेचाच त्यांनी पुरस्कार केलेला दिसतो. त्यातही ब्राह्मणांची एक खास भूमिका आहे असा त्यांचा विश्वास व्यक्त झालेला दिसतो. ब्राह्मणांचे दोष किंवा त्यांच्या आजवरच्या ऐतिहासिक कामगिरीतील उणिवा दाखवीत असतानाही ब्राह्मणांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे हे सांगण्यास ते विसरत नसत. ब्राह्मण आणि तत्सम प्रगत जातीपुरते पाहणाऱ्या मध्यमवर्गीय पुणेकर लेखकांची 'सदाशिवपेठी' म्हणून केतकर थट्टा करीत पण खरे म्हणजे त्यांचा चातुर्वर्ण्याचा अभिमान, विशेषतः ब्राह्मण जातीच्या कार्याबद्दलची त्यांची गौरवभावना, दलितांच्या दुःखाविषयी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविषयीची त्यांची उदासीन वृत्ती ही 'सदाशिवपेठी' या विशेषणाने सूचित होणाऱ्या मनोवृत्तीपेक्षा काही वेगळी नव्हती.

मुळात हिंदुसमाजात चार वर्ण होते, कालांतराने या चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुसमाजाचे तुकडे पडून आजच्या तीन हजार जाती तयार झाल्या ही लोकप्रिय उपपत्ती केतकरांना मान्य नव्हती. आजचा हिंदुसमाज अनेक राष्ट्रजातींचा (ट्राईब्ज) मिलाफ होऊन बनलेला आहे. या अनेक राष्ट्रजातींचा परस्परांशी संपर्क वाढल्यामुळे कालांतराने त्यांनी समान चालीरीती, परंपरा व कल्पना स्वीकारल्या. विशेषतः ब्राह्मणांनी स्थलांतर व देशांतर करून त्यांचा प्रसार केला. "विस्तीर्ण समाजाची एक जनता करणे इत्यादी क्रिया करून ब्राह्मणांनी एक व्यापक संस्कृती स्थापन केली." असे केतकरांचे म्हणणे होते. (भारतीय समाजशास्त्र पृष्ठे २४०-२४१) ब्राह्मणांची ही समाजविस्तारक विद्या जागतिक संस्कृती निर्माण करण्यास उपयोगी पडेल असा त्यांचा दृढ विश्वास होता.

गुणकर्मानुसार कोणत्याही समाजात चार वर्ग असतात इतकाच चातुर्वर्ण्यसिद्धांताचा आशय आहे असे त्यांचे मत होते. तरुणपणी केतकर जातिभेद शक्य तितक्या लवकर नाहीसा करावा अशी भाषा करीत असत. पण चातुर्वर्ण्य सिद्धांत झिडकारण्यास ते कधीच तयार झाले नाहीत. "सामाजिक प्रयत्न करताना तो जुन्या पायावरच करावा लागतो. नाहीतर तो मुळीच टिकत नाही. जातिसंस्था आणि चातुर्वर्ण्य या गोष्टी अनिष्ट आहेत काय याविषयी चांगला विचार केल्याशिवाय समाजात सुधारणेचा प्रयत्न अयोग्य होईल. चातुर्वर्ण्याविषयी हे सांगितले पाहिजे की हे तत्त्व समाजास अत्यंत हितकर आहे, चातुर्वर्ण्य आणि जातिभेद ही एक नव्हत, एकजातिरूप बनलेल्या राष्ट्रात आणि समाजात चातुर्वर्ण्य असू शकते आणि आज जातिभेद नाहीसा झाला तर चातुर्वर्ण्य उत्कर्ष पावेल; अपकर्ष पावणार नाही." अशी त्यांना आयुष्याच्या अखेरपर्यंत खात्री वाटत होती. (भारतीय समाजशास्त्र, पृष्ठे २०४-२०५) हिंदूंचे धर्मशास्त्र किंवा त्यांचा चातुर्वर्ण्य सिद्धांत जातिव्यवस्थेला दुजोरा देत नाही असे केतकरांचे म्हणणे होते. देशातील सर्व लोकांचे एक राष्ट्र करण्यासाठी जातिभेदाचा अडथळा दूर करणे जरूर आहे असे केतकर तरुणपणी म्हणत असले तरी त्यासाठी हिंदूंचे धर्मशास्त्र किंवा त्यांचा चातुर्वर्ण्य सिद्धांत टाकून देण्याचे कारण नाही असे केतकर मानीत असत.

आरंभीच्या काळात केतकर जातिभेद मोडावयाची कल्पना बोलून दाखवत होते त्याचे कारणही लक्षात घेण्यासारखे आहे. जातिभेदामुळे फोफावणारी विषमता हीच मूलतः अनिष्ट आहे म्हणून जातिभेद नष्ट व्हावयास पाहिजे अशी त्यांची भूमिका नव्हती. "आपल्या देशातील सर्व लोकांचे एकीकरण करून आमचे एक बलवान राष्ट्र करावयाचे व हिंदुस्थानाचे महत्त्व आम्हास जगात वाढवावयाचे." "आपल्या राष्ट्रधर्माच्या आड जातिभेद येतो व त्याकरिता हा मोडला पाहिजे" असे ते म्हणत. (संकीर्ण लेख, पृ. ४५) विविध राष्ट्रजातीमधील संपर्कामुळे निर्माण झालेला हिंदुसमाज जातिव्यवस्थेचा आधार घेऊनही पुरेसा एकात्म झाला नाही हे केतकर कबूल करीत. जातिसंकल्पनेपेक्षा उच्च अशी साऱ्या मानवजातीची संकल्पना हिंदुंना माहीत होती पण राष्ट्रवादी भावना त्यांच्या परिचयाची नव्हती. म्हणूनच हिंदुसमाजाची संपूर्ण एकात्मता साधण्यासाठी भारतीय

राष्ट्रवादाचा आधार घ्यावा असा केतकरांनी उपाय सुचवला होता. जातिभेद मोडून राष्ट्रवादावर आधारलेला एकात्म-हिंदुसमाज निर्माण करण्यासाठी त्यांनी बारा-कलमी कार्यक्रम सुचवला होता. मात्र हा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी ब्राह्मणांनीच पुढाकार घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती.

हिंदुंनी मुसलमान, ख्रिस्ती वगैरे बाहेरचे व अस्पृश्य आहेत ही कल्पना सोडून दिली पाहिजे असे या कार्यक्रमात केतकरांनी नमूद केले होते. हिंदूंमधील निरनिराळ्या जातीत सोवळेपणाच्या बाबतीत समानता यावी म्हणून सोवळ्याओवळ्याच्या फाजील कल्पना सोडून द्याव्या; अस्पृश्यांना स्वच्छता शिकवावी, सभ्य लोकांनी परस्परांमधील संबंध वाढवावेत; विवाहपद्धती सुधारावी, प्रेमविवाह घडून येण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण तयार करावे व जातिभेद मोडण्याचा देशव्यापी कार्यक्रम हाती घ्यावा असे केतकरांनी सुचवले. ब्राह्मणांनी मांसाहारासंबंधीचा तिटकारा सोडावा. मात्र ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांना जरा कमी शिव्या द्याव्यात असे पथ्य त्यांनी सांगितले.

" हिंदुस्थान हे राष्ट्र होणे इष्ट आहे एवढेच केवळ नाही तर ते अपरिहार्य आहे " याबद्दल केतकर निःशंक होते. राष्ट्रबलसंवर्धनासाठी भारताची आर्थिक प्रगती व्हावयास हवी हे ओळखून त्यांनी जातिभेदामुळे आर्थिक विकासास कशी खीळ बसते हे भारतीय अर्थशास्त्रावरील त्यांच्या निबंधात दाखविले आहे. जातिव्यवस्थेमुळे समाजात फूट पडते. सोवळ्याओवळ्याच्या कल्पनांचाही आर्थिक परिस्थितीवर प्रभाव पडतो. जातिभेदातून निर्माण होणाऱ्या सामाजिक दुहीमुळे समान आर्थिक जीवन विकसित होण्यात अडचणी येतात. सामाजिक दृष्ट्या कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या थरातील लोकांचे राहणीचे मान वाढत नाही आणि उत्पादनाच्या प्रक्रियेत समाजातील विविध वर्गांमध्ये जे सहकार्य असावयास हवे तेही होऊ शकत नाही. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी शरीरश्रम करणारे, भांडवल असणारे व बुद्धिमंत यांच्यामध्ये जे सहकार्य लागते ते निर्माण होणे जातिभेदामुळे कठीण होते. हिंदुसमाजातील विविध जातीमध्ये सामाजिक दृष्ट्या संपर्काचा अभाव दिसतो. काही जाती पडदा किंवा गोषा पद्धत पाळतात. त्यामुळे एरवी जी कमी कष्टाची कामे स्त्रियांनी केली असती तीही पुरुषांना करणे भाग पडते. हिंदूंची कलियुगाची कल्पना, इहलोकापेक्षा परलोकातील सुखे मिळविण्याचा त्यांचा ध्यास वगैरे गोष्टीही देशाच्या आर्थिक विकासास बाधक ठरतात असा त्यांनी इशारा दिला आहे.

पारमार्थिक विचारांच्या अतिरेकामुळे व अध्यात्माचे स्तोम माजवल्यामुळे राष्ट्रबल-संवर्धन न होता राष्ट्र कमकुवत होते हे ओळखून केतकरांनी ऐहिक ध्येयवादाचा सतत पुरस्कार केला. ह्या बाबतीतली आपली भूमिका स्पष्ट करताना केतकर म्हणतात. " समजा, एखाद्या राष्ट्रावर परचक्र आले व राष्ट्रातील लोक शत्रूशी लढण्याची तयारी न करिता आमच्यावर कोणी का राजा येईना आम्हाला त्याच्याशी काय करावयाचे आहे, असे म्हणून संध्या, पूजा, वैश्वदेव, होमहवने, उपासना इत्यादिकात जर गढून गेले तर या सर्व लोकांच्या पाठीवर कोरडा ओढावा असे ऐहिक ध्येयवादी मनुष्यास वाटेल. ज्या-

प्रमाणे युद्धास प्रवृत्त न होता वैश्वदेवास आणि उपासनास प्रवृत्त झालेल्या लोकांचा सामाजिक मुत्सद्दी धिःक्कार करतील त्याप्रमाणेच राष्ट्राच्या बलवृद्धिसाठी अवश्य असलेल्या अर्थवृद्धीत व उद्यमांत न गुंतता राष्ट्रातली मनुष्ये इष्ट परलोकात उडी मारण्यासाठी धडपडतील तरी देखील ऐहिक ध्येयवादी पारमार्थिकांचा धिक्कार करील. ”

राष्ट्रबलसंवर्धनासाठी व राष्ट्राच्या उत्कर्षासाठी जे जे आवश्यक ठरेल ते ते सारे केले पाहिजे असे ते मानीत असत त्यामुळे काहीवेळा त्यांची मते क्रांतिकारक किंवा जहाल वाटत असत. “आपली गाईसंबंधींची पूज्यबुद्धी ध्या. गोहनन करावे असे मी म्हणत नाही. तथापि आपली अंतःकरणे अशी बनू नयेत की जेणे करून राष्ट्ररक्षणासाठी देखील गोहनन अशक्य होईल.” (संकीर्ण लेख पृ. ४८) राष्ट्ररक्षणासाठी गाय मारण्याची गरज असेल तर तेही करावे हे त्यांचे मत कर्मठ सनातनी हिंदूंना रुचण्यासारखे नव्हते. पंजाबात वीरनवालीवर एका युरोपियन खिस्त्याने बलात्कार केल्यामुळे लोकांनी तिला वाळीत टाकले. त्यामुळे तिने आत्महत्या केली. या घटनेचा उल्लेख करून केतकरांनी विटाळाच्या असल्या अजब कल्पनामुळे समाज कसा दुबळा बनतो हे दाखवले आहे. राष्ट्रबलसंवर्धन म्हणजे हिंदुसमाज-बलसंवर्धन असे त्यांचे समीकरण होते. त्यामुळे परधर्मीयांना शुद्ध करून घेण्याच्या चळवळीला त्यांचा पाठिंबा होता. बिगर-हिंदू स्त्रीशी कोणी विवाह केल्यास त्यांची हरकत नव्हती कारण त्यामुळे हिंदुसमाजात भर पडणार होती पण हिंदू स्त्रीने परधर्मीयांशी विवाह करण्याचे ठरवल्यास ते दृश्य पाहणे त्यांना फार ‘क्लेशदायक’ वाटे, हे खान पाणंदीकर या आंतरधर्मीय विवाहाच्या वेळच्या त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट दिसते. (द. न. गोखले, डॉ. केतकर, मौज प्रकाशन, १९५९, पृष्ट २१७) शुद्धिचळवळीचा जोरदार पुरस्कार करणाऱ्या केतकरांचा मुसलमान किंवा खिस्ती लोकांच्या हिंदूंना बाटविण्याच्या उद्योगास विरोध होता हेही या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

मात्र हिंदुसमाज व धर्म हे शब्द वापरताना केतकरांना काय अभिप्रेत होते ते विसरून चालणार नाही. ज्या अर्थाने खिश्चन किंवा मुसलमान यांच्या बाबतीतच धर्म हा शब्द वापरता येईल त्या अर्थाने हिंदूंच्या बाबतीत धर्म हा शब्द वापरणे चुकीचे ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे. खिश्चनांचा किंवा मुसलमानांचा एक निश्चित धर्मग्रंथ आहे. देव म्हणजे काय? मरणानंतर माणसाचे काय होते?—असल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना त्यांच्या पवित्र धर्मग्रंथातून मिळतात. विधिनिषेध त्यात सांगितलेले असतात. काही समारंभ किंवा धर्मविधी करणे त्यांच्यावर बंधनकारक असते. खिश्चन व मुसलमान यांच्या संदर्भात धर्म या अर्थाने केतकरांनी ‘थिओक्रॅट्री’ ही संज्ञा वापरलेली आहे. आपण पंथ किंवा संप्रदाय या संज्ञा वापरतो त्या ‘थिओक्रॅट्री’शी मिळत्याजुळत्या आहेत असे केतकरांनी प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते हिंदूंचा असा पंथ, संप्रदाय नव्हता किंवा ‘थिओक्रॅट्री’ नव्हती. “हिंदू समाज म्हणजे विशिष्ट मते अगर परमार्थसाधने यांच्या पायावर निर्माण केलेला समाज” नसल्याने व “सर्व प्रकारच्या मतांची आणि

दैवतांची ग्राहकता " हिंदूमध्ये असल्याने भारतातील मुसलमान आणि ख्रिस्ती लोकांना राष्ट्रबलसंवर्धनाच्या म्हणजेच हिंदुसमाजबलवर्धनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे अवघड नाही असे केतकरांना वाटत असल्याचे दिसते. " मुसलमान आणि ख्रिस्ती लोकांनी आपली जात वाढविण्याचा प्रयत्न न करिता आपला ईश्वरसाधनाचा मार्ग वाढविण्याचा प्रयत्न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, ही गोष्ट त्यास भासविली पाहिजे. हिंदुस्थानीय लोकांपैकी प्रत्येकाची जात हिंदू आहे. मग त्याचे ईश्वरविषयक मत कोणतेही का असेना. " ( महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, विभाग पहिला, पृष्ठ ४२६ ).

राष्ट्रबलसंवर्धनासाठी विविध जातींच्या व धर्मांच्या लोकांना एकाच कायद्याने बांधणे आवश्यक आहे यावरही त्यांनी भर दिला आहे. ' समान नागरी कायद्याचे ' तत्त्व भारताच्या राज्यघटनेत मार्गदर्शकतत्व म्हणून समाविष्ट करण्यात आलेले असले तरी अद्यापही त्याला मूर्त रूप देता आलेले नाही ही विदारक वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी केतकरांनी समान नागरी कायद्याच्या आवश्यकतेकडे लक्ष वेधले होते हे उल्लेखनीय आहे, " विविध समाजाचे पृथक्त्व ज्या समाजविशिष्ट कायदेपद्धतीमुळे विनाकारण उत्पन्न होते त्या प्रकारच्या कायद्याविषयी अधिक विचार करून व अनवश्य म्हणजे परमार्थाशी असंबद्ध कारणामुळे उत्पन्न झालेली भिन्नता काढून टाकून सर्व समाजास सामान्य कायदा निर्माण करण्याकडे देशाची एकंदर प्रवृत्ती असावी; का की येणेकरून समाजात अधिक सारखेपणा वाढून राष्ट्रीयत्त्वाचा विकास होईल. " ( पाहा– या संग्रहातील उतारा क्रमांक अठरा ) केतकरांनी ज्या काळात यांसंबंधी लिहिले त्या काळात तर सर्व हिंदूंसाठीही एक समान कायदा नव्हता. म्हणून केतकरांनी लिहिले, " निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना निरनिराळे कायदे आहेत या वस्तुस्थितीविरुद्ध प्रयत्न तर पाहिजेच पण सर्व हिंदूस तरी एक कायदा असावा या गोष्टीकडे अधिक लक्ष पाहिजे. " ( कित्ता )

हिंदुसमाजातील स्त्रियांच्या भूमिकेबाबतचे त्यांचे विचारही कर्मठ सनातन्यांना जहाल वाटण्यासारखे होते. " देशाच्या उन्नतीक्रमात आम्हास स्वतंत्र विचाराच्या स्त्रिया पाहिजेत " म्हणून " स्वतःचे स्वातंत्र्य वाढवीत नेणे हे त्यांचे महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे " असे केतकर सांगत. स्त्रिया निर्भय बनाव्यात; त्यांनी मोकळेपणाने वावरावे, त्या आर्थिक दृष्ट्या परावलंबी राहू नयेत असे केतकर म्हणत कारण "... भारतीयांस जगांत जो कमीपणा येतो त्याचे कारण एकटे पुरुष नसून स्त्रियाही आहेत. जोपर्यंत स्त्रियांच्या मोकळेपणाच्या अभावामुळे पुरुषांच्या रहाणीत व चालीरीतीत उद्धटपणा आहे तोपर्यंत हिंदु हा युरोपीयास आपल्या बरोबरीचा वाटणार नाही. " ( पाहा– या संग्रहातील उतारा क्रमांक एकवीस ) स्त्रियांच्या हक्कांची तरफदारी केतकर करीत असत कारण स्त्रियांचे सहकार्य मिळाल्याशिवाय राष्ट्राचा आर्थिक विकास वेगाने होणार नव्हता. " हिंदुस्थानी लोकांस उच्च प्रकारचे नागरिक बनविण्यासाठी स्त्रियांमध्ये जोराची चळवळ पाहिजे " असे त्यांना वाटे. स्त्री-पुरुषामधली विषमता स्त्रियांना अन्यायकारक होते म्हणून

केतकरांचा तिला विरोध नव्हता तर राष्ट्रोत्कर्षास व राष्ट्रबलसंवर्धनास ती मारक ठरते अशी त्यांची धारणा होती हे लक्षात ठेवले पाहिजे.

राष्ट्रीय ऐक्यभावना कशी वाढेल व राष्ट्रबलसंवर्धन कसे होईल या दृष्टीने केतकर सामाजिक, आर्थिक त्याचप्रमाणे राजकीय प्रश्नांचा विचार करीत होते व हे उद्दिष्ट ज्या उपायांनी साधेल असे त्यांना वाटत असे ते उपाय सुचवीत होते. हिंदुस्थानचे राजकीय विभाग भाषावार केल्याने देश एकात्म होण्यास मदत होईल या विश्वासाने भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा त्यांनी आरंभापासून जोरदार पुरस्कार केला. त्यांच्या इंग्रजी प्रबंधाच्या दुसऱ्या खंडात त्यांनी भाषावार प्रांतरचना कशी हितकारक होईल हे सांगितलेच पण शिक्षण संपवून स्वदेशी परतल्यावर त्यांनी भाषिक प्रांतांच्या मागणीसाठी चाललेल्या चळवळींत हिरीरीने भाग घेतला. आंध्र प्रांताच्या निर्मितीसाठी ज्या परिषदा १९१५ व १९१६ मध्ये तेलगू भाषिकांनी विझगापट्टम व कोकोनाडा येथे भरवलेल्या होत्या त्यांत केतकरांनी भाग घेतला होता. इंग्रज सरकार भाषावार प्रांतरचना करण्यास तयार होणार नाही म्हणून त्यासाठी चळवळ करणे व लोकमत जागृत करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. ओरीसा व आंध्रातील चळवळीला पाठिंबा देताना मध्यप्रांत, वऱ्हाड व मुंबईइलाखा या मराठी भाषिक प्रदेशातील लोकांनाही स्वतंत्र प्रांत असावा असे वाटू लागले आहे, याचा केतकरांनी आवर्जून उल्लेख केला आहे. "प्रांतिक राज्यकारभार देशी भाषेत व्हावा. तो देखील इतका की गव्हर्नरने इंग्रजीत सही केली तर ती बेकायदेशीर ठरावी. देशभाषेत हायकोर्टाचे निवाडे व्हावे म्हणजे देशी सामान्य भाषांना कायदेशीर भाषेचा संस्कार होईल आणि इंग्रज कायदेपंडितांचे देशात प्रामुख्य राहणार नाही." अशा शब्दात भाषिक प्रांतरचनेचा आशय त्यांनी स्पष्ट केला होता. (पाहा :- या संग्रहातील उतारा क्रमांक तीन) केतकरांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनी इंग्रजी राजवट जाऊन देश स्वतंत्र झाला. त्यानंतरच्या पहिल्या दोन दशकात भारतातील राज्यांची मुख्यतः भाषिक तत्त्वावर पुनर्रचनाही झाली पण अद्याप केतकरांनी कल्पिलेली स्थिती निर्माण झालेली नाही. इंग्रजीचे स्तोम अद्यापही माजवणाऱ्या लोकांची संख्या काही थोडी-थोडकी नाही.

ज्ञानकोशाची रचना करण्याचा त्यांनी संकल्प केला व अनेक अडचणीवर मात करून अवघ्या बारा वर्षांत त्यांनी हे प्रचंड काम हातावेगळे केले. त्यामागेही आपले अंगीकृत कार्य हे राष्ट्रोन्नतीकारक आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. "महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठी झालेला प्रयत्न होय." अशा शब्दात त्यांनी स्वतःच आपल्या या उपक्रमाचे मर्म सांगितले आहे. (पाहा :- या संग्रहातील उतारा क्रमांक चौदा) अत्यंत परिश्रम घेऊन, जबरदस्त आत्मविश्वासाने, जिद्दीने, धडाडीने, कल्पकतेने, एकाग्रतेने व वेगाने केतकरांनी हा अभूतपूर्व उपक्रम हाती घेऊन तडीस नेला. "ज्ञानकोशाची योजना पार पडणार नाही, ती पार पडणे अत्यंत कठीण गोष्ट आहे" असे लोकमान्य टिळकांसारख्या वडीलधाऱ्या पंडितानेही सांगितले

होते. त्यावर टिळकांना केतकरांनी दिलेले उत्तरही खास त्यांच्या स्वभावाचे द्योतक आहे. केतकर टिळकांना म्हणाले, " ज्ञानकोश तयार करावा की न करावा याविषयी तुम्हाला सल्ला विचारावयास आलो नाही. तुम्ही काय मदत देऊ शकाल एवढेच विचारावयास आलो आहे. " टिळकांनी लेखनसाहाय्य करावयाचे आश्वासन दिले पण कार्यबाहुल्या-मुळे त्यांना ज्ञानकोशासाठी लिहिण्यास वेळ मिळाला नाही. वृद्धावस्थेमुळे डॉक्टर रामकृष्ण भांडारकरही लिहू शकले नाहीत. इतिहासाचार्य राजवाड्यांना सहा हजार रुपये देऊ करूनही त्यांचे लेखनसाहाय्य मिळू शकले नाही. पण केतकर डगमगले नाहीत. त्यांनी नवे सहकारी गोळा करून आपला संकल्प सिद्धीस नेला. देश परक्यांच्या हाती असल्या-मुळे केवळ लोकाश्रयावर भिस्त ठेवून ज्ञानकोशाचा हा उपक्रम केतकरांनी आरंभला. आर्थिक विवंचना सहन करीत हा साहसी उपक्रम त्यांनी ज्या निर्धाराने पुरा केला त्याला खरोखरच तोड नाही.

ज्या झपाट्याने त्यांनी हे काम फत्ते केले त्यामुळे केतकर काही काळ शरीराप्रमाणेच मनानेही चांगलेच थकले असावेत. वामनराव आपटे, निळोपंत रानडे व गीर्वाणलघु-कोशकार ओक हे आधीच्या पिढीतील कोशकर्ते हाती घेतलेले काम पुरे होते न होते तोच मृत्युमुखी पडले तसेच आपले काही होणार नाही ना या शंकेने काही काळ केतकरांच्या मनात घर केले होते. ' आशावादी ' कादंबरीच्या प्रस्तावनेत स्वतः केतकरांनीच आपल्या या मनःस्थितीचे वर्णन केले आहे. " ही किंकर्तव्यतेची वृत्ती १२ फेब्रुवारीपासून जूनपर्यंत होती. फेब्रुवारी गेला, मार्च गेला, एप्रिल उजाडला, ज्ञानकोशाचा एकविसावाही भाग पुरा छापून झाला. हा जेव्हा छापून झाला तेव्हा मनाशी म्हटले एकदाचा हा तर पुरा झाला, आता आपण मेलो तर काय होईल ? ज्ञानकोशासाठी जे तीस हजारांचे कर्ज झाले आहे ते फेडण्याची असमर्थता उत्पन्न होईल आणि सावकार बुडतील, आणि माझ्या नावाने ओरडतील. कर्जाला जामीन मी असल्यामुळे माझ्यामागे घरदार विकावे लागेल. काही हरकत नाही, काय व्हावयाचे असेल ते होईल, पण ज्ञानकोश एकदाचा बाहेर पडला आहे. कौटुंबिक आपत्ती जरी उत्पन्न होईल तरी एक महत्त्वाचे कार्य हातावेगळे झाले आहे. " (पाहा :– विद्यासेवक– वर्ष ४, अंक १ ते ३, मार्च, एप्रिल व मे १९२७)

ज्ञानकोशाचे काम पुरे केल्यानंतर केतकरांनी लिहिले, " मला चारही वेद काळजी-पूर्वक वाचावयाचे होते व त्यानंतर संशोधन करावयाचे होते. ते करण्याची संधी मला ज्ञानकोशानी दिली आणि आज जरी माझे संशोधनफल जगप्रसिद्ध झाले नाही तरी ते उद्या होईल आणि वेदाच्या अत्यंत मोठ्या अभ्यासकांत माझे नाव केव्हातरी होईल ही माझी खात्री आहे. मी असे म्हणू शकतो की ज्ञानकोशमंडळात नवीन वैदिकसंशोधन प्रसिद्ध झाले आहे ते जगातील अत्यंत मोठ्या, वेदाच्या अभ्यासकांच्या सबंध आयुष्यातील कामाइतके मोठे ठरेल आणि याचे कारण दहाबारा माणसे हाताशी घेऊन वेदाभ्यास करण्याची संधी मला मिळाली हे होय. ज्या मनुष्यास पैसा मिळतो त्या मनुष्यास कीर्तीचा

लोभ असतो. पैसा हातचा जातो पण कीर्ती लवकर जात नाही. वैदिक संशोधक म्हणून माझी कीर्ती झाली नाही हे खरे आहे. ती पुढे होईल अशी माझी खात्री आहे. त्यामुळे समकालीनांनी जरी योग्य अभिज्ञता दाखविली नसली तरी त्याबद्दलदेखील खंत मुळीच नाही. मला असे वाटते की, मी जे काय लिहिले आहे त्याची उत्तमप्रकारे जाणीव होण्याइतका ज्ञानविकास भोवतालच्या जनतेत नाही त्यामुळे लोकांच्या स्तुतिनिंदेची मला फारशी फिकीर वाटत नाही. जो पुढे वेदाभ्यासक वर्ग निघेल तो माझे कर्तृत्व ओळखील ही माझी खात्री आहे. तसेच ज्ञानकोशामध्ये जे समाजशास्त्र घातले आहे ते जगांतील प्रचलित समाजशास्त्रांपेक्षा काही बाबतीत वरच्या दर्जाचे आहे हाही मला आत्मविश्वास आहे तथापि त्याची पारखदेखील समकालीन महाराष्ट्राकडून होणे शक्य नाही. जे मी लिहिले आहे ते इंग्रजीत लिहिले असते तर त्याचें महत्त्व लोकांस पटले असते. मी जे लिहिलें आहे त्याचे खरे महत्त्व जो समाजशास्त्र आणि वैदिक संशोधन यांमध्ये आजतागायत आहे त्यासच पटेल पण त्याच्या दृष्टीस ते आजच पडणे शक्य नाही व महाराष्ट्रीय वाचकांस त्याचे महत्त्वही समजणार नाही. ज्यावर लोक मोठमोठाले ग्रंथ लिहितील अशा अनेक गोष्टी विशेषेकरून जगद्विकासविषयक सत्ये मी फार थोड्या पानांत मांडली आहेत आणि अनेक शास्त्रांच्या विकासाविषयी काही तरी नवीन सांगितले आहे असें आजतागाईत शास्त्रीय वाङ्मय वाचणारास दिसून येईल. या सर्व गोष्टी केल्या त्या अर्थात कीर्तीच्या आशेने केल्या नाहीत. ...आजपासून अनेक दशकांनी माझ्या संशोधनाची जाणीव उत्पन्न होईल ही माझी खात्री आहे." (माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास, १९२७, पृ. १५४–१५५).

वरील विस्तृत उताऱ्यात केतकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दोन महत्त्वाचे विशेष स्पष्ट दिसतात. त्यांचा स्वतःच्या कर्तृत्वावर जबरदस्त विश्वास होता आणि त्यांचा आशावाद दुर्दम्य होता. समकालीनांपैकी एखाद्यास त्यांचे हे उद्गार आत्मश्लाघेचे वाटले असतील तर कोणास हे उद्दाम अहंकाराचे प्रदर्शन वाटले असेल. पण या उद्गारांमागच्या कमालीच्या आत्मविश्वासामुळे व दुर्दम्य आशावादामुळे आपत्ती सोसण्यास व अडचणींना तोंड देण्यास केतकरांना बळ मिळाले असावे. मुळात वकूब बेताचा असणाऱ्या एखाद्या संशोधकाने स्वतःविषयी असे लिहिले असते तर ते हास्यास्पद वाटले असते पण केतकरांसारख्या प्रतिभावंत समाजशास्त्रज्ञाची ही आत्मप्रशंसा करुणास्पद वाटते. अखेरच्या वर्षात ही आत्मप्रशंसाच त्यांना दिलासा देत असावी. ज्ञानकोश पुरा झाल्यानंतरची केतकरांच्या आयुष्यातली अखेरची दहा वर्षे कसोटीची होती. सावकारांचे तगादे, हजारो रुपयांच्या कर्जाचा एकट्याने उचलावा लागणारा बोजा, मतभेदामुळे एकामागोमाग एक दुरावत चाललेले सहकारी, आर्थिक अडचणीमुळे स्थगित करावे लागलेले वर्तमानपत्राचे, मासिकाचे प्रकाशन, गांधीजींच्या विरोधामुळे प्रसिद्ध न होऊ शकलेली व धूळ खात

पडलेली गुजराती ज्ञानकोशाच्या हस्तलिखिताची बाडे, भरीला कौटुंबिक अडचणी; या चक्रव्यूहातून केतकर कधीच बाहेर येऊ शकले नाहीत. पण केतकर अखेरच्या वर्षात क्वचित कधी निराश होत असले तरी ते पुन्हा नव्या हुरुपाने कामाला लागत. आपत्तींनी खचून न जाता नवनवीन संशोधनांचे संकल्प बोलून दाखवीत.

१९२६ पासून केतकरांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध होऊ लागल्या. गोंडवनातील प्रियंवदा ही त्यांची पहिली कादंबरी त्यांनी १९१६ साली लिहावयास घेतली. "तुम्ही पाहिजे तर निबंध लिहावेत पण कादंबरीच्या भानगडीत पडू नये" असे त्यांना त्यांचे कादंबरीकार बालमित्र श्री. बा. सं. गडकरी म्हणाले होते. आपल्या मित्राचा हा अभिप्राय खोटा टरविण्यासाठी केतकरांनी ही कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. पण ज्ञानकोश-रचनेत ते गुंतल्यामुळे ज्ञानकोशाचे हस्तलिखित पुरे होईपर्यंत कादंबरी-लेखन थबकले. ज्ञानकोश पुरा झाल्यानंतरच्या वर्षात मात्र केतकरांनी समाजशास्त्रीय व ऐतिहासिक संशोधनपर ग्रंथनिर्मितीबरोबरच कादंबऱ्या लिहिण्याचा धडाका लावला आणि 'चालू' भाषेत सांगावयाचे झाले तर त्यामुळे कादंबरीक्षेत्रात धमाल उडाली. मराठी साहित्यात तोपर्यंत जी कादंबरी लिहिली जात होती त्यापेक्षा आशयाच्या दृष्टीने व तंत्राच्या दृष्टीनेही केतकरी कादंबरी वाचकास व टीकाकारांस बरीचशी वेगळी वाटल्याने प्रतिकूल टीकेचा एकच गदारोळ माजला. केतकरी कादंबरीतील विषयवैचित्र्य, चमत्कृतिपूर्ण नावीन्य, निराळा ताजेपणा ही वैशिष्ट्ये जाणवण्यासारखी असली तरी 'कादंबरी' या शब्दाने ज्या विशिष्ट रचनाप्रकाराचा बोध होतो त्याच्या साच्यातही त्यांच्या कादंबऱ्या बसण्यासारख्या नाहीत अशीच सर्वसाधारण प्रतिक्रिया झाली. (पाहा–ग. त्र्यं. माडखोलकर यांचा डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्या हा लेख, प्रतिभा, केतकर विशेषांक जुलै १९३७, पृ. ४११ ते ४१६) केतकरांच्या कादंबऱ्या या कादंबऱ्याच नव्हेत तर ते समाजशास्त्रीय प्रबंध आहेत किंवा संवादप्रचुर निबंध आहेत असा टीकाकारांचा मुख्य आक्षेप होता. केवळ कलादृष्टीने पाहाता केतकरांच्या कादंबऱ्या हिणकस व दोषपूर्ण आहेत याबाबत वामन मल्हार जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर व ग. त्र्यं. माडखोलकर या केतकरांच्या समकालीन कादंबरीकारांचे जवळजवळ एकमत झालेले दिसते. सुसंबद्ध कथानकाचा अभाव, अचतुर निवेदनपद्धती, औचित्यभंग आणि ओबडधोबड भाषा या चार ठळक दोषांनी भरलेल्या केतकरांच्या कादंबऱ्यांना ललित वाङ्मयात स्थान नाही तर समाजशास्त्राच्या साहित्यात आहे असा अभिप्राय माडखोलकरांनी त्या काळात दिला होता. आजही या मताचे पडसाद उमटताना आढळतात.

आपल्या कादंबरीविषयी होणाऱ्या टीकेची दखल घेऊन केतकरांनी कादंबरीबाबतची आपली भूमिका वारंवार स्पष्ट केलेली दिसते. समकालीन मराठी कादंबरीस 'सदाशिवपेठी' म्हणून केतकर तिची टर उडवीत असत. "सदाशिवपेठी पुणेकर लेखकास जे जग दिसते, त्यापेक्षा कितीतरी विस्तृत जग पुण्यातल्यापुण्यातच आहे. या लेखकवर्गाच्या स्त्रियासंबंधीच्या कल्पना प्रत्यक्ष अवलोकनाने फारच थोड्या नियमित होत असून, बऱ्याचशा कल्पना

त्याला जग कसे असावे हे पुस्तकांनी शिकविले असते त्या अपेक्षांशी निगडित झालेल्या असतात. . . . —पुण्यापासून थोड्याच अंतरावर असलेल्या जेजुरीत ज्या मुरळ्या असतील किंवा कर्नाटकात ज्या जोगतिणी किंवा बसवी आहेत त्यांनी पुण्यातल्या पुण्यात केलेले अनेक कारभार पुणेकर लेखकांच्या दृष्टीस पडते, तर स्त्रीपुरुषसंबंधाची व विवाहसंस्थेची अत्यंत भिन्न भिन्न स्वरूपे मांडण्यास तो समर्थ झाला असता. मध्यमवर्गीय पुणेकर लेखक, ब्राह्मण आणि तत्सम वर्गापुरते पहात असतो. जगातील आर्थिक कोलाहल आणि द्रव्य व त्याचा अभाव यांचे जे स्त्रीपुरुषसंबंधावर परिणाम होत जातात त्यांच्या प्रखरतेपासून मुक्त असाच तो असतो. त्यांतल्या त्यांत हलक्या वर्गाशी न मिळण्याची वृत्ती अर्वाचीन जगाचे ज्ञान त्यापासून दूर ठेवीत असते. गायक समाजातील एखादी सिनेमानटी आणि ब्राह्मण तरुण यांचे होणारे संबंध किंवा विवाह तेवढेच त्यांच्या विचारकक्षेत येतात पण कामकरी स्त्रीवर्गाचा आयुष्यक्रम त्यास कितपत परिचित आहे " १ (सत्यकथा, एप्रिल १९३७ ) तत्कालीन मराठी कादंबरीसंबंधीची केतकरांची ही मते चुकीची नव्हती.

याचा अर्थ केतकरी कादंबरीत कामकरी स्त्रियांचा आयुष्यक्रम रेखाटला आहे किंवा जगातील आर्थिक कोलाहल व द्रव्याचा अभाव यामुळे स्त्रीपुरुषसंबंधावर होणारे परिणाम चित्रित झाले आहेत असा नाही. केतकरांनी मराठी कादंबरीचे क्षेत्र विस्तृत केले असे म्हटले जाते ते तत्कालीन मराठी कादंबरीच्या संदर्भात ह्याचे अवधान ठेवावयास हवे. मध्यमवर्गीय माणसाच्या संकुचित जगाबाहेर मोठे जग पसरले आहे, याचे त्यांना भान होते एवढे फार झाल्यास म्हणता येईल. पण त्यांच्या कादंबऱ्यांतील बरीचशी पात्रे वरिष्ठ जातीतील आणि वरिष्ठ वर्गातीलच होती. त्यांच्या सामाजिक समस्याही बव्हंशी वरिष्ठ जातीतील लोकांच्याच होत्या. 'सदाशिवपेठी' या निंदागर्भ विशेषणाने केतकर ज्या मराठी कादंबरीच्या परंपरेला नाक मुरडीत असत त्यापेक्षा केतकरांच्या कादंबरीतील विश्व मूलतः भिन्न होते असे नाही. केतकरांना कादंबरीचे तंत्र अवगत नाही असाही आक्षेप त्याकाळात अनेकांनी घेतला. खुद्द केतकरांनी या टीकेचे जे खंडन केले आहे ते टीकाकारांना झोंबल्याशिवाय राहिले नसेल. 'माझ्या लेखनामध्ये Technique नाही असे वाङ्मयक्षेत्रातील शूद्रांनी बोलावे यात कोणतेही आश्चर्य नाही. Technique ज्या साहित्याच्या अवलोकनापासून निर्माण व्हावयाचे त्या साहित्याचेच अल्पत्व ज्यास भासून येते तो आपल्या कृतीने नवीन Technique निर्माण करण्यास चालना देणार आहे हे ह्या वाङ्मयातील शूद्रांस काय समजणार ? जंगली लोकांना Rational Surprise असू शकत नाही असे जे स्पेन्सरने सांगितले आहे तो नियम वाङ्मयांतील शूद्रांसही लागतो." (ज्योत्स्ना :- मी व माझे टीकाकार, ऑगस्ट १९३६ ) केतकरांच्या टीकाकारांना कादंबरीलेखनाचे एक विशिष्ट तंत्रच अभिप्रेत होते असे वाटते. ना. सी. फडके यांनी लोकप्रिय केलेल्या साच्यात जी कादंबरी बसत नाही ती कादंबरीच नव्हे अशी अनेकांनी समजूत करून घेतलेली दिसते. केतकरांच्या कादंबऱ्यांचे मूल्यमापन करताना कळतनकळत फडके-प्रणीत कादंबऱ्यांचा नमुना आदर्श मानून परीक्षण झालेले दिसते. केतकरांची कथा-

रचना उत्कंठावर्धक नसते; पात्रांचे बाह्यांगवर्णन फडक्यांच्या कुशलतेने किंवा आस्थेने ते देत नाहीत; त्यांच्या कादंबऱ्यात सृष्टिवर्णने नाहीत; त्यांच्या कादंबरीचा अंत दिलखेचक किंवा मनाला चटका लावणारा नाही; त्यांची कथनशैली प्रबंधकाराची आहे वगैरे आक्षेप घेणारे टीकाकार फडके-प्रणीत कादंबरीच्या मगरमिठीतून सुटलेले दिसत नाहीत.

केतकरांच्या कादंबऱ्या वाचताना एच्. जी. वेल्स या कादंबरीकाराची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. लोव्हॅट डिक्सन या अभ्यासकाने वेल्सच्या कादंबऱ्यांविषयी लिहिताना म्हटले आहे ते केतकरांच्या बाबतीतही लागू पडते. वेल्सप्रमाणेच केतकरांच्या सर्व कादंबऱ्यातील निवेदक स्वतः केतकरच आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख पात्रांची नावे वेगळी असली, त्यापैकी काहींचा चेहरा मोहरा आवतीभोवतीच्या काही व्यक्तींशी मिळताजुळता वाटला तरी अखेर ही पात्रे केतकरांचे विचार बोलून दाखवताना दिसतात. 'ब्राह्मणकन्या' कादंबरीतील वैजनाथशास्त्री या पात्राचा चेहरामोहरा इतिहासाचार्य राजवाडे यांच्याशी मिळताजुळता वाटला तरी आप्पासाहेब डग्गे यांच्या प्रश्नांची वैजनाथ-शास्त्री उत्तरे देत असताना केतकर बोलत आहेत हे सारखे जाणवत राहते. परागंदा कादंबरीतील विष्णु सरंजामे, 'आशावादी'तील स्वामी ब्रह्मगिरी (देवीदासपंत अत्रे) विचक्षणा कादंबरीतील प्रा. लोंढे या पात्रांच्या मुखवट्यामागचे केतकरही सहज ओळखू येतात. वेल्सच्या कादंबऱ्या म्हणजे त्याच्या नेहमीच्या बोलण्याला त्याने दिलेले ग्रंथबद्ध रूप आहे असे म्हटले जात असे. तसेच केतकरांबाबतही म्हणता येईल. कादंबरीकाराने आपल्या कलाकृतीत डोकावू नये, त्याचे अस्तित्वही जाणवू नये या कल्पनेचा पगडा अद्याप मराठी टीकाकारांवर पडलेला दिसतो. कादंबरीत सांगण्यापेक्षा दाखवण्यावर भर दिला जावा या कल्पनेचा प्रभावही अजून कायम आहे. त्यामुळे केतकरी कादंबरीत जसे होते तसे घडले तर—म्हणजे कादंबरीकाराचे अस्तित्व सारखे जाणवू लागले व त्याने केलेली भाष्ये जागा अडवू लागली तर—कादंबरीचे तंत्र लेखकाला अवगत नाही असे म्हटले जाते.

खरे म्हणजे ज्या तंत्राचा बडिवार माजवून टीकाकारांनी केतकरांना धारेवर धरले ते कादंबरीलेखनाच्या अनेक तंत्रांपैकी केवळ एक तंत्र होते. कादंबरी लेखनाचे तेवढे एकच तंत्र असू शकते असे मानणे मात्र चुकीचे होते. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत लिहिली गेलेली इंग्रजी कादंबरी व तिच्या अनुषंगाने झालेली कादंबरी या वाङ्मय-प्रकाराची चर्चा लक्षात घेतली गेली तर मराठी टीकाकारांना केतकरांच्या कादंबऱ्यांना कादंबऱ्या म्हणावे की नाही असा प्रश्न पडण्याचे कारण उरणार नाही. कादंबरी-काराला निवेदक व भाष्यकार म्हणून आपला आवाज ऐकवण्याचा अधिकार आहे, असे आता मान्य झालेले आहे. डोरिस लेसिंगच्या 'गोल्डन नोटबुक' या कादंबरी-विषयी लिहिताना ही कादंबरी आहे की आत्मचरित्र आहे की राजकीय निबंध आहे की मनोविकृतिशास्त्रातील उदाहरणसंग्रह आहे असा जॉर्ज स्टायनरसारख्या समीक्षकाने प्रश्न विचारला होता. त्यावरून अलीकडच्या इंग्रजी कादंबरीने किती विलक्षण स्वरूप

धारण केलेले आहे हे सहज लक्षात येईल. केतकरी कादंबरी तत्कालीन मराठी टीकाकारांना मान्य व ओळखीच्या असलेल्या तंत्रानुसार लिहिली नव्हती म्हणून ती कादंबरीच नव्हती असे म्हणणे योग्य होणार नाही.

नजीकच्या भूतकाळाचा अनेक-खंडात्मक कादंबऱ्यातून वेध घेण्याचा प्रयत्नही अलीकडच्या वर्षात अँथनी पॉवेल, सी. पी. स्नो यांच्यासारख्या कादंबरीकारांनी केलेला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील निवेदक आपल्या आयुष्यातील विविध अवस्थांचे चित्रण करताना त्या त्या वेळच्या समाजाचेही दर्शन घडवीत असतो. अनेकदा असल्या कादंबऱ्या उघडउघड आत्मचरित्रात्मक असतात किंवा आडवळणाने कादंबरीच्या रूपात आत्मचरित्र लिहिले जात असते. केतकरांच्या कादंबऱ्यापैकी प्रत्येकीचा सुटा सुटा विचार करण्यापेक्षा त्यांची प्रत्येक कादंबरी ही केतकरांनी मनाशी योजिलेल्या अशाच अनेक–खंडात्मक कादंबरीचा भाग आहे असे समजणे योग्य होईल. केतकरांनी स्वतःच आपल्या कादंबरीलेखनामागचा हेतू स्पष्ट केला आहे तो या संदर्भात लक्षात घ्यावयास हवा. "समाज अत्यंत विविधांगी आहे. चालू समाजाचे चित्र सर्व बाजूंनी रंगवावयाचे झाल्यास मला आणखी १०–२० कादंबऱ्या लिहाव्या लागतील इतके ते विविध आहे, असे असता गिरगांवी अगर सदाशिवपेठी लेखक लोकांपुढे महाराष्ट्रीय समाजाचे अत्यंत अल्प स्वरूप ठेवतात तर आपण जितके व्यापक स्वरूप दाखविता येईल तितके दाखवावे, जितक्या विविध प्रकृति लोकांपुढे आणता येतील तितक्या आणाव्यात ही मनीषा चित्तांत वागत असल्यामुळे कादंबरीतील विविध प्रकार वर्णिले गेले. ज्या लोकात मी करीत आहे ती क्रिया शक्यच नव्हती असाच वर्ग बहुतेक लेखकांत असणार आणि विस्तीर्ण अवलोकन व समाजातील अनेक अंगांचे ज्ञान ही ज्यांस नसतील त्यांस माझ्या कादंबरीचा प्रकारच गैर आहे, कलेचा अपकर्षक आहे असा बोभाटा करावा लागणार व तो त्याप्रमाणे करीत आहेत तो स्वाभाविकच आहे." [ ज्योत्स्ना–मी आणि माझे टीकाकार. ऑगस्ट १९३६ ]

केतकरांचे लक्ष अनेकदा कादंबरीतील विशिष्ट पात्रावर केंद्रित झालेले नसून ते पात्रांच्या समूहावर केंद्रित झालेले आहे हे केतकरी कादंबरी वाचताना जाणवते. 'गोंडवनातील प्रियंवदा' कादंबरीतील प्रियंवदा कादंबरीच्या केंद्रस्थानी सारखी दिसत नाही. ती व तिचा नवरा रामभाऊ यांच्यापेक्षा बिंबा व हरिभय्या मोघे आणि शारदाबाई व वैजनाथशास्त्री या दोन पुनर्विवाहित जोडप्यांनाच काही वेळा अधिक महत्त्व दिले जाते. 'परागंदा' व 'गांवसासू' या कादंबऱ्यांतही केतकर परदेशात वास्तव्य करणाऱ्या भारतीयांच्या समूहाचेच चित्रण करीत आहेत हे उघड दिसते. केतकऱ्यांच्या कादंबऱ्यातील पात्रे अनेकदा व्यक्ती न वाटता 'नमुने' वाटतात. खुद्द केतकरांनीच 'आशावादी' कादंबरीच्या प्रस्तावनेत केलेले निवेदन या संदर्भात महत्त्वाचे ठरते. "स्वामी ब्रह्मगिरी ऊर्फ देवीदासपंत अत्रे ही इंग्लंड, अमेरिका यासारख्या देशांत हिंडणाऱ्या मंडळींच्या चांगल्याच परिचयाची व्यक्ती आहे...आपले चरित्र कायम ठशाचे होऊ नये ही भावना, लोककल्याणाची इच्छा, या गोष्टी ज्या तरुण मंडळींच्या अंगी आहेत पण ज्यांचे आयुष्य

निश्चित रस्त्यावर आले नाही, अशा मंडळींचा हा नमुना आहे. असे तरुण परदेशी गेले म्हणजे पुष्कळदा परतच येत नाहीत...असे लोक पुष्कळदा केवळ विचारबाहुल्यामुळे जवळजवळ निष्कर्तव्यतेच्या सरहद्दीवर कसे जाऊ लागतात हे एक विशिष्ट चरित्र घेऊन दाखविले आहे. "

केतकरांच्या कादंबऱ्यांनी श्रेष्ठ कलाकृतीची उंची मात्र कधी गाठली नाही. वामन मल्हार जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे, प्रमाणशीरपणा, एकजीवपणा, ठाकठिकी वगैरे गुणांचा केतकरी कादंबरीत थोड्याबहुत प्रमाणात अभाव होता. विचारविषयक सत्याविषयी दक्ष असलेले केतकर सत्यकथनाच्या रीतीविषयी बेफिकीर असत. केतकरी कादंबरी अस्ताव्यस्त पसरलेली, विस्कळीत आहे हे जाणवते. श्री. के. क्षीरसागर किंवा दुर्गाबाई भागवत यांच्यासारख्या केतकरांच्या चाहत्या समीक्षकांनीही केतकरांचे कादंबरीवाङ्मय रेखीव व प्रमाणबद्ध नाही हे मान्य केले आहे. " लेखनातला अव्यवस्थितपणा, भाषेतली ढिलाई, संवादातला बोजडपणा वगैरे दोषांमुळे त्यांच्या कादंबऱ्या कलागुणात उणावल्या " असे दुर्गाबाई भागवतांनी स्पष्ट म्हटले आहे.

केतकरी कादंबरीतला अव्यवस्थितपणा, विस्कळितपणा, एकसंधतेचा अभाव हे दोष केवळ त्यांच्या कादंबरीपुरतेच मर्यादित होते असे मात्र नाही. अखेरच्या वर्षांतले केतकरांचे सारेच लेखन या दोषांनी डागळलेले आहे. प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास केतकर कधीच पुरा करू शकले नाहीत. पण त्याहीपेक्षा दुःखदायक घटना होती ती वेगळीच! प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा प्रसिद्ध झालेला भाग इतका " अव्यवस्थित, असंगत, विकीर्ण " होता की दा. ना. आपटे यांच्यासारख्या जाणकाराने सौम्य पण स्पष्ट शब्दात आपली तक्रार नोंदवलीच. " अशा प्रकारच्या ऐतिहासिक लेखनपद्धतीचा पुरेसा परिचयही डॉ. केतकरांना जणू नसावा असे वाटण्यासारखी विचित्र लेखनपद्धती त्यांनी अनुसरली आहे. त्यामुळे केवळ टाचणापलीकडे कसलेही व्यवस्थित स्वरूप या ग्रंथास आलेले नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, या ग्रंथाचा वाचक क्षणोक्षणी अडखळल्यासारखा होतो, बुचकळ्यात पडतो व ग्रंथकर्त्याला म्हणावयाचे तरी काय आहे यासंबंधी अज्ञ राहतो. जर खरोखर महाराष्ट्राचा इतिहास पद्धतशीर व सुसंगत असा जनतेपुढे मांडावयाचा असेल, तर या ग्रंथाचे समग्र स्वरूप बदलून त्यातील माहिती टाचणवजा समजून तिचे पुनर्ग्रंथन केले पाहिजे, तरच त्यापासून सामान्य वाचकवर्गास बोध होईल " (पाहा :— दा. ना. आपटे; ' डॉ. केतकर आणि प्राचीन महाराष्ट्र, ' ' लोकशिक्षण ' वर्ष ८, अंक १ जुलै १९३७ ) ज्या काटेकोरपणाने व शिस्तीने आरंभीच्या काळात त्यांनी संशोधनपर सुस्पष्ट लेखन केले ते गुण ज्ञानकोशानंतरच्या लेखनात हळूहळू दिसेनासे झाले. ' भारतीय समाजशास्त्र ' या १९३६ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या पुस्तकातील " विचारांची व लेखनाची शिथिलता " इरावती कर्वे यांच्यासारख्या अभ्यासकांना बोचल्याशिवाय राहिली नाही.

' व्हिक्टोरियस इंडिया ' या अखेरच्या पुस्तकात तर त्यांचा तोल पार गेलेला दिसतो.

ज्ञानकोशाची रचना पुरी करण्यापूर्वीच्या काळात राजकीय घडामोडीचे मर्म जाणून त्यांच्या परिणामाविषयी त्यांनी अचूक भाकिते वर्तविलेली दिसतात. उदाहरणार्थ : पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत स्थापन झालेले लोकसत्ताक राज्य किती काळ टिकेल याबद्दल त्यांना वाटणारी शंका रास्त ठरली. जर्मनीमुळे पुन्हा एकदा जागतिक युद्धाचा वणवा भडकेल व तो विझवण्यात राष्ट्रसंघ असमर्थ ठरेल हे सारे त्यांनी १९२३ साली प्रसिद्ध झालेल्या ज्ञानकोशाच्या प्रस्तावना खंडात सांगितले आहे. जपानचा ब्रिटन व अमेरिकेशी खटका उडेल हा त्यांचा अंदाजही बरोबर होता हे त्यांच्या मृत्यूनंतरच्या जागतिक घडामोडींनी सिद्ध केले. पण अखेरच्या वर्षांत राजकारणाचे बदलते रंग ओळखण्याची कुवत त्यांच्यामध्ये राहिली नव्हती आणि ते एका अजब कल्पनासृष्टीत रमले होते असे वाटते. १९३५ च्या कायद्यान्वये भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे अशी त्यांनी समजूत करून घेतली होती. या कायद्यान्वये भारतातील शासनावरचा ब्रिटनच्या संसदेचा अधिकार संपूर्णपणे नष्ट झाला आहे आणि ही वस्तुस्थिती भारतातील कोणत्याही राजकीय नेत्याच्या लक्षात आलेली नाही असे त्यांचे म्हणणे होते. भारत हा ब्रिटनने जिंकलेला देश नसल्यामुळे त्याला ब्रिटनची वसाहत म्हणता येणार नाही. या देशातील सार्वभौमसत्तेने ईस्ट इंडिया कंपनीस दिवाण नेमून आपण होऊन ब्रिटनबरोबर साहचर्य वाढवले. पुढे ब्रिटनच्या संसदेने ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटनच्या राजाकडे हस्तांतरित झालेल्या दिवाणगिरीचे अधिकार बळकावून त्यांचा वापर करण्यास सुरुवात केली. ब्रिटनच्या संसदेचे हे कृत्य बेकायदेशीर होते. त्याविरुद्ध प्रथम आपण आवाज उठवला, न्यायालयात खटले भरून हा बेकायदेशीरपणा चव्हाट्यावर आणला व हिंदुस्थानवरची बेकायदेशीर सत्ता सोडण्यास ब्रिटनला आपण भाग पाडले असा केतकरांचा दावा होता. १९३५ च्या कायद्यानुसार भारत स्वतंत्र झाला आहे तो आपण दिलेल्या एकाकी लढतीमुळे असे असताना त्याचे श्रेय कोणीही आपल्याला देत नाही अशी त्यांनी 'व्हिक्टोरियस इंडिया' या अखेरच्या पुस्तकात तक्रार केली.

शेवटच्या वर्षांतील केतकरांची राजकीय घडामोडीबद्दलची अचाट व अजब मते पाहिली की मन विषण्ण होते. त्यांच्या बुद्धीला आलेल्या विशिष्ट क्षीणतेच्या छायांनी त्यांचे अखेरचे लेखन झाकळून गेले आहे हा त्यांचे चरित्रकार डॉ. द. न. गोखले यांचा अभिप्राय यथार्थ आहे असे वाटते. 'भटक्या' ही त्यांची अखेरची कादंबरी अपूर्ण राहिल्याबद्दल दुर्गाबाई भागवत हळहळत नाहीत तर त्यांना समाधानाचा सुस्कारा सोडावासा वाटतो हे देखील या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. "ज्या राजकारणाच्या चर्चेत डॉ. केतकर उत्तरोत्तर घसरत चालले होते, त्या चर्चेला सुरुवात अशी याच प्रकरणात होत होती. आणि दैवाची खैर म्हणूनच हे पुस्तक अपूर्ण राहिले." [ दुर्गा भागवत, केतकरी कादंबरी, पृ. ९९ ) त्यांचे अखेरचे लेखन वाचताना जास्त जाणवते ते त्यांच्या 'सर्वस्पर्शी' प्रतिभेचे होत चाललेले विघटन! ज्ञानकोशाने केतकरांचा बळी घेतला असे म्हणावेसे वाटते ते या अर्थाने!

ज्ञानकोशाचे काम केतकरांनी फत्ते केले तरी त्यासाठी त्यांनी फार किंमत दिली. त्यांच्यासारखा प्रतिभाशाली समाजशास्त्रज्ञ ज्ञानकोशासारख्या मुख्यतः संकलनात्मक ग्रंथाच्या निर्मितीत इतका गुंतला नसता तर बरे झाले असते. नाहीतर समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी प्रत्यक्षतः जेवढी मजल मारली त्यापेक्षा कितीतरी मोठा पल्ला त्यांना गाठता आला असता. या अर्थाने महाराष्ट्राला ज्ञानकोशकार मिळाला तरी भारताने एक मोठा समाजशास्त्रज्ञ गमावला असे म्हणावे लागते. आरंभीच्या काळातील त्यांच्या इंग्रजी पुस्तकांनी देशोदेशीच्या अभ्यासकांचे त्यांच्याकडे लक्ष वेधले गेले होते. पण ज्ञानकोशाचे काम हाती घेतल्यानंतर ते आयुष्याच्या अखेरपर्यंत राजकीय विषयासंबंधीचे प्रासंगिक लेखन वगळता केतकरांनी इंग्रजीत फारसे काही लिहिलेच नाही. आपल्या अभ्यास-विषयातील जाणकार विदेशी पंडितांबरोबरचा त्यांचा संवादच त्यामुळे संपला; विचारांची देवघेव थांबली. त्यांचा स्वमताभिमान झपाट्याने दृढ होत गेला. लेखनावर होणाऱ्या टीकेच्या अनुरोधाने आपले प्रतिपादन वारंवार तपासून पाहण्यामुळे एखाद्या संशोधकाची वाढ होते. केतकरांच्या बाबतीत ही प्रक्रियाच थांबल्यासारखी झाली. अखेरच्या वर्षात तर वैचारिक क्षेत्रात आपण मिळविलेल्या यशाबद्दल त्याना वाटणारा आत्मसंतोष अधिकच वाढला असावा असे वाटते.

१९२८ साली केतकरांनी दिलेली कबुली लक्षात घेण्यासारखी आहे "ज्ञानकोश चालू असता जी बारा वर्षे खर्च झाली, त्यापैकी फक्त तीनच वर्ष मजकडून संशोधनाचे काम झाले· उरलेला वेळ सामान्य लेख लिहिणे, इतरांचे लेख तपासणे व त्यास योग्य पुरवण्या जोडणे, ज्ञानकोशासाठी पैसा उभा करणे, मुद्रणाकडे लक्ष ठेवणे इत्यादी क्रियांमध्ये बहुतेक वेळ गेला. इतिहास संशोधनाचे काम असे असते की ते काम करताना पूर्ण लक्ष तिकडे द्यावे लागते आणि त्यामुळे इतर कार्यास वेळ मिळत नाही." [विद्यासेवक; वर्ष ५, अंक १, एप्रिल १९२८, पृष्ठ ७५] तीन ते चार हजार वर्षांचा कालखंड व्यापणाऱ्या जातिसंस्थेचा पद्धतशीर इतिहास लिहिण्याची त्यांची इच्छा होती. त्यासाठी विविध विषयावर स्वतंत्र पुस्तके लिहिण्याचा त्यांचा इरादाही त्यांनी बोलून दाखवला होता. ब्राह्मणवर्गाचा उदय, चार वर्णांचा उदय व विकास, गौतमबुद्ध व जातिसंस्था, बृहत्तर भारतात झालेला हिंदू कायद्याचा प्रसार, आर्थिक बदलामुळे धर्माच्या इतिहासात घडून येणारे परिवर्तन वगैरे अनेक विषयांवर लिहिण्याचे त्यांनी योजिले होते असे आरंभीच्या त्यांच्या ग्रंथावरून दिसून येते. ज्ञानकोशाची प्रस्तावना लिहिताना त्यापैकी काही विषयांवर त्यांनी लिहिले असले तरी या अभ्यासविषयांना त्यांनी पुरेसा न्याय दिला असे वाटत नाही.

एका तऱ्हेने केतकरांची ही शोकांतिका विकसनशील देशातील परिस्थितीचा एक अटळ परिणाम आहे असे वाटल्याशिवाय राहात नाही. विकसनशील देशात संशोधकांना उपलब्ध असलेली साधनसामग्री, मिळणारी आर्थिक मदत, विकसित देशातील संशोधकां-च्या तुलनेने फारच अपुरी असते. प्रसिद्धीच्या साधनांची वाण त्यांना सारखी भासते.

ज्ञानसाधनेस पोषक ठरणारी ग्रंथालये किंवा प्रयोगशाळासारख्या संस्थाही थोड्या असतात. मूलग्राही संशोधन होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती ऐतिहासिक साधने, आकडेवारी किंवा अन्य माहिती गोळा करून प्रकाशित करण्याचे किचकट काम फारसे होत नाही. पहिल्या दर्जाच्या स्वतंत्र संशोधनास पूरक, आपल्या परीने उपयुक्त पण दुय्यम प्रतीचे संशोधनही फारसे होत नसते. त्यामुळे मूलगामी संशोधन करण्याची धमक असलेल्या अग्रगण्य ज्ञानवंतालाही अनेकदा साधने गोळा करण्यात किंवा मुख्यतः संकलनात्मक ग्रंथनिर्मिती करण्यात आपली प्रतिभा खर्ची घालावी लागते. इतिहासाचार्य राजवाडे किंवा केतकर यांना असेच करावे लागले.

ज्ञानकोशाच्या साऱ्या खंडांवर केतकरांची सावली पडलेली दिसते. त्यांचे ग्रह, आग्रह व पूर्वग्रह, आवडीनिवडी, रागलोभ कळतनकळत त्यात उमटले आहेत. केतकरांच्या ऐवजी त्यांच्यापेक्षा कमी प्रतिभाशाली, कमी आग्रही माणूस मुख्य संपादक असता तर ज्ञानकोशाचे हे मुख्यतः संकलनात्मक काम अधिक प्रमाणबद्ध झाले असते. त्यात पूर्व-गौरववादी राष्ट्रवाद जितक्या प्रकर्षाने जाणवतो तितका कदाचित जाणवला नसता. ब्राह्मण्याचा विकास व इतिहास याला जे प्राधान्य मिळालेले दिसते ते मिळाले नसते. आपल्या आवडत्या विषयांना व कल्पनांना वाजवीपेक्षा जादा महत्त्व दिल्याने जागा पुष्कळ अडविली जाते आहे हे त्यांच्या लक्षात येत नव्हते असे नाही पण त्यांनी त्याचे समर्थनच केलेले दिसते. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या तिसऱ्या विभागात 'वेदकालातील शब्दसृष्टि' या प्रकरणाने तीनशेहून अधिक पाने अडवलेली आहेत. "या शब्दांनी जागा पुष्कळ अडविली आहे ही गोष्ट खरी पण हे शब्द सर्व भावी भारतीय ऐतिहासिक संशोधनाचा पाया असल्यामुळे त्यास लागणारी जागा आम्ही निर्भयपणे देत आहो." असे प्रकरणाच्या आरंभीच सांगून त्यांनी खुशाल हा पसारा मांडलेला आहे. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश' प्रस्तावना खंड. विभाग तिसरा पृष्ठ १५४) वेदकाळाविषयी संशोधन करण्याची जबरदस्त इच्छा असल्यामुळे ज्ञानकोश रचताना ती हौस त्यांनी पुरवून घेतली. परिणामतः ज्ञानकोशाच्या प्रस्तावना खंडाच्या पाच विभागात वेदकालाविषयीच्या विवेचनाने प्रमाणाबाहेर जागा अडवलेली आहे. दुसऱ्या विभागात तर चक्क 'विषयांतर' असे शीर्षक देऊन वेदोक्त इतिहास व आख्यायिका सांगण्याची संधी केतकरांनी घेतलेली दिसते. भारतीय संस्कृतीचा इतरत्र जो प्रसार झाला त्याचे वर्णन करण्यात केतकरांनी दोनशे-हून अधिक पाने खर्ची घातली तर बाह्यांचा हिंदुस्थानवर झालेला परिणाम या विषया-साठी जेमतेम चाळीस पाने बहाल केली. त्यांतली वीस पानेदेखील होमरचा वाल्मिकीवर परिणाम झाला नसणार हे सिद्ध करण्यातच खर्च झाली आहेत.

केतकरांनी हे सारे अनवधानाने केले नव्हते. "भारतीय ज्ञानकोशाची शेकडा ३५ पृष्ठे भारतीय संस्कृतीच्या स्पष्टीकरणासाठी दिली आहेत आणि केवळ शेकडा १५ पृष्ठे बाह्य संस्कृतीच्या उद्बोधनासाठी दिली आहेत... परक्या देशांची आपणास केवळ स्थूल माहिती हवी असते, तथापि आपल्या देशाची आपणास सूक्ष्म माहिती पाहिजे

असते. आपल्या देशाची माहिती देताना, आपल्या देशातील पंडित वर्गास उपयोगी पडेल असा ग्रंथ केला पाहिजे. सामान्य जनता व आपल्या देशासंबंधाने संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानात जे आज जमीन अस्मानाचे अंतर आहे ते काढून टाकावयाचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रीय जनतेची ही मोठी बौद्धिक गरज आहे आणि ज्ञानकोशकारांनी ती लक्षात घेतली पाहिजे. " [ माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास; पृष्ठे १११-११२ ] केतकरांची ज्ञानकोश रचनेमागची ही भूमिका लक्षात घेतली तरीही फ्रेंच राज्यक्रांतीसारख्या जगाच्या इतिहासास वळण लावणाऱ्या घटनेबद्दल ज्ञानकोशात दिली आहे त्यापेक्षा अधिक विस्ताराने माहिती द्यावयास हवी होती असे वाटल्यावाचून राहत नाही. ' लोकसत्ता व लोकमत यांजकडून अपेक्षा ' या विषयासंबंधी कशीबशी पाच पाने विवेचन केले आहे त्यापेक्षा अधिक सखोल व विस्तृत विवेचन केले जाणे जरूर होते. " व्यापारविषयक व आर्थिक संबंधांचे यात फारच अल्पत्वाने विवेचन आले आहे " हे स्वतः केतकरानीच कबूल केले आहे. " आर्थिक संबंधांचे विस्तृत विवेचन करावयास अवश्यक साहित्य वेळेवर मिळाले नाही. " [ महाराष्ट्रीय ज्ञानकोश प्रस्तावनाखंड. विभाग पहिला. पृष्ठ ४८३ ] असे या उणिवेचे कारणही त्यांनी सांगितले आहे. युरोपमधल्या प्रबोधनाबद्दल किंवा धर्मसुधारणेच्या चळवळीबद्दलही फार जुजबी माहिती देऊन तो विषय आटोपता घेण्यात आला आहे. ज्ञानकोशासारख्या ग्रंथांत जागतिक इतिहासातील या महत्त्वाच्या घटनांची त्यापेक्षा जास्त दखल घेणे जरूर होते.

आज ज्ञानकोश वाचताना या उणिवा खुपल्या तरी त्यामुळे केतकरांच्या त्या धाडसी उपक्रमाचे मोल कमी समजण्याचे कारण नाही. " केतकरांचा प्रचंड ज्ञानकोश हे एक भाषांतरवजा भारुड आहे " असे चिं. वि. जोशी म्हणत ते मात्र बरोबर वाटत नाही ( चिं. वि. जोशी, अभिरुची, मे १९४५ ) केतकरांच्या ज्ञानकोशाच्या मर्यादा या काही अंशी ज्या काळात हे काम झाले त्याच्या मर्यादा होत्या, काही त्यांच्या विशिष्ट व्यक्तिमत्वामुळे पडलेल्या होत्या. हे सारे जमेस धरूनही संशोधनाच्या क्षेत्रात आरंभीच्या काळात व ज्ञानकोशाची रचना करीत असताही अधूनमधून त्यांनी इतरांच्या विचारांना चालना देण्याची व नव्या दिशा धुंडाळण्याची दाखवलेली धमक विसरून चालणार नाही. तीसचाळीस वर्षांनंतरच्या काळात औद्योगिक समाजाचे जे विकसनशील रंगरूप दिसणार होते ते आधीच ओळखून, त्या समाजातल्या संभाव्य समस्यांचे निराकरण कसे करता येईल हे सांगण्यात केतकर कितीतरी वर्षे आधीच मग्न झालेले होते. " प्राथमिक शिक्षण व शहराची साफसफाई, पाण्याचा पुरवठा व रस्त्यात दिवे लावणे या पलिकडे नागरिकासंबंधीच्या कर्तव्याच्या कल्पना ज्या काळात जात नव्हत्या त्या काळात नगरसंवर्धनाचा व नगरसौंदर्याचा केतकर विचार करीत होते. " गिरण्यांतील यंत्रे जशी द्रव्योत्पादनाची साधने आहेत त्याप्रमाणेच शहरातील रस्ते, शहराची मांडणी, शहरातील शिक्षण, तेथील लोकांच्या सवयी, रहाणी वगैरे सर्व गोष्टी द्रव्योत्पादनास उत्कर्षक आणि अपकर्षक असतात. या सर्व गोष्टींचा शहराने विचार करावा व त्याप्रमाणे वृद्धि कोणत्या

गोष्टींची करावयाची, फेरबदल कोणत्या गोष्टीत करावयाचा व तो फेरबदल करण्यासाठी नाश कशाचा करावयाचा, यासंबंधाने आपला कार्यक्रम ठरवावा. " [ संकीर्ण लेख; पृष्ठ १४३ ] नगर नियोजनाची भाषा ज्या काळात रूढ झाली नव्हती त्या काळात नगरनियोजनाचे महत्त्व केतकर प्रतिपादन करीत होते. आर्थिक दृष्ट्या प्रगत अशा अमेरिकेसारख्या देशात विक्रीची पद्धतीदेखील पुढे गेलेली असते हे जाणून माल कसा खपवावा यासंबंधीच अनुभवाचे बोल त्यांनी ऐकवले. व्यापारविषयक वाङ्मय आपल्या भाषेत फारसे नसतानाही त्यांनी ते वाढण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. टपालविक्रीच्या पद्धतीने आपल्याकडेही माल विकण्यास कसा वाव आहे याचे जसे त्यांनी विवरण केले त्याचप्रमाणे जाहिरातीचे युग अवतरण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी जाहिरात करण्याच्या तंत्राविषयी त्यांनी तपशीलाने लिहिले. मध्यमवर्गातील स्त्रियांनी उद्योगधंद्यात प्रवेश केल्यावर निर्माण होणाऱ्या समस्यांचे स्वरूप अजमावण्याचाहीं त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

भावी काळात निर्माण होणाऱ्या समस्यांचा वेध घेण्याची धडपड जशी त्यांनी केली त्याचप्रमाणे ज्या विषयांच्या वाटेला कोणी सहसा गेले नाही ते विषय हाताळण्याचा किंवा ज्ञानाच्या क्षेत्रातील रूढ मतांना धिटाईने धक्के देऊन नवे विचार मांडण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. महाराष्ट्रीयाच्या काव्याभिरुचीचे परीक्षण करण्याचा त्यांचा उपक्रम अभूतपूर्व होता. वाङ्मयाभिरूचीचे समाजशास्त्र समजावून घेण्याच्या फंदात पडलेले समाजशास्त्रज्ञ आजही फारसे आढळत नाहीत. लेव्हिन शूकिंग या अभ्यासकाने १९३१ साली जर्मन भाषेत प्रसिद्ध केलेला, 'वाङ्मयाभिरुचीचे समाजशास्त्र' ( सोशियॉलॉजी ऑफ लिटररी टेस्ट ') हा ग्रंथ या विषयावरचा एक अपवादभूत असा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. केतकरांचे पुस्तक हे त्याही आधी तीन वर्षे प्रकाशित झाले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे. सामाजिक व वैज्ञानिक परिस्थितीचा वाङ्मयोत्पादनावर झालेला परिणाम दाखवून त्याच परिस्थितीचा महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणावरही कसा प्रभाव पडला आहे त्याचे विश्लेषण केतकरांनी या पुस्तकात केलेले आहे. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या तिसऱ्या विभागात ब्राह्मण्याचा इतिहास देताना गोत्र व प्रवर यासंबंधी त्यांनी जे विवेचन केले ते तोपर्यंत रूढ असलेल्या मताविरुद्ध होते हे ध्यानात ठेवावयास हवे. गोत्र ही संस्था फार प्राचीन नाही. गोत्रांचा वैदिक धर्मसंस्थेत महत्त्वाचा संबंध नाही. हे सर्व भेद सूत्रकालीन आहेत. प्रवरांशी गोत्रांचा संबंध सूत्रकालीन होय हे केतकरांचे प्रतिपादन नवीन होते. पुढे हाच धागा पकडून एस्. व्ही. करंदीकरानी भरभक्कम पुराव्यानिशी छाननी करून या मताला पुष्टि दिली. ( जी. एस्. घुर्ये; 'टू ब्रॅह्मनिकल इन्स्टिटयुशन्स–गोत्र अँड चरण ', पॉप्युलर प्रकाशन, १९७२ पृष्ठे ८–९ ) केतकरांचे हे सर्व लेखन वाचले की त्यांच्या द्रष्टेपणाची खात्री पटल्याशिवाय राहात नाही.

मुंबई विद्यापीठ
मुंबई १

यशवन्त दिनकर फडके

# विभाग १

डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकरांनी स्वतःविषयी व इतर व्यक्तीसंबंधी केलेल्या लेखनातून पहिल्या विभागासाठी चार उतारे निवडले आहेत. त्यांची 'माझ्या आयुष्यातील जुन्या बऱ्यावाईट आठवणी' ही लेखमाला 'प्रतिभा' पाक्षिकात १९३३ साली प्रसिद्ध झाली होती. त्या लेखमालेतून 'माझ्या आयुष्याची वक्रगती' हा या पुस्तकातील पहिला उतारा घेतला आहे. अमेरिकेला जाण्यापूर्वी विद्यार्थीदशेत व बालपणी त्यांच्यावर आवतीभवतीच्या वातावरणाचे कोणते संस्कार झाले ते या उताऱ्यात त्यांनी वर्णिले आहेत.

१९३६ साली 'ज्योत्स्ना' मासिकात 'मी व माझे टीकाकार' हा केतकरांचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यातून दुसरा उतारा घेतला आहे. टीकाकाराबद्दलची त्यांची वृत्ती ज्याप्रमाणे या उताऱ्यात प्रतिबिंबित झाली आहे त्याप्रमाणेच त्यांचा जबरदस्त आत्मविश्वासही या उताऱ्यात व्यक्त झाला आहे.

अमेरिकेतील शिक्षण संपवून भारतात परत आल्यानंतर १९१५ साली ज्ञानकोशरचनेच्या कामास केतकरांनी सुरवात केली. हे काम आपल्याला का करावेसे वाटले, त्यासाठी तेलगू ज्ञानकोशाची रचना करू पाहणाऱ्या डॉ. अच्युंत लक्ष्मीपती वगैरेकडून आपण काय शिकलो हे त्यांनी 'माझें बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास' या पुस्तकात सांगितले आहे. १९१७ साली प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकातून तिसरा उतारा घेतला आहे.

इतिहासाचार्य राजवाड्यांविषयी केतकरांना फार आदर होता. त्यांच्या मृत्यूनंतर राजवाड्यांच्या जीवनपद्धतीविषयी जो लेख लिहिला होता त्यातील महत्त्वाचा भाग चौथ्या उताऱ्यात घेतलेला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९७५
दा. क. २३८९८
निबंध २८/८८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# १. माझ्या आयुष्याची वक्रगति

माझ्या आयुष्यक्रमाला जी वक्रगति मिळाली तिचे पृथक्करण करतां असें म्हणता येईल कीं मातृपितृनिधनामुळे आणि उपजीविकेस व शिक्षणास पुरतील इतक्या पैशाच्या अस्तित्वामुळे जें स्वातंत्र्य प्राप्त झाले तें एक महत्त्वाचे कारण होतें, आणि कॉलेजच्या दिवसांत जें भोवताली राजकारणाचें वातावरण निर्माण झालें तें दुसरें एक कारण होतें. माझ्या भिन्न झालेल्या आयुष्यक्रमाचें श्रेय अगर दोष मला कितपत देतां येईल असाच प्रश्न मनांत येतो.

मी एकनिष्ठ प्रेम करणारा नाहीं. अनेक स्त्रियांच्या पाठीमागें जसें माझें अंतःकरण भटकलें आहे तसेंच तरुणपणांत तें अनेक आयुष्यध्येयांच्या मागें सैरावैरा धावत सुटलें आहे. योगमार्ग, देशाभिमान, ईश्वरजिज्ञासा यांनींच मला भटकविलें असें नाहीं तर विद्येची आवड, भारतीय संस्कृतिरक्षणाची इच्छा, भाषेचा अभिमान या सर्व भावनांनीं आयुष्याला गति मिळाली आहे. जेव्हां विशिष्ट भावनेचा जोर होई तेव्हां आयुष्याला काही निराळी गति मिळाल्याशिवाय रहात नसे. किंकर्तव्यतामूढासारखें इतस्ततः हिंडणे-देखील बरेंच झालें आहे. आयुष्याचें स्वरूप कसें झालें तर ध्येयांनीं भटकणें आणि पोटाच्या म्हणजे निकट फायद्याच्या विचारांनीं दुसऱ्या मार्गानें जाणें म्हणजे, "ताळ्यावर येणें" या दोन शक्तींच्या ओढींत आयुष्याला स्वरूप आलें तें आलें. जेव्हां जेव्हां मी परीक्षांत नापास झालों आहें तेव्हां तेव्हां प्रकृत अभ्यास सोडून आवडीच्या अनेक विषयांकडे भटकण्यामुळें झालों, असें आठवतें. नापास झाल्यानंतर डोळ्यांत अंजन पडावें आणि भटकणारे अंतःकरण जरा आवरून धरावें असाहि थोडासा प्रकार होई. इंटरमिजिएटमध्यें एकदां नापास झालों त्यावेळेस "योगमार्ग" विशेषकरून हठयोगमार्ग यावरील पुस्तके वाचीत होतो आणि क्रिया करूं लागलो होतो. पातंजलयोगदर्शन, हठ-योगप्रदीपिका इत्यादी पुस्तकांचा अभ्यास याच वेळेस केला. "योगी" म्हणून प्रसिद्ध असलेल्या, पण लबाड अशा मंडळींना खुश करून त्यांची विद्या घ्यावी या हेतूनेदेखील थोडाबहुत वेळाचा व्यय झालेला आहे. हा अपव्यय होत असताना मी आपलं प्रकृत कर्तव्य दुर्लक्षित नाहीं अशीहि मनाची समजूत करून घेत असे. त्याच वेळेस मिल्टनचे प्याराडाईझ लॉस्ट या काव्यांतील एक पुस्तक परीक्षेसाठी घोकावे लागत होते. त्यावेळेस "प्रीडेस्टिनेशन" वगैरे गोष्टींवर जें मिल्टनने बरेवाईट पांडित्य केले आहे त्याचा परिणाम माझ्या मनावर झाल्यावाचून राहिला नाही. त्यातल्या त्यात त्या भागाकडे विशेष लक्ष जाण्याचे कारण त्या वेळेचा एक अध्यापक होय. प्रो. रॉबर्टसन नांवाचा एक तरुण अध्यापक विल्सन कॉलेजमध्ये होता आणि त्याच्यावर "प्रीडेस्टिनेशन"वर व्याख्यान

झोडण्याचा प्रसंग आला, आणि त्यानं जें व्याख्यान झोडलें त्यांत त्याने प्रयत्न असा केला की सर्वज्ञ ईश्वराला अमुक मनुष्य काय करणार हे जरी ठाऊक असले तरी त्याच्या पूर्वज्ञानाचा परिणाम मनुष्याच्या इच्छाशक्तीवर होण्याचे कारण नाही. मनुष्याला स्वयंनिर्णय आहेच. प्रो. रॉबर्टसनचे हें फ्रीवुइलवरील पांडित्य मला पटलं नाहीच. भवितव्याचं पूर्वज्ञान ईश्वराला आहे हे जर खरे असले तर जे व्हावयाचे असेल ते होईल. आपण व्यर्थ तडफड करण्यात अर्थ नाहीं; आयुष्याचं तारू भटकेल तसे भटकू द्यावे, असे विचार मनात येत. त्या विचारांना व्यावहारिक स्वरूपहि होते. मी मनांत ठरविले कीं, पास होणार असलो तर अभ्यास न करता पास होईन, नापास होणार असलो तर अभ्यास करूनहि नापासच होईन ! याप्रकारे विचार चालू असता परिणाम व्हावयाचा तो झालाच. परीक्षेत नापास झालो एवढेच नव्हे तर तीन विषयांत नापास झालो. पुढच्या वर्षी अर्थात ताळ्यावर आलो. पुढे आणखी नापासाचे दोन शिक्के मिळाले. ज्युनिअर बी. ए.च्या वर्गात असता पहिल्या एलएल. बी. ला बसलो होतो तींत नापास झालो आणि बी. ए. मध्ये देखील पुढच्या वर्षी नापास झालो या दोन नापाशींचे कारण योगमार्ग नव्हता, प्रीडेस्टिनेशन नव्हते, तर देशाभिमान होता. आणि आपल्या परीक्षाविषयी एकंदर जुगुप्सा होती. परीक्षांचे लिगाड हे इंग्रजाने गळ्याभोवती लावले आहे. या दुष्ट परीक्षांतून निसटण्याचा सोपा उपाय म्हणजे इंग्रजांचे राज्यच नाहीसे करून टाकणे हा आहे तर आपण त्याच मार्गाला लागले पाहिजे असे विचार त्यावेळेस मनात घोळूं लागले होते.

माझ्या देशाभिमानाचं स्वरूप वारंवार भिन्न प्रकारचे होत गेले, तथापि देशाकरता आपण कांही तरी केले पाहिजे अशा तऱ्हेची भावना मला अगदी लहानपणापासून झाली. माझ्या मनावर ज्या अनेक गोष्टी संस्कार करत्या झाल्या त्यापैकी एक गोष्ट म्हटली म्हणजे आमचे पेशवे घराण्याशी नाते आहे याचा शोध होय. हे नाते म्हणजे जवळचे होते अशातला भाग नाहीं. ज्याप्रमाणे दोन कोकणस्थ घराणी एकमेकांमध्ये जुने नाते आहे काय असा शोध करू लागली म्हणजे नाते हे निघावयाचेच, तशा पैकींच हा प्रकार होता. काशीला जुन्नरकर जोशी म्हणून एक सावकार घराणे होते, त्या घराण्याचे पेशवे घराण्याशी व सरदार घराण्याशी अनेक संबंध होते. त्या घराण्यात केतकरांचीहि एक मुलगी गेली होती. त्यामुळे आमचा पेशवे घराण्याशी संबंध झाला. पेशवे आणि केतकर सगोत्री असल्यामुळे प्रत्यक्ष संबंध अर्थात् शक्यच नव्हता. आमच्या वडलांची आत्या हिला पेशव्यांचा विहीणपणा असल्यामुळे तिने नानासाहेबांना लग्नांत पाहिले होते. ही गोष्ट देखील माझ्या लहानपणीच मला कळली. १८८८ च्या सुमारास पेशव्यांच्या घराण्यांतील दोन अल्पवयी मुलगे ( कोण होते कोण जाणे ) मुंबईस आले होते. आणि त्यांचा कांही घरीं स्वागतसमारंभ व सत्कार झाला होता. ज्या घरीं सत्कार झाला त्यांत आमचे एक घर होते. तो सत्कार बरेच दिवस घरांत चर्चेचा विषय होता. याचे कारण ऐपतीबाहेर सत्कार केला म्हणून आमच्या चुलत्यावर घरांतल्या बायकामाणसांचा राग होता हे होय. या सत्काराच्या वेळेस पेशवे म्हणजे काय हे मला समजत नव्हते. पुढे दोन तीन वर्षांनी समजू

लागले आणि ते आपले आप्तसंबंधी आहेत अशीहि बातमी घरांत म्हणजे माझ्या थोरल्या आतेकडून कळली. फार खर्च केल्याबद्दल आमच्या थोरल्या चुलत्यांचा निषेध याच आतेने विशेष केला होता. घरांत लागणाऱ्या अनेक गोष्टींवर पैसा खर्च करावयाचा नाहीं. आणि जे आप्त अतिशय दूरचे, त्यांच्या सत्कारासाठीं इतके पैसे कशाला खर्च करावयाला पाहिजे होते असा तिचा आक्षेप होता. या आतेकडून केतकरांचे पेशव्यांच्या घराण्याशीं संबंध अनेक तऱ्हेचे होते असें कळलें होतें. थोरल्या आतेचे जें गाऱ्हाणे होते त्याबद्दल मला सहानुभूति होती अशांतला भाग नाही. तथापि घरातल्या पूर्वेतिहासाच्या ज्या कांही गोष्टी आम्हांला आमच्या वडलांमार्फत किंवा चुलत्यामार्फत कळल्या नसत्या त्या आतेमुळे कळत असत आणि आमच्या वडलांच्या किंवा चुलत्यांच्या मनाविरुद्ध गोष्ट करण्याचे जर कोणाला धैर्य असेल तर त्या या आतेलाच होत असे. आमच्या वडलांची म्हणजे आतेची आत्या तर पेशव्यांची विहीणच होती, तिचा वरपक्ष होता आणि तिचा सत्कार पेशवे मंडळीकडून जसा व्हावयास पाहिजे होता तसा कांहीं झाला नव्हता, अशा प्रकारची कांहीं भानगड होती. मला त्या भानगडीची मोठी फिकीर नव्हती. पेशवे घराण्याशीं आपला कसाबसा संबंध आहे ही गोष्ट कळल्यानेच मला मोठा आनंद होत असे. पुढे सुमारे १४ वर्षांचा मी असता माझी आई, थोरले चुलते, थोरली आत्या आणि एक सर्वांत थोरली चुलती ( जी बारा वर्षांची असतांच विधवा झाली व तेव्हांपासून अंजनवेलीसच असे ) ही सर्व मंडळी काशीयात्रा करून आली, त्यावेळेस आमच्या वडलांच्या आत्याबाई जुन्नरकर या देखील येऊन उमरावतीस कांही दिवस आमच्याकडे राहिल्या होत्या. त्यावेळेस मग ५७ सालाच्या गोष्टी बऱ्याच निघत. त्या आत्याबाईंनी नानासाहेबांना एका लग्नाच्या वेळीं पाहिले होते पण त्यांचे बोलणें झालें नव्हते. त्या वेळेस लग्नांतील एका पक्षाच्या पुरुषांनीं व्याहीपक्षाच्या स्त्रियांशीं बोलावे हे अगदी अनुचित समजले जात असे.

पेशवाईच चालू असती तर आपण कितीतरी मोठे असतो अशा प्रकारच्या कल्पना मनांत उद्भूत होणे अगदी साहजिक आहे आणि त्या तशा झाल्याहि. पेशवाई परत यावी अशी मात्र इच्छा उत्पन्न होत नसे. कारण पेशव्यांच्या घराण्यांपैकी कोणालाच प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. स्वराज्य स्थापन व्हावयाचें तर ते शिवाजीसारखीच कोणीतरी बंडाळी करून पुन्हां स्थापन व्हावयाचें अशा तऱ्हेच्या कल्पना वागत असत. नानासाहेब अजून फरारीच आहेत अशी कल्पना लोकांत त्यावेळेस प्रचलित होती व नानासाहेब मेले नाहींत या तऱ्हेचाच समज आम्हांस समाधानकारक वाटत होता. जर नानासाहेब जिवंत असले तर ते पुन्हा काहीतरी करून स्वराज्य स्थापन करतील. त्यांना शिंदे, होळकर, गायकवाड अजून मिळतील अशा तऱ्हेच्या आशांना आम्ही आपल्या बालवयांत सोडलें नव्हतें. नानासाहेब आले आणि ते आमच्याच घरीं उतरले आणि पोलीस पार्टीनें घराला गराडा दिला आणि त्यामुळें गोळीबार सुरू झाला, अशी स्वप्नेंहि मला पडत असत.

देशाभिमान म्हणजे इंग्रजांचें राज्य घालविण्यासाठीं प्रयत्न, दुसरे तिसरे कांहीं नाहीं अशा तऱ्हेचीच कल्पना माझ्या लहानपणीं माझीच होती असें नव्हे तर अनेक अल्पवयी मंडळीची होती. त्यांना घालविण्याचा मार्ग बंडाशिवाय दुसरा नाहीं अशी ही अल्पवयी समजूत असल्यामुळे जो बंडाळी करी तो मोठा देशाभिमानी म्हणून आमची समजूत होई. तंट्याभिल्लासंबंधींच्या वृत्तीमध्ये माझ्या मनांत याच कारणामुळें स्थित्यंतर झाले. रायपूरला माझा जन्म झाला. पुढें संबलपूरला वडलांची बदली झाली. तेथून पुढें मुंबईला येऊन राहीपर्यंत तंट्या भिल्लाच्या बंडाळीच्या कथा ऐकू येत. माझे वडील पोस्ट-मास्तर होते. पोस्टाची तिजोरी त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांना देखील तंट्या भिल्लाची दहशत होती. व तंट्या भिल्ल जर पोस्ट ऑफिस लुटण्यासाठी आला तर काय केलें पाहिजे याबद्दल त्यांची समवयस्कांशीं चर्चा चाले. त्यावेळेस तंट्या भिल्ल म्हणजे रावणा-सारखाच कोणी एक राक्षस आहे अशी कल्पना होती.

तथापि जेव्हां बंडखोरी म्हणजे इंग्रजाविरुद्ध प्रयत्न, बंडखोरांतून पुढेंमागें स्वराज्य-संस्थापक निघावयाचे अशा तऱ्हेच्या कल्पनांमुळे तंट्या भिल्लाविषयी माझ्या हायस्कूलच्या दिवसांत माझ्या मनांत आदरच उत्पन्न झाला. तंट्या भिल्लाशिवाय दुसरी एक बंडाळी करणारा पुरुष म्हटला म्हणजे वासुदेव बळवंत फडके. याचा पुतण्या उमरावतीला इंग्रजी दुसरींत असतां माझ्या वर्गांतच होता. तो अत्यंत गरिबींतच दिवस काढीत होता, तथापि त्या पुतण्याला मी थोर पुरुषाशीं संबंध असलेला म्हणून भाग्यवान समजत होतो. येणें-प्रमाणें जे बंडावा करीत त्यांच्याविषयीं सहानुभूति व आदर हीं उत्पन्न होत. पुढें पुढें जरी या असल्या प्रयत्नांनीं कांहीं होणार नाहीं असें समजूं लागलें तरीदेखील असल्या मंडळी-विषयीं अत्यंत आदर व प्रेम हे बरेच दिवस वाटत असे. फार कशाला कै. दामोदर हरी चाफेकर यांच्या पंक्तीला बसून लाडू खाल्ले आहेत ही गोष्ट देखील मला अभिमानाची वाटे. हायस्कूलमध्यें असतांना या मला मिळालेल्या थोर मानाबद्दल मी आपल्या सहा-ध्यायांच्या समोर बढाई मारली आहे. ज्या व्यक्तींना लोक थोर समजतात अशा अनेक व्यक्तींबरोबर भोजन प्रसंग किंवा अल्पाहारप्रसंग आले आहेत, तथापि दामोदर चाफेकर यांच्याबरोबर जेवण्याबद्दल जो अभिमान वाटला तितका अभिमान दुसऱ्या कोणत्याहि जेवणानें वाटला नाहीं.

सावरकर, अण्णा कर्वे, इत्यादि मंडळी ज्या कॉलेजांतील चतुष्टयींत होती त्याच चतुष्टयींत मी असल्यामुळें त्यांच्या मनांत व माझ्या मनांत जे विचार वागत होते त्यांत कांहीं अंशी सादृश्य तर कांहीं अंशी विसादृश्य होते. कॉंग्रेससारख्या संस्थेविषयी बऱ्याचशा महाराष्ट्रीय ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या मनांत त्यावेळेस तिरस्कारच वाटत होता. आणि मागणीनें कांहीं मिळत नसते या तत्त्वाचेच बरेच लोक अनुयायी होते. या परकीयांच्या जबर सत्तेविरुद्ध काय करावें हें समजण्याइतकें शासनशास्त्र कोणालाच ठाऊक नव्हतें, त्यामुळें माझा मंत्र तो खरा, दुसऱ्याचा खोटा अशा तऱ्हेचीं भांडणें पुष्कळच चालत होतीं. आपला व्यवहार सोडून देशस्वातंत्र्याच्या मार्गाला लागणारा कोणी असणें

शक्य नव्हतें. तथापि स्वराज्य जाऊं द्या पण आपल्या जातीचा अपमान झालेला पाहूं नये, गोऱ्या कातडीच्या लोकांची खुशामत करीत जाऊं नये एवढ्या तरी गोष्टी आपण अंमलांत आणाव्यात असें वाटत असे. कांहीं दिवस नैराश्यवादी मंडळींत "अधिकारी हत्त्या मत" पसरू लागलें होतें. अशा प्रसंगीं एका चर्चेत मी सहज बोलून गेलों कीं जर इंग्रज अधिकाऱ्यांची हत्त्या करावयाची झाली तर त्याची पानसुपारी चालली असतां त्याला गोळी घालावी म्हणजे संशय पानसुपारी देणारावर जाईल आणि इंग्रजस्तुतीचे हे प्रकार बंद पडतील. ज्यावेळेस हें असें बोलून गेलों त्यावेळेस अण्णा कर्वे मंडळींत होते. हे गप्पांतील भाषण मी विसरूनहि गेलों होतों, पण पुढें सुमारे ५ वर्षांनी मी अमेरिकेंत असतां त्याची आठवण झाली. कारण जॅकसनचा खून त्याच्या पानसुपारीच्या वेळेसच झाला. आणि तो नाशिकला झाला त्यावेळेस कर्व्यांची आठवण झाली. कांहीं दिवसांनी कर्व्यांचे नांव आरोपींच्या यादींत पाहिलें तेंव्हां गुन्ह्याच्या स्वरूपांत आपणच दिशा दाखविली नाहीं ना असा अत्यंत खेदजनक विचार मनांत आला, "खेदजनक" हे शब्द वापरण्याचें कारण जॅकसनच्या खुनाबद्दल मला खरोखरच वाईट वाटत होते. जॅकसन हा कितपत पंडित होता याची मला कांहींच माहिती नव्हती, तथापि त्यावेळेस मी अमेरिकेंत होतों आणि अयोग्य राज्यपद्धतींचें धागेदोरे फार दूरवर पसरलेले असतात आणि विशिष्ट अधिकारी तिला फारसा जबाबदार नसतो ही गोष्ट मनाला पटली होती. व पाश्चात्य मंडळींत रोजचें राहाणें असल्यामुळे त्यांच्याविषयीं हेहि स्वजनच आहेत अशी भावना उत्पन्न झाली होती. त्यामुळें एखाद्या कोकणस्थ ब्राह्मण मामलेदाराचा खून करणें जितके गैर तितकेच इंग्रज कलेक्टरचा देखील खून करणे गैर आहे असें वाटूं लागलें होतें. शासनशास्त्राच्या अभ्यासामुळें एका पद्धतींतील एका व्यक्तीचा खून केल्यामुळें पद्धतीची सुधारणा न होता ती पद्धती बळकट होत जाते अशीही कल्पना जगांतील अनेक चळवळींचा इतिहास पाहून झाली होती.

देशाला बंडाळी करून स्वराज्य मिळविणें अशक्य नाहीं अशी कल्पना बराच काळपर्यंत माझ्या मनांत वावरत होती. या पद्धतीनें कर्तृत्व सुरूं व्हावे यासाठी मनांत कल्पना अनेक येत होत्या. एकदां वाटे फौजेंतले लोक सत्तावन सालीं फितले पुन्हां फितणार नाहींत कशावरून? तसें फितविण्यास क्षेत्र अजूनहि आहे. त्यांना नेते मात्र चांगले मिळाले पाहिजेत. यशस्वी युद्धाच्या शक्यतेच्या कल्पना बराच काळपर्यंत आमच्या पिढीच्या तरुणांच्या मनांत वावरत होत्या ही गोष्ट बॅरिस्टर सावरकरांच्या उदाहरणावरून स्पष्ट होणारी आहे. माझ्या समकालींनापैकी बरीच मंडळी निरनिराळ्या राजकीय प्रयत्नांत सामील झाली, त्यांपैकीं अनेक बाबती केवळ पोरखेळासारख्या होत्या. राजकीय तऱ्हेच्या प्रयत्नांत पडण्याच्या कांठावर मी येत असे पण आंत गुंतत नसे. याला कारणें अनेक असत. तसल्या तऱ्हेच्या प्रयत्नांत जी मंडळी पडत त्यांच्या मतापासून माझी मतें जराशीं पुढें सरकलेलीं असत, त्यामुळें मी कोणाच्याच प्रकरणांत सामील झालो नाहीं असे वाटतें. ज्या वेळेस दुष्ट सरकारी अधिकारी मारून टाकावे म्हणजे हिंदुस्थानला बरे दिवस

येतील असें मला वाटे त्यावेळेस आमच्या सहाध्यायी मंडळीपैकी कोणास तसें वाटत नसे. तथापि जेव्हा तशा प्रकारचें मत लोकांचे होई त्याच्या अगोदरच त्या मताचा मी त्याग केला असें मात्र आढळून येई. त्यामुळें देशकल्याणाचा "खरा एकच मार्ग" सोडून स्वार्थाच्या मागे मी लागलो आहे असा आरोप मजवर मधून मधून होत होता. अशा प्रकारचा आरोप सावरकरांच्या लंडनमधील गोटांतील एका व्यक्तीनें मी अमेरिकेंत असतां मजवर केला आणि पुढे ती व्यक्ती स्वतःच्या बचावासाठी सरकारची साक्षीदार देखील झाली.

सैन्य उठवून बंडाचा प्रयत्न करावा असा प्रसंग केव्हा येईल तेव्हां येवो. वेळेची वाट पहात जय्यत रहाण्याचें आपले कर्तव्य आहे. त्यासाठीं अगोदर प्रत्येक देशकल्याणेच्छू व्यक्तीनें युरोपांत आणि अमेरिकेंत जाऊन लष्करी विद्या व शस्त्रास्त्रे तयार करण्याची विद्या या संपादन कराव्यात आणि वेळ येईपर्यंत वेळेची वाट पहात कोठेंतरी नोकरी करीत रहावे अशा तऱ्हेचें विचार बऱ्याच मंडळीचे होते व माझेही त्या प्रकारचे होते आणि या कारगासाठी एक संघ तयार करावा असाहि प्रयत्न होता. या संघाला एक कायदे-पंडित भेटला; तो वकील नव्हता पण सामान्य मनुष्य तथापि सरकारी नोकराचा मुलगा होता. तो म्हणाला लष्करी विद्या संपादन करणे हा कांहीं गुन्हा होत नाहीं, तर याचा गाजावाजा करण्यास हरकत नाहीं. बऱ्याच जणांनी ही क्रिया उघड उघड करावी. लष्करी शिक्षण घेण्यासाठीं विदेशी जाण्याला पैसे पाहिजेत. पण तो पैसा दिला पाहिजे. त्यासाठीं फंड उभारला पाहिजे अशा तऱ्हेची वाच्यता पुष्कळच करीत; पण फंड देण्यास कोणीही पुढे आले नाहीं. लष्करी शिक्षण कोठे मिळेल याची चौकशी सुरू झाली आणि अनेक देशांच्या कॉन्सलांच्या ऑफिसांत आम्ही फेऱ्या घातल्या, तेव्हां लष्करी शिक्षण अमेरिकेंत बऱ्याच शाळांतून आणि युनिव्हर्सिट्यांतून दिले जातें हें पुढें कळलें. आणि त्यामुळें कांही मंडळींनी अमेरिकेंत जाण्याचे ठरविले. तथापि याप्रसंगी दोन मंडळी प्रत्यक्ष जाण्यास तयार झाली. ती म्हटली म्हणजे प्रभाकर शिलोत्री आणि मी. बाकी कोणी मंडळी आपल्या आयुष्यांस हवे तिकडे भटकूं देण्यास तयार नव्हती. लोकांच्याकडून फंडदेखील मिळाला नाहीं तथापि एका स्नेह्याकडून ४०० रुपये घेऊन शिलोत्री गेले. मी त्यावेळेस जाऊं शकलो नाहीं. आमच्या घरच्या मंडळींनी आडकाठी केली, पैसे दिले नाहींत. तेव्हां त्याच्या पुढच्या वर्षी गेलो. शिलोत्रीनंतर बरोबर एक वर्षानें मी हिंदुस्थान सोडलें. शिलोत्री अगोदर गेले ते कार्नेल युनिव्हर्सिटीमध्यें अग्रिकल्चरल कॉलेजमध्यें दाखल झाले; तेथें शिक्षण फुकट होतें व लष्करी शिक्षण देखील होते. शिलोत्री गेल्यानंतरच्या वर्षांत इकडे माझें पुन्हां मतांतर झालें. युद्धविषयक अनेक पुस्तकें मी त्यावेळेस वाचली आणि हिंदुस्थानची स्थितीदेखील अधिक चांगली अभ्यासली आणि पुढें यशस्वी बंड करणें शक्य होणार नाहीं असें ठरविलें. आणि पुढच्या सालीं अमेरिकेंत गेलों तो आपण जाण्यासंबंधानें गप्पा बऱ्याच मारल्या त्या खऱ्या करून दाखविल्या पाहिजेत असें वाटल्यामुळे गेलो. अमेरिकेस गेल्यानंतर आपण काय करावें यासंबंधीचें मनापुढें कोणतेंच कल्पनाचित्र नव्हतें.

प्रतिभा. वर्ष १ अंक १८, २८ ऑगस्ट १९३३ पृ. २७-३१.

## २. मी व माझे टीकाकार

माझ्याविरुद्ध किंवा अनुकूल असे दोन्ही प्रकारचे टीकाकार माझ्या नित्य परिचयाचे आहेत, आणि ते योग्यता आणि भावना या दृष्टींनीं अत्यंत विविध आहेत. माझ्या लेखनावर जशी टीका होते तशी माझ्या वागणुकीवरही होते. माझ्या लेखावर टीका करणारांमध्ये विविध प्रकार आहेत. त्याप्रमाणे माझ्या वागणुकीवर किंवा कृत्यावर टीका करणारांतदेखील आहेत. वागणुकीवर टीका करणारी मंडळी घरांतल्या निकट आप्तापासून आहेत. माझ्या अत्यंत निकट आप्तांनी मला कांहीं बाबतींत दुःसाध्य व्यक्ती म्हणून सोडून दिलें आहे. कोणी वर्तमानपत्राच्या बातमीदारांनी माझ्या आप्तांच्या मुलाखती घेतल्या नाहींत म्हणून ब-याचशा गोष्टी झाकून आहेत. जाहीर टीकांमध्ये प्रतिकूल टीका व्यक्त होते, त्याप्रमाणें अनुकूलही होते. तथापि सर्वच प्रसंगीं दोन्ही बाजू लोकांपुढे येतात असें नाहीं. जेव्हां कांहीं प्रतिकूल टीका होते तेव्हां तेव्हां त्याला उत्तर देणारी अनुकूल टीका करण्याची फिकीर थोडक्यांसच असणार. टीके-मध्ये जसें विषयवारीनें प्रकार सांगतां येतील त्याप्रमाणेंच लेखकाच्या मनोवृत्तीच्या किंवा लायकीच्या अनुरोधानें देखील सांगता येतील. कांहीं टीका अपरिचित मताविषयीं असहिष्णुता बाळगणारी आहे; पण पुष्कळ प्रसंगीं तशी जरी बखर दिसली तरी त्या टीकेंतील प्रबल भावनांचे कारण निराळेंच असतें. जें मी अनुभवानें व ज्ञानानें तसेच पूर्वीच्या माहितीनें लिहूं शकतो तितका अनुभव व माहिती आपणास नसल्यामुळें म्हणजे माझ्या लेखनाशी तुल्य असें लेखन आपणांस लिहिताच येणार नाहीं याच्या जाणीवेमुळे माझ्या लिहिण्यांतील वैविध्यास अगर नवेपणांसच आक्षेप घेणारी टीका प्रचलित वाङ्मयांत दृष्ट झाली आहे. जेव्हां माझ्या लेखांतील मतांवरच संतापून जाऊन शिव्या देण्यास प्रवृत्त होणारी अशी टीका माझ्या नजरेस येई तेव्हां ती टीका माझ्या मतांवर खरोखर नसून लेखक त्यांत आपलाच हीनत्वगंड दाखवित आहे असे मला वाटे. या प्रकारच्या विविध कारणांमुळें बहुतेक प्रसंगी टीकांना मी उत्तरच देत नसे. जेव्हां टीकालेखकाची गैरसमजूत झाली आहे किंवा तो माझेपेक्षां जें निराळें तत्त्व घेऊन बसला असेल तें चूक आहे आणि ती चूक दाखवून देणें प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे असे जेव्हां मला वाटे तेव्हा प्रत्युत्तरादाखल मधून मधून मी टीकांस उत्तरें दिलेलीं आहेत. पण बहुतेक टीकांकडे त्यास शिखंडीचे बाण समजून दुर्लक्षच करावे लागले. कारण त्या टीका उत्तर देण्याला लायक किंवा योग्य भावनेने प्रेरित झालेल्या होत्या असें मला वाटलें नाहीं. तथापि हेंहि मात्र सांगितले पाहिजे कीं कोणत्याहि टीकाकाराबद्दल मला द्वेष म्हणून कधीं वाटलाच नाहीं. उलट आपली स्तुति करणारांपेक्षा आपली निंदा करणारेच

लोक आपणांविषयीं जास्त लिहून आपल्या अस्तित्वाची आठवण जगास देतात, या दृष्टीनें त्यांचे कार्य उपयुक्त आहे असेंच मला नेहमीं वाटत असे. आणि म्हणून थोडासा प्रतिकूल टीकेचा एखादा झरा एखादे वेळी कोरडाच पडेल की काय अशी मला भीति वाटे. येथें हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, या प्रकारच्या भीतीमुळें माझ्याविषयीं गैरसमज पसरवून देऊं इच्छिणाऱ्या लेखास मी उत्तर दिलें नाहीं व थोडासा गैरसमज राहिला तरी त्यांत नुकसान कांहीं नसल्यास मी तो तसाच राहू देत असे. हेतु एवढाच कीं, निराळ्या दृष्टीकोनानें व विरुद्ध भावनेनें आपलेकडे पहाणारा लेखक आपल्याविषयीं पुढें काय लिहितो याचीहि मजा आपणास पाहतां यावी. शिव्यांचा वर्षाव, पण तो जर माफक प्रमाणांत असेल तर मला आवडतो. माझ्यावर जेव्हां भलभलत्या हेतूंचा आरोप होई तेव्हां देखील एक तऱ्हेची मौज वाटल्याशिवाय राहात नसे. माझ्या लेखांवर टीका करणाऱ्यांचा अनुभव मला १९०६ पासून आजपर्यंत ३० वर्षांवरचा आहे. 'महाराष्ट्र वाग्विलास' जेव्हां १९०६ मध्ये प्रसिद्ध करूं लागलों तेव्हांपासूनच मी आखाड्यांत उतरलों. मला अनुकूल त्याप्रमाणेच माझ्याविरुद्ध लेखकांमध्यें जगांतील पहिल्या प्रतीचे विद्वान् आहेत. पण हे सर्व उच्च टीकाकार माझ्या इंग्रजी ग्रंथांचे परीक्षण करतांना उत्पन्न झालेले आहेत. १९१४ सालचे अंतापासून माझें इंग्रजीतील लिहिणें बंद झालें आणि तेव्हांपासून शिष्टवर्गीय टीकाकारांशी माझा संबंध तुटला. आणि माझ्या लेखांचे व ग्रंथांचे परीक्षण नुकत्याच शाळेंतून सुटलेल्या पोरापासून ते फार तर ज्यांस बऱ्या प्रकारचे सुशिक्षित असें म्हणता येईल येवढ्याच वर्गाकडून होऊं लागलें. अर्थात् या वर्गांमध्ये उत्तर देण्यालायक लोकहि थोडेच असत. हें टीकेस उत्तर न देण्याचें बरेंच महत्त्वाचें कारण होय.

माझ्या इंग्रजी पुस्तकांवरील टीकाकारांमध्ये पुढील नांवें देतां येतील. ही प्रथमतः माझ्या जातिभेदाच्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या प्रसिद्धीनंतर संबंध व परिचय उत्पन्न झालेली मंडळी होत.

प्रो. रॉस, विसकान्सिन युनिव्हिर्सिटी, प्रो. एजर्टन, हॉवर्ड युनिव्हिर्सिटी, (टीका लिहिली त्यावेळी पदवीधर विद्यार्थी होते.) प्रो. ऱ्हिस् डेव्हिडस्, पाली अध्यापक, मँचेस्टर युनिव्हर्सिटी, प्रो. वाक्शवायलर, ब्रुसेल्स सोशालॉजिकल इन्स्टीटयुटचे डिरेक्टर (याजकडून फ्रेंचमध्ये एक लहानशी पुस्तकवजा टीका) प्रो. हापकिन्स, येल युनिव्हर्सिटी, प्रो. व्हिन्सेंट स्मिथ, लंडन युनिव्हर्सिटी. प्रो. बार्नेट, लंडन युनिव्हर्सिटी व ब्रिटिश म्युझियम.

या शिवाय आपल्या ग्रंथांत केवळ गौरवयुक्त उल्लेख करणाऱ्यामध्यें अनेकांची नांवें देता येतील. त्यामध्ये प्रो. मॅक्डोनेल (ऑक्सफर्ड) प्रो. विंटरनिझ (प्राग), हिंदुस्थान सरकारचे कांहीं सेन्सस रिपोर्टांतील लेखक, त्याचप्रमाणे, मि. बकलंड, आय्. सी. एस्. (डिक्शनरी ऑफ अँग्लो इंडियन बायोग्राफी यांचे कर्ते) हीं नांवें येतील.

विद्वान् वर्गाचे क्षेत्राबाहेर माझ्या इंग्रजी लेखांचें चांगलें स्वागत करणारे अनेक लेखक दिसले. त्यांची नांवें माझ्या सध्यां लक्षात नाहींत तथापि एक दोनच सांगतां येतील.

लंडन येथे T. P.' S. Weekly साप्ताहिकांत माझ्या किरकोळ लेखांतील वारंवार उतारे प्रसिद्ध होत असत. ज्या वेळेस माझ्या पुस्तकांवर इंग्रजीतून उत्तम उत्तम अभिप्राय येत होते तेव्हां त्यांचा मी जाहिरातीकडे उपयोग केला नाहीं. केला असता तर त्याचाच प्रतिध्वनि सर्व हिंदुस्थानभर पत्रांत उमटला असता, हे मला ठाऊक होते. परंतु मला तें नको होतें. मला हिंदुस्थानच्या जनतेचे स्वतंत्र मत पाहिजे होतें. पण त्या मताचें स्वरूप जेव्हां मला कळून चुकलें तेव्हां मला अत्यंत खेद झाला. मी जातिभेदाच्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या ७५ प्रति हिंदुस्थानांतील पत्रांकडे अभिप्रायासाठीं पाठविल्या. पण टाइम्स ऑफ इंडिया, बर्मा क्रिटिक, स्टेटसमन, या तीन इंग्रजी पत्राखेरीज व हिंदुस्थान व इंडियन रिव्हयू मध्यें आलेल्या लहानशा टीपांखेरीज कोठेंच उल्लेखहि आला नाहीं व पोंचहि आली नाहीं, हिंदुस्थानामध्यें आल्यानंतर जेव्हां अनेक पत्रकारांना विचारले तेव्हां "तुम्ही रिव्हयू लिहून द्या, आम्ही छापून टाकतो." अशा तऱ्हेचीं उत्तरें मिळालीं. पाश्चात्यांच्या प्रशंसामय मताच्या साहाय्यानें हिंदुस्थांनात प्रशंसा मिळवावयाची नाहीं या माझ्या भावनायुक्त वृत्तीस व्यवहारदृष्टि अपकर्षक झाली नाहीं. पुस्तकाचा प्रकाशक मीच होतो. म्हणजे पहिल्या पुस्तकावर नांव जरी "टेलर आणि कार्पेंटर" या स्थानिक प्रकाशकाचें होतें तरी त्याच्या प्रसिद्धीला लागणारा खर्च मीच दिलेला होता. व ते केवळ विक्रेते होतें आणि त्यामुळें पुस्तकाचा प्रचार करण्याची फिकीर त्या प्रकाशकांना नसून मलाच होती. युरोपियन व अमेरिकन पंडितांचे उत्तमोत्तम अभिप्राय घेऊन ते छापून त्यांच्या साहाय्यानें आपल्या लोकांचे मत बनवावें व त्याच्या मतावर रचिलेल्या लेखकाच्या मतानें आपल्याच देशांत प्रसिद्धि करून घ्यावी ही गोष्ट मला किळसवाणी वाटत होती. आणि या गोष्टीचा अवलंब करण्याचें मी नाकारलें. या माझ्या प्रवृत्तीमुळें माझा फायदा झाला की तोटा झाला हे सांगणे आज तरी कठिण आहे. भावनांचे हिताहितविचारानें नियंत्रण केलें पाहिजे आणि मनुष्यानें आत्महिताबद्दल जो विचार करावयाचा तो करून आपल्या मनोवृत्तीस आळा घातला पाहिजे ही गोष्टहि मला मान्य आहे. पण भावनासंयमन किती करावे या विषयीं माझें मत निश्चित् झालें नाहीं. फायद्याच्या विचारानें जे हेतु आपण उच्च समजतो त्याचे नियंत्रण कितपत करावे या विषयीं पुन्हां विचार करता उच्च भावनांचे नियंत्रण करणें मनाला युक्त वाटत नाहीं. तात्पुरत्या अनेक फायद्यांना मी मुकलो असेन तरी त्या फायद्यांकडे दुर्लक्ष करणारी आणि आपलें कर्तव्य जें वाटत असेल तें करणारी मनोवृत्ति अधिक बळकट होऊं लागली यात शंका नाहीं. या मनोवृत्तीचा विकास करविणें हीच गोष्ट मी अधिक हिताची समजतो. समाजशास्त्रीय विषयांवर बरीच वर्षें अभ्यास केलेला असा पहिला लेखक मीच असल्यामुळें आणि हिंदुस्थानांत त्या प्रकारचें वाचन शिक्षण कांहींच नसल्यामुळें हिंदुस्थानांतील टीका मनावर घ्यावयाची नाहीं अशी वृत्ती उत्पन्न होण्यास या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतरचा अनुभव उपयोगी पडला आणि अमेरिकन लोकांशीं नित्य सहवास घडत असल्यामुळें आत्मादराची भावना अधिकच बळावली. अमेरिकेंत असताना व तेथील समाजशास्त्रीयांशीं चर्चा करताना मला स्वाभाविकपणें आपण अमेरिकन

अभ्यासकापेक्षा उच्चतर भूमिकेवर आहों असें वाटत असे. कारण तेथील अत्यंत मान्य असे त्यावेळचे समाजशास्त्रज्ञ म्हणजे प्रो. गिडिंग्स किंवा प्रो. लेस्टर वार्ड, प्रो. अलबीयन स्माल, प्रो. रॉस, प्रो. वुइलकॉक्स, प्रो. जेंकूस इत्यादि मंडळींची माझ्या मनांत स्वतःशी तुलना उत्पन्न होई. त्यांना जगाचा बराच भूभाग बरोबर ठाऊक नाहीं. ज्या सामाजिक अवस्था मला चांगल्या परिचित आहेत त्या त्यांना ठाऊक नाहीत, पण त्यांच्या समाजाचे ज्ञान मात्र आपणास आहे; अशा तऱ्हेची भावना जातिभेदाचा अभ्यासक अशा मला झाल्याशिवाय राहात नसे. आणि त्यामुळें व त्यांच्या विद्वत्तेच्या मर्यादा अधिक निश्चितपणें कळल्यामुळें स्वतःविषयीं एक तऱ्हेची अतुल्यत्वाची भावना उत्पन्न झालेली होती. आणि त्यामुळे त्यांच्या प्रशंसेत देखील अभिमान बाळगण्याजोगे विशेष नाहीं. कारण त्यांची प्रशंसा समाजशास्त्रीय ज्ञानाच्या अल्पत्वावरच रचलेली आहे, व अशांची तारीफ आपल्या लोकांपुढे मांडणे म्हणजे आपल्या लोकांस फसविणें होय असें वाटूं लागलें आणि त्या वाटण्याचा आयुष्यावर बराचसा परिणाम झाला. हिंदुस्थानचें लोकमत पाश्चात्यमतानुसारी कसें आहे हें मला एकाच उदाहरणावरून कळलें. माझा जातिभेदाचा इतिहास, भाग १ ला या पुस्तकावर न्यूयॉर्क येथील ‘नेशन’ पत्रामध्यें जो अभिप्राय झाला तो अभिप्राय शब्दान्शब्द ‘हिंदुस्थान रिव्हयू’ मध्यें उतरला गेला. ‘हिंदुस्थान रिव्हयू’ कडे पुस्तक पाठविले होतें, पण त्याच्या संपादकाकडे जेव्हां माझ्या पुस्तकावरील अमेरिकन पत्राचा अभिप्राय असलेला अंक अथवा त्याचें कर्तन आलें तेव्हां त्यांनी ते कर्तन जसेच्या तसेच उतरून दिलें व एक वाक्य तेवढेंच जास्त घातलें, अशा तऱ्हेनें आपल्यातील अत्यंत सुप्रसिद्ध मासिकांची आपलीं मतें इंग्रज किंवा अमेरिकन मतावर रचण्याची जी प्रवृत्ति आहे तिच्याबद्दल मला अमेरिकेंत असताना इतका खेद झाला कीं तो हिंदुस्थान रिव्हयूमधील उतारा माझ्या कोणी मित्राच्या दृष्टीस पडूं नये असें मला वाटलें. मला असें वाटूं लागले की, ज्या माझ्या मित्रांना माझें पुस्तक माहित आहे आणि माझ्याविषयीं थोडीशी प्रेमादरयुक्त बुद्धि आहे आणि ज्यांनी माझ्या पुस्तकावर आलेले अमेरिकन पंडितांचे अभिप्राय पाहिले आहेत; त्यांच्या दृष्टीस हा “हिंदुस्थान रिव्हयू” मधील अभिप्राय पडला म्हणजे त्यांना हिंदुस्थानाविषयीं काय वाटेल ? विषय हिंदुस्थानी, लेखक हिंदुस्थानी आणि अशा पुस्तकावर हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध मासिक अमेरिकन साप्ताहिकांत आलेला अभिप्राय योग्य म्हणून स्वीकारते एवढेच नव्हे तर आपलाच म्हणून दडपतें ! तर हे हिंदु लोक अगदीच दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारे आहेत हे सहजच त्यांस वाटणार हीं गोष्ट मला स्वतःला इतकी लज्जाकारक वाटली कीं, ती पाहून मलाच कोणी चपराक लागावली आहे असें झालें. अर्थात् तो अभिप्राय मी आपल्या कोणाहि अमेरिकन मित्रास दाखवला नाहीं. कारण त्या अभिप्रायांत माझ्या स्तुतीपेक्षा हिंदुस्थानची फजितीच जास्त दिसत होती. आणि ही फजिती माझ्या मित्रांच्या नजरेस पडूं नये असें मला वाटत होतें. आपलें व्यंग दिसलें अगर स्तुतिवाक्य लपले तरी हरकत नाही पण आपल्या देशाचे व्यंग दिसूं नये ही भावना माझ्याचमध्यें काय पण त्या वेळच्या अमेरिकेंत

असलेल्या बऱ्याच हिंदु तरुणांच्या मनांत एकसारखी वागत होती. आणि ज्या आपल्या गौरवाच्या योगानें आपल्या देशाच्या हीनतेची जाणीव इतर जनांस होईल असा गौरवच आपणास नको आणि हिंदुस्थानानें आपलें मत परकीयांच्या मतावर रचावें या तऱ्हेची क्रिया होण्यास उत्तेजक असे आपल्या हातून कांहीं होऊं नये असें वाटत होतें. याचमुळे पाश्चात्यांच्या उत्तमोत्तम अभिप्रायांची मी हिंदुस्थानांत प्रसिद्धीच होऊं दिली नाहीं. अर्थात् माझ्या पुस्तकाचा प्रकाशक जर दुसरा कोणीहि असता तर त्यानें माझ्या आत्यंतिक नाजूक भावना चालूं दिल्या नसत्या हें उघड आहे. पण जें काय झालें तें झाले, अजूनहि मला असें वाटतें कीं व्यापारी विचार लक्षांत घेऊन माझ्या भावनांचा मी कोंडमारा होऊं दिला नाहीं ही गोष्ट पैशाच्या दृष्टीनें जरी अपकर्षक झाली असली, तरी मानसिक उन्नतीच्या दृष्टीनें अश्रेयस्कर झाली नाहीं. त्या भावनांच्या परिपोषामुळेच माझ्या हातून जें कांहीं बरेवाईट कार्य व्हावयाचें तें झालें आहे.

[ ज्योत्स्ना :— वर्ष १ अंक २ जून १९३६ पृ. ८-१० ]

## ३. ज्ञानकोश-रचनेच्या कार्याचा आरंभ

ज्ञानकोश रचनेसारख्या कठिण कार्याकडे जी प्रवृत्ति झाली ती सुखासुखी झाली नाहीं. ज्ञानकोश व्हावा असें वाटत होतें हें खरें पण तेवढ्यानें कार्याकडे प्रेरणा होत नाहीं. मनुष्यप्राणी सुखाचा आणि अल्प परिश्रमाचा मार्ग शोधीत असतो; आणि कष्टतर मार्गाकडे एकाएकी प्रवृत्त होत नाहीं. माझी या कार्याकडे जी प्रवृत्ति झाली ती होण्यास केवळ भाषाप्रेम एवढेंच कारण होतें, असें मला आज तरी वाटत नाहीं; ज्यावेळेस काम सुरूं केले त्यावेळेस आपण केवळ भाषाप्रेमामुळें इकडे वळलों आहोंत असे वाटत होतें एवढेंच नव्हे तर इंग्रजी राज्याचा हेतु इंग्रजी भाषेस संस्कृत भाषेचें स्थान देऊन मराठी भाषेला शुद्र भाषेचें स्थान द्यावयाचें आहें हाच आहें आणि हा हेतु आपण विध्वंसून टाकला पाहिजे असें वाटत होतें.

१९१४ साली डिसेंबर महिन्यांत मी मद्रासच्या कांग्रेसला गेलों होतों आणि तेथें हिंदुस्थानचे देश व विभाग भाषेच्या तत्त्वावर पाडावे इत्यादि मताचा प्रसार करण्यासाठीं एक पत्रक छापून तेथील प्रतिनिधीमध्ये वाटलें; त्यामुळें तेथील आंध्र मंडळीपैकींबऱ्याच मंडळीची ओळख झाली. त्यामध्येच रा. रा. डॉ. अच्यन्त लक्ष्मीपति यांच्याशीं ओळख झाली, व त्यानंतर मद्रासहून सिलोनला गेलों होतों. व सिलोनहून परत आल्यानंतर इंडियन सायन्स कांग्रेसला हजर राहण्यासाठी पुनः मद्रासला परत आलो, तेव्हा डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे उतरलों होतों व त्यांच्याकडे उतरल्यामुळें ज्ञानकोशाची जी कल्पना होती तिला चालना मिळाली. डॉ. लक्ष्मीपति यांनी व दुसऱ्या कांही मित्रांनी मिळून तेलगु ज्ञानकोशाचें काम अगोदरच सुरू केलें होतें व त्यांतील कांहीं अंक माझ्या नजरेस पडले.

### तेलगु ज्ञानकोश

तेलगु ज्ञानकोशाचे मुख्य संपादक कै. के. व्ही. लक्ष्मणराव हे होते. कै. के. व्ही. लक्ष्मणराव हे पूर्वी मराठी लेखक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे लक्ष मराठीकडून तेलगूकडे वळविण्यास त्यांची बहीण कारण झाली असें म्हणतात. ते प्रथम नागपूरासच शिक्षण घेऊन प्रसिद्ध झाले. आणि त्यांची जन्मभाषा तेलगू असल्यामुळे तेलगु वाङ्मयाची महाराष्ट्रांत प्रसिद्धी करण्याकडे त्यांनी कांहीं प्रयत्न केले. कै. के. व्ही. लक्ष्मणराव यांचे भाचे रा. रा. भवानीशंकर नियोगी हे तर अस्सल नागपुरी म्हणून मोडतात आणि नागपुर म्युनिसिपालिटीचे ते अध्यक्ष आहेत. एवंच मराठी व तेलगु दोन्ही ज्ञानकोशाच्या

उत्पादकत्वाचा संबंध नागपुरशीं येतो हा योगायोग आहे. लक्ष्मिपतींच्याकडे १९१५ च्या जानेवारी १५ नंतर उतरलों होतों पण माझ्या मनांत जी एक विचारक्रांति झाली ती सिलोनमध्यें हिंडत असतां झाली.

१९१५ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस सिंहलद्वीपांत गेलो तेव्हां तेथें ज्या कांहीं गोष्टी दृष्टीस पडल्या त्यावरून हिंदुस्थानांतील भावी संस्कृतीचें स्वरूप कसें होईल याविषयी निरनिराळ्या कल्पना मनांत येऊं लागल्या. तेथें १९११ सालीच शिक्षण हिंदुस्थानापेक्षां जास्त होतें. प्रौढ विवाह अगदीं सामान्य झाले होते आणि त्यावेळेस मद्रास इलाख्यामध्यें ऋतुप्राप्तीनंतर होणारे हिंदु स्त्रियांचे विवाह कायदेशीर धरले जावेत म्हणून एक बिल ना. शास्त्री यांनी मद्रास कौन्सिलांत आणलें होतें. सिंहलद्वीप हे शिक्षण-दृष्टीनें किंवा सामाजिक दृष्टीनें हिंदुस्थानच्या बरेच पुढे गेलेले असल्यामुळें तेथें आज जी स्थिति दृष्टीस पडते ती उद्यां हिंदुस्थानांत दृष्टीस पडेल अशी स्वप्नें मला दिसूं लागलीं. आणि एकंदर आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टया सिंहलद्वीप जरी पुढे गेले तरी राष्ट्रीय भावनांच्या दृष्टीनें त्या देशाचा अपकर्ष झाला आहे असें मला वाटू लागलें आणि ती स्थिति बदलण्यासाठी देशांत जोराची चळवळ पाहिजे म्हणून प्रयत्न करावा असें मला वाटूं लागलें.

सिंहलद्वीपामध्ये खिस्ती आणि बौद्ध यांच्यामध्यें सामाजिक वियुक्तता नाहीं.

**राष्ट्रीय अरिस्टॉक्रसी आणि देषभाषासंवर्धन**

गोइगम जातीची खिस्ती मंडळी आणि बौद्ध मंडळी एकमेकांशीं लग्नें करतात आणि तेथील विद्वान पुढारी डॉ. हेवावितरण ( यांची व माझी लंडन येथेच ओळख झाली होती. ) असें म्हणत कीं खिस्ती झालेला मनुष्य पतित झाला अशी भावना खिस्ती मंडळींत नाहीं, बौद्धातही नाहीं. उलट तो प्रगतीच्या मार्गालाच लागला असे सामान्य जनास वाटूं लागते, हा नैतिक अपकर्ष बौद्ध समाजांत झालेला दिसला. याशिवाय हेंहि दिसून आलें कीं, दोन सिंहली जातीची मंडळी एकमेकांशीं लग्नें करीत नव्हती पण ती बर्बर म्हणजे युरेशिअन लोकांशी लग्ने करीत. याचा परिणाम असा व्हावयाचा की, इंग्रज हे सिंहली समाजाचे केंद्र होणार आणि सामाजिक दृष्ट्या देखील इंग्रजांचा दर्जा सिंहली लोकांपेक्षा उच्च ठरणार आणि जर इंग्रजी भाषेस देशांत प्रामुख्याचें स्थान राहिलें तर समाजाचा नेता, व उच्च संस्कृतीचा वाहक या नात्यानें इंग्रजाचे अस्तित्व देशांत मान्य होणार, पाश्चात्त्य भाषेस प्राधान्य चालूच राहिले तर ती बोलणारा इंग्रज ब्राह्मण ठरणार आणि सुशिक्षित देशी मनुष्य केवळ इंग्रजाची खराब नक्कल असा तयार होऊन तो इंग्रजांचा शूद्र होणार. तर देशी संस्कृतीची म्हणजे देशी वाङ्मय आणि देश्य ललित कला यांचें देशांत प्रामुख्य राहिलें तरच देशांतील लोकांची सामाजिक उच्चता कायम राहील. परक्या भाषेची उच्चता देशांत राहूं दिली तर ती भाषा ज्यांची जन्मभाषा आहे त्यांचे उच्च जातित्व देशास मान्य करावें लागेल. तर या क्रियेस जोरानें प्रतिबंध केला पाहिजे. हिंदूंमध्ये जातिभेद आहे आणि राज्य जरी परक्यांचे आहे, तरी त्यामुळे क्षत्रियवर्ग काय

तो स्थानभ्रष्ट झाला, पण ब्राह्मणवर्गाचें देशावर प्रामुख्य राहिले. परराष्ट्रीयास आपले सामाजिक उच्चत्व देण्याची अधोगति देशांत अजून उत्पन्न झाली नाहीं तर आपल्या भाषेचें देशांत प्रामुख्य राखल्यानें इंग्रजांच्या सबंध जातीला समाजाचा उच्च वर्ग बनू देण्यामुळें जी राष्ट्रीय अधोगति उत्पन्न होईल, तींतून तरी आपला समाज बचावेल. परकीय राष्ट्रास आपली सामाजिक उच्च जात म्हणून कबूल करण्याचें भवितव्य अनेक प्रकार करून टाळले पाहिजे असें मनानें घेतलें आणि त्याला माझ्या मनांत जी सुधारणात्रयी वागत होती तो एकच उपाय आहे, असें दिसूं लागलें. देशामध्यें देश्य भाषेचें स्वामित्व राहिले तरच त्या भाषा उत्तम तऱ्हेनें बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या वर्गांचे स्वामित्व राहील ही कल्पना मनांत चांगली बिंबली आणि नवीन तऱ्हेचे विचार देशांत पसरविण्यास मन उद्युक्त झालें. आणि कांहीं दिवस सुधारणात्रयीचा प्रचार करावा असा निश्चय झाला.

**अरिस्टॉक्रसीचे स्वरूप**

सिलोनमध्यें प्रवास करीत असतां अशी एक गोष्ट दिसून आली कीं सिंहली समाजामध्यें प्रौढविवाह जरी पूर्णपणें स्थापित झाला आहे तरी प्रीतिविवाह स्थापित झालेला नाहीं. आणि स्त्रीपुरुषांची ओळख ज्या समाजांत होते असा म्हटला म्हणजे तेथील युरोपिअन आणि बर्घेरांचा समाज होय. युरोपिअन लोकांचा समाज बराचसा स्वयंपूर्ण आहे. त्यांत बर्घेर लोकांसही मज्जाव आहे पण बर्घेर लोकांच्या समाजामध्यें युरोपिअन लोकांच्या चालीरीतींचें बरेच अनुकरण झालें आहे व त्यांच्या सामाजिक फंक्शन्समध्यें म्हणजे संस्थामध्यें श्रीमंत वर्गांतल्या सिंहली आणि तामिळ लोकांचाही प्रवेश होतो. सिंहली लोकांमध्यें व तामिळ लोकांमध्ये जरी लग्नाचें वय आणि शिक्षण हीं वाढलीं आहेत तरी स्त्रीपुरुषांचा सामाजिक परिचय करून देणाऱ्या संस्था न वाढल्यामुळें वेल्लील, गोइगम किंवा करावा यासारख्या सुशिक्षित जातीमध्यें देखील परस्पर लग्नव्यवहार तर नाहींच पण स्त्रीपुरुषांच्या ओळखीदेखील होत नाहींत. त्यामुळें पुष्कळशा तरुण सिंहली किंवा तामिळ मंडळींची या बर्घेरांच्या म्हणजे युरेशिअनाच्या समाजांत आपला प्रवेश करून घेण्याची प्रवृत्ति होते. आणि त्यामुळें या समाजाचे उच्चत्व देशी लोकांच्या मनावर ठसतें. या सर्व गोष्टी मी पाहिल्या तेव्हां माझ्या मनांत जी गोष्ट आली ती ही, कीं प्रत्येक देशांत त्या देशाच्या उच्च संस्कृतीची वाहक अशी ॲरिस्टाक्रसी पाहिजे; तशी तयार होण्यास त्या समाजामध्ये स्त्रीपुरुषसंबंध देखील खुला पाहिजे. कारण ज्या समाजांत हा खुला संबंध असतो. तो समाज अधिक आकर्षक होतो, आणि त्यामुळें त्या समाजांत शिरावें अशी इतरांस इच्छा उत्पन्न होते. “अरिस्टाक्रसी” होऊं इच्छिणाऱ्या समाजानें केवळ लखोटेबंद राहून उपयोगी नाही तर इतरांना आपणांत समाविष्ट होण्याची संधि दिली पाहिजे आणि आपल्या वर्गांत समाविष्ट होण्याची इतरांची इच्छा जिवंत ठेवली पाहिजे. ब्राह्मणांत शिरावे अशी ब्राह्मणेतरांची इच्छा असल्यास त्यांस संधि द्यावी. ब्राह्मण समाज अधिकाधिक आकर्षक करावा व त्या समाजामध्यें इतर जातीतील चांगल्या व्यक्तींना येण्यास संधि मिळावी. असें केल्यानें ब्राम्हण जात ही केवळ जात न राहतां समाजाचा

उच्च वर्ग होईल; म्हणजे देशांमध्ये इंग्रजास हिंदू समाजाची उच्च जात बनू द्यावयाचें नाहीं; तो मान राखण्याचा ब्राह्मणांनी प्रयत्न करावयाचा व देशामध्यें इंग्रजांना सामाजिक प्रामुख्य मिळूं नये म्हणून देशी भाषेचे प्रामुख्य देशांत राखावयाचें आणि तें देखील इतके की प्रत्येक भागांत जे परके लोक येतील त्यांना देखील देश्य लोकांशीं सादृश्य उत्पन्न व्हावें ही आवश्यकता वाटावी.

यासाठीं उपाय म्हटला म्हणजे देशाचे विभाग भाषेच्या तत्त्वानुसार व्हावे, प्रांतिक राज्यकारभार देशी भाषेंत व्हावा, तो देखील इतका कीं गव्हर्नरनें इंग्रजीत सही केली तर ती बेकायदेशीर ठरावी, देशभाषेंत हायकोर्टाचे निवाडे व्हावे म्हणजे देशी सामान्य भाषांना कायदेशीर भाषेचा संस्कार होईल, आणि इंग्रज कायदेपंडितांचे देशांत प्रामुख्य राहणार नाहीं आणि त्याबरोबर त्यांचे नैतिक प्रामुख्यहि राहणार नाहीं.

सायन्स कॉंग्रेसच्या वेळेस मी मद्रासला होतों. पण त्यावेळेस माझा मुक्काम काय तो ५।६ दिवस होता. त्यावेळेस मी डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे उतरलो होतो पण त्यावेळेस त्यांची " आंध्रविज्ञानसर्वस्वम् "ची योजना मी पाहिली नाहीं. मद्रासला सायन्स कॉंग्रेसला गेलों त्यावेळेस हिंदू आयकोनोग्राफीचे कर्ते टी. गोपीनाथराव यांची ओळख झाली, आणि त्यांनी मला त्रावणकोर पहाण्यास बोलवलें तेव्हां मी तें आमंत्रण स्वीकारलें आणि त्याच्यानंतर २।३ दिवसानी त्रिवेंद्रम् येथें पोहोंचलों. तेथें देखील आणखी एका गोष्टीचें अवलोकन झालें आणि तें म्हटलें म्हणजे तेथें स्त्रियांना जरी स्वातंत्र्य बरेच आहे तरी तेथे अनुनयपद्धती उत्पन्न झाली नाहीं. त्रावणकोरहून कोचीनला गेलो. तेथें एर्नाकुलम्, त्रिचुर इत्यादि मुक्कामी होतो. त्रिचुर येथें तेथील एथ्नालाजिस्ट ए, के. अनंत कृष्ण अय्यर यांच्याकडे पाहुणा होतो. त्रावणकोर येथील गोपीनाथरावांमुळे आणि त्रिचुर येथील रा. ऐय्यरांमुळे तेथील मल्याळी लोकांच्या समाजाची माहिती चांगल्या प्रकारे झाली. तेथें असें दिसून आलें कीं, जरी त्यांच्यामध्ये प्रौढविवाह आहे, आणि प्रीतिविवाह होतो तरी प्रीतिविवाह ही गोष्ठ जनसंमत धरली जात नाहीं. त्रावणकोरचे दिवाण रा. कृष्णन् नायर यांनी तर प्रीतिविवाहाचे अस्तित्व नायर समाजात नाहीं व नायर आणि ब्राह्मण यांच्या विवाहपद्धतींत जणुं काय फरकच नाहीं असे दाखविण्याची त्यांची इच्छा होती. म्हणजे जेथें स्त्रीस्वातंत्र्य आहे व नैतिक विचार अगदी स्वतंत्र आहेत तेथील हिंदु समाजांत देखील अनुनयपद्धतीची कल्पना रुजत नाहीं. याचें कारण समाजाच्या ब्राह्मण अरिस्टॉक्रसीने ती मान्य केली नाहीं हें होय असें वाटू लागलें.

## ना. गोखल्यांचा मृत्यू

त्रिचुर येथे असता नामदार गोखल्यांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकलें व तेव्हां एक तऱ्हेची मनाला जागृति झाल्यासारखें झालें. महाराष्ट्रांतील एक महत्त्वाचा मनुष्य दिवंगत होतो आणि आपण केवळ अनिश्चयी मनुष्यासारखे भ्रमण करीत आहों, जग हें पुढें दररोज चालले आहे, हिंदुस्थान मात्र मागे आहे आणि आपण त्याच्या प्रगतीसाठी काय

करीत आहोंत इत्यादि विचार मनात जागृत झाले आणि गोखल्यांच्या मृत्यूची बातमी आल्यानंतर एकदोन दिवसांनी त्रिचुर सोडले आणि मद्रासला गेलों. यावेळेसहि डॉ. लक्ष्मीपतींच्याकडे उतरलों होतों आणि आंध्रांच्या ज्ञानकोशाची माहिती मला याच वेळेस झाली.

डॉ. लक्ष्मीपति आणि त्यांच्या सुशील पत्नी

डॉ. लक्ष्मीपती हे पुण्यास वैद्यक संमेलनाच्या वेळी आले होते त्यामुळे त्यांची ओळख कांहीं महाराष्ट्रीयांस असेलच. डॉ. लक्ष्मीपति हे तेलगु ज्ञानकोशाचे मुख्य संपादक नव्हते. मुख्य संपादक रा. रा. के. व्ही. लक्ष्मणराव, एम्. ए. हे होते. तथापि या ग्रंथाची सर्व व्यवस्था पहाण्याचें काम डॉक्टर लक्ष्मीपति हेच करीत होते. हें काम करण्यासाठीं जो प्रास्ताविक खर्च लागावयाचा तो चार मंडळींनी कांहीं महिने शंभर रुपये दरमहाप्रमाणें पैसे घालून केला. या कामाची योजना साधारणतः येणें प्रमाणें होती. एका रुपयास १०० पानें ज्ञानकोशाची द्यावयाची आणि शंभर पृष्ठांचा एक असे साठ अंक काढून पुस्तक साठ रुपयांत द्यावयाचें. त्यांच्या ग्रंथाला या योजनेनें सातशें वर्गणीदार मिळाले. आणि त्यामुळें त्यांचे काम चालेल असा त्यांस विश्वासहि वाटू लागला. त्यांनी अनेक पुस्तकांचे पद्धतशीर पृथक्करण करावयाचें आणि त्यांत विषय पडतील तसे पडूं द्यावयाचे अशी योजना न करतां अगोदरच अजमासानें विषय ठरवून त्या त्या विषयांवर लेख लिहिण्याची योजना केली. ही कल्पना आणि आम्ही ज्ञानकोश तयार करताना योजलेली कल्पना यांची तुलना ज्ञानकोशाच्या प्रथमच्या योजनेतच केली आहे ( ही योजना परिशिष्ट म्हणून पुढे छापली आहेच ). डॉ. लक्ष्मीपतींच्याकडे यावेळेस बरेच दिवस म्हणजे निदान दोन आठवडे राहिलों, आणि ते दिवस मोठ्या आनंदाचे गेले. डॉ. लक्ष्मीपति म्हणजे आपली प्रगति अनेक दिशांनी व्हावी म्हणून उत्साह बाळगणारे, आणि वाङ्मय, राजकारण, वैद्यकशास्त्र, सामाजिक सुधारणा यासारख्या सर्व प्रकारच्या गोष्टींत आस्था बाळगणारे गृहस्थ असल्यामुळे त्यांच्याशी संभाषण मनास उल्लसित करीत असे आणि त्यांच्या सुशील पत्नी या सुशिक्षित आणि सुस्वभावी आंध्र कुलवधूचा उत्तम नमुना होता असे म्हणण्यास हरकत नाहीं. आणि या दोहोंच्या संबंधानें माझ्या मनांत एक तऱ्हेचा आदर उत्पन्न झाला. त्यावेळेस आंध्रमंडळीमध्ये मुलीचे रजोदर्शनोत्तर विवाह क्वचितच होत आणि मिसेस लक्ष्मीपति यांचे लग्न त्या इंटरमिजिएट झाल्यानंतर झालें, आणि दोघांचा परिचय झाल्यानंतर झालें आणि नवरा आणि बायको ही दोघे ब्राह्मण पण निराळ्या पोटजातींतली होती त्यामुळें हें कुटुंब तेथील सामाजिक दृष्टीनें अत्यंत प्रगमनशील मंडळीत मोडलें जाई. डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे असताना आंध्र देशांतील प्रमुख लेखकवर्गाच्या ओळखी झाल्या, आणि त्यावेळेस मी " आंध्रामध्ये गीर्वाणविषयक जागृति " हा विविधज्ञान विस्तारांत पाठविण्यासाठी लेख तयार केला. ( वि. वि. एप्रिल १९१५ ).

यावेळेस डॉ. लक्ष्मीपतींच्या आंध्रविज्ञानसर्वस्वमूच्या व्यवस्थेचे गुण व त्याप्रमाणें दोषहि कळून आले. अंक वेळेवर निघत ना, आणि दोन अंक एकदम देण्याचीही प्रवृत्ति

झाली. पण तीमुळें नुकसानहि सोसावे लागले. व्ही. पी. दोन रुपयांची केली म्हणूनच कित्येकांनी नाकारली. असेही दिसून आलें, कीं ज्या अनेक ग्राहकांनी पहिला अंक घेतला त्यांनी दुसरा अंक घेतला नाहीं, आणि ज्यांनी दुसरा घेतला त्यांनी तिसरा घेतला नाहीं, त्यामुळे संच बिघडले आणि असेच चालूं राहिलें तर काम शेवटपर्यंत कसें तडीस जाईल याची शंका डॉ. लक्ष्मीपतींनाच वाटूं लागलेली दिसली; तेव्हां रुपरुपायास एकेक अंक विकावयास काढणें हा योग्य मार्ग नव्हे असें मनात मीं ठरविलें. या सर्व गोष्टींचे अवलोकन मराठी ज्ञानकोशाच्या यशाला कारण आहे असें मी समजतों. आपल्या आंध्र मित्रास आलेलें अपयश आमच्या यशास कारण झाले आहे.

### आंध्र आणि महाराष्ट्र

आंध्रांचा हा प्रयत्न पाहून मनाला एक तऱ्हेचे ईर्ष्येचें उत्तेजन मिळाले. आंध्रांच्यामध्यें शिक्षण कमी आहे अशी माझी त्यावेळेस समजूत होती. आणि आंध्रांपैकी निजाम हद्दींत असलेला भाग महाराष्ट्राच्या निजाम हद्दींत असलेल्या भागापैकीं जास्त आहे आणि त्यामुळे बऱ्याच भागांत आंध्रवाङ्मयाला अपकर्षक अशी स्थिति आहे असें दिसून येत होतें, आणि अर्वाचीन आंध्रवाङ्मय त्याच्या योग्यतेकडे पाहिले तर तें मराठीपेक्षां कमी दर्जाचें आहे असें भासल्याशिवाय रहात नसे; असें असूनही आंध्रांनी ज्ञानकोश तयार करण्याची कंबर बांधली तर महाराष्ट्राला तसें करता येणार नाहीं काय, असा विचार उत्पन्न झाला; व माझा स्वतःच्या योग्यतेसंबंधाने मोठा आत्मविश्वास होताच. तर आपण जर ज्ञानकोशरचनेचे काम अंगावर घेतले तर आंध्रापेक्षा तें अधिक चांगलें यशस्वी खात्रीनें करूं असें वाटलें. तथापि यावेळेस देखील ज्ञानकोश काढण्याचें अंगावर घेण्याचा कायमचा निश्चय झाला नाहीं. अजून माझे मन स्वकीय संस्कृतीच्या संवर्धनासाठी सामाजिक व राजकीय चळवळ करण्याकडेसच होते. आणि मद्रास येथें मी जीं व्याख्यानें दिलीं तीं याविषयावरच होती. त्या व्याख्यानांचे अहवाल तेथील स्थानिक दैनिकांत प्रसिद्ध झाले होते. आणि त्यामुळे माझ्या मतांविषयी आणि विचारांविषयी आंध्र मंडळींत बरीच जिज्ञासा उत्पन्न झाली होती. त्यामुळे मच्छलीपट्टणच्या मंडळींनी मला व्याख्यानास येण्यास आमंत्रण केले. तेथें व्याख्याने झाली ती संभाषण स्वरूपाची होती आणि त्या व्याख्यानांत आंध्रांच्या भाषाविशिष्ट प्रांताच्या तत्त्वास नव्या तत्त्वज्ञानाची जोड मिळाली.

आंध्रांच्या देशांत असतां त्यांनी माझा जो सत्कार केला आणि त्यांच्या चळवळीस जो मी जोर दिला त्यासंबंधाने सविस्तर माहिती देणें तो केवळ आत्मचरित्राचा भाग होईल. तो ज्ञानकोशाच्या इतिहासाचा भाग होणार नाहीं आणि यासाठीं त्याची विशेष माहिती येथे देतां येत नाहीं. एवढेंच सांगता येईल कीं, आपल्या समाजाची संस्कृति कायम राखण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आणि तीसाठी सुधारणात्रयीचे महत्त्व आंध्रांना बरेच पटले. इंग्रजी भाषेनें समाजांत एक दुर्बल एकीचा सदृश वर्ग उत्पन्न होईल पण एक जात जितकी परस्परबद्ध असते तितक्या एकीचा वर्ग तयार करावयाचा असला तर तो स्थानिक संस्कृतीच्या महत्त्वस्थापनेनें समाजांत जें दृढीकरण उत्पन्न होतें त्यानेंच

होईल आणि भिन्न लोक स्थानिक समाजाशी एकजीव होण्याचा प्रयत्न अधिकाधिक करतील.

तर थोडक्यांत सांगावयाचे कीं हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत स्थानिक संस्कृतीचे महत्त्व स्थापन करण्यासाठीं जी एक भावना मनांत उत्पन्न झाली आणि ज्या भावनेचा प्रसार मी इतरांत उत्पन्न करीत होतो, ती भावना ज्ञानकोशाच्या उत्पत्तीस बऱ्याच अंशी कारण झाली. या भावना उत्पन्न करण्यासाठी मी संस्कृतमध्यें व्याख्यानेही दिली आणि समाजसंघटनेवर कांहीं संस्कृत श्लोकहि तयार करून त्यांचा प्रचार आंध्र देशात, बेझवाडा, गुंतूर, नरसपेठ, राजमहेंद्री, काकीनाडा, विजयानगर इत्यादि ठिकाणी हिंडून आणि उत्कलांतील गंजम, कटक, जगन्नाथपुरी इत्यादि गांवें हिंडून केला आणि नंतर कलकत्ता व रायपूर येथें जाऊन नागपुरास आलों आणि तेथें ज्ञानकोशाची कल्पना मांडली आणि कार्याला लागलों. रायपूर येथें माझा जन्म झाला असल्यामुळे यावेळेस रायपूर पाहून मला मोठा आनंद झाला. नागपूरलाच ज्ञानकोशाची कल्पना कां मांडली याविषयीं थोडेंसे विवेचन अप्रस्तुत होणार नाहीं.

**कार्य पुण्यास कां सुरू केलें नाहीं ?**

ज्ञानकोशाचा कार्यक्रम पुण्यांत सुरू न करतां नागपुरासच सुरू कां केला याविषयीं थोडासा खुलासा केला पाहिजे. प्रारंभीचा कार्यक्रम नागपुरासच सुरू करण्यांत अनेक सोयी होत्या. पुण्यास संस्था पुष्कळ आहेत. नागपूर व मध्यप्रांत येथे महत्त्वाची संस्था नाहीं याविषयी नागपूरच्या कांहीं मंडळींना खेद वाटे. पुण्यास संस्था निघाव्यात आणि त्यांनी वऱ्हाड नागपुराकडे वर्गणीसाठीं यावे ही गोष्ट गैर आहे असें पुष्कळ लोकांस वाटू लागलें होतें. माझ्या मनांतही हीच भावना होती. मला पुण्याचा अभिमान नव्हता. मला महाराष्ट्राचा अभिमान होता आणि त्यातल्या त्यांत पूर्वेकडील महाराष्ट्राचा अभिमान होता. वऱ्हाड नागपूरनें एखादें असें कार्य करून दाखवावे कीं जें हिंदुस्थानांत गाजेल असें मलाही वाटत होतें. या माझ्या प्रांतिक देशाभिमानामुळे माझी नागपुरासच काम करावे ही प्रवृत्ती झाली पण या प्रांतिक अभिमानाशिवाय दुसरीही कारणें होतीं. पुण्यास जर हा कार्यक्रम सुरू केला असता तर हे कार्य पक्षविषयक प्रश्नांतच गणले गेले असते. त्यावेळेस लो. टिळक जिवंत होते आणि लो. टिळक ही एक अशी व्यक्ति होती कीं तिला आंत घ्यावे तरी पंचाईत व वगळावे तरी पंचाईत. लोकमान्य आंत असले तर ज्ञानकोश हा ग्रंथ विशिष्ट पक्षाचा होणार असें लोकांना वाटलें असतें. आणि त्यावेळच्या वातावरणांत विशेषेकरून मवाळपक्षानें त्यास उपद्रव दिला असता. कांहीं कारणामुळे मला त्यावेळेस जहालपक्षाचे धरण्यांत येत असे. आणि त्याला कारण काय तर "स्वार्थत्यागाची मीमांसा" हा लेख. फर्ग्युसन कॉलेजच्या कांहीं मंडळींना तो लेख केवळ मवाळांची टवाळी करण्याकरता आहे असें वाटलें. या लेखामध्यें केवळ स्वार्थत्याग हा केव्हां उपयोगी पडेल, केव्हां शहाणपणाचा, केव्हां निरुपयोगी याविषयीं तत्त्वें दिलीं होतीं व फर्ग्युसन कॉलेजचे उदाहरण केवळ डोळ्यासमोरचें म्हणून दिलें होतें. परंतु या कॉलेजच्या अभिमानी

मंडळींचा असा समज झाला कीं माझा मुख्य हेतु फर्ग्युसन कॉलेजची टवाळी करणें हा आहे, व तत्त्वाची मांडणी केवळ उपबृंहण होण्यासाठी आहे. सुबोधपत्रिकेनें तर त्या लेखावर टीका करताना डॉ. केतकर हे जहालांचे पुढारी होऊं पहात आहेत असा मजवर आरोप केला. फर्ग्युसन कॉलेजमध्यें सर्वच मंडळी अगदी विरुद्ध होती अशातला मुळींच भाग नाहीं. कारण प्रो. पटवर्धन, डॉ. गुणे वगैरे मंडळींनी त्या लेखांचें स्वागत चांगल्या प्रकारें केलें.

[ माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास पृ. १५–२७ ]

# ४. राजवाडे यांची जीवनपद्धति

राजवाड्यांच्या आयुष्यक्रमाकडे अनेक तऱ्हेनें पहावे लागते, साधनांचे संशोधक या नात्यानें त्यांनी जी संपत्ती जमविली तिची कल्पनाच करणें अशक्य आहे. त्यांनी दोन हजार हस्तलिखितें तीस हजार रुपयांस पंतप्रतिनिधीस विकली. त्याखेरीज त्यांची संपत्ती किती तरी आहे. तीस गिऱ्हाईकी असती तर राजवाडे अत्यंत श्रीमान् झाले असते. पंतप्रतिनिधींकडून मिळावयाच्या त्या ३० हजारांपैकी फारशी रक्कम राजवाड्यांस पोंचली नाहीं. तो करार राजवाड्यांच्या एकंदर स्वभावाप्रमाणें लेखी नव्हताच. तर त्या करारास श्रीमंत पंतप्रतिनिधी जागोत म्हणजे झाले, ते जागले तर त्यांनी कर्तव्य केलें एवढेंच होईल. जागले नाहीं तर मात्र त्यांच्या शब्दांची किंमत महाराष्ट्रांत नाहिशी होईल. पंतप्रतिनिधी करारास जागोत अगर न जागोत त्यांनी एक सत्कार्य केलेच आहे आणि तें म्हटलें म्हणजे संशोधकानें जमविलेल्या साहित्यास बाजारांत किंमत असते, हे जनतेस आपल्या क्रियेनें सांगणें, हें होय. संशोधकास सापडणाऱ्या जिन्नसास किंमत उत्पन्न करण्याचें कार्य फार महत्त्वाचें आहे. ते एक समाजविकासाचें कार्य आहे. राजवाड्यांच्या हस्तलिखितास किंमत देऊं करून साहित्याची लोकांस किंमत ओळखावयास लावण्याइतकी प्रगति महाराष्ट्रांत उत्पन्न करण्यात पंतप्रतिनिधींनी मदत केली. जुने साहित्य संग्रहून ठेवलें, तर तशा तऱ्हेचे साहित्य जमवून ठेवण्याची इच्छा इतर संस्थानिकांना होईल. आपण कल्पना करूं, कीं एखाद्या संशोधक संन्याशानें मिळविलेल्या साहित्याची एका संस्थानिकानें चोरी केली अशी एक गोष्ट खरोखरच घडून आली. तर त्या संन्याशापाशीं असलेल्या ग्रंथधनाची किंमत संस्थानिकानें जाणली हा त्या संन्याशास सापडलेल्या वस्तूंचा खरोखर सन्मानच झाला. आणि ज्या गोष्टीस बाजारांत किंमत नव्हती त्या गोष्टीस किंमत उत्पन्न करण्याचें कार्य झालेंच. संन्याशाच्या हातांत पैसे पडले नाहींत हा भाग निराळा. संस्थानिकांचे कार्य वाङ्मयसंशोधन इत्यादि कार्यास उत्तेजन देणें हें आहे. केवळ वाङ्मयविकास आणि शास्त्रविकास यांच्या दृष्टीने असें म्हणतां येईल की उत्तेजन न देतां उत्तेजन देण्याची थापाथापी करणारा संस्थानिक वाङ्मयविकास, कलाविकास आणि शास्त्रविकास यांच्याविषयी अगदीच उदासीन असलेल्या संस्थानिकांपेक्षा पुष्कळ चांगला. मोठ्यांच्या थापाथापीनेंही संशोधनाचें किंवा वाङ्मयाचें कार्य असें कांहीं तरी होऊनच जाते यासाठीं असें वाटतें, की हे तीस हजार रुपये बुडविण्याचा जरी श्रीमंत पंतप्रतिनिधींचा इरादा असला तरी पूर्वी दिलेल्या अभिवचनाची

उपयुक्तता नाहींशी होत नाहीं.

राजवाडे यांनी आपल्या व्यवसायांत जे धंदे केले ते अधिक प्रगत देशांत निरनिराळे लोक करतात. राजवाड्यांना धंदे करावे लागले ते येणेप्रमाणे :

(१) साहित्य जमा करण्याचा धंदा. (२) साहित्य रक्षण करण्याचा धंदा.
(३) साहित्य संपादण्याचा धंदा. (४) साहित्य प्रसिद्ध करण्याचा धंदा.
(५) संशोधकाचा धंदा.

या पांचही धंद्यांत त्यांचें काम महत्त्वाचें झालें आहे. तथापि इतिहाससंशोधक या नात्यानें त्यांची जास्त ख्याति झाली आहे. खरोखर पाहाता त्यांनी इतिहाससंशोधकाचें काम फारच थोडे दिवस केले. त्यांच्या खंडांकडे लक्ष दिलें तर बऱ्याच खंडांना प्रस्तावनाच नाहींत. आणि इतिहाससंशोधक या नात्यानें त्यांचे खरोखर काम म्हटलें म्हणजे दोनच अभ्यास होत. त्यांचा पहिला अभ्यास म्हटला म्हणजे पानपतच्या लढाईचा अभ्यास. आणि दुसरा म्हटला म्हणजे ब्रह्मेंद्र स्वामींवरील लेख. हे दोन पद्धतशीर अभ्यास सोडून दिले तर त्यांचे मराठ्यांच्या इतिहासावर पद्धतशीर अभ्यास दुसरे नाहीतच असें म्हटलें तरी चालेल. राजवाडे यांच्या चवथ्या, सहाव्या आणि आठव्या खंडांच्या प्रस्तावना म्हणजे अनेक विषयांवर लिहिलेली पण एकत्र केलेली त्रोटक टिपणें आहेत. यांत इतिहास कसा लिहावा, इतिहासाचें एकंदर क्षेत्र किती विस्तीर्ण आहे इत्यादि गोष्टीसंबंधानें विवेचन आहे. त्यांत इतिहास संशोधन नाहीं. म्हणजे विशिष्ट काल किंवा विषय घेऊन त्याचा खोल अभ्यास नाहीं.

राजवाडे यांचे इतिहाससंशोधकापेक्षा भाषाशास्त्रसंवर्धक या नात्यानें काम खरोखरच अधिक झालें; पण त्यांस इतिहाससंशोधक हेंच नांव प्रामुख्यानें मिळालें. याचें कारण त्यांच्या पहिल्या खंडाची बरीच प्रसिद्धी झाली हें होय. खरोखर पहाता साहित्यसंशोधन बारीक शोध आणि इतिहास विकास विषयक विचार या दृष्टीनीं पहातां अर्वाचीन इतिहासाच्या क्षेत्रांत त्यांच्या पहिल्या खंडाइतक्या योग्यतेचा दुसरा ग्रंथ गेल्या ५० वर्षांत हिंदुस्थानांत झालाच नाहीं. हा ग्रंथ राजवाड्यांनी सातआठ वर्षांच्या परिश्रमाने लिहिला आणि त्यामुळे त्यांची जी ख्याति झाली; त्या ख्यातीवरच त्यांच्या कार्याचा डोलहारा उभारता आला. व या ग्रंथामुळें त्यास इतिहाससंशोधक हें नांव मिळालें तें कायमचें टिकलें. परंतु पहिल्या खंडाची प्रस्तावना वाचून उत्तरोत्तर अधिकाधिक महत्त्वाच्या ऐतिहासिक चर्चा राजवाड्यांनी केल्या असतील अशा अपेक्षेनें जो राजवाड्यांचे उत्तरकालीन लिखाण वाचील तो मात्र फसेल. इतिहाससंशोधक या नात्यानें त्यांची झालेली कामगिरी झाली ती इतर लोकांच्या मानानें जरी बरीच असली तरी राजवाड्यांच्या एकंदर कार्याच्या व्यापाकडे लक्ष दिलें असतां ती फारच कमी महत्त्वाची ठरते. साहित्य जमा करण्याच्या कामांत मिळविलेली राजवाड्यांइतकी संपत्ती कोणापाशीही नसेल ती गोष्ट खरी, तथापि त्यांनी या कार्यांत कांहीं लोक तयार केलेच. रा. देव, भट, कै. चांदोरकर, कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन, रा. दत्तोपंत आपटे, आबा चांदोरकर इत्यादि

अनेक मंडळींनी या कार्यास हात घातला. म्हणजे राजवाड्यांनी साहित्य जमा करण्याच्या बाबतीत तेंच काम लोकांसाठी करणारे अनुयायी तयार केले.

साहित्यशोधक या नात्यानें राजवाड्यांचें काम झालें तें देखील एका मनुष्यानें केलें तर त्या मनुष्यानें मोठी सेवा केली असे होईल. बावीस खंडांचें प्रकाशन करणारा एखादा पुस्तक प्रकाशनाच्या धंद्यातला मनुष्य घेतला तरी त्याची कामगिरी लहानसहान होईल असें नाहीं. आणि राजवाड्यांची भाषाशास्त्रविषयक कामगिरी लक्षात घेतली तर तीपुढें अनेक मोठमोठ्या अभ्यासकांचे प्रयत्न फिके पडतील. राजवाड्यांच्या अनेक कामगिऱ्यांपैकीं सर्वांत अधिक मोठी कोणती हे ठरवून राजवाड्यांचे वर्णन करावयाचे झाले तर त्यांस भाषाशास्त्रज्ञ म्हणावे लागेल आणि त्यांची गणना अत्यंत मोठ्या वैय्याकरणांत करावी लागेल. हेमचंद्र आणि वररूचि यांचे प्रयत्न राजवाड्यांच्या प्रयत्नांच्या दृष्टीनें कांहींच नाहींत. इतिहासाचार्य किंवा इतिहाससंशोधक हे नाव राजवाड्यांस देण्यात आपण त्यांच्या कार्याचे अज्ञान दाखवू. त्यांच्या बौद्धिक कार्याचे गुरुलघुत्व माझ्या मते ( १ ) भाषाशास्त्रज्ञ ( २ ) वैय्याकरण ( ३ ) शब्दसंग्राहक ( ४ ) इतिहाससंशोधक या अनुक्रमानें आहे.

राजवाड्यांनी याप्रमाणे आपली कार्यक्षेत्रें आणि अभ्यासक्षेत्रें निरनिराळी कां केलीं याचें देखील कारण विचारण्याजोगें आहे. एक तऱ्हेचा अभ्यास करून मनुष्य कंटाळतो व तो दुसऱ्या तऱ्हेच्या अभ्यासास हात घालतो असें आपणास अनेक पंडितांच्या चरित्राकडे पाहिलें असतां दिसतें. तथापि क्षेत्र बदलण्याचें कारण केवळ कुतूहलबुद्धीची व्यापकता एवढेच नसतें. जेव्हां संस्कृतीस चालना देऊ इच्छिणारा एखादा लेखक स्पर्धाक्षेत्राबाहेर जातो तेव्हां त्यांस असें वाटूं लागतें की अभ्यासक्षेत्र कितीतरी विस्तीर्ण आहे आणि आपल्या राष्ट्रांत त्यापैकीं कोणत्याच अंगाची कल्पना नाहीं, तेव्हां त्या अशा लेखकांस निरनिराळ्या दिशांनी प्रयत्न करून न तुडविलेलीं क्षेत्रें कांहीं अंशी स्वतः तुडवून आपण पुढें जावें, आणि इतरांस आपल्या पाठोपाठ येऊन त्या क्षेत्रांचे अधिक पद्धतशीर आक्रमण करण्यास तें क्षेत्र मोकळे ठेवावें असें वाटूं लागतें. राजवाड्यांमध्ये तर ही वृत्ति प्रामुख्यानें दिसत होती. राजवाड्यांनी अनेक कल्पना करून अभ्यासाचे क्षेत्र किती विस्तीर्ण आहे याची वारंवार आठवण करून दिली आहे. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास त्या गांवांच्या नांवांच्याच अभ्यासानें कसा काढता येईल, हें दाखविण्यासाठीं इतिहास व भाषाशास्त्र यांस संयोजक अशी लेखमाला "इतिहास व ऐतिहासिक" या मासिकांत प्रसिद्ध केली ती तर सुप्रसिद्धच आहे. कुलविषयक इतिहास जमा करण्यासाठीं नाशिकच्या ब्राह्मणांच्या वह्या तपासून आडनांवें गोळा करण्याचा त्यांनी दीर्घोद्योग आरंभला होता आणि सुमारे २००० नांवें गोळा केलीं होतीं. त्यांच्या चिठ्ठ्या अजून असतीलच. एका क्षेत्राचा अभ्यास करून ते टाकून दुसरे क्षेत्र घ्यावे ही त्यांची वृत्ती होती पण ती "ज्याक ऑफ ऑल ट्रेडस" सारखी नव्हती, तर त्या वृत्तीचीं कारणें फार खोल होती. त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्यांत एका गोष्टीची जाणीव दिसे. व ती जाणीव म्हटली म्हणजे आपणच पहिले राष्ट्रविकासाच्या भावनेनें कामात पडलेले संशोधक आहोंत ही होय. अभ्यासक

या नात्यानें ते फक्त भांडारकर, टिळक व रावबहादुर जोशी यांचाच उल्लेख थोडासा आदरपूर्वक करीत. पण संशोधनाच्या कार्याकडे प्राधान्यानें पडलेलें पहिलें आपणच हीच ते जाणीव दाखवीत. या प्रकारच्या जाणीवीमुळें महाराष्ट्राच्या बुद्धीस सर्व प्रकारें चालना देण्यासाठीं त्यांनीं अनेक क्षेत्रांत संशोधन स्वतः आपल्या अंगावर घेतलें असावें. आणि ज्या विषयामध्यें किंवा ज्या प्रकारच्या संशोधनामध्यें पारंगतता मिळविली त्या क्षेत्रांतच कार्य न करतां त्या क्षेत्राचाही त्याग करावयास त्यांचें मन तयार झालें असावें. १९१८–१९ च्या सुमारास त्यांचें लक्ष या प्रकारच्या अभ्यासावरून एकाएकी उडून त्यांनीं पदार्थ-विज्ञान व रसायनशास्त्र यांवरच पुष्कळशी पुस्तकें पाहून टाकली आणि इतिहास संशोधन आणि भाषाशास्त्रसंशोधन टाकून देऊन फिझिसिस्ट किंवा केमिस्ट बनण्याचा आपला विचार आहे हें कळविल्याची अनेक मंडळींस आठवणही असेल. त्यांनीं समाजशास्त्र-मंडळ काढलें ते एक वर्ष टिकले. त्यांनीं “सोसायटी टु सजेस्ट लेजिस्लेशन” ऊर्फ “शासनसूचक मंडळी” काढण्याचें योजिलें होतें पण तें मंडळ निघालेंच नाही. आरोग्य-मंडळाच्या उत्पादकामध्ये राजवाडे होते ही गोष्ट पुष्कळांस ठाऊकहि नसेल. त्या मंडळातून त्यांनीं अंग काढून घेण्याचें कारण, त्या मंडळानें म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांवर फिर्यादी लावावयास सुरवात करावी हें धोरण इतर सभासदास पटेना हें होय. अर्थात राजवाडे हे आपल्या आयुष्याकडे इतिहाससंशोधक या नात्यानें पहात नसून संस्कृतिविकासप्रवर्तक या नात्यानें पहात होते आणि त्यांची खरी किंमत ओळखणाऱ्यानें त्यांच्या आयुष्याचें याच दृष्टीनें अवगमन केलें पाहिजे.

[ विद्यासेवक : वर्ष ३ अंक ११ पृ. ४१ ते ४४ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९७१
दा. क्र. २३८९७
निबंध रत्नाकर
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# विभाग २

दुसऱ्या विभागात केतकरांच्या कादंबऱ्यांतील सहा उतारे निवडले आहेत. केतकरांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख पात्रांच्या मुखवट्याआड दडलेले केतकर सहज ओळखू येतात. 'परागंदा' कादंबरीतील विष्णु सरंजामे व 'आशावादी' कादंबरीतील स्वामी ब्रह्मगिरी किंवा देवीदासपंत अत्रे ही केतकरांचीच दोन रूपे आहेत. 'फेरीबोटीतील संवाद' हा पाचवा उतारा 'परागंदा' कादंबरीतून घेतला आहे. त्यात विष्णु सरंजामेने अशुतोष चौधरीला सांगितलेले पूर्ववृत्त केतकरांच्या जीवनवृत्ताशी मिळते जुळते आहे. सहावा उतारा 'रिप व्हान विंकल' हा 'आशावादी' कादंबरीतून घेतला आहे. स्वामी ब्रह्मगिरी मुंबईस शिकत असताना एक दोनदा पुण्याला गेले होते तेव्हा त्यांना पुणे कसे दिसले हे सांगण्याच्या मिषाने केतकरांनी आपल्याला तेव्हा पुणे कसे दिसले त्याचे वर्णन केले आहे. केतकरांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा येथे प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही.

सातवा उतारा 'गोंडवनातील प्रियंवदा' या कादंबरीतून घेतला आहे. व आठवा 'ब्राह्मणकन्या' कादंबरीतून घेतला आहे. दोन्ही उताऱ्यात ज्या वैजनाथशास्त्री या इतिहाससंशोधकाचे चित्रण केतकरांनी केले आहे ते करताना केतकरांच्या डोळ्यासमोर इतिहासाचार्य राजवाडे होते हे उघड आहे. वैजनाथशास्त्र्यांचा चेहरामोहरा राजवाड्यांशी मिळताजुळता असला तरी त्यांची मते ही केतकरांची आहेत हे देखील लक्षात येते. केतकरांनी त्याबाबत स्वतःच जो खुलासा केला आहे तो लक्षात घेण्यासारखा आहे. "वैजनाथशास्त्री हे पात्र 'गोंडवनातील प्रियंवदा' या कादंबरीत आले ते नमुना म्हणून आहे. या तऱ्हेचा नमुना प्रत्येक देशात आहे. पण अशी माणसे महाराष्ट्राच्या फारच थोडी नजरेस येतात, त्यामुळे ते पात्र विशिष्ठ व्यक्तीस अनुलक्षून आणले असा लोकांचा समज झाला. जर प्रत्यक्षावर पात्ररचना झाली नसली तर त्या पात्राला असत्यता उत्पन्न होते, यासाठी प्रत्यक्षावरच पात्ररचना केली पाहिजे."

केतकरांच्या कादंबरीतील प्रमुख पात्रे "सुशिक्षित, विचारप्रवण, मननशील व विवादप्रिय" असतात हे या विभागातील पाचव्या, सातव्या, आठव्या व दहाव्या उताऱ्यावरून दिसून येईल. काही वेळेला त्यांच्या कादंबऱ्यांना संवाद प्रचुर निबंधांचे स्वरूप कसे येई हे आठव्या उताऱ्यावरून लक्षात येईल. "निबंध आणि कादंबरी या दोहोंचे मिश्रण माझ्या हातून काही अलक्षितपणे तयार झाले असावे" असे केतकरांनीही मान्य केले आहे.

नववा उतारा 'गावसासू' या कादंबरीतून घेतला आहे. १९११--१२ साली केतकर इंग्लंडमध्ये होते त्या काळात इंग्लंडमध्ये राहणाऱ्या भारतीयांचे विशेषतः तेथील हिंदी विद्यार्थ्यांच्या जीवनाचे चित्र केतकरांनी 'गावसासू' कादंबरीत रेखाटले आहे. दहावा उतारा 'विचक्षणा' कादंबरीतून घेतला आहे. मधुमालती ही प्रो. लोंढे यांची थोरली विधवा मुलगी व विचक्षणा ही धाकटी मुलगी. बाळोबा हा त्यांचा मुलगा मजूर चळवळीत काम करीत असे. माधव छत्रे या लोंढे यांच्या एका विद्यार्थ्याबरोबर विचक्षणेने लग्न केल्यानंतर मधुमालती, संकर्षण आठवले या गरीब चित्रकाराबरोबर लग्न करण्याचे ठरवते. आपले वडील– प्रो. लोंढे लग्नास संमती देणार नाहीत या कल्पनेने मधुमालती घरातून पळून जाते. त्यानंतर प्रो. लोंढे व विचक्षणा यांच्यात झालेले संभाषण दहाव्या उताऱ्यात दिलेले आहे.

## ५ फेरीबोटीतील संवाद

न्यूयॉर्क शहराच्या तेविसाव्या रस्त्यावर जी न्यूजर्सीकडे नेणारी एक फेरी बोटीची सर्व्हिस आहे त्या सर्व्हिसच्या बोटीवरून प्रत्येकाला जावें लागतेंच आणि या बोटीवर अनेक लोकांच्या अचानक भेटी होतात. न्यूयॉर्क शहर हें ज्या मानाथन बेटावर पसरलें आहें त्या बेटावरून मुख्य भूभागावर जाण्याचा रस्ता म्हटला म्हणजे या प्रकारच्या फेरी बोटी. यांपैकीं एका फेरी बोटीवर दोन हिंदी तरुण बोलत होते. या तरुणांविषयीं फारसें सांगण्याचें कारण नाहीं; त्यांचें जें संभाषण चाललें होतें तें ऐकल्यास आपल्या कथासूत्रास अवश्य असणारी माहिती त्यांच्याच तोंडून बाहेर पडणार आहे.

"काय डॉ. सरंजामे, तुम्ही परत कधीं जाणार ?"

"माझें कांहीं ठरलें नाहीं. तुम्ही कधीं परत जाणार ?"

"माझ्या मनांत एका महिन्यानेंच जावयाचें होतें. पण लाला लजपतराय लवकरच येणार आहेत म्हणून एक आठवडा उशिरानें जाईन म्हणतों."

"भाग्यवान पोरगा आहेस !"

"मला तुमच्याविषयीं आश्चर्य वाटतें. तुम्ही डॉक्टोरेटची पदवी मिळविली. आतां खरोखर येथें राहाण्यांत काय फायदा आहे !"

"मलाही हिंदुस्थानात एकदां फेरी करून परत यावेसें वाटत आहे पण सध्यां प्रवासखर्चाला शिल्लक नाहीं म्हणून जात नाहीं."

"तुम्ही परत येण्याची भाषा बोलतां हें पाहून फार आश्चर्य वाटतें ! या अमेरिकेतला आयुष्यक्रम अतिशय कठिण झाला आहे. मला अमेरिकेंत राहाण्याची बिलकूल आवड नाहीं. समाजांतील चांगलें स्थान येथें मिळण्याची आशा नाहीं. शिक्षण संपादा, इतर अमेरिकन विद्यार्थ्यापेक्षां जास्त लायकी दाखवा, आणि शेवटीं काय ? युनिव्हर्सिटींत एखादी इन्स्ट्रक्टरची जागा असली तरी आपल्यासारख्या काळ्या कातडीच्या माणसाला मिळण्याची मारामारच पडणार " अशुतोष उद्‌गारला.

"असें जरी आहे तरी कांहीं हिंदी मंडळी गुणाधिक्यानें चांगल्या प्रतीच्या नोकऱ्या मिळवू शकली आहेत कीं नाहीं ? कोणी केमिस्ट झाला आहे तर कोणी युनिव्हर्सिटींत इन्स्ट्रक्टर झाला आहे." डॉ. सरंजामे म्हणाले.

"आणि पुष्कळसे चांगलें शिक्षण असूनहि येथील आर्थिक परिस्थितींत झगडण्यास असमर्थ ठरून शेवटीं कोणी ठकवाठकवीच्या धंद्यांत शिरले आहेत; कोणास सदसद्विवेकबुद्धि बाजूस ठेवून प्रसिद्ध हिंदु फलज्योतिषी म्हणून धंदा करावा लागत आहे. असल्या हालांत राहाण्यापेक्षां स्वदेशासच परत जा कसे."

" स्वदेशांत जाऊन तरी काय करणार ! तेथें कमी शिक्षणाच्या इंग्रजापुढे तोंड वेंगाडून नोकरी मागावयाची. नोकरी देणार तो प्रॉव्हिन्शिअल देणार, आणि प्रॉव्हिन्शिअल पत्करली म्हणजें आपले लोकच, 'तुम्ही आपल्या शिक्षणाची किंमत कमी केली. जास्त शिक्षण असून तुम्ही खालची नोकरी पत्करली आणि राष्ट्राची अब्रू घालविली' म्हणून आपणांस टोंचून बोलणार ! "

" विपत्ती स्वदेशी आहे तशी येथेंही आहे ! तर मग आतां करावयाचें तरी काय ? "

" स्वदेशी भोगी विपत्ती, सांगे वडिलांची कीर्ति, तो एक मूर्ख " एवढं संतवचन मला परिचित आहे. आणि जें राज्य माझा आणि माझ्या जातिबांधवांचा पदोपदी अपमान करतें, आणि तो अपमान दूर करणें माझ्या शक्तीच्या बाहेर आहे, अशा स्थितींत मला हिंदुस्थानांत परत देखील जावेसें वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या परिस्थितीची आठवण झाल्याबरोबर मला संताप येतो. येथें जन्मभर जरी कपबशा विसळण्याची नोकरी करावी लागली तरी करीन पण हिंदुस्थानांत जाऊन आपल्या स्वदेशबांधवांना परके लोक बुटाखालीं कसे तुडवतात तें पहाणें नको ! "

" तर मग तुम्हाला देशांत जाऊन देशसुधारणेचे प्रयत्न करावयाचे कीं, येथेंच रडत दिवस काढावयाचे ? "

" अरे बाबा, मी देशाभिमानी नाहीं. मला देशाचे दिवस सुधारण्याचा मार्ग मुळींच दिसत नाही. देशांत परत जाऊन इंग्रजांचें राज्य घालवून देण्याची मला ताकद नाहीं. तर मी देशास परत तरी कशास जाऊं. मी राजकारणी मनुष्य नाहीं, मी केमिस्ट आहे, आणि केमिस्टला हिंदुस्थानांत क्षेत्र काय आहे ? "

" मग येथें तरी तुला काय क्षेत्र मिळणार ? "

" मला माझ्या शास्त्राचा अभिमान आहे, आपल्या शास्त्राच्या साहाय्यानें, जरी मी गोऱ्या कातडीचा नसलो तरी वर येईन असा मला विश्वास वाटत आहे. "

" जर तूं स्वदेशास जाणार नसलास तर तुझा देशाला काय उपयोग ? "

" अरे बाबा, मला तूं देशाभिमानी मंडळींत का ओढतोस. मला देशाचा अभिमान नाहीं असें तुला मी अनेकदां सांगितलें नाहीं काय ? "

" डॉ. सरंजामे, तूं मला अगदी विचित्र मनुष्य दिसतोस. येथें तुझे अनेक स्नेही इंग्रज आहेत. तुझ्या अनेक इंग्रज मित्रांस तूं अनेक प्रसंगीं मदतही केली आहेस. तुजजवळ एक भाकरी असली तर त्यांतली अर्धी मोडून तूं इंग्रज किंवा अमेरिकन विद्यार्थ्यांस देखील देण्यास मागें पुढें पाहणार नाहीस म्हणून तुझी ख्याति आहे. असें असतां हिंदुस्थानवर इंग्रजांचें राज्य आहे याबद्दल जर आम्हांपैकी कोणी अधिक संतापानें भाषण करणारा असेल तर तो तूंच आहेस, आणि पुन्हां स्वदेशाभिमानाचा आरोप जर तुझ्यावर कोणी केलाच तर संतापतोस; तर तूं स्वदेशाभिमानी नाहींस हें तुझें म्हणणें आम्ही खरें तरी मानावें कसें ! "

" मी स्वदेशाभिमानी नाहीं ही माझी खात्री आहे. "

" आणि यासाठीं तुझ्या एकंदर मनोवृत्तीसंबंधानें मला कोडें पडलें आहे. "

" तसें कोडें असलें तर तूं मानसशास्त्रज्ञाकडे जा. मला एवढेंच सांगता येईल कीं, माझ्या वर्तनांत किंवा विचारांत विसंगति असली तर ती विसंगति मी मुद्दाम उत्पन्न करीत नाहीं. मनुष्याच्या सर्व भावना परस्परांशीं सुसंगत असतात असें कोणी सांगितलें आहे ? "

" डॉ. सरंजामे, तुम्ही अशी उडवाउडवी करूं नका. मला तुम्हांस हिन्दुस्थान-विषयीं आलेल्या कंटाळ्याचें स्पष्टीकरण अगदी निराळें दिसत आहे. "

" तें कसें काय ? "

" मला वाटतें—काय सांगूं—स्पष्ट बोलूं ? "

" खुशाल ! "

" मला वाटते कीं, हा प्रेमाचा खेळ आहे. स्त्रीप्रेम तुला येथें अडकवून ठेवीत आहे. "

" स्त्रीप्रेम मनुष्याला स्वदेशीं परत जाण्यास अटकाव कसें करील ? "

" कां, स्त्रीप्रेम अटकाव करणार नाहीं ? "

" फार थोडा करील—नाहीं—तूं म्हणतोस तें शक्यहि आहे. एखादा मनुष्य दुसऱ्याच्याच बायकोवर प्रेम करीत असला आणि तीही त्यावर प्रेम करीत असली आणि दोघांचा प्रेमाचा व्यवहार फारसा पुढे गेला असला व तो चोरून चालला असला तर जेथें त्या बाईचा नवरा असेल तेथेंच प्रेमामुळें त्याच्या बायकोवर प्रेम करणाऱ्या परक्याला अडकून पडले पाहिजे. असल्या प्रकारची परिस्थिति असल्याखेरीज मला येथें अडकून पडण्याचें कारण नाहीं. पण तू मला येथें दुसऱ्यांच्या बायकांशी संधान लावणारी व्यक्ति समजतोस काय ? "

" तुम्ही भलभलत्या कल्पना काढून चालू प्रश्नापासून संभाषण दूर नेत आहांत. तुमचें मिस् कामतवर प्रेम जडले आहे कीं नाही तें सांगा ! ! "

" अरे बाबा, तूं मला आणखी पंचाइतींत पाडतोस. माझें प्रेम अनेक स्त्रियांवर जडलें आहे. त्यातल्या त्यांत मिस् कामतविषयी माझ्यामध्यें प्रेमभावना आहे किंवा नाहीं याचा मलाच पत्ता नाहीं. परंतु त्या प्रेमभावनेचा आणि हिंदुस्थानांत जाण्याचा संबंध काय ? "

" संबंध एवढाच की, मिस् कामत आणि तूं निरनिराळ्या जातींची आहांत. तुम्ही हिंदुस्थानांत गेलांत तर दोघांनाहि जातीकडून त्रास होईल म्हणून तुम्ही हिंदुस्थानांत जात नाहीं. "

" अरे बाबा, आजकाल जाती दुर्बल झाल्या आहेत. जातीची भीति निदान अमेरिकेस खेप घालणारास तरी अनवश्य आहे. "

" आणि ती कां ? "

" जातीची पर्वा लोक कां बाळगतात ? तर याचें कारण हेंच कीं, जात सोडली तर आपणांस ज्या समुच्चयांत रहातां येईल असा समुच्चय नाहीं म्हणून. हिंदुस्थानांत प्रत्येक मनुष्य कोणत्याना कोणत्या तरी जातीचा आहे, आणि त्याला असें वाटतें कीं, जात सोडली तर आपल्या मुलाबाळांचें कसें होईल. त्याला उत्तर एवढेंच कीं, जातिक्षेत्राबाहेर लग्न लावणारे आज थोडके आहेत, उद्यां जास्त निघतील. तुम्हांस वावरावयास अनुकूल असा समाज सापडेलच. मला जातीबाहेर लग्न केल्यानें हिंदुस्थानांत आपली स्थिति विशेष वाईट होईल असें मुळींच वाटत नाहीं. प्रत्येक गोष्टीची आपण विनाकारण भीति बाळगतों. "

" तर मिस् कामतचें आणि तुझें लग्न होणार एकूण. "

" हें तुला कोणी सांगितलें ? "

" त्याशिवाय जातीबाहेर लग्न करण्यानें नुकसान होत नाहीं इतकें सिद्ध करण्याची तुला आवश्यकता काय ? "

" तूं जातिविषयक प्रश्न उपस्थित केलास म्हणून त्यावर तात्त्विक दृष्ट्या उत्तर देणें अवश्य होतें. "

" मग तुमच्या लग्नाला अडचण काय आहे ? "

" अडचण मुळींच नाहीं, मला तिच्याशीं लग्न करावेसें वाटलें पाहिजे, तिला माझ्याशीं लग्न करावेसें वाटलें पाहिजे, आणि माझ्यापेक्षां अधिक लायक वर मिळावा अशी तिच्या बापाची इच्छा नसली पाहिजे एवढीच. बाकी अडचण कांहीं नाहीं. "

" तुला तिच्याशीं लग्न करावेसें वाटतें कीं नाहीं ? "

" अरे, तूं तर फारच चौकशी करायला लागलास ? तूं मि. कामत यांच्यातर्फे चौकशी करतो आहेस काय ? "

" मुळींच नाहीं. "

" मग तुला इतकी जिज्ञासा कां ? "

" केवळ स्नेही म्हणून. "

" म्हणजे ? माझी तिच्याबरोबर लग्न करण्याची तयारी आहे असें तुला कळलें म्हणजे तूं माझा कोणता फायदा करून देणार आहेस ? "

" मी कोणता फायदा करून देणार ? "

" तर मग तुझी जिज्ञासा स्नेहाची आहे हें मी कसें ओळखावें, आणि ती जिज्ञासा तृप्त कां करावी ? "

" कां बरें, जिज्ञासा नसावी काय ? "

" नसावी असें मी कसें म्हणूं—जी भावना स्वभावतः मनुष्याच्या हृदयांत उत्पन्न होते ती भावना नसावी असें म्हणणें म्हणजे सृष्टीची एखादी होत असलेली क्रिया होऊं नये असें म्हणणें आहे "

" जिज्ञासा असावी असें जर तुझें म्हणणें, तर तूं उत्तर दे. "

" तेवढ्यावरून मी उत्तर दिलें पाहिजे असें कोठें ठरतें ? तुझी जिज्ञासा स्वाभाविक आहे—आणि तिला मी उत्तर कांहींच न देतां ती अतृप्त ठेवणें हेंहि स्वाभाविकच आहे ! सर्वच स्वाभाविक इच्छा परिपूर्ण होण्याजोग्या नसतात आणि दुसऱ्याच्या दृष्टीनें योग्यहि नसतात. "

" तर मग हा प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणालाच नाहीं काय ? "

" नाहीं असें कसें म्हणूं—ज्यांच्या मनात विशिष्ट एखादा लग्नसंबंध घडून येण्यासाठीं, मदत करावयाची असेल त्यांची जिज्ञासा योग्यच होईल. तरुणास व तरुणीस एकत्र होऊन संसाराच्या प्रवाहांत पडण्याचा निश्चय करतां येत नसेल, तर तें प्रकरण जास्त हातघाईवर आणण्यासाठीं " जिज्ञासू " आणि " हितचिंतक " स्नेही बरेच उपयोगी पडतात. "

" आणखी ? "

" तसेंच मी एखाद्या तरुणीवर फिदा होऊन गेलों आणि ती तरूणी मिळविण्यासाठीं माझी तारीफ तरुणीपाशीं किंवा तिच्या आईबापापाशीं करण्यास देखील " जिज्ञासू स्नेही " उपयोगी पडतील. "

" बरें सांगितलेस, या बाबतींत जर तुला साहाय्य पाहिजे असेल तर तें मी मोठ्या आनंदानें करीन. मिस्टर आणि मिस् कामत यांच्यापाशीं तुझी सपाटून स्तुति करीन. "

" पण आधीं माझी तयारी पाहिजेना ! मिस् कामत मला हवी असें माझें ठरलें म्हणजे मग मला तुझ्यासारख्या स्नेह्याची मदत उपयोगी पडेल. तरी देखील प्रेम-संबंध जुळविण्याच्या बाबतींत तुझी मदत घ्यावी की नाहीं याचा मला विचारच करायला हवा ! "

" तो कां ? "

" तूं देखणा आहेस म्हणून माझें जिच्यावर प्रेम जडलें असेल अशा तरुणीकडे तुझ्यासारखा देखणा तरुण मध्यस्थीला पाठविणें भयप्रद होईल. ती मुलगी माझ्याऐवजी अर्थात तुलाच पसंत करणार ! तूं अधिक देखणा, आणि स्वतःविषयी विचार न करतां मित्रकार्याला उत्सुक झालेला, तेव्हां कोणाच्याही दृष्टीने तूं माझ्यापेक्षां उच्च ठरणार ! माझें एखाद्या स्त्रीवर प्रेम जडलें असतें, आणि तूं आहेस तितका देखणा नसतास तर तुझ्या या मदतीचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार केला असता. "

" मी तुझ्यापेक्षा देखणा आहे काय—अरे माझी अशी तंगडी ओढूं नको. पण डॉ. सरंजामे, मिस् कामतवर तूं प्रेम करतोस की नाही ? "

" तुला माझ्या प्रेमसंबंधांत मदत करणें शक्य नाहीं हें तर तुला सांगितलेच. तर तुला हितचिंतक, जिज्ञासू या नात्याने प्रश्न विचारण्यास अधिकार नाहीं,—"

" तूं नेहमी अधिकाराच्या गोष्टी बोलतोस. "

" मी कायदेशीर अधिकाराच्या गोष्टी कोठें बोलतों. मी कायदेपंडित नाहीं, पण मी व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें बोलतों. कोणत्या तऱ्हेच्या आणि कोणत्या हेतूनें

केलेल्या प्रेमविषयक चौकशीला खरी माहिती देणें योग्य आहे यासंबंधानें कांहीं तरी नियम आहेत. तर माझें एवढेंच पाहाणें आहे कीं तुझी चौकशी कोणत्या श्लाघ्य कारणाच्या वर्गांत घालतां येईल. ”

“ चौकशी कोणत्या कारणासाठीं केली असतां ती श्लाघ्य चौकशी होईल ? ”

“ त्या कारणांची याद मला संपूर्ण कशी देतां येईल ? पण दोन चार उदाहरणें किंवा कारणें मी तुला देतों. त्यापैकीं एखाद्या कारणाखाली तुझी जिज्ञासा तुला घालतां येईल तर पाहा. ”

“ सांग बरें, कांहीं तरी चेष्टेचें तूं बोलणारच; मला ठाऊक आहे. ”

“ हें पाहा, मी जी गोष्ट गंभीरपणानें सांगतों ती तुला चेष्टेची वाटत आहे. चौकशीच्या योग्यायोग्यतेविषयीं मी जे नियम शोधून काढले ते तुला चेष्टेचे वाटतात. ”

“ अरे बाबा, मी माझे शब्द परत घेतों ! काय सांगायचें तें सांग. ”

“ एखाद्या तरुणानें ज्या सावकाराचे पैसे घेतले असतील, त्या सावकारास तो तरुण, कोणत्या मुलीवर प्रेम करीत आहे, तो श्रीमंत मनुष्याच्याच मुलीवर प्रेम करीत आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींसंबंधानें चौकशी करायला आणि प्रसंगीं त्या तरुणाला “ योग्य सल्ला ” द्यावयाला पूर्ण अधिकार आहे. पण तूं तर माझा सावकार नाहींस, तेव्हां तुझें विचारणें चौकशी या सदराखालीं येऊं शकत नाहीं. ”

“ बरें, पुढें. ”

“ जर कोणी प्रेमाच्या मानसशास्त्राचें संशोधन करीत असला तर त्याला प्रत्येक व्यक्ति ही केवळ अभ्यासाची वस्तु या नात्यानें त्या व्यक्तीसंबंधानें चौकशी करण्यास अधिकार पोचतों.

“ मी मानसशास्त्री नाहीं हें तुला ठाऊकच आहे. ”

“ जर तुलाच मिस् कामत हिची प्रीति संपादन करावयाची असेल, जर तूच तिच्यावर प्रेम करू लागला असशील, तर मात्र दुसरा कोण तिच्यावर प्रेम करीत आहे त्याची चौकशी करण्यास आणि आपल्या मार्गांतील कांटा दूर करण्यास तुला अधिकार आहे—तुझी चौकशी वरच्या कारणात पडली नाहीं तर निदान या कारणाखालीं तरी पडेल. ”

“ नाहीं बोवा, माझी चौकशी या कारणाखालीं पडत नाहीं. मी मि. कामत यांचा जावई होण्याची महत्त्वाकांक्षा धरीत नाहीं. ”

“ तर मग तूं आपला चौकशीचा अधिकार स्वतःच कमी करून घेत आहेस—अरे, तूं लाजूं नकोस, मिस् कामतवर प्रेम करीत असलास तर तूं खुशाल सांग, आणि मी तिच्यावर प्रेम करीत आहे किंवा नाहीं याचीही चौकशी खुशाल कर, मीही तुला उत्तर देईन. तुझ्या तर्फेची एक गोष्ट तुला सांगितली पाहिजे. ”

“ ती कोणती ? ”

“ जातीच्या दृष्टीने माझ्यापेक्षां तूं मि. कामत यांच्या जास्त जवळचा आहेस ही

गोष्ट तुला दाखवितां येईल."

"काय, मि. कामत यांना मी तुझ्यापेक्षां जास्त जवळचा ?"

"होय, पण ही गोष्ट तुला ठाऊक नाहीं. मि. कामत हे सारस्वत ब्राह्मण आहेत. तुम्हीही गौड ब्राह्मण आहांत. सारस्वत आपणांस कधीं गौड सारस्वत म्हणवितात, ते आपला बंगाली ब्राह्मणांशीं संबंध सांगतात, बंगाली ब्राह्मण मच्छी खातात, सारस्वतहि मच्छी खातात, तर बंगाली तरुणास महाराष्ट्रीय सारस्वताच्या मुलीसाठी मागणी घालावयाची असल्यास महाराष्ट्रीयांपेक्षां तुम्हीच जवळचे आहांत अशी मांडणी तुला करतां येईल."

"तुझी छोकरी दुसऱ्या तरुणानें न्यावी असें तुला वाटतें काय ?"

"एखादी मुलगी "माझी छोकरी" ठरली म्हणजे मी जी धडपड करायची ती करीन. पण तुला स्पर्धा करून तरुणीचें अंतःकरण जिंकून नेण्याची मी मोकळीक ठेवतों— ज्याचें नशीब अधिक बलवत्तर असेल तो जिंकील, पण एखाद्या मुलीची प्रेमयाचना करणारे जितके अधिक तितके त्या मुलीला हितावहच आहे, म्हणून मी मिस् कामत यांच्या हिताच्या दृष्टींनेच बोलत आहे."

"फार उदार आहेस बाबा तूं!"

आशुतोष चौधरीने हे शब्द उच्चारले तोंच बोट न्यू जर्सीच्या धक्क्याला लागली आणि दोघे तरुण हस्तांदोलन करून निरनिराळ्या दिशांना निघून गेले.

डॉ. सरंजामे यांच्या पूर्ववृत्तांताचा कांहीं भाग अमेरिकेस शिक्षणासाठीं गेलेल्या बऱ्याच लोकांच्या स्थितीचा दर्शक होईल. यांचे वडील मुंबईस एका पोस्टांत नोकर होते. व ते अल्पवयी असतानाच मृत्यु पावले. त्यानंतर त्यांचे शिक्षण पुण्यास चुलत्याकडे झालें, आणि त्यामुळें पुण्यातील सर्व वातावरण त्यांच्या अंगांत पुरें भिनलें होतें. पुण्यास झालेला प्लेग, त्यानंतर पुणे शहरांत सोल्जर लोकांनी केलेला धुमाकूळ, आणि त्यानंतर झालेले-थांड आणि आयर्स्ट यांचे खून, त्यानंतर लोकमान्य टिळकांवर झालेले खटले आणि चाफेकर बंधू यांची हकीकत या गोष्टी त्यांस अत्यंत लहानपणी समजल्यामुळें त्यांच्या मनावर कांहीं विशिष्ट संस्कार अगदी अल्पवयांत झाले होते. पुण्यास ते चुलत्याकडे आईसह कांहीं दिवस रहात होते तेव्हां त्यांस असें दिसून आलें कीं आपल्या आईची पदवी घरांत बिनपगारी नोकरापलीकडे कांहीं नाहीं. आई जर स्वैपाकीण म्हणून स्वतंत्र असती तर आईस अधिक चांगली वागणूक मिळाली असती, आणि पगारही मिळाला असता, आणि आपणही अधिक बऱ्या स्थितींत असतों. पण सभ्य आणि कुलीन घराण्यांतील बाईनें स्वैपाकीण म्हणून नोकरी करावयास तरी कसें जावें या प्रकारच्या सामाजिक निर्बंधाचा त्यांच्या स्थितीवर परिणाम झाला होता. डॉक्टर सरंजामे यांस आपल्या घराण्याचा अभिमान होता. त्यांच्या घराण्याचे पूर्वीचे आडनांव लोंढे होते, पण पेशवाईत पूर्वजांनी कांहीं थोर कृती केल्यामुळे पेशव्यांकडून सरंजाम मिळाला होता. पण तो सरंजाम पुढें इंग्रजींत राहिला नाही. फक्त सरंजामे आडनांव तेवढें शिल्लक राहिलें. आपल्या पूर्वजांनीं मराठी राज्याच्या विस्तारासाठीं काय कृति केली यासंबंधी माहिती त्यांस घरातल्या

बोलण्यावरून थोडीशी कळली होती, आणि त्याबरोबर त्यांस आपल्या काल्पनिक जबाबदारीचीहि जाणीव होऊं लागली होती. मराठी राज्य फसलें हें आपल्या पूर्वजांच्या दोषामुळें. तर झालेली चूक आपणांस दुरुस्त केली पाहिजे इत्यादि कल्पना त्यांच्या मनांत येत असत. पण या तऱ्हेच्या कल्पना पुस्तकें वाचतांना येत आणि कृति काय करावी हें समजत नसे. आपल्या देशांतील कुणबी लोकांना मरेमरेतों काम करून पोटभर अन्न देखील मिळत नाहीं, आणि या तऱ्हेची स्थिति येण्यास जबाबदार सरकार आहे, आणि हें असें वाईट सरकार आपल्या लोकांच्या उरावर बसण्यास कारण आपण आहोंत इत्यादि कल्पना त्यांच्या मनात येत असत. पण त्याबरोबर आपण स्वतः अत्यंत असहाय स्थितीत आहों असें त्यांस वाटे. त्यांचे कांहीं शिक्षण झाल्यानंतर सरंजामे यांस कांहीं अमेरिकन तरुण आपलें पोट भरून विद्याभ्यास करीत आहेत याची माहिती लागली, आणि इतरांस जें शक्य झालें तें आपणांस कां शक्य नाहीं, आपणही परदेशी जाऊन कांहीं तरी अधिक शिकावे इत्यादि विचार मनात येऊन त्यांनी अमेरिकेस जावयाचा निश्चय केला. पण या गोष्टीस आईची संमति मिळाली नव्हती म्हणून तो निश्चय पुढील काळावर ढकलला गेला. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें त्यांची आई वारली आणि त्यांस वाटेल तिकडे जावयास चारहि दिशा मोकळ्या झाल्या. पण बी. ए. ची परीक्षा लवकरच व्हावयाची होती तेव्हां ते ती परीक्षा उत्तीर्ण होऊन येथून बी. ए. ची पदवी प्राप्त करून घेऊन अमेरिकेस गेले.

विष्णु सरंजामे अमेरिकेस आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यास पोटाची पंचाईत पडूं लागली. आणि तो अमेरिकेंत आपल्या पोटाची सोय कशी होईल हें पाहूं लागला. प्रथम तो एका शेतांत जाऊन २॥ डॉलर रोज प्रमाणें काम करीत होता, आणि नंतर त्यानें कोलंबिया युनिव्हर्सिटींत प्रवेश केला. पोस्ट ग्रॅज्युएट स्कूलमध्यें त्यानें आपलें नांव दाखल केलें, आणि पुढें तो तीन वर्षें युनिव्हर्सिटींत अभ्यास करीत होता. तीन वर्षांत तो तेथील उच्च पदवी पीएच्. डी. प्राप्त करून घेता झाला. आणि पुढें त्याच युनिव्हर्सिटींत उपाध्यापकाचे काम करीत होता.

तो युनिव्हर्सिटींत अभ्यास करीत असतां गोविंदराव कामत यांच्याकडे वारंवार जात असे. गंगाधरपंत न्यूयॉर्क सोडून कोठें तरी निघून गेल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं या तरुण महाराष्ट्रीयाची आणि गोविंदरावांची गांठ पडली. अस्सल पुण्याचा मराठी बोलणारा विद्यार्थी न्यूयॉर्कला आला आहे, त्यांतल्या त्यांत तो महत्वाकांक्षी आहे इत्यादि गोष्टी गोविंदरावांच्या नजरेस आल्यामुळे तो त्यांस आवडूं लागला. गोविंदरावांना असें झालें होते कीं, मराठी बोलणारा कोणी आला म्हणजे तो त्यांस आप्तापेक्षाहि जवळचा आप्त वाटत असे, आणि आपल्या मुलाला त्याची संगत लागावी असेंहि वाटत असे. त्यांतल्या त्यांत विष्णूचें मराठी वाचन चांगलें होतें, वेदांतावरच्या गोष्टींची त्याला चर्चा करतां येत होती आणि आगरकर, विष्णुशास्त्री व टिळक यांच्या पुण्यांत विश्रुत असलेल्या दंतकथा त्याला परिचित होत्या, व त्याचें मराठी कवींच्या कवितांचे वाचन चांगलें झालें होतें. एकदां घरच्या गणपतीच्या उत्सवाच्या प्रसंगीं त्यानें हरदासी पोशाख करून कीर्तनहि चांगलें केलें.

होते, तें याचें कीर्तन ऐकून शांताबाईहि चांगल्याच खूष होऊन गेल्या, कां की, त्यांस आपण न्यूयॉर्क येथें नसून शेणव्यांच्या ठाकुरद्वारीं आहोत असेंच वाटलें. आपल्या मुलांना हिंदुस्थानचें वातावरण चांगलें समजून आपले राष्ट्रीयत्व कायम रहाण्यास हा चांगला उपयोगी पडेल असें गोविंदरावांस वाटलें म्हणून त्याच्याकडे गोविंदरावांचे विशेष लक्ष राहिले. एके दिवशीं मि. कामत यांच्या घरीं सरंजामे जेवावयास आला असतां जेवण झाल्यानंतर पत्ते खेळणें झालें व पत्ते खेळल्यानंतर रात्र फार झाली म्हणून मि. कामत यांनीं रात्रीं सरंजामे यास निजावयास ठेवून घेतले. त्या दिवशीं गोविंदराव आणि विष्णु हे एकाच खोलींत निजले होते आणि सकाळी दोघेहि जागे झाल्यानंतर तुम्हाला कांहीं भूपाळ्या येताहेत कां हो ? म्हणून गोविंदरावांनीं विचारले. तेव्हां "घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठि लवकर वनमाळी उदयाचळी मित्र आला ॥ ' ही भूपाळी विष्णूनें पूर्णपणें चांगली म्हणून दाखविली. ती म्हणून दाखविल्यानंतर गोविंदरावांना ती इतकी गोड लागली कीं, अरेरे आपण या गोड भाषेला मुकणार तर नाहीं ना, आपलीं मुलें मराठी जाणतात. पण त्यांस अशी भूपाळी रचतां थोडीच येणार आहे, लीला कविता करू लागली आहे पण ती कविता इंग्रजीतच करते इत्यादि गोष्टी मनांत जागृत झाल्या. विष्णु सरंजामे हा त्यांच्या परिचयकक्षेत आल्यानंतर गोविंदरावांचे महाराष्ट्रीयत्व इतके जागृत झालें कीं, त्यांस नवीन जगास येऊन आपण मिळविलेली ही संपत्ती आपलें महाराष्ट्रीयत्व जाईल तर निरुपयोगी आहे असें वाटू लागलें.

गोविंदराव कामत यांच्या घरीं सरंजामे यांचें जाणें अधिकाअधिक होऊं लागलें आणि शांताबाईस तर डॉ. सरंजामे अत्यंत प्रिय झाले.

( विद्यासेवक वर्ष ३ अंक ६–७ पृ. २८-३५ )

## ७. रिप व्हान विंकल

... ब्रह्मगिरि मुंबईस विद्यार्थी असतांना एकदोनदां पुण्यालाहि गेले; आणि पुण्यास गेले असल्यामुळें स्वदेशाभिमानाचें आदिपीठ जें पुणें शहर त्याची थोडीबहुत माहिती झाली होती. पुण्याचे मेळे त्यांस मनोरंजक वाटले, आणि त्यांची मनोरंजकता विशेषेंकरून भोंवतालच्या परिस्थितीवर टीका करणारी जीं पदें होतीं त्या पदांमुळे त्यांस भासली, त्यांतली कांहीं पदें तर त्यांस फारच आवडलीं. एका पदांत—

पत्नि घालीते अंबाडा, वरि खोंवोनी केवडा
धावे मार्गी ती दुडदूडा, शारदा पहाया.

अशा ओळी होत्या. ओळी तर त्यांस आवडल्या. पण त्या ज्यामुळें आवडल्या त्यामुळें कवीच्या मनातला उद्देश साध्य झाला असेलच असें सांगतां येत नाहीं. चालू परिस्थितीचें हें चित्र अनिष्ट नसून इष्ट चित्र आहे असेंच त्यांस वाटलें.

ब्रह्मगिरि टेंगशांच्या वाड्यांत उतरत असत, त्यावेळेच्या त्या वाड्यांतील परिस्थितीचें चित्र त्यांस अजून चांगलेंच आठवत होतें. त्यावेळेस टेंगशांच्या वाड्यांत पुण्यामध्यें देशाभिमानी, रसिक, धर्माभिमानी आणि राजकारण समजणारी मंडळी रहात असत अशी प्रसिद्धी होती; व आपण टेंगशांच्या वाड्यांत उतरलों व त्यामुळें आपली या संघाशीं ओळख झाली म्हणून आपणांस कितीतरी अभिमान वाटला. पण त्या मंडळींशीं प्रत्यक्ष संबंध आल्यानंतर त्यांच्याविषयींचा आदर किती मर्यादित झाला वगैरे गोष्टी त्यांस आठवल्या. श्रीमंती हा जणु काय एक मोठा दुर्गुण आहे असें दाखविण्याची प्रवृत्ति सदाशिव पेठेतील विशिष्ट मंडळींत होती. ती या वाड्यांतील मंडळींत दिसून येत असे. मोठीं माणसें कोणतीं तर जीं स्वार्थत्याग करणारी. याच एका गुणामुळें मनुष्याची किंमत ठरवावयाची असें त्यावेळचे तत्त्ववेत्ते किंवा लेखक भासवीत असत. घाणेरड्या वस्तींत कसेंबसें जीवन चालवावें, पैसे मिळवणाऱ्या मंडळींची निंदा करावी, दुसऱ्या मंडळींनी पैसे मिळविण्यासाठीं काय काय ढंग केले, कोणी कंत्राट मिळविण्यासाठीं कोणत्या साहेबाच्या मडमेला कंठा दिला इत्यादि गोष्टी नित्य चर्चेच्या असत. ऑफिसातून यावें, चौकामधील एका पडवींत एक सतरंजी घालावी, आणि मंडळींनी पत्ते खेळतांना चहा घ्यावा आणि चिवडा खावा असा अनेक वाड्यांतील आयुष्यक्रम असे. त्या प्रमाणें टेंगशांच्या वाड्यांतील आयुष्यक्रम होता. या वाड्यांत अनेक बिऱ्हाडें होतीं. एक

स्वार्थत्यागी शाळामास्तर, एक एका वर्तमानपत्रांतील दुय्यम लेखक, एक कलेक्टर कचेरीतील कारकून आणि एक शास्त्रीवजा पुराणिक. त्यावेळेस पुण्यातील भाडीं स्वस्तीं होतीं. प्रत्येक जण दोनतीन रुपयांच्या आंतले भाडें भरणारा, आणि मोठमोठ्या मंडळीवर व धर्म, शिक्षणपद्धति व राजकारण इत्यादि सर्व विषयांवर टीका करणारा— तो पुराणिक धार्मिक गोष्टींतील अधिकारी म्हणून मिरवे. कलेक्टर कचेरीतील कारकून आपणांस सरकारचीं सर्व रहस्यें ठाऊक असल्याचा बाणा बाळगी तो कारकून असा तसा नव्हता, तो ग्रॅज्यूएट होता. तो स्वार्थत्यागी शाळा मास्तर भावी पिढीस उच्च वळण लावण्यासाठी आपण अवतरलो आहों असा बाणा बाळगी, तर वर्तमानपत्रांतील दुय्यम लेखक महाराष्ट्र आपल्या तावडींत आहे अशा भावनेनें वागत असे. सर्व मंडळी एकाच मताची होती असें नाहीं, कोणी पुनर्विवाह असावा असे म्हणे, तर कोणी नसावा असे म्हणे, तर कोणी लहानपणीच विधवा झाल्या असतील असल्या स्त्रियांच्या बाबतींत पुनर्विवाह क्षम्य आहे असें सांगून आपण मोठ्या समतोल वृत्तीचे आहोंत असें दाखवी आणि त्याबद्दल प्रशंसा मिळवी. या वाड्यांतील मंडळींचीं भिन्न मतें तरी कशावर असायची, पुनर्विवाहावर असायची, कां कीं विचाराला निराळे विषय असतील तर ना! स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, हे त्यावेळच्या जगांतले दोनच विषय. यांवर एका बाजूनें बोलले म्हणजे सुधारक म्हणत, दुसऱ्या बाजूनें बोलले म्हणजे उद्धारक म्हणत. मनुष्यमात्राचें वर्गीकरण एवढ्याच गोष्टीकडे पाहून करावयाचे असा त्यावेळच्या लोकांमध्यें संप्रदाय पडला होता. तो टेंगशांच्या वाड्यांत पूर्ण प्रतिबिंबित झाला होता, त्या मंडळींना विचाराला विषयच थोडे होते, पण मंडळी मात्र असें समजत कीं हा टेंगशांचा वाडा सर्व महाराष्ट्रीय उन्नतीचें केंद्र आहे.

त्या मंडळींच्या विचारांचें दुर्भिक्ष्य पाहून ही सर्व मंडळी अशिक्षित होती असें कोणी म्हणेल पण ती चूक होईल. शाळामास्तर बी. ए. झाला होता तर तो अशिक्षित कसा? वर्तमानपत्रांतील दुय्यम लेखक तर कायद्याचेंहि शिक्षण मिळालेला होता आणि तो आपल्याला मोठा सुशिक्षित विनोद करणारा समजत असे; तर त्याला अशिक्षित कसें म्हणावें? जो कलेक्टर कचेरींत होता तोहि बी. ए. झालेला होता. त्याचप्रमाणे जो शास्त्रीवजा पुराणिक होता, तो देखील इतर मंडळींमध्ये बसला असतां कोट्या करण्यांत प्रवीण होता. त्यावेळेस त्यांची स्त्रीशिक्षणावरहि चर्चा चालत असे, आणि स्त्रिया फार शिकल्या असतां काही अनर्थ ओढवतील म्हणून या वाड्यांतील सुशिक्षितांमध्ये म्हणजे त्या चौघांमध्ये अगदीं एकमत होतें. अनर्थाची जी जाणीव त्यांस थोडींबहुत होती ती देखील काल्पनिक नसून सकारण होती. त्यांस वाटत असलेल्या भीतीच्या कारणांतील एक कारण होतें तें असें : ही मंडळी गप्पा मारीत बसली असतां जीं विनोदाची भाषणें करीत ती भाषणे करताना मंडळी बहुधा अश्लीलतेच्या कांठावर जात, पण त्याप्रकारची चर्चा करताना संस्कृत शब्द वापरीत. जर बायका शिकल्या व त्यांना संस्कृत येऊं लागलें तर आपल्याला या प्रकारचें बोलणें बोलतां येणार नाहीं, आणि आपल्या बोलण्यावर विनाकारण

नियंत्रण उपस्थित होईल, ही त्या मंडळीस मोठीच अडचण वाटत असे.

फाजीलपणाचें बोलणें बोलूच नये तर आयुष्यांत मजा रहात नाही. अशोकवन-मंजिरीचे अभिसारकांचे कौमुदीमहोत्सवाचे दिवस कधींच निघून गेले. आतांचे नीरस आयुष्य आनंदानें कसें घालवावें हा प्रश्न आहे. हा राष्ट्राचा वृद्धापकाळ आहे, वृद्धापकाळीं तारुण्यांतील विलास फक्त आठवून आनंदित व्हावयाचे, त्याप्रमाणेच आज देशाची स्थिति आहे. आपली " रसिकता " कृतींत आणण्याची आज स्थिति नाहीं, तर ती आठवणीतच व संभाषणांत व्यक्त करावयाचे दिवस आहेत ही गोष्ट देखील सर्वमान्य होती. फाजीलपणा व रसिकता यांतील मुख्य भेद त्या चौकडीच्या मतानें असा होता कीं, चावटपणाचें बोलणें बोलतांना संस्कृत शब्द वापरले म्हणजे तो चावटपणा मुळीच नसून रसिकपणा होय. रसिकपणाचें हें स्पष्टीकरण त्या चौघांस अगदीं मान्य होतें. गिरणीतल्या लोकांबरोबर आयुष्य काढणाऱ्या आणि त्या कामकरी वर्गावर प्रेम उत्पन्न झालेल्या ब्रह्मगिरीस टेंगशे वाड्यातील मंडळींनी चावटपणा आणि रसिकता यांतील पत्ता लावलेला भेद म्हणजे केवळ भिकारी पण स्वतःस अधिक शिष्ट समजणाऱ्या वर्गाचा कामकरी वर्गाविषयीं व त्यांच्या करमणुकीविषयीं असलेला तिरस्कार आहे, दुसरे कांहीं नाहीं असें वाटे.

हीं मंडळी कालेजांत शिकली होती व ती आता स्वतंत्र झाली होती, व आपापल्या बायकांना घेऊन स्वतंत्रपणे राहूं लागली होती. ते कालेजांत असतांना त्यांच्या मनांत वागत असलेलें सुखी आयुष्यक्रमाचे चित्र स्वतंत्रपणें संसार करणें एवढेच होतें. तथापि पाश्चात्त्यांची कुटुंबपद्धति वाईट, आपली एकत्र कुटुंबपद्धति चांगली असेच म्हणण्याचा त्यांचा परिपाठ असे. टेंगशांच्या वाड्यांतल्या या तरुण मंडळीस आपल्या ध्येयाप्रमाणें आपणांस आयुष्यक्रम आखता आला आहे एवढ्याबद्दलच कृतकृत्यता वाटत असे. त्यांच्या दृष्टीनें सुखी अशा आयुष्यक्रमाचें चित्र त्यावेळच्या एका कादंबरीकारानें रंगविलें होतें. त्या कादंबरीकारास हऱ्या आपटे म्हणत हेहि ब्रह्मगिरीस आठवले. टेंगशांच्या वाड्यांतली ही मंडळी जरी स्वतः न अनुभविलेल्या जुन्या प्रकारच्या आयुष्यपद्धतीची स्तुति करीत असे तरी ही मंडळी जुनें तें चांगलें अशी भावना असलेली मुळीच नव्हती, त्यांस उलट आपल्या सुशिक्षिततेचा अभिमान असून ते जुन्या मंडळीस तुच्छच मानीत असत; तथापि एका पिढीच्या पूर्वीच्या कालातल्या जुन्याची ही मंडळी अभिमानी असत; म्हणजे जुन्याचा अभिमान बाळगावयाचा पण आपल्या निकट पूर्वीच्या पिढीला लाथा मारावयाच्या अशी त्यांची विद्या होती. यालाच ही मंडळी मुत्सद्दीपणा समजत. या गोष्टी देखील ब्रह्मगिरीस चांगल्या आठवत होत्या.

पुण्यांतल्या या तरुण पिढींत आणि पूर्वीच्या तरुण पिढींत पुष्कळच अंतर होते. या पिढीच्या मंडळींनी संस्कृत काव्यें वाचलीं होतीं. इंग्रजी काव्यें वाचलीं होतीं. आणि इंग्रजी कादंबऱ्याहि वाचल्या होत्या. त्यामुळे या मंडळीच्या मनांत अद्‌भुतरसाची थोडी जागृती झाली होती, रोमान्सच्या गोष्टींची आवड होती आणि त्या त्यांस परिचित

असलेल्या वास्तविक जगांत नाहींत म्हणून दुःख वाटत असे. लहान मुलींची लग्नें त्यांना समजूं लागण्यापूर्वी होऊन जातात त्यामुळे प्रेमकथा आपल्या सभोवतालच्या जगांत दिसत नाहींत, तर आपण वस्तुस्थितिदर्शक पण सुरस अशीं काव्यें किंवा कादंबऱ्या तरी कशा लिहाव्यात अशीहि अडचण त्यांना भासून येई. तरी देखील प्रौढविवाहाचें ओझें समाजानें पत्करावें असें म्हणण्यास ही मंडळी तयार नव्हती. सभ्य मंडळींनी स्त्रीविषयक गोष्टी मुळीच काढूं नयेत इत्यादि ज्या सभ्यपणाच्या कल्पना लोकांच्या उरावर लादल्या जात होत्या त्यांच्याविरुद्ध त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति होती. पण आजच त्या सभ्यपणाच्या कल्पनांस पॉलिसीसाठी विरोध करू नये असे रानडे मास्तर व भाऊसाहेब भडभडे म्हणत. कलेक्टर कचेरीत कारकुनी करणाऱ्या भडभड्यांना भडभडे म्हणण्यापेक्षा भाऊसाहेब भडभडे म्हणणेच योग्य होते. कां कीं, ते बी. ए. होते व ते पुढे मामलेदार होणार म्हणजे रावसाहेब होणार होते, तर पहिल्यापासून त्यांना भाऊसाहेब म्हणावे हेंच रास्त होय, असें त्या वाड्यातील मंडळी समजत असत. हें दोघांचें म्हणणें ते एल्. एल्. बी. उपसंपादक, आणि शास्त्रीबुवा या दोघांसही मान्य होतें. येणेप्रमाणें स्त्रियासंबंधाच्या अनेक गोष्टींविषयीं साधकबाधक चर्चा होऊन या चौघांमध्यें म्हणजे पुण्यांत म्हणजे महाराष्ट्रांत एकमत उत्पन्न झालें होतें.

त्यावेळच्या सुशिक्षित मंडळीचे नेहमींचे चर्चेचे विषय कांहीं ठरलेले होते. सरकारी कारकून होते ते निरनिराळ्या साहेबांच्या गोष्टी सांगत. त्यांत साहेबांचा शहाणपणा दाखविणाऱ्या गोष्टी सांगणारे कांहीं असत, तर कांहीं त्यांचा गाढवपणा दाखविणाऱ्या गोष्टी सांगणारे असत. कांहीं साहेबांची, तो हिंदूंच्यातर्फेचा आहे की मुसुलमानांच्यातर्फेचा आहे असे वर्गीकरण गांवांतले लोक करीत; तर तो ब्राह्मणांना पसंत करतो की प्रभूंना पसंत करतो या तऱ्हेच्या गप्पा अधिक सुशिक्षित वर्ग मारी. नोकरीसाठी जे वर्ग धडपड करीत असत ते आपल्या जातीखेरीज दुसऱ्या जातीवर टीका करीत. वशिले लावण्याची खटपट करणारे लोक मोठे मुत्सद्दी समजले जात. खालच्या स्थितीतले लोक युनिव्हर्सिटीकडे वशिले लावून परीक्षेची सुपरवायझरशिप मिळवीत. तर वरच्या दर्जाची मंडळी युनिव्हर्सिटीचे एक्झामिनर होण्यासाठी धडपड करीत. या सर्व गोष्टी वर्तमानपत्रांच्या फायली पुढे घेऊन बसणाऱ्या स्वामी ब्रह्मगिरींच्या डोळ्यांसमोर आल्या.

आपल्या मनांत त्यावेळेस निराशेचें साम्राज्य कसें माजलें होतें त्याची देखील त्यांस आठवण झाली. टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्यें आपण कोर्स पुरा केला तरी आपणांस भवितव्य काय आहे ? हा प्रश्न आपल्या मनांत उद्भवला तेव्हां कांही दिवस आपण कर्तव्यशून्य वृत्तीनें मुंबईत कसे भटकत होतों. आपल्याप्रमाणेच भवितव्याविषयीं साशंक झालेले तरुण किती तरी होते हें त्यास आठवले. सूतकाम व विणकाम या खात्याचा कोर्स घेऊन बाहेर पडलेली मंडळी त्यांस भटकतांनाच दिसली होती. गिरण्यांकडे पहावें तर गिरण्या पारशांच्या किंवा मुसुलमानांच्या किंवा गुजराथ्यांच्या— पण त्या सर्व ठिकाणी महाराष्ट्रीय मंडळीचा प्रवेश होईना म्हणून त्यांची वृत्ती विषण्ण झाली होती. बी.ए.कडचे

शिक्षण घेऊन जी मंडळी बाहेर पडली होती, त्यांस बाहेर क्षेत्र नाही, सरकार ब्राह्मणांना जागा देण्याविषयीं प्रतिकूलता दाखवीत आहे. आणि गिरण्यांमधले लोक महाराष्ट्रीय मंडळींचा गिरण्यांत देखील शिरकाव होऊ देत नाहींत. स्वदेशी चळवळ महाराष्ट्रीयांनी जोशी काकांच्या पासून प्रेमानें चालविली. तिचा जो इष्ट परिणाम झाला त्याचा फायदा पारशी व गुजराथी गिरणीवाल्यांना मिळत आहे आणि ते गिरणीवाले आपल्या चळवळी-बद्दल मुळींच कृतज्ञ नाहींत, तर स्वदेशीवाल्यांचा सूड घेण्यासाठींच कीं काय ते दर वाढवून बसले आहेत, व स्वदेशी कपडा सपाटून मुनाफा खाऊन विकीत आहेत, व स्वदेशी चळवळ आम्ही करतो म्हणून दक्षिणी लोकांस एक्स्ट्रीमीस्ट ठरवून पारशी खटपटे महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे नांव सरकारपाशीं बद्दू करीत आहेत, सरकारचा रोष महाराष्ट्रीय ब्राह्मणांस सहन करावा लागत आहे. महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी चळवळ करावी, स्वार्थत्याग करून महाग कपडे घ्यावेत आणि हे दक्षिणी घेलसप्पे मूर्खासारखे स्वदेशी कापड जास्त पैसे देऊन घेतात तर स्वदेशी म्हणून वाटेल तो घाणेरडा माल त्यांच्या गळ्यांत बांधावयास हरकत नाही, म्हणून पारशी व गुजराथी लोकांनी हसावे, दक्षिणीच्या गळ्यांत घाणेरडा माल घालावा, आणि त्यांचा प्रवेश मात्र गिरण्यांत होऊं देऊं नये या परिस्थितींत महाराष्ट्रीय ब्राह्मणांनीं करावें तरी काय ? देशाभिमानी आणि उदार भावना अजिबात दाबून टाकून द्याव्यात काय ? अशी मनोवृत्ति टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें पसरली होती.

याच सुमारास एका इंग्रज पत्रानें हिंदी पदवीधरांना " नवीन कार्यक्षेत्र " म्हणून एक सूचना केली होती. ती ही कीं, या पदवीधरांनी वनस्पतिशास्त्र शिकून यूरोपीयन लोकांच्या बंगल्यावर माळी बनावे ! तो लेख पाहून ब्रह्मगिरीस दुःखावर डागण्या दिल्या-सारखे झाले. तरुणांस पुढें उज्ज्वल भवितव्य नाहीं, देशांतील धार्मिक चळवळी करणारे पुढारी किंवा धार्मिक पीठावरील अधिपती क्षुल्लक स्वार्थाच्या गोष्टींकडे गुंतले आहेत. समाजसुधारक गिरणीतील गरीब लोकांच्या स्थितीकडे लक्ष देत नाहींत आणि केवळ पांढरपेशांच्या विधवांची लग्ने या ठराविक मुद्यांवर वाद करण्यांतच चूर आहेत. या परि-स्थितीत देशांत राहून आणि सभोवतालच्या आपल्या लोकांचें दैन्य पाहून आणि तें दैन्य पहात असतां देखील आपण तें दूर करण्यास असमर्थ आहोत याबद्दल अत्यंत उद्वेग वाटून आपलीच मनगटें चावण्यांत काय अर्थ आहे, असे जे त्यावेळच्या तेजस्वी तरुणांस वाटलें तें स्वाभाविक नव्हतें काय ? या विचाराच्या प्राधान्यामुळें आपल्याप्रमाणेंच अनेक तरुणांची हिंदुस्थानला रामराम ठोकावा अशी वृत्ति बनली, पण प्रत्यक्ष देश सोडून थोडेच गेले. आपण त्यावेळेस कर्तव्य चुकवून पळालों काय ? असा आपल्या मनाला प्रश्न करून त्यांनी " नाहीं " असेंच त्या प्रश्नास उत्तर दिलें. पण पुन्हां त्यांच्या मनास वाटलें कीं, आपण स्वतःलाच प्रामाणिक उत्तर देत नाहीं. आपण जे निघून गेलों ते परिस्थितीचें भीषण स्वरूप पाहून, कर्तव्यमूढ झालेले नव्हतों काय ? होतों हें उघड आहे, तरी देखील आपण जें केलें तें योग्य केलें असें होत नाहीं. विचार करणाऱ्या मनुष्यानें जिकडे स्वार्थ साधेल तिकडे जाण्याऐवजीं देशांतच रहावें या तऱ्हेचा आग्रह जर करावयाचा असेल तर

तो कां ? त्याचें कारण एवढेंच कीं, आपण देशांतल्या स्वजनांच्या उपयोगी पडूं म्हणून. पण आपण जर स्वजनांस उपयोगी पडण्यास असमर्थच असलों तर येथें राहाण्याचें प्रयोजन तरी काय ? तर आपण स्वदेश त्यावेळेस सोडला हेंच बरें केलें. तो सोडला नसता तर आपल्या मनांत आज जो आत्मविश्वास उत्पन्न झाला आहे तो उत्पन्नच झाला नसता.

[ विद्यासेवक वर्ष ४ अंक १-३ पृ. ३१—३५ ]

# ७. शारदाबाई व वैजनाथशास्त्री यांची पहिली भेट

शारदाबाई ज्या दिवशीं तेथें आल्या होत्या त्या दिवशीं तेथें सुमारें पस्तिशी उलटलेला असा एक गृहस्थ कांहीं बारकाईनें तेथील प्रत्येक अवशेषांचे निरीक्षण करण्यांत गुंतला होता. या गृहस्थाकडे पाहिलें म्हणजे कोणाचेहि लक्ष त्याच्याकडे वेधलेच असते. त्याचें तें पंचावजा धोतर, एक सदरा, तो देखील प्रवासानें मळलेला आणि डोक्याला एक पांढरा रुमाल एवढेंच त्याच्या अंगाला दिसत होतें. त्याचें प्रवासांतलें सामान म्हटलें म्हणजे एक लहान टिपा घेण्याची वही, एक पडशी, तींत कांहीं पोहे, एक तांब्या पंचपात्री आणि एक धाबळी. त्याच्याजवळचें सामान एवढेंच. शारदाबाईंनीं प्रथम त्या गृहस्थाकडे लक्ष दिलें न दिलें असेच केले, तथापि हा काय करतो, कोठें जातो, इकडे मात्र त्यांनी सूक्ष्म दृष्टी ठेविली आणि त्याच्यासाठीं तो गृहस्थ दृष्टिआड होणार नाहीं अशा बेतानें तथापि त्याच्या फारसें लक्षात येणार नाहीं अशा बेतानें त्याच्यावर दृष्टी ठेविली आणि हा गृहस्थ दृष्टिआड ज्या ठिकाणावरून होणार नाहीं अशा ठिकाणचे अवशेष आपल्या सहचरीबरोबर पाहण्यास सुरुवात केली.

त्या गृहस्थानें तेथील एका तलावांत स्नान केलें, आपलें धोतर धुतलें आणि तें वाळत टाकलें. थोडासा वेळ संध्यावंदनांत घालवून नंतर पोह्यांत पाणी घालून आणि त्यांत एक गुळाच्या खड्याचा चूर घालून पोह्यावरच दुपारची भूक शांत केली.

हा प्रकार दुरून शारदाबाई पहात होत्या आणि त्या गृहस्थाला बोलावून कांहीं तरी फराळाचें त्यांस द्यावें असें त्यांस वाटलें तथापि त्याला एकदम कांहीं खावयास देऊं केल्यास तें बरोबर दिसणार नाहीं असेंहि वाटून त्या स्वस्थ बसल्या.

संध्याकाळची वेळ; सुमारे चार वाजतां रत्नपुरांतील एका भग्न देवालयाच्या गर्भगृहांत तो गृहस्थ एक शिलालेख ओल्या फडक्यानें धुऊन स्वच्छ करीत होता. तो शिलालेख धुवून झाल्यावर त्यानें त्यावर ओले कागद घातले आणि ते तसेच वाळूं द्यावेत आणि तोपर्यंत आपण जरा स्वस्थ बसावें या हेतूनें तो आपल्या खिशांतील एक विडी काढून ती पेटवीत बाहेर आला. बाहेर येऊन पाहतो तों आपल्यापुढें दिसण्यांत देखणी, उंची नागपुरी लुगडें नेसलेली, अंगावर शाल घेतलेली आणि पायांत पुणेरी जोडा घातलेली एक स्त्री उभी आहे. ही स्त्री कोण असावी म्हणून तो गृहस्थ बुचकळ्यांत पडला असेल; पण आमच्या प्रिय वाचकांस संदेहांत पडण्याचें कारण नाहीं. त्यांनी ताडलेच असेल कीं ती दुसरी तिसरी कोणी नसून त्यांच्या परिचयाची ही शारदाबाईच होय.

" आपण येथें काय करीत आहां ? मला तें जाणण्याची इच्छा आहे. "

" मी येथें एक शिलालेख दिसला त्याचा छाप घेत आहे. "

" हा कशासाठीं ? "

" याचा कांहीं इतिहासार्थ उपयोग झाला तर पाहावा या हेतूनें. "

" आपण काय इतिहासकार आहांत. "

" नाहीं, पुढें मागें आपल्या देशांत कोणी इतिहासकार झाला तर त्याला कांहीं पूर्वी झालेला अभ्यास आणि पूर्वी गोळा केलेलें साहित्य उपयोगी पडावें म्हणून तें साहित्य जमा करण्याचें आणि कांहीं सापडलेल्या साहित्याचा अर्थ लावण्याचें हमाली काम मी सध्यां करीत आहे. "

" तर मग आपण काय इतिहास संशोधक आहांत ? "

" इतिहासकार आणि इतिहाससंशोधक यांतील फरक आपल्याला कळतो वाटते ? "

" न समजायला काय झालें ? आपल्या देशांत कांहीं विशेष उद्योग माणसे करूं लागली म्हणजे त्या उद्योगाचे नांवहि लोकपरिचित होते. "

" बरं तर मग माझ्या उद्योगाला इतिहाससंशोधनाचे नांव देता येईल. "

" हें काम फार कठिण आहे. "

" नाहीं, विशेष नाहीं. करूं लागलें म्हणजे येतें. का आपल्याला तें करायचें आहे काय ? इच्छा असली तर अशक्य नाहीं. "

" हें काम कठिण नसेल तरी माझ्यासारखीला कठिणच आहे. तसलें काम धुळ्याच्या वैजनाथशास्त्र्यांसारखीच माणसे करू जाणतील. "

" धुळ्याचे वैजनाथशास्त्री आपल्या ओळखीचे आहेत काय ? "

" त्यांना कधीं पाहिलें नाहीं पण त्यांचीं पुस्तकें मजजवळ आहेत. "

" वैजनाथशास्त्री कांहीं मोठा विद्वान नाहीं किंवा अलौकिक बुद्धिमत्तेचा मनुष्य नाहीं. तो मेहनत करणारा मनुष्य आहे एवढेंच. "

" वैजनाथशास्त्री कांहीं मोठा विद्वान नसेल तथापि आज जीं माणसें हिंदुस्थानांत अस्तित्वांत आहेत तेवढ्यांत तो अत्यंत विद्वान आहे ही गोष्ट कोणास नाहीं म्हणतां यावयाची नाहीं. "

" दुसरे कोणी म्हणणार नाहीं तरी मी म्हणतों कीं वैजनाथशास्त्री हा अत्यंत सामान्य बुद्धीचा मनुष्य आहे आणि हें देखील पूर्ण ओळखून सांगतो. "

" वैजनाथशास्त्र्यांस अत्यंत सामान्य म्हणणारे आपण; तर आपल्यासारख्या विद्वानाचें नांव आम्हांस कळलें पाहिजे. "

" काय, माझें नांव ? "

" होय. "

" तें तर आपणांस ठाऊकच आहे. "

" तें कसें ? "

" वैजनाथशास्त्री मीच. "

" वैजनाथशास्त्री ! "

हा शब्द शारदाबाईंनी चकित वृत्तीने उद्‌गारला कारण तें नांव ऐकतांच त्यांस मोठें आश्चर्य वाटलें.

महाराष्ट्रीय विद्वानांचा मुकुटमणि म्हणून ज्याची ख्याति आहे आणि ज्या मनुष्याचें नांव सर्वतोमुखी आहे आणि जो मनुष्य मोठा बुद्धिमान, प्राचीन दुर्वास ऋषीचा जर कोणी अवतार आजच्या दुर्दैवी भारतभूमींत असला तर हा एवढाच असेल म्हणून ज्याविषयीं त्याचे भक्त आदरयुक्त वाक्यांनी बोलत आहेत, तोच काय हा वैजनाथशास्त्री ? अरेरे ! काय ही स्थिति !! ज्याचें खरें न्यस्तासारखें वर्तन पाहून आपला देश जर स्वतंत्र असता तर शेंकडों राजांनी ज्याचें अत्यंत आदरानें स्वागत केलें असतें, तोच काय हा महर्षि ! आजची दुपार यास पोहे आणि गुळाचा खडा एवढ्यावर काढावी लागली ! सज्जनास कष्टमय स्थितींत पाहून देखील त्याच्या सेवेस न धावून जाणें हाच का आमचा शिष्टाचार ? कशाला दुपारच्या वेळेस मी लाज धरली. पुढें त्यांस जेवणास आमंत्रण करणें माझें कर्तव्य नव्हते काय ? शारदे, तुला एवढें समजावयास पाहिजे होतें कीं, आजच्या या कर्तव्यशून्य आणि प्रत्येक फाल्तू गोष्टीची टिमकी वाजविणाऱ्या आणि कांहीं एक विचार न करतां अगर शोध न करतां वर्तमानपत्रें आणि मासिकें यांत लिहिण्यास प्रवृत्त होणाऱ्या महाराष्ट्रांत छे, सर्व हिंदुस्थानांत जो जुन्या अवशेषांची माहिती गोळा करीत हिंडत आहे, आणि थंडी, वारा, ऊन इत्यादिकांकडे दुर्लक्ष करीत आहे तो प्रत्यक्ष वैजनाथशास्त्री जरी नसला तरी कोणी दुसरा पुरुष आहे हें लक्षांत न आणतां शारदे, तूं आज दुपारीं सुखानें जेवण जेवलीस ! "

या प्रकारच्या भावना शारदाबाईच्या मनांत जागृत झाल्या आणि शारदाबाई समोरच्या गृहस्थांकडे मोठ्या आदरबुद्धीनें आणि स्वतःकडून मोठा प्रमाद घडला आहे की काय अशा प्रकारची मुद्रा करून पाहूं लागली. हे पाहून वैजनाथशास्त्र्यास मात्र थोडा-बहुत विस्मय वाटला असेल. आपली योग्यता जाणणारा पुरुषवर्गांत देखील दुर्लभ सापडतो आणि केवळ वरच्यावर आजकाल लोक विद्वत्ता मोजीत असतात आणि जो स्वतःस विद्वान समजणारा मनुष्य अडाणी गव्हर्नराकडे आपलीं इंग्रजींत लिहिलेलीं पुस्तकें पाठवून आणि त्यांचे अभिप्राय मागवून स्वतःची किंमत लोकामध्यें वाढवीत बसतो, आणि जो स्वजनास तुच्छ समजतो अशांचाच लोकांत बडेजाव होतो. समाजांत ज्याच्यापाशीं दोन पैसे जास्त आहेत अशाच वर्गाशीं स्त्रिया आणि त्यांतल्या त्यांत सुशिक्षित स्त्रिया संबंध ठेवूं इच्छितात. सुशिक्षित आणि त्यांतल्या त्यांत आजकालच्या फॅशन्सनीं परिवेष्टित झालेली स्त्री, उघडपणें रंडी ठेवणाऱ्या पण पुष्कळ पैसे मिळविणाऱ्या डाक्टराशीं अगर वकिलाशीं संबंध ठेवूं इच्छील, पण दारिद्र्यांत दिवस काढणाऱ्या विद्वानाशीं संबंध ठेवूं इच्छिणार नाहीं. संस्कृत विद्याविभूषित शास्त्रीवर्गास आजकाल लग्न करण्याची पंचाईत पडूं

लागली आहे.

"आपण तर महाराष्ट्रीय इतिहासाचें संशोधक आणि आपण येथे रत्नपुरास कसे आला ?" विस्मयामुळें उत्पन्न झालेला मुग्धतेचा बांध फोडून शारदाबाई म्हणाल्या.

"मी केवळ महाराष्ट्राच्याच इतिहासाकडे लक्ष देतों असें नाहीं. महाराष्ट्राकडे अधिक देतों एवढेंच. आणि शिवाय हें रत्नपूरचें राज्य महाराष्ट्रीय इतिहासाशीं संबंध आहे."

"संबंध एवढाच ना कीं, भास्करपंडितांनीं हें राज्य १७४१ सालीं शस्त्र उगारल्या-शिवाय खालसा केलें."

"भास्कर पंडिताचा पराक्रम आपणांस ठाऊक आहे वाटतें ?"

"होय, त्यांतल्या त्यांत ठाऊक असायचें कारण म्हटलें म्हणजे त्यांच्या वंशातील एक गृहस्थ मला भेटला होता. भास्करपंडितास बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान यानें भेटण्या-करिता बोलाविलें आणि विश्वासघातानें ठार मारलें आणि पुढें त्यास पश्चात्ताप वाटून त्यानें त्याच्या घराण्यास एका गांवाची जहागिर करून दिली असेंहि त्या गृहस्थानें सांगितलें. आणि भास्कर पंडिताच्या बंगालमध्यें झालेल्या पराक्रमावर बंगाली भाषेंत एक काव्यहीं असल्याचें त्यानें सांगितलें. त्या काव्याचें नांव "महाराष्ट्र पुराण" तें कोणी गंगाराम नांवाच्या कवीनें केलें आहे. त्यांत शाहूराजास नंदीचा अवतार केलें आहे."

"या ठिकाणीं कोणतें घराणें राज्य करीत होतें, हें ठाऊक आहे काय ?"

"येथें हैहय नांवाच्या राज घराण्यांतील पुरुष राज्य करींत होते, असें मीं वाचलें आहे."

"याला प्रत्यक्ष प्रमाण कांहीं आपणांस ठाऊक आहे काय ?"

"याला प्रत्यक्ष प्रमाण ठाऊक नाहीं; पण हें मी इंग्रजी पुस्तकातून वाचलें आहे."

"इंग्रजी पुस्तकांतून वाचणें हें दुसऱ्या प्रतीचें प्रमाण, त्यापेक्षां अधिक चांगलें म्हणजे मूल प्रमाण, तें तुम्हांला येथें सांपडेल."

"येथें कोठें ? कोणत्या तरी शिलालेखावर ?"

"अर्थात् तेथेंच."

पाठीमागें ज्या गोष्टी झाल्या त्यावर कोणी अर्वाचीन लेखकानें पुस्तक लिहिलें असलें म्हणजे आपण नेहमीं असा प्रयत्न करावा कीं त्यानें हें पुस्तक कशाच्या आधारानें लिहिलें, आणि तें पहावें आणि त्यानें दुसऱ्या ग्रंथाच्या आधारानें लिहिलें तें समजल्या-नंतर आपण पुन्हां असा आणखी प्रश्न विचारावा कीं, त्या दूरच्या तरी ग्रंथकाराचें लिहिणें विश्वसनीय आहे काय ?"

"असें करीत कोठपर्यंत जावयाचें ?"

"जितक्या लांबपर्यंत जातां येईल तितकें जावयाचें."

"आणि मग पुढें ?"

"या पुढली क्रिया म्हटली म्हणजे मूळ माहिती देणाराची सत्यता तपासावी."

" ती कशी तपासावी ? "

" ज्यप्रमाणें कोर्टांत पुढें आलेल्या साक्षीदाराच्या साक्षींत सत्य आपण कितपत आहे तें काढीत बसतों त्याप्रमाणें करावयाचें. "

" तें कसें ? "

" साक्षीदाराचें बोलणें कितपत खरें आहे हें पहावयाचें झाल्यास मनाशीं दोन प्रश्न करावेत. "

" ते कोणते ? "

" पहिला प्रश्न म्हणजे साक्षीदारास सत्य ठाऊक आहे काय ? "

आणि दुसरा ? "

" साक्षीदार त्याला ठाऊक असेल तितपत तरी सत्य सांगत आहे किंवा कांहीं दूषित दृष्टीमुळें त्याचें बोलणें अविश्वसनीय आहे ? "

आजकालच्या किंवा शंभर दीडशें वर्षांपूर्वीच्या गोष्टींवर पुस्तकें सांपडतील पण हजारों वर्षांपूर्वीचा इतिहास लिहावयाचा तो कसा ? लोक म्हणतात आर्यभट्ट अमक्या शतकांत झाला, पाणिनी इसवी शकापूर्वी अमक्या शतकांत झाला. इत्यादि गोष्टी कशा सांगतात ? "

" तेंहि सांगता येते. "

" एखाद्या ग्रंथांत कांहीं विशिष्ट गोष्टींचा उल्लेख असला आणि त्या गोष्टीचा काल जर आपणास ठाऊक असला तर ती गोष्ट उल्लेखिणारा ग्रंथ त्या गोष्टीशीं समकालिन किंवा त्या गोष्टीच्या कालानंतर झाला हें उघड आहे. "

" वा ! एकंदरींत इतिहाससंशोधन म्हणजे साधें तर्कशास्त्र आहे. "

" अगदीं साधें. आपणांस एखाद्या कालाचा इतिहास लिहावयाचा झाला म्हणजे एवढेंच पहावयाचे कीं त्या कालांतील अवशेष आणि लेख काय उरले आहेत, आणि ते गोळा केल्यानंतर त्यांच्यापासून ऐतिहासिक सत्य काढावयाचें. "

" इतिहाससंशोधन म्हणजे जो कांहीं बाऊ बाऊ म्हणून वाटत होता तितकें तें कठिण नाहीं.

" मुळींच नाहीं. अनुभवानें सत्यनिर्णय कसा काढावा या गोष्टी येऊं लागतात. या प्रकारच्या कामास मेहनत मात्र पुष्कळ पडते. बराच अभ्यास करून फार थोडें लिहितां येतें. चांगलें यूरोपीय संशोधक पुष्कळसा अभ्यास केल्याशिवाय विशिष्ट विधान करण्यास धजत नाहींत. "

" मी तर ऐकिलें कीं आपण यूरोपीय संशोधकांच्या लेखांवर विश्वास ठेवीत नाहीं आणि आपण जी अभ्यासपद्धतीसंबंधानें माहिती सांगतां तीवरून इतिहाससंशोधक संशयी का होतो हें कळलें. केवळ इंग्रज ग्रंथकार सांगतो एवढ्यावर आपण अवलंबून राहणार नाहीं असें वाटतें, कां कीं, ग्रंथकारांनीं दिलेली माहिती सर्व दुय्यम प्रतीची आहे. दुय्यम प्रतीच्या माहितीवर आपल्यासारखे संशोधक विश्वास ठेवीत नाहींत. "

" माझी मतें काय असतील तीं आणि माझीं मतें काय असतील या संबंधाची लोकांची जी काय कल्पना असेल ती, यांच्यांत बरीच तफावत असणें शक्य नाहीं काय ?"

" शक्य आहे, आपलीं मतें कांहीं मीं वाचली देखील आहेत, तथापि आपल्या लेखांत व्यक्त न झालेली अशी आपलीं मतें मी बरीच ऐकली आहेत. आतापर्यंत आपला प्रत्यक्ष परिचय नव्हता, आणि त्यामुळें आपण कसे काय गृहस्थ आहांत, आपली मतें काय आहेत इत्यादी गोष्टींविषयीं कर्णोपकर्णी आलेली माहितीच आमच्या कानीं यावयाची."

" तुम्ही कधीं असा अनुभव पाहिला आहे काय, कीं पुष्कळ लोकांना कांहीं एक निरोप दुसऱ्याला सांगायला सांगितला तर तो देखील यथातथ्य सांगता येत नाहीं."

" हो, हें तर मी दररोज पहातेंच."

" यांत जशा चुका होतात, तशाच चुका लेखकांकडून होतात आणि त्यामुळें ऐतिहासिक सत्य बिघडतें. माझ्याविषयीं ज्या गोष्टी आपण ऐकल्या असतील त्याविषयीं आपण असा एक विचार करावा कीं ज्याला झालेली गोष्ट सरळपणानें जशीच्या तशीच सांगता येईल, अशाच मनुष्यांच्या कथन--परंपरेंतून त्या गोष्टी आल्या आहेत काय ?

" तशा परंपरेंतून नाहीं आल्या हें कबूल केलें पाहिजे."

" बरें, एखादा लेख वाचून दोन निराळ्यानिराळ्या मनुष्यांच्या मनांत त्यांच्याकडून वाचण्याच्या दुर्लक्षामुळें निरनिराळ्या प्रकारचे अर्थ त्याच्या मनांत शिरलें असेंहि आपण पाहिलें असेलच."

" हो पाहिलें आहे."

" अशाच चुकांमुळेंहि ऐतिहासिक सत्य बिघडतें. तुम्हांला इतिहासाची गोडी दिसते. तर अभ्यास चालू ठेवा."

इतकें बोलून वैजनाथशास्त्री जावयास निघाला. बायकांना तत्त्वांपेक्षा व्यक्तिविषयक माहिती अधिक हवी असते आणि आमच्या शारदाबाईंना वैजनाथशास्त्र्यापासून एखादें व्याख्यान अगर धडा शिकण्यापेक्षां त्याच्या जीवितक्रमाविषयींच जास्त जिज्ञासा होती व अनायासें आलेली संधि वायां जाऊं द्यावयाची नाहीं, या हेतूनें त्या म्हणाल्या,

" कां हो, वैजनाथशास्त्री, मी आतां आपणांला कांहीं तुमच्या स्वतः संबंधाचे प्रश्न विचारतें, आपण त्यांचीं उत्तरें द्याल कां ? प्रश्न विचारल्याबद्दल राग तर नाहींना येणार ?"

" प्रश्न विचारल्याबद्दल राग येणार नाहीं एवढे आपणांस मी सांगू शकतों, तथापि आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देईनच कीं नाहीं हें मात्र आपणास सांगू शकत नाहीं."

" माझा एक प्रश्न असा कीं, जो मनुष्यप्राणी अत्यंत उच्च दर्जाचा असतो, ज्याचा तो फारच स्वार्थत्यागी म्हणून लोकांची समजूत असते, आणि जो लोककल्याणासाठीं झटतो म्हणून इतर लोक म्हणतात तो खरोखर स्वतःच्या सुखासाठीं झटत असतो कीं लोकांच्या हितासाठीं झटतो ?"

" माझी अशी कल्पना आहे कीं, मनुष्य स्वतःच्या सुखासाठीं झटत असतो. "

" आतां तुम्ही देशाच्या इतिहासासाठीं सर्व सुखांवर पाणी सोडलें म्हणून आपल्याविषयीं सर्व लोक म्हणतात. "

" लोक मूर्ख आहेत, त्यांना काय समजतें, त्यांच्या सुखाच्या कल्पनाच क्षुद्र आहेत. 'गोड खायला आणि मऊ निजायला' याच्या पलीकडे त्यांना कांहीं दिसतच नाही. मी केवळ स्वार्थासाठीं आणि सुखासाठी हपापलेला मनुष्य आहे. "

" तर मग आपण कोणत्या सुखासाठीं धडपडत आहां ? "

" तुम्ही प्रश्न करतां त्यावरून जरा चतुर दिसतां, मग तुम्हांला ह्याच प्रश्नाच्या ठिकाणीं कां अडचण पडली ? तुमची काय कल्पना आहे ? "

" आपण आतांच मला बोध केला नाहीं काय कीं, आपणासंबंधाच्या सामान्यजनांच्या कल्पनांवर विश्वास ठेवूं नये. आपलीं जीं कांहीं मतें असतील, त्यात आणि आपली मतें कशीं असावींत यासंबंधाची इतर लोकांचीं मतें यांत असलेला भेद लक्षांत घ्यावा म्हणून. "

" नेहमींच प्रत्यक्ष प्रमाण सांपडत नाहीं; पण निर्दोष अनुमान देखील करतां येतें. "

" तें कसें ? आणि तुमच्या मनांत काय आहे हें आम्ही निर्दोषपणें कसें ताडावयाचें ? "

" दृश्य आणि निकट असें जें सुख असतें, तें सोडून जरा दूरचें आणि अल्पबुद्धीच्या मनास ज्यांची वांछा होत नाहीं, अशी सुखें कोणतीं आहेत, त्यांचें निरीक्षण करावें आणि त्यांपैकीं प्रत्येक मनांत आणून तें प्रस्तुत मनुष्यास कार्यहेतु आणि आयुष्यहेतु होत असेल काय, याचा विचार करावा. "

" म्हणजे तुम्ही माझ्या बायकी विचारशक्तीस बरीच तालीम देणार. इतका सूक्ष्म विचार पुरुषांच्या मेंदूपेक्षां कमी वजनाच्या बायकांच्या मेंदूस झेंपेल काय ? " शारदाबाई हंसून म्हणाल्या.

" दुसऱ्याच्या मनांत शिरण्याचा कठिण प्रयत्न जर आपण करीत आहांत, तर त्याच्याबद्दल पडणारे श्रम नकोत का करायला ? "

" माझी अशी समजूत आहे कीं हा कष्टमय जीवितक्रम आपण कर्तव्यबुद्धीनेंच घेतला आहे. "

" तुमचें असें म्हणणें आहे काय कीं सर्वसामान्य आणि कायम ठशाची जीं आपणांस भोवतालीं जीवनचरित्रें दिसतात त्यांच्यापेक्षां मी कमी सुखी आहे. "

" नेहमीच्या सुखार्जनाच्या पद्धती सोडून इतर आचरण जो करतो त्यानें स्वतः पत्करलेल्या आयुष्यक्रमापासून सुख होतें याविषयींची खात्री इतरांस करून दिली पाहिजे ? "

" आणि ती काय म्हणून ? "

" स्वतःस लाधलेला सुखाचा मार्ग इतरांस शक्य व्हावा म्हणून. "

" हा उद्योग येथें कुणा लेकाला सांगितला आहे ? जो तो आपल्या मानसिक

स्थितीप्रमाणें आणि प्रवृत्तीप्रमाणें सुखाचा मार्ग स्वतः शोधून काढण्यास समर्थ आहे आणि काढतो."

"तर मग जगांत गुरूंची, मार्गदर्शकांची आणि उपदेशकांची जरूरच नाहीं."

"जरूर जरी असली तरी उपदेश कोणी कोणाला करावा, आपल्या कल्पनांप्रमाणें वागणें शक्य ज्यास होईल असा सांपडला तर त्याला. आपणांस सांगावयाची कांहीं आवश्यकता नाहीं. कारण हा आयुष्यक्रमाचा मार्ग स्त्रीशूद्रांसाठीं नव्हे."

शारदाबाई हंसून म्हणाल्या, "परमार्थसाधनाची जीं तत्त्वें आणि परिभाषा आहे, ती आपण ऐहिक गोष्टींसहि लावतां काय?"

"मला ऐहिक आणि पारमार्थिक गोष्टी भिन्न वाटत नाहींत. राष्ट्राची ऐहिक सुधारणा हाच परमार्थ अशी माझी वृत्ति आहे."

"तर मग आपण कबूल करतां कीं राष्ट्रांची ऐहिक सुधारणा हेंच आपलें ध्येय आहे. राष्ट्रांच्या ऐहिक सुधारणेमध्यें स्त्रीशूद्रांचा कर्तव्यात्मक भाग कांहींच नाहीं! तथापि, स्त्रीशूद्रांस अगम्य अशा जीवनक्रमाचीं रहस्यें तर मग आपण मजसारख्या स्त्रीस सांगतां एकंदरींत?"

"समजतील तर सांगावयास हरकत नाहीं, पण पटतील कां नाहीं हाच प्रश्न. तत्त्वें जरी समजलीं तरी तत्त्वांनुरूप आचरण हें मात्र स्त्रीशूद्रांकरितां खास नाहीं."

"मी तुम्हांला जे प्रश्न विचारतें ते मीं स्वतः तदनुरूप आचरण ठेवण्यासाठीं विचारतें अशातला भाग मुळींच नाहीं. केवळ बायकी कुतूहलवृत्तीनें विचारतें. आतां मी आपणाला आणखी एक प्रश्न विचारतें तो तुम्हां स्वतःसंबंधाचा मुळींच नाहीं. केवळ मानसशास्त्रांतर्गत एक ज्ञेय मला समजावयास पाहिजे म्हणून विचारतें."

"म्हणजे मला मानसशास्त्र कितपत येत आहे, हें पहातां वाटतें? मी आपणांस साफ सांगतों कीं, मला मानसशास्त्र येत नाहीं."

"मी आपणांस विचारणार तो प्रश्न हा की, आजच्या परिस्थितींत अशी कोणती ऐहिक ध्येयें आहेंत कीं, त्यांनीं मनुष्य प्रेरित झाला म्हणजे,

स्नेहं दयां तथा सौख्यं यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकस्य मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

असें निर्भय वृत्तीनें म्हणूं शकेल. लोकांचें आराधन आजच्या दिवसांत करावयाचें तें कोणत्या तऱ्हेने करावयाचें?"

"कां आपण उत्तररामचरित्र वाचलें आहे हें मला दाखवूं इच्छितां वाटतं?"

"शर्थ झाली पुरुषांच्या कुत्सित कल्पनांची. मला असं वाटतं कीं, मला चिरडीवर आणून आपण माझ्या प्रश्नाचें उत्तर द्यायचें टाळूं पाहाता. मी हा श्लोक म्हटला याचें कारण कर्मयोगानें प्रेरित होऊन संन्यासमय वृत्तीच्या बनलेल्या पुरुषाच्या वृत्तीचा निदर्शक दुसरा श्लोकच नाहीं. ज्याला तुम्ही राष्ट्राची ऐहिक सुधारणा म्हणतां, त्यालाच आमचा वऱ्हाडी भवभूति 'आराधनाय लोकस्य' म्हणतो. जानकीत्याग याचा अर्थ आजकालच्या

दिवसांत स्त्रीपाणिग्रहणाशिवाय रहावयाचें एवढाच करावयाचा. ”

“ माझ्या मनांत खोल आणि मलाच गूढ असलेल्या भावनांस कुतूहलमय प्रश्नांचा पंप लावून त्यांचें निरर्थकत्व तुम्ही बाहेर काढणार कीं काय ? ”

“ तुम्ही तर मग असें कबूल करतां कीं, लोककल्याणाचेंच ध्येय आपणांस इतका स्वार्थत्याग करण्यास अगर निराळ्या प्रकारचें सुख अनुभविण्यास प्रेरित करीत आहे, तथापि तें ध्येय आणि तद्विषय भावना आपण गूढ ठेंवू इच्छितां ? ” शारदा पुन्हां हंसून म्हणाली.

“ तुम्ही तर वकिलाप्रमाणें माझी उलट तपासणीच चालविली. नकारामधून कबूलीजबाब शोधून काढण्याचें आपलें कौशल्य विलक्षण आहे. तुम्ही वाटतील तीं अनुमानें काढा, त्यांच्या सत्यत्वाबद्दल मान्यता मी तुम्हांस देणार नाहीं. तीं अनुमानें बरोबर आहेत अगर चुकलीं आहेत हें देखील मी सांगणार नाहीं. ”

“ लोकांनीं आपलें अंतःकरण ओळखूं नये, अशी तरी आकांक्षा आपल्यामध्यें कां असावी ? ”

“ मी साधारणपणें स्वतःविषयीं बोलण्याचें टाळतों, याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे उपदेश करणारी मंडळी बरीचशी दूर ठेवावी, अशी माझी इच्छा आहे. दुसऱ्यानें स्वार्थत्याग करावा, आपल्या बुद्धीचा आणि आयुष्याचा अशा रीतीनें सद्व्यय करावा म्हणून उपदेश करणारी मंडळी बरीच असते. तुम्हांला तरी आमच्या आयुष्याच्या तऱ्हेवाईकपणाची उपयुक्तता कर्तृत्वाच्या मापानें मोजावयाची असेल, नाहीं ? ”

“ मी तुम्हांस जे प्रश्न करते ते उपदेश करण्याच्या हेतूनें करीत नाही, मी विद्यार्थि-बुद्धीनें करीत आहे. ”

“ माझ्या आयुष्यक्रमाचा हेतू समजून घ्यावा म्हणून आजपर्यंत आज आपण केला इतक्या निकराचा प्रयत्नहि कोणी केला नाहीं. आपण स्त्री आहांत म्हणून गोष्ट निराळी झाली, नाहीं तर इतरांस मी याच्या अगोदर केव्हांच हुसकावून लावले असतें. ”

“ एवढंच आपल्या मनांत स्त्रियांविषयीं दाक्षिण्य थोडेबहुत तरी जागृत आहे. शास्त्रीय पद्धतीनें प्रत्येक गोष्टीचा विचार करून आपण अगदीच ‘ वेदाभ्यासजड ’ झाला नाहीं. ”

“ काय माझ्या अंगी स्त्रियांविषयी दाक्षिण्य आहे ? ”

“ कां, जे गुण धैर्यवान मनुष्याच्या हृदयांत स्वाभाविकपणें वास करावयाचे त्याच्याबद्दलहीं आपणांस लाज वाटतें कीं काय ? तुमची अशी समजूत आहे कीं काय, की शास्त्रज्ञानें स्त्रीपुरुषभेद विसरलाच पाहिजे. ”

“ दाक्षिण्य ही गोष्ट वाईट आहे असें मी म्हणत नाहीं. तथापि त्याचें श्रेय मला देणें म्हणजे अवस्वारोप आहे. ”

“ दाक्षिण्य खरेखुरें फारच थोड्या लोकांत सांपडते. सुंदर व तरुण स्त्रियांना उठून खुर्ची देणारे व वृद्ध स्त्रियांकडे दुर्लक्ष करणारे लोक आपल्या समाजांत पुष्कळ आहेत,

पाश्चात्त्यांमधून खोटें दाक्षिण्य आपल्या समाजांत पुष्कळ येऊं पहात आहे. त्या खोट्या दाक्षिण्याचा आरोप मी आपल्यावर करीत नाहीं.

"आपल्या समाजांत स्त्रियांविषयीं खरें दाक्षिण्य आहे अशी आपली समजूत आहे काय ?"

"समजूत आहे काय ? माझी खात्री आहे. दाक्षिण्याचा खरा पाया दुर्बलांविषयीं अनुकंपा हा होय. सौंदर्याविषयीं रसिकता हा नव्हे. खोटें दाक्षिण्य पाश्चात्त्य लोकांत आहे व खरें दाक्षिण्य आपल्या लोकांत आहे.",

"तें कसे काय ?"

"वाहवा ! आपण इतिहाससंशोधक आणि आपण मजसारख्या बाईला प्रश्न विचारावा ?"

"न विचारायला काय झालें. मी या सामाजिक प्रश्नावर फारसा विचारच केलेला नाहीं. आपण जें मत देतां तें आमच्या देशांतील अतिनिंदित पुरुषवर्गास संतोषकारक आहे आणि यामुळें आपल्या मताविषयीं कौतुक वाटतें. तसेंच जी गोष्ट आपणांस ठाऊक नसेल ती दुसऱ्याकडून समजून घेतलीच पाहिजे. पुरुषांचें स्त्रियांशी वर्तन कसें असते ही गोष्ट शिष्ट किंवा अतिशिष्ट मंडळीस पूर्णपणें ओळखणाऱ्या बाईस अधिक समजणार कीं मजसारख्या वनांत हिंडणाऱ्या जंगली ब्राह्मणास अधिक समजणार ?"

"आता हेंच पहा, कांहीं गोष्ट आपल्यास ठाऊक नसली व बायकास ठाऊक असली तर ती बायकांपासून ऐकून घ्यावयास आपण किती तत्परता दाखवितां. "गुणा पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वय" हें आपल्याच परंपरेतलें वाक्य आहे. स्त्रियांचें शिष्यत्व पत्करण्याची देखील आपल्या देशांत तयारी आणि पाश्चात्त्य देशांत, "सूतिका-विज्ञान व रुग्णपरिचर्या" यांसारख्या विषयाची प्रोफेसरी तरी बायकांना कोठें मिळू देतात. गुणी स्त्रियांस तात्पुरतें तरी महत्त्व न देण्यासंबंधानें पाश्चात्त्यांचा केवढा दुराग्रह ! आणि आपल्याकडे चांगदेवासारखे महायोगीदेखील मुक्ताबाईच्या पायां पडले."

आमच्या देशांतील कित्येक लोक यावर असा आक्षेप घेतील कीं, एखाद्या व्यक्तीनें एखाद्या बाईच्या पाया पडणें निराळें आणि सर्व समाजाच्या दृष्टीनें अगर सामाजिक संस्थांमध्यें स्त्रियांस मानाचे स्थान देणें निराळें ?" इतिहाससंशोधकांनीं प्रश्न केला.

"स्त्रियांसंबंधी लोकवृत्ति काय हें पहावयाचें आहे. संस्थांमधून ती लोकवृत्ति उघड दिसो अगर खाजगी दिसो. तथापि संस्थांच्या दृष्टीनें पाहिलें तरी देखील आमच्याकडे दाक्षिण्य हें पूर्णपणें दिसतें."

"तें कसें ?"

"आपल्याकडे अनेक धर्मकर्मं पत्नीशिवाय होत नाहींत; युरोपांत तसें कोठें आहे? आपल्याकडे लग्नाच्या वेळीं बायका पुढें असतात आणि पुरुषांस पाठीमागचें स्थान असतें.

यजमानाला जेवावयास बोलाविलें तर सुवासिनीच्याहि पायां पडावें लागतें. स्त्रियांवर वैधव्य आलें म्हणजे त्यांनीं पवित्राचरणानें रहावें या हेतूनें त्यांस या तऱ्हेने मान देण्याची वहिवाट आहे. इंग्रजांमध्यें बायकांभोवतीं घिरट्या घालणाऱ्या तरुणांस त्या केवळ मौजेचा विषय आहेत. तथापि आपल्याकडे अलीकडे थोडासा फरक होत चालला आहे. विधवास पावित्र्यास्पद समजण्याची प्रवृत्ति कमी करण्यासाठीं त्याचें गंगाभागीरथी हें पूर्वपद काढून घेऊन श्रीमती वापरणें हेंच अलीकडे सभ्यपणाचा भाग झालें आहें."

"वा! आपण पुरुषवर्गाची तरफदारी बरीच करतां."

"निदान या दिवसांत केली पाहिजे. तुमचे दुष्ट, आमचे यूरोपीयन लोक चांगले अशा तऱ्हेच्या गप्पा कित्येक मतलबी इंग्रज मिशनरी पसरवून देत आहेत. त्यांच्या मनांत आमच्या ब्राह्मणांत आणि शूद्रांत वैमनस्य उत्पन्न करावयाचेंच आहे. आणि आमच्या पुरुषांत आणि बायकांत तेढ उत्पन्न करून देऊन आमचे इंग्रज लोक पाठीराखे आहेत ही भावना आमच्या बायकांत उत्पन्न करावयाची आहे. अलीकडे सुधारक म्हणवून घेणाऱ्यांची जी एक अडाणी टोळी उत्पन्न झाली आहे ती देखील त्या त्यांच्या हेतूस मदत करीत आहे."

"आपल्या स्त्रीवर्गाची अनास्था पुरुषांमध्यें नाहीं असें वाटतें काय?"

"आपणांमध्यें पुष्कळशा गोष्टींची अनास्था आहे. तथापि सुदैवानें आपल्या लोकांमध्यें बायकांची अनास्था करण्याचा काळ आला नाहीं आणि नवीन परिस्थितीनें बायकांची स्थिति फारशी सुधारलेली नाहीं."

"काय म्हणता?"

"विधवांच्या पोळपाटलाटण्यावर सुधारक टीका करतात पण पोळपाटलाटण्याऐवजीं विधवा बायकांच्या वांटणीस आज काय आलें आहें? तर आठ-दहा रुपयांची मास्तरकी. त्या मास्तरणीला म्युनिसिपालिटीच्या शाळांत काम करावें लागतें. आणि म्युनिसिपालिटींत मेंबर आणि इन्स्पेक्टर इत्यादि लोकांस खूश करावें लागते. तिला घराबाहेर पडावें लागतें तेव्हां तिच्यावर छत्री, जोडा, शाल आणि जरा अधिक किंमतीचें लुगडें इतका खर्च तिच्यावर पडतो. तर दहाबारा रुपये मिळविणाऱ्या मास्तरणीनें करावें तरी काय? यापेक्षां स्वैपाकिणीची स्थिति किती चांगली. जेव्हां जेव्हां फारच थोड्या पगाराची मास्तरीण मला दृष्टीस पडते तेव्हां पोळपाटलाटण्याकडे पुन्हां वळा असा मी त्यांस उपदेश करते. अहो, एखादी मास्तरीण सुंदर परंतु दरिद्री असली म्हणजे तिला आपल्याकडे आपल्या मुलामुलीस शिकविण्यासाठीं, बोलावण्याकरितां गांवातील वकील अगर म्युनिसिपालिटीचे कित्येक मेंबर कसे टपले असतात म्हणून सांगू. तिला खासगी शिकवणीचें आणखी दहा बारा रुपये मिळण्यासारखे असले म्हणजे आणि घरांत दहा किंवा बारांत खर्च निघत नसला म्हणजे ती शिकवणी घेतलीच पाहिजे असें वाटतें. आणि तिनें ती पत्करली म्हणजे तिचा खर्च आणि पूर्वीची काटकसर करण्याची सवय नाहींशी होते. आणि होईल तितके करून ती शिकवणी कायम ठेवली पाहिजे, असें तिला वाटू लागतें. मधून मधून त्या

वकिलाच्या घरींच जेवण्यास आमंत्रण येतें आणि पुढें जें व्हावयाचें असतें तें होतें."

"आपल्याकडील दाक्षिण्य कमी झालें आहे काय?"

"फारसें अजून नाहीं. झालें आहे तें सुशिक्षित वर्गामध्यें कमी झालें आहे. आपल्याकडे स्वतःचें लग्न लांबणीवर टाकून अगोदर बहिणीचें लग्न करून द्यावयाचें ही वृत्ति आहे. तसा प्रकार युरोपांत आहे काय?"

"आमचा पुरुषवर्ग फार चांगला आहे असें मला पूर्वीपासून जें वाटत होतें, तें मत आज अधिक दृढ झालें. माझ्या कल्पनेला दुजोरा देणारी बाई एक तरी स्त्रीवर्गांत निघाली हें पाहून मला आनंद होतो."

"हां, थांबा! इतक्यांतच आपली पाठ थोपटून घेऊं नका."

"आतां काय आपण आमच्या पुरुषवर्गावरच उलटणार वाटतं?"

"होय, तुम्हांला एक दुसरी बाजू दिसली पाहिजे."

"ती कोणती?"

"स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांचें वर्तन कसें असावें याचा विचार केला असतां पुष्कळच सुधारणेस जागा आहे. प्रथमतः नीतिमत्ता; पुरुषांच्या मनांत स्त्रियांविषयीं जितका आदर असावयास पाहिजे तितका नाहीं. प्राचीन उच्च ध्येयें आमचे पुरुष विसरत चालले आहेत. जितके पुरुष अधिक नीतिमान् होतील, तितके त्यांचें गृहसौख्य वाढेल. पुरुषांनीं स्वतःच्या सौख्याच्या दृष्टीनें जरी विचार केला, तरी त्याबरोबर स्त्रियांची स्थिति सुधारेल. पण स्वतःच्या सुखासंबंधानें तरी उच्च कल्पना आपल्या पुरुषामध्यें कोठें आहेत? स्त्रियांस शिक्षण द्या म्हणून पुरुष म्हणतात. पण पुरुषांमध्यें शिक्षण चांगलें कोठें आहे? आमचे वडील मीमांसक होते, त्यांच्याइतकी सूक्ष्म विचारपद्धति ज्यांमध्यें आहे, असा आजकालच्या वकीलांत एकहि दिसत नाहीं. 'काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्' हें वाक्य आजकालच्या सुशिक्षित पुरुषांसंबंधानें कोठें खरें आहे? आपण शिकलेले आहों व श्रेष्ठ आहों, असा वृथा गर्व मात्र चोहोंकडे दिसून येतो. पुरुष स्वतःचें आचरण जेवढें चांगल्या तऱ्हेनें ठेवतील आणि स्वतःच्या उन्नतीकरितां जितके झटतील तितकी बायकांचीहि उन्नति करून देतील. आजकालच्या दुर्बल आणि दरिद्री मध्यमवर्गातील हिंदू आपले असे कोणते हक्क बायकांस देणार? पुरुषांनीं स्वतः तेजस्वी व पराक्रमी व्हावें म्हणजे ते आपल्याबरोबर आम्हां बायकांचेहि भवितव्य सुधारतील. बरें तें सर्व राहूं द्या. तुमच्या आयुष्याला स्फूर्तिदायक किंवा कार्यप्रवर्तक असें काय आहे या प्रश्नाला आपलें उत्तर यायचें राहिलेंच.'

"पण काय हो, तुम्ही-तुम्ही आपलं नांव तर सांगितलंच नाहीं. माझं नांव मात्र विचारून घेतलं आणि आमच्या आयुष्याचं ध्येय शोधीत बसतां?"

"यःकश्चित् स्त्रीवर्गातील एका व्यक्तीचें नांव विचारून घेण्याची आपणांला तरी कोठें पर्वा होती. सध्यांच्या बायकांपैकीं एखादीचं नाव समजण्यापेक्षां धोंड्यावर शेकडों वर्षांपूर्वी खोदलेले नांव वाचूनच आपणांस अधिक आल्हाद होत असेल नाही?"

वैजनाथशास्त्री हंसून म्हणाले, "केवळ बायकांचींच नांवें समजलीं नाहींत तर चालेल असें नाहीं, आजकालच्या बहुतेक पुरुषांची देखील नांवें समजण्यापेक्षां शिलालेखांतील एखादें नांव उकललें तर आनंद होईल. शिवाय ज्या लोकांचीं नांवें समजण्यांत फायदा नाहीं, त्या वर्गांत महाराष्ट्रांतील एकूण एक बायका येतात, असेंहि नाहीं."

"महाराष्ट्रांत ज्या बायकांचें नाव समजले अगर ओळख झाली तर आपणांस आनंद होईल, अशा बायका आहेत तर ?"

"परिचिताचें नांव तरी समजण्याची इच्छा आणि तें समजलें असतां आनंद होणेहि स्वाभाविकच आहे. संभाषणप्रसंग ज्यांच्याशीं आला अशा स्त्रिया वगळल्या असतां उरलेल्या बायकांत अमुक एक बाईचें नांव समजल्यामुळें अगर तिच्याशीं ओळख झाल्यानें आनंद होईल, अशा बायका आहेतच असें मी जरी विचार केल्याशिवाय म्हणणार नाहीं, तरी तशी असणें शक्य आहे, हें मीं म्हणतों."

"बायकांवर मोठी मेहेरबानी झाली म्हणायची !" शारदाबाई हंसून बोलल्या,

"बरं आपलं नाव काय ? ते कांहीं तर्कानें काढणें कठिण नाहीं म्हणा ! आपल्याकडे कॉलेजांत शिक्षण मिळविणाऱ्या स्त्रियांची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. तीन चार डॉक्टरणी, आठ दहा बी. ए. च्या बाजूचें शिक्षण घेणाऱ्या इतक्याच आहेत. त्यांतील परभू, शेणवी आणि ब्राह्मण कुमारिका अगर सुवासिनी वगळल्या तर एकदोघी जणींच रहातील, त्यांतल्यात्यांत शारदाबाई सोमण या एवढ्याच मुंबई इलाख्याचे बाहेर, तर आपण त्याच असाल, किंवा मी चुकतही असेन, कारण त्या शारदाबाई पुरुषवर्गावर फार ताशेरा झाडणाऱ्या, क्रूर, अरसिक, कठोर आणि चष्मा घालणाऱ्या असाव्यात, आणि आपण तशा दिसत नाहीं."

"वाहवा इतिहासकार ! आपल्यासारखे विद्वान कोठें घसरतात हें कळलें. पुरुषवर्गावर घसरणें आणि चष्मा घालणें या दोहोंमध्यें संबंध काय ?"

"संबंध बराच आहे. जननेंद्रियशास्त्रांतर्गत जें मानसशास्त्र आहे, त्याचा सिद्धांत असा आहे कीं, लेखकांची आणि वक्त्यांची भाषा क्रूर आणि कठोर असली तर त्यांची इंद्रियविषयक उपासमार होते असें समजावें. ज्यांची इंद्रियविषयक उपासमार होते त्यांच्या बाहेरील खुणा म्हटल्या म्हणजे कावरीबावरी, अगर क्रूर अशी मुद्रा, विड्या ओढणें, तपकीर ओढणें इत्यादि संवयी, या होत. ही उपासमार फार झाली म्हणजे निदान अरसिकता उत्पन्न होते आणि स्वतःची मुद्रा देखील त्यांस आनंदी असण्यापेक्षां गंभीर झालेली बरी वाटते पण तें साधत नाहीं आणि असतुष्टपणा म्हणजे असंतुष्टता हृदयांत असली म्हणजे तिचा चेहऱ्यावर परिणाम होऊन गंभीरपणाच्या ऐवजीं भेसूरपणा मात्र उत्पन्न होतो. वेळ घालविण्यास दुसरे उपाय नसले म्हणजे तंबाखू आणि तपकीर यांच्या संवयी लागतात. मनांत इंद्रियविषयक उपासमारीनें आणि अनेक प्रकारच्या निराशांनीं उत्पन्न झालेला संताप मी कोणावर काढूं असें होतें. पुष्कळ अविवाहित स्त्रियांची पौरुषात्मक जोरदार भाषा याच गुणामुळें उत्पन्न होते. ॲनिबिझांट, सिस्टर निवेदिता,

पंडिता रमाबाई इत्यादिकांच्या भाषांमध्यें जो जोरदारपणा उत्पन्न होतो त्यास भौतिक कारणें हींच असावींत असें वाटतें.

"वाहवा! बरीच आहे आपली विचारमालिका! जननेंद्रियशास्त्रांतर्गत मानसशास्त्र बरेंच मौजेचें दिसतें! मी या शास्त्रावर कांहीं पुस्तकें वाचावीं अशी इच्छा एकदां आमच्या परिचयाच्या एका इंग्रज डॉक्टरिणीस व्यक्त केली तेव्हां तिनें काय भयंकर मुद्रा केली!"

"अहो, इंग्रज लोकांत आणि त्यांच्या संसर्गानें आपल्या पुरुषांत देखील एक तऱ्हेचा वेडगळ सोंवळेंपणा आहे. शास्त्रीय विषयावरचें पुस्तक वाचायला त्यांना आडकाठी होईल तथापि त्यांना विषयवासनासूचक कादंबऱ्या आणि नाटकें वाचण्यास आणि पोषाख, करण्यास बिलकूल हरकत वाटत नाहीं."

"पण आपण चष्मा कोठून काढलात?"

"पुष्कळदां पाश्चात्य देशांत आणि आपल्याहि देशांत कांहीं अविवाहित स्त्रिया अगर लग्नास तयार परंतु अविवाहित अशा विधवा यांचा अविवाहितपणा शरीरवैगुण्यामुळें येतो, आणि दुखरे डोळे हे त्यांपैकी वैगुण्य असतें. शिवाय ज्या बायकांच्या चवी गंभीर बनतात, त्यांना चष्मा घालणें वाईट वाटत नाहीं, उलटें चांगलेंच वाटतें आणि त्यांचे डोळे दुखरे असल्यास त्यांना चष्मा लागतो."

बरें इतिहासकार, आपल्या कल्पना बऱ्याच मौजेच्या आहेत. जोंपर्यंत दृश्य प्रमाणाच्या अनुरोधानें आपण चालला होता तोंपर्यंत सत्याजवळ जवळ येत होता. पण जेव्हां आपण त्या मानसशास्त्राच्या सिद्धांतांच्या साहाय्यानें निर्णय करावयास लागला तेव्हां मात्र घसरलां. कारण शारदाबाई सोमण ती मीच."

"असं काय? बाकी तुम्ही जशा असाल म्हणून वाटलें त्यापेक्षां बऱ्याच निराळ्या दिसता."

"याचें कारण मला असं वाटतं की तुम्ही माझे लेख वगैरे वाचले असतील, त्यावरून माझ्या स्वभावाचें एक लहान अंग काय ते आपणांस कळलें असेल. पण आपल्याविषयीं काय वाटतें तें मात्र मी सांगतें."

"आणि तें काय?"

"बोधरसातें पिऊनी मस्तपणानेंच राहतो विजनीं।
तो हा सद्गुरुराजा स्वच्छंदें क्रीडतो सदा स्वजनीं॥

हें बयाबाई रामदासाविषयीं म्हणत होती तेंच मी आपल्याविषयीं म्हणत होतें आणि म्हणेन."

"झालें तर मग, आमच्या आयुष्याचा हेतु तरी आपणांस आणखी काय समजावयाचा आहे?"

"पुष्कळ गोष्टी अजून गूढ आहेत."

"त्या कोणत्या?"

"ज्ञानाची तहान भागवितांना जें सुख आपणांस प्राप्त होतें तें इतकें मोठे आहे काय

कीं, त्या सुखापुढें आपणांस होणारे हे शारीरिक क्लेश विदेही जनकाप्रमाणें आपणांस तुच्छ वाटतात ? केवळ ऐतिहासिक वस्तूंसारख्या नाशिवंत गोष्टींची ज्ञानप्राप्ति आपणांस दारिद्र्य व एकाकित्व यांपासून उत्पन्न होणाऱ्या अनेक दुःखांशीं झगडण्यास समर्थ करिते काय ? ”

“ आपणांस त्या कल्पनेच्या ग्राहकतेविषयीं संदेह कां पडावा ? ”

“ संदेह पडण्याचें कारण एवढेंच कीं दुःखाशी झगडण्यास केवळ जिज्ञासा उपयोगी पडणार नाहीं, आणि अत्यंत उच्च ध्येयांशिवाय जिज्ञासाहि प्रज्वलित होणार नाही. ”

“ नसेल कदाचित. ”

“ अहो महाराज, मी मघांपासून जो प्रश्न विचारीत आहे, त्या प्रश्नाची टाळाटाळी आपण करू नका. मी आपणांस हा जो प्रश्न विचारीत आहे तो सहेतुक आहे. ज्ञानप्राप्तीनें लोककल्याण होईल ही आपली भावना आहे, असें मला उघड दिसतें आणि आपण जें कार्य करूं त्याचें राष्ट्राला आज जरी महत्त्व नसलें तरी तें कर्तव्य आहे म्हणून केलें पाहिजे ही भावना देखील मनांत जागृत असेल. पण महाराज ‘ लोककल्याण ’ म्हणजे काय हें देखील मला समजेनासें झालें आहे ? आणि त्यामुळें माझें मन घोटाळत आहे. महाराज, या शारदेस आपण केवळ स्त्री म्हणून तुच्छ मानू नका. ही शारदा-देखील इतर स्त्रियांपेक्षा निराळी आहे. ध्येयाच्या मागें लागून त्याच्यासाठीं पाहिजे तिकडे वहावत जाणारे आणि जगाकडून त्यामुळें वेडेपीर म्हणवून घेणारे लोक आहेत त्यांतली ही आहे आणि त्यामुळें मी मृगजळाच्या पाठीमागें तर धांवत नाहीं ना ? असा मलाच संदेह उत्पन्न होत आहे. स्वतःच्या विचारांत संदेह उत्पन्न झाला तर कोणाकडे जावें ? कोणी सहव्यवसायी असेल त्याच्याकडे जावें असें वाटलें. आपणांस ठाऊक नसेल तथापि आपली अज्ञातवासांत असलेली मी शिष्या आहे. गुरुंस जो शिष्य ठाऊक नाहीं, अगर गुरुनें ज्याचा स्वीकार केला नाहीं अशा मनुष्यास धिःक्कार करणाऱ्या गुरुस देखील गुरु मानून रहाण्याचा अधिकार महाभारतकारांनी एकलव्याच्या कथेंत दिला आहे. मघाशीच बयाबाईची जी आर्या आपणांस म्हणून दाखविली, ती आर्या मी आज बरींच वर्षें आपल्या मनाशीं म्हणत आहे. मला असें वाटतें कीं, माझ्या मनांतील विकल्प काढून टाकून आपण माझ्या आयुष्यास हेतु उत्पन्न करून द्याल. देशकल्याण म्हणजे काय हेंच मला कळेनासें झालें आहे. आपल्या देशांतील अनेक चळवळी घेतल्या तरी त्या सर्व मला फोल दिसूं लागल्या आहेत. कॉंग्रेस घ्या, अगर सामाजिक सुधारणा घ्या अगर दुसऱ्या कोणत्याहि प्रागतिक चळवळी घ्या. केवळ जुन्या गोष्टींचा संहार करण्यापलिकडे त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं तर केवळ नाशकारक गोष्टींकडेच आपण आपली शक्ती खर्च करावयाची काय ? उत्क्रांतिवाद उर्फ विकासवाद घ्या, त्यांचें तत्त्वज्ञान वाचलें तरी काय हातीं येतें ? अवयवी म्हणून ज्या ज्या वतू आहेत त्या निरवयव स्थितींतील जीवांपासून अगर वस्तूपासून अल्पसंक्रमणाच्या साहाय्यानें हळूहळू तयार होत जातात, असें हें स्पेन्सरीय मत सांगतें तेच सिद्धांत ते समाजास लावतात. समाज हा अल्पवयी

आहे असें म्हणतात. समाजशास्त्रवेत्ते म्हणतात कीं, समाजाची उत्क्रांति होत असतांना त्या उत्क्रांतीस जोरानें चालना देणें हें समाजशास्त्रयुक्त कार्याचें ध्येय आहे. अर्थात् देशाभिमानानें जें कार्य व्हावयाचें तें समाजाची उत्क्रांति अधिक होण्यासाठींच होय. तर मग महाराज आपल्या समाजाची उत्क्रांति कोणत्या दिशेनें होणार ? अर्थात् ज्या दिशेनें तो विकास होणार आहे ती दिशा ओळखून त्या विकासांतील कांहीं तरी कार्य साधल्यानेंच लोककल्याण होणार आहे. तर मग महाराज मी आपणांस असें विचारतें की पुढें समाज कसा होणार आहे, व त्यासाठीं आज काय करावें, आपण आपल्या आयुष्याचा सद्व्यय कसा करावा. आणखी हेंहि सांगा कीं, केवळ नाशिवंत आणि ऐहिक सुखें भोगण्यापलीकडे आपणांस कांहीं कर्तव्य आहे कीं नाहीं. अगर अत्यंत सामान्य प्रतीचें अगर अत्यंत कनिष्ठ प्रकारचें जें दान म्हणजे आपल्याजवळ जें असेल तें दुसऱ्यास देणें—या पलीकडे उच्च मनोविकारास कांहीं कर्तव्यक्षेत्र आहे कीं नाहीं ? स्पष्टवक्ते म्हणून आपली ख्याति चोहोंकडे आहे त्या अर्थी आपण जें कांहीं खरें खरें असेल तेंच सांगाल अशी माझी खात्री आहे."

शारदेचे हे उद्गार वैजनाथशास्त्री शांत चित्तानें आणि कांहीं अंशी समाधानवृत्तीनें ऐकत होता. शारदेच्या मुखांतून हे उद्गार निघाले ते सद्गदित कंठानें निघाले. त्यांत पराभवाच्या अनुभवाची छटा दिसत होती. केवळ आपण आपल्या चौकसपणानें स्वतःच्या हृदयाचा पत्ता वैजनाथशास्त्र्यास लागूं न देतां त्याच्या हृदयांत काय आहे हें काढून घेण्यासाठीं जो आपण प्रयत्न केला तो निष्फळ झाला, आतां आपलें हृदय उघडें करून त्याच्यापाशीं गेलें पाहिजे असेंच तिला वाटूं लागलें. डोळ्यांतून आंसवें निघण्याचीहि वेळ आली होती. शारदेचें बोलणें ऐकून वैजनाथशास्त्री आपली गंभीरवृत्ति कायम ठेवून म्हणाला, "शारदे, आतां मला तुझी ओळख पटली. आणि मला मघांपासून तूं जे प्रश्न विचारीत होतीस त्यांचा रोंखहि समजला. आतांपर्यंत जर मला कोणी म्हटलें असतें कीं आपल्या राष्ट्राचें आणि समाजाचें भवितव्य काय ? या विषयींच्या संदेहामुळें ज्या स्त्रीला आयुष्यहेतु उत्पन्न झाला नाहीं अशी एक तरी स्त्री आजच्या महाराष्ट्रांत आहे तर तें खरें देखील वाटलें नसतें. तुझ्या प्रश्नास उत्तर आहे. आजच्या स्थितींत देखील कार्य करण्यास मनुष्यास उत्साह देतील अशी कार्यें आहेत तीं प्रगतीचीच द्योतक आहेत. पण तीं कोणाहि करारी पुरुषाच्या आयुष्यांत हेतु उत्पन्न करून देतात कीं नाहीं हें मला निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. पण शारदे, अशी कल्पना कर कीं तीं कार्यें पुरुषांच्याच हातून होण्यासारखीं असती तर तूं तरी काय करणार ?"

"कोणतेंहि कार्य असें आहे काय कीं जें पुरुषाच्या आयुष्यास हेतु उत्पन्न करतें पण स्त्रियांच्या आयुष्यास करीत नाहीं ? स्त्रियांस शारीरिक दुर्बलतेमुळें अनेक गोष्टी स्वतः करितां येणार नाहींत हें खरें. तथापि त्या कार्यांत साहाय्य तर करतां येईल ना ? स्त्रियांस लढणें शक्य नसलें तर शिपायांचे कपडे शिवून देण्याचें काम तरी त्यांस करतां येईल ना ? काम कितीही हलके असो त्याच्या योगानें आयुष्यास हेतु उत्पन्न झाला पाहिजे. आतां

हें पहा कीं मी सध्यां शिक्षकिणीचें काम करीत आहे. हें काम जर कोणत्यातरी ध्येयाच्या साधनेसाठीं आहे अशी जर माझी खात्री असती तर हेंच काम मी किती अत्यंत उत्साहानें केलें असतें ? आतां सध्यां केवळ चरितार्थसाधन म्हणून आणि त्याच्या योगानें कांहीं तरी देशहित आणि तें कसें तरी होत असेल अशी कल्पना करून करीत आहे. पण माझ्या कामापासून होणाऱ्या परिणामांची मला इतकी अंधुक कल्पना आहे कीं तिच्या योगानें कार्यपरत्वाचें वारें शिरत नाहीं.

"जें कांहीं कार्य करावयाचें तें शोधण्यासाठीं आणि उत्साहानें त्याकडे लागण्यासाठीं प्रवृत्त करणारें ज्ञान तुम्हांस पाहिजे ?"

"होय."

"आणि कार्यध्येय आपणांस समजलें आणि त्या ध्येयाच्या पूर्तीसाठीं अनेक कार्यें करावयाचीं असलीं तर त्या कार्यांत स्त्रियांनीं कोणतीं कामें करावयाचीं हाच तुमचा प्रश्न आहे काय ?"

"होय, हाच माझा आपणांस प्रश्न आहे, भावी कार्यक्रमांत स्त्रियांकडून कोणतें कार्य होण्यासारखें आहे हें मला समजावून पाहिजे."

ज्याच्या चित्तांत मार्दव आहे असा संशय त्यास स्वतःलाच आला असतां स्वतःवरच रागावणारा, स्त्रियांविषयीं दाक्षिण्य आहे असें त्यास कोणी दाखवून दिलें तर जणूं काय त्यानें आपला मोठा अपराधच केला आहे अशी मनाची समजूत करून घेणारा, आणि पारदकणाप्रमाणें आपण आर्द्रतेच्या विकारापासून अत्यंत अलिप्त आहों असें समजणारा, तो मनुष्यरूपी जड पदार्थाचा गोळा, अगर प्रखरता, अगर तेजस्विता, सर्वग्राहकता, भयदायकता या बाबतींत साक्षात वैश्वानराची बरोबरी करणारा असा अरसिक वैजनाथशास्त्री शारदेच्या या प्रकारच्या भाषणांनीं अगदीं विचारग्रस्त झाला. शारदाबाईच्या प्रश्नाचें उत्तर देणें वैजनाथशास्त्र्यासहि सोपें नव्हतें. आणि त्यानें त्या भग्न देवालयाच्या पायठणीवर बसून विचार करण्यासाठीं डोळे मिटले. शारदा त्याच्याकडेच पहात होती. बोलतां बोलतां संध्याकाळ झाली.

[ विद्यासेवक-वर्ष २ अंक ४ पृ. ६१-७२ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९७१
ग्रं. क्र. २३८१७
निबंध रत्नाकर
मुं. शाखा (स्थळ प्रत)

# ८. वैजनाथशास्त्र्यांचा पहिला डोस

टेंकडीच्या अर्ध्या उंचीवर जाऊन वैजनाथशास्त्री चोहोंकडे पाहूं लागले व अप्पासाहेबांस म्हणाले. " तुमचा प्रश्न काय आहे ? "

" जातिभेद मोडूं इच्छिणाऱ्या लोकांची सामाजिक निकृष्टता हेंच भवितव्य आहे काय ? हा माझ्यापुढील प्रश्न आहे. " अप्पासाहेब उत्तरले.

" तें त्या वर्गाच्या उच्चस्थान–साधनेसंबंधाच्या प्रयत्नावर आहे. समाजाचा जो ठराविक कायदा आहे तो कायदा मोडण्याच्या भानगडींत जो पडेल त्याचें भवितव्य भर्तृहरीनें पूर्वीच सांगितलें आहे.

कुसुमस्तबकस्येव द्वयीवृत्तिर्मनस्विनाम्
मूर्ध्नि वा सर्वलोकस्य विशीर्येत वनेऽथवा ।

जे लोक जातिभेद मोडूं इच्छितात ते विनाकारण मोडूं इच्छीत नाहींत. त्यांना कोणता तरी एक नवीन वर्ग स्थापन करावयाचा असतो. विशिष्ट वर्ग तयार करण्याच्या उद्दिष्टाशिवाय जातिभेद मोडा, जातिभेद मोडा, हे सांगणारी चळवळ विधायक मुळींच नाहीं; ती केवळ विघातक आहे. जे लोक निश्चित संघस्थापनेचा विधायक कार्यक्रम आपल्यापुढें ठेवणार नाहींत त्यांच्या आयुष्यास दिशाच लागणार नाहीं. जातिभेद मोडूं इच्छिणारे लोक सामाजिक दुर्गतीस पोंचणार हें जें भय तुम्हीं सांगितलें तें खरेंखुरें आहे. समाजांतील सर्व जातींपेक्षां आणि वर्गापेक्षां श्रेष्ठ अशी जात स्थापन करण्याचें ध्येय नसलें म्हणजे मिश्रविवाहाची संतति विदूर, अकरमासे किंवा कडू मराठे यांच्यामध्येंच समाविष्ट होत जाणार; पण कांहीं महत्कार्यसाधनेची दृष्टि जातिभेद मोडूं पहाणाऱ्या लोकांपुढें राहिली तर मात्र त्या वर्गास ' मूर्ध्नि सर्वलोकस्य ' हें भवितव्य आहे. "

" पण समाजांतील सर्व जातींपेक्षां श्रेष्ठ अशी जात निर्माण तरी कशी करावयाची ? "

" हें जो जाणील तो जगांतील एक महापुरुष होईल. "

" म्हणजे तें तुम्हांला ठाऊक नाहीं काय ? "

" आज माझ्या मनांत अंधुक कल्पना आहेत; केव्हां तरी त्यांना निश्चित स्वरूप लौकरच येईल. "

" जातिभेद मोडण्याचा विचार तत्त्वतः चूक आहे काय ? " असें अप्पासाहेबांनीं विचारलें. तेव्हां वैजनाथशास्त्री यांनीं अप्पासाहेबांस सांगितलें कीं, " जातिभेद मोडण्याचें ध्येय चुकीचें मुळींच नाहीं. प्राचीन काळापासून ऋषींचें तेंच ध्येय होतें. ब्राह्मण जात जी तयार झाली ती सर्व जातींना उच्चवर्गीयांमध्यें स्थान मिळावें एवढ्यासाठींच तयार झाली आणि अत्युच्च विद्येचें संरक्षण आणि विकास हीं होण्यासाठींच तयार झाली. नाहीं तर

जुनी भिक्षुकी जातच देशांत असती तर जातीचें नांव अजून अथरवा किंवा अथर्वा या प्रकारचेंच राहिलें असतें. जातिभेद मोडावा हें ध्येय ठेवून जातिभेद कधींच मोडत नाहीं. समाजाच्या अत्यंत श्रेष्ठ प्रकारच्या सेवेचें काम जे लोक घेतात, त्यांना जातिनियमानें बद्ध ठेवणें कधींच उपयुक्त होणार नाहीं; हें प्राचीनानें ओळखलें होतें व अशा उच्चवर्गानें आपल्यांत नवा घेण्याचें स्वातंत्र्य आपणांस ठेवलें होतें."

"ध्येयवादी मंडळीच जातिभेद आपल्यापुरता आपल्या कार्यासाठीं मोडतात, असें आपलें म्हणणें आहे काय?"

"होय, अगदीं तसेंच."

"ज्याच्यापुढें मोठें ध्येय नाहीं, त्याला जातिभेद मोडण्याची आवश्यकताहि नाहीं."

"सध्यां जातिभेद नको म्हणणाऱ्या मंडळीपुढें ध्येय नाहीं काय?"

"अगदींच नाहीं असें नाहीं. आहे तें दुर्बल आहे. ज्याची इतिकर्तव्यता केवळ पोट भरण्याची व दोन पैसे मिळविण्याची आहे, त्याला जातिभेद असला काय कीं नसला काय, सारखाच. तो कशाला संशयित प्रकारच्या लग्नाच्या भानगडींत पडेल? त्याला जातीविरुद्ध स्वातंत्र्यहि नको आहे. जातिभेद नको कोणाला वाटतो तर ज्याचें त्यापासून कांहीं नुकसान होत असेल त्यांनाच. विशेषेंकरून ज्यांना आपल्याला वरच्या प्रकारचे जामात हवे असें वाटत असतें आणि तसल्या प्रकारचे जामात जातींत सांपडत नाहींत त्यांनाच जातिभेद मोडावासा वाटतो असें आपण स्पष्ट समजलें पाहिजे. हा त्यांचा प्रयत्न जातिभेद मोडण्यासाठीं नसून 'बडे नोकर' जात तयार करण्यासाठीं आणि तींतील पोटजाति मोडण्यासाठीं आहे; पण हें ध्येय सर्व राष्ट्रभर पसरणार नाहीं आणि त्यामुळें या कार्याला फारसें यश आलें नाहीं.

"लोकांना यश कां आलें नाहीं; यावर मला भाष्य नको आहे. राज्य गेलें म्हणजे तें कशानें गेलें यावर शेकडों भाष्यें आहेत आणि प्रत्येक भाष्यकार आपलेंच मत खरें म्हणून म्हणणारा आहे."

"तर मग तुम्हांस काय पाहिजे?"

"जातिभेद मोडण्यासाठीं यशस्वी प्रयत्न करणें शक्य आहे काय?" हें मला समजलें पाहिजे.

"प्रत्येक काळांत जुन्या जाती मोडून नव्या जाती तयार होण्याची क्रिया चाललीच आहे; तर जातिभेद दुर्लक्षिणारी आणखी एक जात तयार करावयास आपणास पाहिजे काय?"

"मला तेवढेंच नको आहे. जातिभेद मोडणाऱ्या लोकांची जर जात बनलीच तर ती समाजांत प्रतिष्ठितपणा पावली पाहिजे."

"पण अशा तऱ्हेचा आग्रह धरणारा मनुष्य स्वतःच्या मनाचा खंबीर लागतो. तुम्ही तसे खंबीर नाहीं."

"काय, माझ्या मनाच्या खंबीरपणाविषयीं तुम्ही संशय व्यक्त करतां?"

" अर्थात् करतों. "

" तो कां बरें ? "

" तुमच्या कर्मामुळें जें क्रमप्राप्त झालें त्याचा तुम्ही तिरस्कार करता. "

" तो कसा ? " अप्पांनीं विचारलें.

" तुम्ही आपल्या मुलीचें नांव देखील कां सोडून दिलें आहे ? "

" तिनें जर सुशिक्षित कुमारीच्या नांवाला बट्टा आणणारें कर्म केलें तर त्याची काय प्रशंसा करावयाची ? "

" तिनें काय गैर केलें ? "

" आपणांसारखी मंडळी तिच्या कर्माला काय म्हणतील ? "

" मी तर विशेष गैर म्हणत नाहीं. "

" म्हणजे. "

" पुरुषाच्या सत्तेखालीं पूर्णपणें गेल्याशिवाय पुरुषसायुज्याचा आणि मातृत्वाचा हक्क तिनें प्रस्थापित केला आहे, दुसरें काय केलें ? "

" स्त्रियांनीं अविवाहित असता मातृत्व पत्करणें ही गोष्ट चांगली आहे काय ? "

" ती गैर कां बरें ? समाजांत चालू असलेल्या रीतीच्या विरुद्ध आहे एवढेंच मी म्हणतों. "

" कां बरें ? "

" स्त्रियांसंबंधी जे कायदे किंवा नीतिनियम झाले ते मध्यमवर्गाने किंवा उच्च वर्गानें तयार केले आहेत. या वर्गांत पुरुष बायकांना आणि त्यांच्या अपत्यांना पोसतो म्हणून त्यांनीं बायकांना आपलें अंकित केलें आहे, पण आर्थिक दृष्ट्या स्त्री जेव्हां स्वतंत्र असते तेव्हां तिला कोणते नियम लागू असावेत याविषयीं जगानें अजून विचारच केला नाहीं, तो जगानें करावयास पाहिजे. तुमच्या मुलीलाच आपल्या वागण्याचें रहस्य तुम्हीं विचारलें काय ? "

" नाहीं. "

" म्हणजे, तुम्ही तिचें म्हणणें ऐकल्याखेरीज तिला वाईट ठरवितां ! "

" तुमचें म्हणणें काय आहे ? "

" तुम्हांला जगापेक्षां आपलें श्रेष्ठत्व सांगणारी ज्ञाति तयार करावयाची असेल, तर त्या ज्ञातीच्या स्थापनेसाठीं त्याबरोबर निराळे नीतिशास्त्र आणि निराळे सामाजिक ध्येय पाहिजे. तुम्हीं काय केलें आणि तुमच्या मुलीनें काय केलें याचें शास्त्रीय स्वरूप तुमच्या लक्षांत आलें नाहीं. तुमची सासू मास्तरीण म्हणजे स्वावलंबी स्त्री होती. तिनें नवरा नाकारला आणि लग्नाशिवाय प्रजोत्पत्ति केली. हें तिनें जें केलें तें गैर केलें असें तुम्ही समजतां, आणि तिच्या मुलीशीं आपण लग्न केलें व त्यांत आपण मोठें औदार्य दाखविलें असें तुम्ही समजतां, आणि तुमची मुलगी लग्नाशिवाय एका मनुष्यापाशीं राहिली हें तुम्ही गैर समजतां. हें सर्व तुमचें वागणें जुन्या कल्पनांचें द्योतक आहे. तुमच्या सासेनेंसू

आणि मुलीनें कांहीं एक गैर केलें नाहीं. त्यांच्या आयुष्याचें रहस्य तुम्हांला समजलें नाहीं एवढेंच."

"आणि तें तुम्हांला समजलें ?"

"होय."

"तें कसें ?"

"तुमच्या सासूनें मातृसत्ताक कुटुंब स्थापन केलें, पण त्या कुटुंबांतील एका मुलीनें वांकडें वळून पुन्हां पितृसत्ताक कुटुंबात आपला प्रवेश करून घेतला, आणि तुमची मुलगी पुन्हां मातृसत्ताक कुटुंबस्थापनेकडे वळली."

"हें तुमचें अगडबंब संज्ञांचे पांडित्य झालें. तुमच्या या पांडित्याप्रमाणें प्रत्येक नायकीण दुराचारी स्त्री नाहीं, तर ती केवळ मातृसत्ताक कुटुंब स्थापन करणारी आहे."

"अर्थात् ती दुराचारी नाहीं. जेव्हां स्त्रियांना आर्थिक स्वायत्तता उत्पन्न होते तेव्हां पुरुषांनीं लादलेलीं बंधनें मुळींच टिकावयाचीं नाहींत. नर्तिकेस नीतिनियम कोणते लावावेत याविषयीं पुन्हां विचार हवा. आर्थिक स्वायत्तता असलेल्या स्त्रियांना पतिसेवेचा धर्म मुळींच चालत नाहीं. त्यांच्यावर पतीची हुकमत चालत नाहीं, त्यामुळें स्वतंत्र उपजीविका करणाऱ्या स्त्रियांसाठीं निराळा कौटुंबिक धर्म पाहिजे. आपल्याकडे गाणें बजावणें करणाऱ्या स्वायत्त स्त्रियांना पतिव्रताधर्म मुळींच सांगितला नाहीं. स्त्रिया जर स्वायत्त किंवा स्वावलंबी झाल्या तर पतिव्रताधर्म टिकायचाच नाहीं. एक तर त्यांचे लग्नच होणार नाहीं आणि जर झालेंच तर त्यांचें आयुष्य दुःखमय होईल. त्यांचे नवरे नालायक आणि गाढव निघतील. त्यांची उपजीविका ज्या पुरुषांच्या सहकारितेमुळें चालते, त्यांच्या त्या अंकित होऊं लागतील. तुम्हांला श्रीमतैर्गणिका व्याप्ता हा श्लोक ठाऊक आहे ना ?"

"कोणता श्लोक ?"

"त्या श्लोकाचे

श्रीमतैर्गणिका व्याप्ता
गृहस्थैश्च कुलांगना
यतिभिर्विधवा व्याप्ता

असे पहिले तीन चरण आहेत."

"आणि चवथा चरण ?"

"तो जरा अश्लील आहे, म्हणून आमच्या एका मित्रानें तो काढून त्याला एक निराळा चरण जोडला."

"तो कोणता ?"

"तो 'डॉक्टरैः परिचारिका' असा जोडला आहे. चवथ्या पादाचा आजचा अभिमत पाठ हाच समजावा."

"तुमचें म्हणणें असें आहे का, कीं स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वायत्त बनल्या म्हणजे त्यांना पातिव्रत्यधर्माचे नीतिनियम लागू होत नाहींत ?"

" माझें एवढेंच म्हणणें कीं, ते कठोर रीतीनें वापरतांच येणार नाहींत. आपणांस ' वरच्या वर्गाची ' म्हणविणारी मंडळी ' खालच्या वर्गाच्या ' स्त्रियांच्या नीतिमत्तेविषयीं वारंवार बोलत असतात; पण तसें बोलावयाचें कारण नाहीं. त्या स्त्रियांचें मनोधर्म निराळे आणि ब्राह्मणादि स्त्रियांचे मनोधर्म निराळे असें मी मुळींच समजत नाहीं. "

" मनोधर्म निराळे नसतील, पण शिक्षणाचा आणि संस्कृतीचा परिणाम उच्च वर्गांत अधिक आहे. "

" कसलें शिक्षण आणि कसली संस्कृति ! खरें कारण ' वरच्या वर्गातील ' स्त्रियांना आर्थिक स्वायत्तता नसते, आणि त्यांच्यावर पैसे आणण्याची जबाबदारी देखील नसते आणि त्यामुळें त्यांचें व पैसे मिळवावे लागणाऱ्या स्त्रियांचें आचरण निरनिराळें होतें. "

" स्त्रियांच्या आर्थिक स्वायत्ततेचा परिणाम जर अशा प्रकारचा होणार असेल तर मी म्हणतों कीं, स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्यच नको. "

" पण तसें चालावयाचें नाहीं. विधवा स्त्रिया व कुमारी यांना उपजीविका स्वतःची स्वतःच करावी लागणार आणि पुष्कळदां पुरुषाच्या दौर्बल्यामुळें देखील द्रव्यार्जनाचा भार स्त्रियांवरच पडणार. तर आतां बऱ्याच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य सर्वकाल रहाणार ही गोष्ट लक्षांत आणून म्हणजे सामाजिक सत्याकडे स्पष्ट अवलोकन करून स्त्रियांसाठीं निराळे नीतिनियम केले पाहिजेत. "

" ते कोणते ? "

इतक्यांत शास्त्रीबोवांच्या लक्षांत आलें कीं, गप्पा मारीत टेकडीवर चढूं लागलें म्हणजे दम लागतो. मग ते एका धोंड्यावर स्थानापन्न झाले आणि कांहीं वेळ विश्रांति घेऊन विडी शिलगावून एक दोन झुरके मारून पुढील उत्तर देते झाले.

" ते कोणते म्हणजे वाटेल त्या स्त्रीस पुरुषाशीं लग्न करतांना तें मातृसत्ताक कुटुंबपद्धतीनें लग्न लावावयाचें किंवा पितृसत्ताक कुटुंबपद्धतीनें लावावयाचें याविषयीं स्वातंत्र्य दिलें पाहिजे. जर तिनें मातृसत्ताक पद्धतीनें लग्न लाविलें तर तिला नवऱ्याला वाटेल तेव्हां टाकून देण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. तिचा नवऱ्याच्या मालमत्तेवर हक्क मुळींच नाहीं व नवऱ्याचा मुलावर हक्क नाहीं. व अशा प्रसंगीं स्त्रीनें व पुरुषानें एकत्र राहिलें पाहिजे असेंहि नाहीं. Shall matriarchy by revived हें मिसेस केतकर यांचें व्याख्यान ' हिन्दूस्थान रिव्हयू 'मध्यें वाचलें. त्यांच्या कल्पना मला पुष्कळ पटतात. "

" तुमची ही सुधारणा कोणीहि मान्य करणार नाहीं व प्राचीन महर्षींनीं सांगितलेल्या धर्माचा अवलंब करणारे आपले हिंदू तुमचें म्हणणें पत्करणार नाहींत व नवीन मताचे लोकहि पत्करणार नाहीत. "

" न पत्करोत; ज्यांना पटेल ते पत्करतील. "

" म्हणजे तुम्ही आपणाला जगांतील सर्व धर्मवेत्त्यांपेक्षां शहाणे म्हणवितां काय ? "

" होय, जगांतील धर्मवेत्त्यांना जो जगाचा इतिहास ठाऊक होता त्यापेक्षां मला अधिक ठाऊक आहे. त्यांची पत्रास माझ्यापुढें सांगूं नका. "

"जुने वसिष्ठ विश्वामित्र— "

"आणि त्या सर्वांपेक्षां श्रेष्ठ मी वैजनाथ आहें."

अप्पासाहेब कांहीं वेळ चूप बसले.

इतक्यांत अप्पासाहेबांना शास्त्रीबोवांच्या पगड्या मारुतीची आठवण झाली आणि ते म्हणाले, "आपल्याला पगड्या मारुतीकडे जावयाचें आहे ना ?"

"राहूं द्या पगड्या मारुती. येथें हवा चांगली आहे, तीच खात बसतों."

अप्पासाहेब पुढें बोलले, "पण शास्त्रीबोवा, तुम्ही आज जे विचार बोलतां ते तुमचेच आहेत काय ?"

"माझ्या बायकोची प्रियंवदा गोडबोले नांवाची एक मैत्रीण होती. ती स्त्रियांच्या हक्कासंबंधानें बोलणारी होती. ती म्हणत असे कीं, सर्व धर्मशास्त्र पुरुषी आहे आणि तें मुख्यतः समाजांतील ज्या वर्गांत पुरुष बायकांना पोसतात अशा वर्गानें बनविलें आहे आणि तें सर्व समाजाच्या माथीं मारलें आहे. हिंदुस्थानांत ज्या स्त्रिया कुटुंब पोषणासाठीं बाहेर जाऊन काम करतात अशाच स्त्रिया तीन चतुर्थांश आहेत. असें असतां पुरुषांनीं पोसलेल्या एकचतुर्थांश स्त्रियांना लागू पडणारे नियम सर्व समाजावर लादणें हा अन्याय आहे हें ती माझ्या बायकोस वारंवार सांगत असे. ती आणखी म्हणत असें कीं, राष्ट्र म्हणजे बायका, पुरुष नव्हत. समाजांतले तीनचतुर्थांश पुरुष मरून गेले व बायकाच उरल्या तरी पुढची पिढी अनेक पत्नीपद्धतीचा अवलंब करून भरून काढतां येईल; पण बायकाच जर मेल्या आणि पुरुष सपाटून उरले तर राष्ट्रसंवर्धन होणार नाहीं. यासाठीं प्रजावर्धनासाठीं जे नीतिनियम करावयाचे त्याचें कर्तृत्व पुरुषांकडे ठेवतां येणार नाहीं."

"शास्त्रीबोवा तुमच्या पापपुण्याच्या कल्पना तरी काय आहेत ?" अप्पासाहेबांनी विचारले. "आपली धर्माची व पापपुण्याची कल्पना नेहमीं बदलत असते. खरे वेदांती पाप किंवा पुण्य हें कांहींच समजत नाहींत; असें असतां विशिष्ट आचरण पाप अगर पुण्य म्हणून व्यवहारांत समजलें जातें, त्याची निर्भयपणें उजळणी व्हावयास नको काय ? ही उजळणी कोणीहि अजून केली नाहीं. पाश्चात्त्य देशांतील शास्त्रज्ञ अजून धार्मिक ग्रंथांवर उपजीविका करणाऱ्या पाद्र्यास भीत आहेत आणि यामुळें धर्मग्रंथांची उलटापालट करणें हा ज्या ब्राह्मणांचा अधिकार आहे त्या ब्राह्मणांनींच हें कार्य केलें पाहिजे आणि याला सुरुवात करण्यासाठीं मी वैजनाथ याविषयीं पुढील नियम देत आहें."

"स्त्रीनें अविवाहित असतां मातृत्व पत्करलें तर तें वस्तुतः पाप नाहीं. तें पाप समजलें जातें याचें कारण त्याचा परिणाम इष्ट होत नाहीं हें होय. स्त्री लग्नाशिवाय पुरुषापाशीं राहिली तर त्या स्त्रीला पुरुषाच्या इस्टेटीवर अधिकार उत्पन्न होत नाहीं; व त्या स्त्रीपासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेस बापाच्या इस्टेटीवर हक्क उत्पन्न होत नाहीं; म्हणून विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति निषेधिली गेली आहे. म्हणजे हे सर्व खेळ पैशाचेच आहेत. यांत परलोकाचा किंवा ईश्वरी आज्ञेचा संबंध नाहीं. जुन्या काळांत कानीनालादेखील वारसाहक्क असेच. अविवाहित मातृत्वामुळें स्त्रियांना व मुलांना सांपत्तिक अपकर्षाची

शिक्षा मिळत आहे, तर त्यापेक्षां अधिक कठोर शिक्षा कशाला ? "

" विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति करणारांस त्यापासून होणाऱ्या सांपत्तिक अपकर्षाची शिक्षा पुरी आहे काय ? " अप्पासाहेबांनीं विचारलें.

" होय, शिवाय हा सांपत्तिक अपकर्षदेखील टाळतां येण्याजोगा आहे. स्त्रियांना विवाहाशिवाय संतति उत्पन्न करण्याचा अधिकारदेखील मान्य करावयास हरकत नाहीं. "

" पण तुम्ही सांगतां त्या प्रकारच्या विचित्र धर्मशास्त्राची तरी आवश्यकता काय आहे ? "

जग अजून जंगलीच आहे. प्रगतीच्या खऱ्या सेवकांस हें जंगली जग उपाशी मारीत आहे. त्याचें फळ अनेक दिवसांनीं मिळणार अशा व्यक्तीस पोसावयास समाज तयार नाहीं. यासाठीं धर्मस्थापनेच्या किंवा धर्मसंरक्षणाच्या कामासाठीं तें काम करणाऱ्यांवर ब्रह्मचर्यव्रत लादलें गेलें आहे. प्राचीन काळचे कित्येक लोक उपाध्येवर्गाची खच्ची करीत असत. हिंदुस्थानांत देखील ज्यास समाजसुधारणेचें काम करावयाचें आहे, अशा वर्गास संन्यासी बनावें लागतें. कारण ज्याचें फल अत्यंत उशिरानें मिळतें अशा कार्यासाठीं पैसे देण्याचें काम समाज फार हळूहळू शिकत आहे. केवळ संशोधनांत आयुष्य घालविणाऱ्यास लोक पोसावयास मुळींच तयार नाहींत. यासाठीं अशा वर्गाच्या सोईसाठीं निराळी विवाहसंस्था व निराळे कायदे पाहिजेत. आतांपर्यंत लोकांना एवढेंच समजलें आहे कीं, संन्यासी किंवा भिक्षू यांस जेवण द्यावें किंवा पोसावें. आणि ज्ञानाची किंवा विद्येची जोपासना करणाऱ्यांनीं संन्यासी व्हावें व लोकांनीं त्यांस जेवण द्यावें, एवढें पुरें नाहीं. समाजहितकर्त्यांस याहूनहि अधिक पाहिजे. मी असें म्हणतों कीं, असल्या पुरुषांवर सक्तीचें ब्रह्मचर्य मुळींच लादूं नये. तर त्यांना संसाराची काळजी न वाटतां त्यांनीं जें सत्कार्य आपल्या हातीं घेतलें असेल तें त्यास शक्य व्हावें, यासाठीं यांच्या पोषणाचा भार जर स्त्रिया पत्करावयास तयार होतील तर चांगलें. लोकहितेच्छूंनीं किंवा ज्ञानहितेच्छूंनीं ब्रह्मचर्य कां पत्करावयाचें ? उत्तर एवढेंच कीं, ज्याचें फळ दूर आहे अशा कार्यांत गुंतलेल्या लोकांस पोसावयास समाज तयार नाहीं म्हणून. तर अशा लोकांच्या संगोपनाचें कार्य बायकांनीं करावयास काय हरकत आहे ? माझ्या हातून जें कार्य झालें त्याचें बरेंच किंबहुना निम्म्याहून अधिक श्रेय माझ्या बायकोलाच देतों. तिनें माझी काळजी घेतली. माझ्या कार्यासाठीं तीच द्रव्यप्राप्ति करीत होती आणि मी आपलें काम स्वेच्छेनें करीत होतों. ती सुशिक्षित होती आणि मी जें जें करीत होतों त्याची तिला मोठी चहा होती. माझ्या वाचनाचें फळ तिला जेवतांना होणाऱ्या संभाषणामुळें मिळे. त्याचप्रमाणें मी कोणत्याहि संशोधनांत गुंतलों म्हणजे त्या संशोधनाच्या अनेक टप्प्यांवर असतां ती त्याविषयीं देखील चर्चा करीत असे आणि मला त्यामुळें ती कार्यांतली खरी सहकारी असें वाटत असे. अशी सहचारिणी मला लाभली हेंच मी आपलें भाग्य समजतों व सर्व श्रीमंतांहून मी आपल्याला श्रीमंत समजत होतों. तिनें माझ्या प्रवासासाठींदेखील पैशाची ददात पडूं दिली नाहीं. एखाद्या मोठ्या खर्चाचा प्रवास करावयाचा झाला म्हणजे मी तिला पंधरा-

वीस दिवस आगाऊ कळवीत असें, म्हणजे ती पैसे तयार करी. तिला शंभर रुपये पगार मिळत होता. आणि त्यामुळें दोन-तीनशें रुपये ती वाटेल तेव्हां उसने काढून माझ्या प्रवासाला देई आणि ते पैसे पुढच्या महिन्यांत काटकसर करून फेडीत असे. "

" मग गुरुमहाराज, तुमच्या घरचा आयुष्यक्रम कसा होता ? तुमची बायको तर सर्व तुमचीच काळजी करीत होती. इकडे तुमच्या बायकोला मात्र तुम्ही आपल्या कार्यासाठीं मेहनत करायला लावतां आणि स्त्रियांना नवऱ्याला वाटेल तेव्हां टाकून देण्याचा हक्क आहे आणि मुलीला अविवाहित असता मातृत्व पत्करण्याचा हक्क आहे अशा गोष्टी बोलतां ? "

" तुम्हांला हें विसंगत वाटत असेल पण तसें नाहीं. "

" कां बरें ? "

" माझ्या बायकोला मला वाटेल तेव्हां काढून टाकायचें स्वातंत्र्य होतेंच. मी खरें सांगतों कीं, पूर्ण स्वातंत्र्य असलें म्हणजे त्याचा फायदा घेण्याची देखील बुद्धि होत नाहीं. "

" हा नियम शारदाबाईसारख्या विदुषींना लागू असेल, इतरांस नाहीं. "

वैजनाथशास्त्रांना त्या विधानानें आनंद झाला व ते पुढें आपल्या बायकोच्या गोष्टी अधिकाधिक सांगूं लागले. पण पुढें त्यांनीं असें सांगितलें कीं, माझ्या सर्व मतांचें पद्धतशीर आणि सर्व बाजूंनीं विवेचन झालें म्हणजे माझें म्हणणें तुम्हांला विचित्र वाटणार नाहीं.

वैजनाथशास्त्र्यांनीं परत येतांना सविस्तर विवेचन पुढल्या भेटींत करीन असें आश्वासन दिलें.

वैजनाथशास्त्र्यांची आणि अप्पासाहेबांची जी मुलाखत झाली ती अप्पासाहेबांना वाटलें त्यापेक्षां पुष्कळच यशस्वी झाली. वैजनाथशास्त्री तर जें आपलें ध्येय आहे आणि जें साध्य होत नाहीं तेंच ध्येय घेऊन बसला आहे, आणि तें ध्येय कोणत्या उपायांनी आणि कोणत्या परिस्थितींत साध्य होईल याची रूपरेखा तयार करीत बसला आहे. तर हाच तत्त्ववेत्ता आपणांस खरा मार्ग सांगेल असें अप्पासाहेबांस वाटलें.

(ब्राह्मणकन्या : पुनर्मुद्रण १९५४. व्हीनस प्रकाशन. पुणे. पृ. २१९ ते २२९)

# ९. मिसेस कैलासनाथ व त्यांचें धूम्रपान

लंडनला जो भारतीयांचा समाज आहे, तो आपल्यास परागंदा समजत नाहीं, तर आपण येथें तात्पुरते आलों आहोंत असें समजतो. तथापि कांहीं हिंदुस्थानी मंडळी तेथें स्थायिकसारखी झालीही आहेत. आणि त्यांच्यांत आपल्या सामाजिक वैशिष्ट्याची चांगली जाणीव जरी नसली तरी आपल्या उच्चत्वाची भावना त्यांत असते. हिंदी मंडळींच्या तेथें एकमेकांशीं नवीन ओळखी होतात. त्या तेथें सहज होतात अशांतला भाग नाहीं, दुसरे कोणी 'इंट्रोड्यूस' केल्याशिवाय आपण दुसऱ्याशीं बोलावयाचें नाहीं हा नियम हिंदी लोक अत्यंत कसोशीनें पाळतात!

लंडनमध्यें ज्यांच्याशीं ओळखी होतात ती मंडळी हिंदुस्थानांत एकमेकांना भेटली म्हणजे कांहीं जुन्या आठवणी निघतातच, या आठवणींपैकीं कांहीं आठवणी तेथे स्थायिक झालेला किंवा बरीच वर्षें राहाणारा हिंदी समाज आहे त्याविषयींच्या असतात. अमक्याची बॅरिस्टरी कशी चालते, तमक्याची सॉलिसीटरकी कशी चालते, एवढेच चर्चेचे विषय नसतात, तर निरनिराळ्या व्यक्तींच्या अत्यंत खासगी गोष्टीदेखील प्रश्नोत्तरांचा विषय होतात.

तेथे असलेला हिंदी समाज जरी अल्पसंख्यांक आहे, तरी तो बहुविध आहे. त्यांत सर्व जातींचे आणि सर्व धर्मांचे लोक आहेत. या मंडळींना हिंदुस्थानांतल्या प्रत्येक प्रांतांतली मंडळी ओळखतात. आपल्या समाजास महत्त्व आणि उच्चस्थानीयत्व आहे याची लंडनस्थ भारतीय समाजास जाणीव चांगलीच आहे. लंडनमधली मंडळी असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक थोर व्यक्ति लंडनला येतेच. त्यामुळे लंडन येथील हिंदी समाजाच्या आठवणी या हिंदुस्थानांतील चालू इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे. लंडनमध्यें कायम वस्ती करून राहाणाऱ्या मंडळींना हिंदुस्थानांतील वयोवृद्ध पुढाऱ्यांचे तारुण्यांतील खेळ आणि ते वयोवृद्ध झाल्यानंतर सभ्यपणा पत्करून तेथील तरुण मंडळीला जो उपदेश करु लागतात तो उपदेश हीं सारखींच परिचित आहेत. आणि कोणी हिंदुस्थानी पुढारी आपल्या प्रतिष्ठितपणाचें प्रदर्शन करूं लागला म्हणजे त्याला त्याच्या तारुण्यांतील गोष्टींची आठवण देण्याची क्रियादेखील अलीकडे लंडनमधील भारतीय मंडळी करूं लागली आहेत. हिंदुस्थानांतल्या पुढाऱ्यांनी देखील त्यांचे सर्व खेळ जाणणाऱ्या आम्हांशीं अत्यंत नम्रतेनें वागलें पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो.

लंडनमध्यें कायमची वस्ती करून राहाणारा व्यापारी वर्ग आहे. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील गिरण्या किंवा मळे यांच्यावर ज्यांचे पोट भरतें अशी मंडळीदेखील तेथें

आहेत. तेथें कांहीं पुरुष आपलीं बायकामुलें हिंदुस्थानांत ठेवून तात्पुरती वस्ती म्हणून तेथें राहतात, तर कांहीं स्त्रिया आपल्या विलायतनिवासासाठीं पैसे मिळविण्याकरितां नवऱ्यांस हिंदुस्थानांत बटलरच्या स्वाधीन ठेवून तेथें राहिल्या आहेत. कांहीं स्त्रिया अन्य कारणांनीं तेथें एकट्याच आल्या आहेत, तर कांहीं नवऱ्याबरोबर तेथें आहेत.

अलीकडे लंडन नगरीमध्यें भारतीय स्त्रियांचा अगदींच अभाव नाहीं. लंडनमध्यें आज अविवाहित हिंदी तरुण मुलीदेखील आहेत. आज लंडनमधील हिंदी मुलींनीं पुरुषवर्गाशी तोऱ्यानें वागण्याचा काळ संपत आला आहे. हिंदुस्थानांतील कॉलेजांतल्या मुली ज्याप्रमाणें समवयस्क विद्यार्थ्यांना एका काळीं कमी समजत असत त्याप्रमाणें विलायतेस गेलेल्या मुली आपण पराकोटींतल्या आहोंत असें समजत व तेथील बहुसंख्यांक बॅरिस्टरीसाठीं आलेल्या विद्यार्थ्यांना स्वतःपेक्षां कमी समजत; पण तो काळ देखील आतां संपत आला आहे असें कळतें.

ज्या काळांत हिंदुस्थानी मुली मोठ्या तोऱ्यानें वागून हिंदी तरुणांच्या अनुनयेच्छेकडे तुच्छतेनें पाहात असत असें दिसत असे त्या काळीं समाजांत खळबळ कशा प्रकारची होती याची बखर कोणी लिहिली नाहीं. खरा बखरकार सांपडण्यापूर्वी कांहीं थोडे देखावे पाहिलेल्याचें त्रोटक टांचण म्हणून या कथेचा उपयोग आहे.

मिसेस कैलासनाथ या लंडनमधील हिंदी स्त्रियांमध्यें चळवळ करणाऱ्या म्हणून बऱ्याच प्रमुख होत्या. मिसेस कैलासनाथ या पुष्कळदा मिसेस दासबरोबर दिसत. जेव्हां मिसेस कैलासनाथ यांना प्रथम पाहिले तेव्हां त्यांच्याविषयीं माझें मत अगदीं वाईट झालें. त्या जबर सिगारेट ओढणाऱ्या होत्या, एवढेंच माझ्या त्यांच्याशीं परिचयविषयक औदासीन्यास कारण होतें.

लंडनमध्यें हिंदु स्त्रिया थोड्या असल्यामुळें त्यांच्याशीं ओळख करण्याची इच्छा जशी सर्वच हिंदुस्थानी मंडळींत होती तशीच माझीही होती; तरी मिसेस कैलासनाथ यांच्याशीं संभाषण करण्याचे अनेक प्रसंग मी टाळले. मी जरी स्वतः सिगारेट ओढणारा आहें आणि माझे अनेक मित्र जरी धूम्रपान करणारे आहेत तरी स्त्रियांना सिगारेट ओढताना पाहिलें म्हणजे मला कसेसेंच वाटे. मिसेस कैलासनाथ या केवळ सिगारेट ओढणाऱ्या होत्या म्हणून त्या माझ्या मनाप्रमाणें वाईट ठरल्या, इतकें असून पुरुष आणि स्त्रिया यांची नीतिमत्ता एकाच मापानें मोजली जावी असें मी तात्त्विक दृष्ट्या म्हणत होतोंच; पण मिसेस कैलासनाथ यांच्या धूम्रपानाकडे दुर्लक्ष करून त्यांची ओळख करून घ्यावी असे मात्र मनाला वाटलें नाहीं. मी त्यांच्या धूम्रपानामुळें त्यांच्या अंगीं पुष्कळच दुर्गुण कल्पिले होते. मी लेखक आहे, ग्रंथकार आहे असा माझा लौकिक त्या वेळच्या लंडनच्या लहानशा हिंदुस्थानी वर्गांत व्हावयाला वेळ लागला नाहीं. माझा तसा लौकिक झाला होता. त्यामुळें मिसेस कैलासनाथ यांनीं जेव्हां एकदां सार्वजनिक प्रसंगीं एक दोन गौरवाची वाक्यें माझ्या लेखाविषयीं काढलीं तेव्हां मात्र मिसेस कैलासनाथ यांच्याविषयीं माझें मत ताबडतोब पालटलें आणि त्यांचे अनेक सद्गुण भराभर मला दिसूं लागले,

आणि मी त्यांच्याशीं परिचय वाढविला.

मिसेस कैलासनाथ काळ्या होत्या, त्यांच्या तोंडावर देवीचे वण होते आणि त्या धूम्रपान करणाऱ्या होत्या या सर्व गोष्टींमुळें जरी त्यांच्याशीं ओळख करण्याविषयीं लोकांत प्रवृत्ति नसे तरी त्यांची ओळख झाल्यानंतर त्यांच्याविषयीं मत अत्यंत अनुकूल होत असें. मिसेस कैलासनाथ यांचें स्वतःचें नाव जान्हवी होतें; पण तें फारसें कोणास ठाऊक नव्हतें. त्यांचे पति हिंदुस्थानांत असत. संयुक्त प्रांतांतले ते इंजिनियर होते. लाख दोन लाख रूपये त्यांनीं शिल्लक टाकले असावेत. मिसेस कैलासनाथ पतिनिधनानंतर आपल्या १५ वर्षांच्या मुलाला आणि दहा वर्षांच्या मुलीला घेऊन त्यांच्या शिक्षणासाठीं इंग्लंडला आल्या, त्याला आज पांच वर्षें झाली. मुलगा केंब्रिजमध्यें शिकत होता.

मिसेस कैलासनाथ यांना पहिला मुलगा त्यांच्या पंधराव्या वर्षी झाला होता आणि तो चांगला मजबूत होता. बालविवाहानें अपत्यें दुर्बळ होतात, या मताविषयीं त्यांच्या मनांत अविश्वास असे. मिसेस कैलासनाथ यांचा अंतर्भाव सुदृढ गतभर्तृकांमध्यें करतां येण्याजोगा होता. त्यांचें तारुण्य संपलें नाहीं असें दिसे आणि त्यामुळें लंडनमधल्या एका विधुराची आणि त्यांची मैत्री आहे अशा गोष्टी तेथील समाजांत पसरल्या होत्या, आणि त्या हिंदी विधुराच्या अजब रसिकतेची मंडळी तारीफ करीत होती. मंडळी म्हणत कीं, कुरुप बायको बापानें लग्न करुन दिल्यामुळें पदरांत पडली तर ती वागविलीच पाहिजे, पण असली काळी व ठिपकेदार तोंडाची बायको मुद्दाम कोण करतो ? मिसेस कैलासनाथापाशीं पैसा आहे हें खरें; पण त्यासाठीं देखील त्यांच्याशीं लग्न करून फायदा नाहीं. कारण तो पैसा तिच्या मुलांचा आहे, असेंही मंडळी बोलत. मंडळींनीं जरी मिसेस कैलासनाथ यांचें आणि त्या विधुराचें सूत जमविलें तरी त्यांत कांहीं महत्त्वाचा आधार होता असें नाहीं. कांहीं सामाजिक प्रसंगीं त्या आणि तो विधुर हीं दोघेंजण बरोबरच प्रसंगाच्या स्थानीं प्रवेश करतांना दिसलीं; एवढेंच लोकांच्या कल्पनांस कारण होतें. तो विधुर गृहस्थ मिसेस कैलासनाथ यांच्या घरीं जाऊन त्यांना 'संरक्षक' (एस्कॉर्ट) या नात्यानें त्यांच्याबरोबर आला होता कीं ट्यूब स्टेशनावरील लिफ्टमध्यें त्या दोघांची गांठ पडून ती एकत्र समारंभस्थानीं आलीं याचीही कोणास माहिती नव्हती. तो गृहस्थ आणि मिसेस कैलासनाथ यांना बरोबर फिरायला जाताना पाहिलें असेंहि कोणी बोललें नाहीं. तरी पण लोकांत प्रेमव्यवहाराच्या गोष्टींची आवड असल्यामुळें प्रेमव्यवहार भोंवतालच्या व्यक्तींना चिकटविण्यास अत्यंत उत्सुक झालेली आम्ही मंडळी फार थोड्या पुराव्यावरून निर्णय काढीत असूं.

मिसेस कैलासनाथ जरी धूम्रपान करीत होत्या तरी त्या त्यासंबंधानें गूढ करीत नव्हत्या. उलट त्या आपल्याबरोबर सोन्याचा मुलामा केलेली चांदीची सिगारेटची डबी बाळगीत. ती डबी त्यांनी दिल्लीच्या सोनाराकडून करवून घेतली होती. त्या आपली डबी वारंवार इतरांस दाखवीत असत. त्यांना आपल्या डबीबद्दल इतका अभिमान होता कीं, त्यांना जर खूष करावयाचें असलें तर ती डबी पाहण्याची इच्छा आपण व्यक्त करावी.

मिसेस कैलासनाथ आपली डबी करणारा सोनार चांदणी चौकांत कोठें आहे हें सांगण्यास विसरत नसत. आपल्या धूम्रपानाचें मिसेस कैलासनाथ समर्थन करीत असत. मिसेस कैलासनाथ या असें सांगत कीं, धूम्रपान केल्यानें मज्जातंतूंस शीण आला असेल तर त्याचा परिहार होतो.

मिसेस कैलासनाथ यांच्यावर टीका करण्यासाठीं म्हणा किंवा तेथील अनेक स्त्रियांवर टीका करण्यासाठीं तेथें आलेल्या एका तरुण विद्यार्थ्यानें एक व्याख्यान दिलें. हें व्याख्यान ईस्ट ॲण्ड वेस्ट सोसायटीपुढें झालें. व्याख्यानाचा विषय "स्त्रियांचें धूम्रपान" हा मुळींच नव्हता, तर त्यापेक्षां बराच प्रतिष्ठित होता. "पूर्व आणि पश्चिम यांचा संबंध" हा विषय होता. त्या प्रसंगीं त्या वक्त्यानें म्हटलें कीं, हा संबंध पौरस्त्य लोकांस हितावह झाला नाहीं. पाश्चात्त्य दुर्गुण आपल्या लोकांत शिरतात. युरोपीअन लोकांचें पाहून आपले लोकही धूम्रपान शिकले आहेत आणि हे धूम्रपानाचें व्यसन आज आमच्या सुशिक्षित भगिनींपर्यंतदेखील पोंचलें आहे, हें पाहून प्रत्येक भारतीयास दुःख होईल यांत शंका नाहीं."

हें भाषण करणारा एक महाराष्ट्रीय तरुण विद्यार्थी होता. त्याच्या या भाषणामुळें पुष्कळ तरुण मंडळींस मनांतल्या मनांत खूप हंसूं आलें व पुष्कळ मंडळी मिसेस कैलासनाथ यांचेकडे साभिप्राय पाहूं लागली. पण मिसेस कैलासनाथ मुळीच डगमगल्या नाहींत. त्या उलट उत्तरासाठी बोलण्यास उभ्या राहिल्या, त्या वेळेस मंडळींनी टाळ्या वाजविल्या. मिसेस कैलासनाथ यांनीं सांगितलें कीं, "धूम्रपान हें मूळचें अमेरिकन-इंडियन लोकांचें, तेथून तें युरोपांत व युरोपांतून हिंदुस्थानांत आलें. पाश्चात्यांच्या संबंधामुळें हिंदुस्थानांत धूम्रपान शिरलें असेल; पण तें आज चारपांचशें वर्षांपूर्वीं शिरलें आहे. धूम्रपान उचलल्याचें श्रेय अगर दोष हिंदुस्थानांतल्या आजच्या सुशिक्षित स्त्रियांना देतां येणार नाहीं. आमच्या घरांतल्या स्त्रियांमध्यें धूम्रपान आज अनेक पिढ्या आहे. माझी आजी धूम्रपान करीत होती. ती हुक्का ओढीत होती आणि आमच्या आजोबांसाठीं हुक्का तयार करून देण्याच्या अगोदर ती स्वतः ओढून मग आजोबांना देत होती. आजच्या स्त्रियांना जर कशाबद्दल दोष द्यावयाचा असेल तर तो हुक्का सोडून सिगारेट ओढण्याबद्दल देतां येईल. मी तर सिगारेटपेक्षां हुक्काच अधिक पसंत करतें. पण या सभेसारख्या ठिकाणीं हुक्का आणणे गैरसोयीचे होतें.

तंबाखू ओढणें ही गोष्ट गैर आहे कीं चांगली आहे याविषयीं निर्णय प्रत्येक व्यक्ति आपापल्याप्रमाणें करील. कित्येकांस तंबाखू ही उपयोगी वाटेल तर इतरांस वाटणार नाहीं. तथापि धूम्रपान येथील भगिनी इंग्रज स्त्रियांपासून शिकल्या असें म्हणतां येणार नाहीं. या बाबतींत हिंदी स्त्रिया युरोपीअन स्त्रियांच्या पुष्कळच पुढें आहेत. ब्रह्मदेशांत स्त्रिया चिरूट ओढतात तर बंगालपासून तुर्कस्थानपर्यंत अनेक मुसलमान स्त्रिया व कांहीं हिंदु स्त्रियादेखील हुक्का ओढतात. हुक्का ओढणाऱ्या स्त्रियांची जुनीं चित्रेंदेखील आपणांस उपलब्ध आहेत. तर अर्वाचीन स्त्रियांवर केवळ पाश्चात्य अनुकरणाचा आरोप करूं नये

व धूम्रपानांत पौरस्त्य स्त्रियांनीं मिळविलेलें अग्रेसरत्व चांगल्या पुराव्याशिवाय नाकारूं नये, एवढेंच माझें म्हणणें आहे. आजचे वक्ते यांनीं तंबाखूला व्यसन म्हटलें आहे. अर्थात् ते तंबाखू ओढत नसतील यांत संदेह नाहीं. तंबाखूची आवड त्यांना अजून चिकटली नाहीं याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतें. ही संवय दुष्ट असो अगर नसो; महाग आहे हें खचित. ”

हें मिसेस कैलासनाथ यांचें भाषण चालू होतें तेव्हां तेथील बरीच मंडळी हंसू लागली व संध्याकाळ परस्पर विनोदांत चांगल्या तऱ्हेनें गेली. मिसेस कैलासनाथ यांचें उपव्याख्यानच मूळ वक्त्याच्या भाषणापेक्षां अधिक आवडलें.

मिसेस कैलासनाथ या मूळच्या जरी फारशा सुशिक्षित नव्हत्या तरी आतां त्या बहुश्रुत झाल्या होत्या. लंडनमध्यें अनेक व्याख्यानांना त्या हजर असत. तें व्याख्यान दक्षिण अमेरिकेसंबंधानें असो कीं उत्तर ध्रुवावर असो; मिसेस कैलासनाथ त्या व्याख्यानाला हजर असावयाच्याच. त्या वाचक होत्या आणि कधी कधी व्याख्यानानंतर शंका विचारण्याचे साहस करीत आणि व्याख्यानानंतरची प्रश्नोत्तरें व्याख्यानाच्या रिपोर्टाबरोबर वर्तमानपत्रांत कधीं कधीं येत, त्यामुळें त्यांचे नांवही वर्तमानपत्रांत येत असे. अशा तऱ्हेनें वर्तमानपत्रांत त्यांची प्रसिद्धी झाल्यामुळें मिसेस कैलासनाथ यांच्यासंबंधानें चर्चा बरीच होत होती. याला केवळ त्यांचें धूम्रपान कारण नव्हतें. हिंदु स्त्री म्हणजे समाजभीरू असावयाची असा जो समज आहे त्याला त्या अपवाद होत्या. उलट एखाद्या हिंदु विद्यार्थ्याला त्याच्या वागणुकीबद्दल टोमणे मारण्याचें काम जर कोणी यशस्वी रीतीनें करूं शकत असेल तर तें मिसेस कैलासनाथ याच करूं शकत असत. दाक्षिण्याच्या कल्पनांनीं पुरुषवर्ग बद्ध झाल्यामुळें त्यांच्याकडून अपमान होण्याची भीति नाहीं याची जाणीव मिसेस कैलासनाथ यांस होती आणि पुरंध्रीस पुरुषांशीं वागताना जो आत्मविश्वास उत्पन्न झाला पाहिजे तो आत्मविश्वास त्यांच्या ठायीं होता; त्यामुळें त्यांची वागणूक आपणाकडे वडीलपणा घेऊन तरुण विद्यार्थ्यांची प्रशंसा करीत करीत आपलें गौरव त्याच्या मनावर ठसवावें अशा प्रकारची होती. त्यांच्याविषयीं नामजोशी नांवाच्या एका महाराष्ट्रीय विद्यार्थ्यानें ही सासूबाईपणा करणारी बाई आहे असा शेरा मारला होता आणि तो शेरा त्यांच्या समर्पकतेमुळें सर्व महाराष्ट्रीय मंडळींत पसरून तिला “ गांवसासू ” हें नांव स्थापन झालें होतें.

[ गांवसासू– प्रकरण १ ले, पृष्ठ १ ते ८, प्रथमावृत्ती, विजय साहित्य, प्रकाशक अ. स. गोखले, पुणे. ]

# १० मधुमालतीचा गृहत्याग

विचक्षणेच्या लग्नाला थोडे दिवस झाल्यानंतर एके दिवशीं दुपारीं मधुमालती बाहेर गेली ती परत आली नाहीं. "मी मुंबईस जात आहें, थोडक्या दिवसांनीं तुला सविस्तर कळवीनच," एवढी चिठी विचक्षणेसाठीं तिनें ठेवली होती. त्या चिठीनें प्रो. लोंढे हे रागावतील आणि आकाशपाताळ एक करतील असें विचक्षणेस वाटलें. पण तसें कांहींच झालें नाहीं. "अजून मुलीला माझ्याविषयीं पुरा विश्वास वाटत नाहीं." एवढेंच ते बोलले, आणि आपल्या वाचनांत आणि लेखनांत गर्क झाले. दोन दिवसांनंतर मधुमालती आठवलेबरोबर पळून जाऊन तीं दोघेंजण मुंबईस एका स्नेह्याकडे उतरलीं आहेत, अशी माहिती छत्रे यास एका मित्रामार्फत कळली आणि त्याच्याकडून विचक्षणेस व तिच्यामार्फत लोंढे यांस कळली. ती माहिती प्रो. लोंढे यांस भीतभीतच विचक्षणेनें सांगितली. आपला बाप ही बातमी ऐकून काय म्हणेल, याची विचक्षणेस देखील कल्पना नव्हती. आठवले कोण, हें जरी विचक्षणेस चांगलें माहीत होतें, तरी हा मनुष्य प्रो. लोंढे यांच्या चांगलासा परिचयाचा नव्हता. पुण्याला चित्रांचें जे प्रदर्शन झालें त्यांत त्याचें एक चित्र होतें. तें चित्र प्रो. लोंढे यांनीं पंचवीस रुपयांस विकत घेतलें होतें आणि तें विकत घेण्यासाठीं मधुमालतीनें आग्रह केला होता. त्यामुळें आठवले या नांवाचा कोणी चित्रकार आहे आणि त्याचें एक चित्र मधुमालतीस फार आवडलें होतें, एवढीच माहिती त्यांस होती. जेव्हां विचक्षणेनें आठवल्याबरोबर ती पळून गेली हें सांगितलें तेव्हां त्यांनीं एकदम "कोण? चित्रकार आठवले काय?" असा प्रश्न केला. तेव्हां विचक्षणेनें होकारार्थी उत्तर दिलें. आणि ते उत्तर ऐकतांच विचक्षणेनें आपल्या बापाच्या तोंडावर राग न पाहतां हास्य पाहिलें तेव्हां ती चपापली व स्तब्धच झाली. थोड्या वेळानें बापच आणखी बोलता झाला,

"सुंदर चेहऱ्याकडे पाहून चित्रकार आकर्षिला गेला यात कांहींच नवल नाहीं; तथापि मधुमालती त्यावर कां बरें भाळली?"

विचक्षणेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां प्रो. लोंढे पुन्हा म्हणाले, "या दोघांची ओळख एक वर्ष तर आहेच; पण स्नेहसंबंध किती दिवस चालू आहे?"

"दोघेहि बरेच दिवस एकमेकांस भेटत आहेत."

"बरेच म्हणजे किती?"

"आज वर्षभर तरी त्यांचें एकमेकांस भेटणें चालू आहे."

"म्हणजे तें चित्र विकत घेण्यापूर्वीपासून?"

"होय."

" मग तर तें चित्र विकत घेण्यास तिनें केलेला आग्रह सहेतुक होता; केवळ चांगलें चित्र घ्यावें एवढाच त्यांत हेतु नव्हता ! "

" आठवल्याला दोन पैसे मिळावे, त्याची दोन महिन्यांची तरी खाणावळ भागावी, असा तिचा हेतु होता हें तिनें मला स्पष्ट सांगितलें होतें. "

" मीं आठवल्याला घरीं कधीं पाहिलें नाहीं ? "

" तीं दोघें बाहेरच भेटत असत. "

" मग तूं कधी बोलली नाहींस ? तिनें तरी हें एवढें गुप्त कां ठेवलें ? तरी तुम्हां दोघींना मी नेहमीं सांगतों कीं, तुम्ही बापाची भीति बाळगूं नका, बापाला आपला मित्र समजा, त्याच्यापासून कांहींहि तुम्ही चोरून ठेवूं नका. पण छे, तुम्ही दोघी मुलींनीं नालायकपणा केला. या गोष्टी तुम्हीं चोरून ठेवल्या ! "

" बरें, आतां पुढें काय करावयाचें ? "

" तें मधुमालतीनेंच ठरवावें. मला सल्ला विचारला तर मी तिला सल्ला देईन. जर ती माझ्यावर विश्वास टाकायला तयार नसेल तर मीहि तिला सल्ला देऊं इच्छीत नाहीं. "

" मग काय ! तिचें नांव सोडून देणार ? "

" छे, छे ! मुळीच नाहीं. तिला तार कर कीं, मुंबई पाहणें झालें म्हणजे परत ये आणि आठवल्यांना देखील पाहुणे म्हणून रहावयास आमंत्रण दे. जा. तारेचा मसुदा तयार करून सहीसाठीं आण. "

" ' मुंबई पहाणें झाल्यावर ' असें कशासाठीं लिहावयाचें ? "

" एवढ्याचसाठीं कीं; आपण मुंबई पहाण्यासाठीं आलों, बापाच्या घरून पळून आलों नाहीं, अशी जर मधुमालतीला बतावणी करावयाची असली तर ती करतां यावी, आणि तिच्या मनांत आणखी कांहीं दिवस घरीं यावयाचेंच नसेल तर आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास तिला सवड असावी. "

" आठवले यांसहि पाहुणे म्हणून येण्याचें आमंत्रण तें कशासाठीं ? " हेतु एवढाच कीं, आठवले यांनीं तिला तिचा कंटाळा येऊन टाकून दिलें असलें व ती एकटी आली, किंवा आठवले यांसहि घेऊन आली, तरीहि तिला घराचें द्वार मोकळेंच आहे."

" म्हणजे ? एकूण तिचें करणें तुम्हाला पसंत आहे ? "

" छे, तुझें लग्न तरी मला कोठें पसंत होतें ? मला असें वाटत होतें कीं, तुझा नवरा आळशी आणि बिनमेहनतीनें आयुष्य कंठावें अशा प्रवृत्तीचा आहे, आणि यासाठी मिळवती बायको शोधणारा आहे. माझें जरी तुझ्या नवऱ्यासंबंधानें हें मत झालें आणि त्यासंबंधानें तुला बोललों, तरी तुला मी कोठें टाकून दिलें ? तूं जसा मूर्खपणा केलास, तसाच थोडासा मूर्खपणा मधुमालतीच्या हातून झाला एवढेंच. "

" म्हणजे माझें आणि मधुमालतीचें करणें सारखेंच असें समजतां कीं काय ? मीं लग्न केलें आहे. कोणाबरोबर पळून गेलें नाहीं मी. "

" अग, चांगलें काय आणि वाईट काय, हें फायदेशीर काय आणि गैरफायदेशीर काय, या दृष्टीनेंच लोक ठरवीत असतात. मधुमालती आणि आठवले यांचें लग्न झालें–आणि तें होईलसें वाटतें–तर तिचें वागणें देखील आक्षेपार्ह रहाणार नाहीं. "

" बाबा, तुमच्या ठायीं एवढी सहिष्णुता असेलसें वाटलें नव्हते. " " मी सहिष्णु कां बरें नसावें ? माझें नुकसान मधुमालतीनें काय बरें केलें आहे ? "

समाजांत तुमचा मोठा लौकिक आहे. तुमच्या मुली वेड्यावाकड्या वागल्या तर तुमच्या लौकिकाला कमीपणा येणार नाहीं काय ? "

" माझ्या अब्रूपेक्षां तिच्याच अब्रूचें नुकसान जास्त होत असतां मीं रागवावें यांत शहाणपणा कोणता ? लोकांमध्यें अब्रूच्या कल्पनादेखील खोट्या वावरत असतात.

" त्या कशा काय ? "

" ग्यारो नांवाची एक जंगली जात आहे. त्या जातींतली एक स्त्री कोर्टांत नुकसानभरपाई मागायला आली होती. तिचा दावा असा होता कीं, तिच्या सासूनें व्यभिचार केला आहे आणि त्यामुळें तिच्या अब्रूची नुकसानी झाली आहे, तर कोर्टानें तिला नुकसानभरपाई देववावी. त्यांच्या अशा बऱ्याच कल्पना आहेत. माडीवर तिसऱ्या कपाटांत मेजर प्लेफेअरचें ग्यारोंवर पुस्तक आहे तें वाच म्हणजे काल्पनिक अब्रू-नुकसानीच्या कल्पनांच्या बाबतींत आपण ग्यारोंच्या मागें किती आहों हें कळेल. "

" त्यांच्या कल्पना कांहींहि असोत, पण आपल्या लोकांच्या विचारांप्रमाणें वागणें अवश्य नाहीं काय ? "

" नाहीं, मुळींच नाहीं. मी काय करतों हें लोकांनीं पहावें आणि तदनुरूप त्यांनीं आपले विचार बदलावे. "

" तुम्हांस आपल्या अब्रूची फिकीरच नाहीं कीं काय ? "

" मी आपल्या अब्रूनुकसानीच्या कल्पना किती जरी वाढविल्या तरी मला जंगली ग्यारोंची बरोबरी मुळींच करतां येणार नाहीं. माझ्या मुलीचें वर्तन चांगलें कीं वाईट, हें, तें हितावह कीं अहितावह, यावर ठरविलें पाहिजे. माझ्या स्वतःच्या अब्रूविषयीं ज्या माझ्या लाडक्या कल्पना असतील त्यांनीं मी आपल्या मुलांस बांधून ठेवणार नाहीं हें मीं पूर्वीच ठरविलें, आणि मुलांच्याच हिताकडे पाहून त्यांच्या संबंधाचे प्रश्न सोडविलें पाहिजेत हें मनानें घेतलें. आणि यासाठीं लोकांतील प्रतिष्ठा आणि अप्रतिष्ठा हीं बाजूला ठेवलीं पाहिजेत हेंहि ठरविलें आहे. लोकांत लुच्च्या आणि बदमाष लोकांचा सन्मान होतो हें आपण पुष्कळदां पहात नाहीं काय ? तर मग लोकांतील प्रतिष्ठेलाहि महत्त्व द्यावयाचें नाहीं. अपत्यांच्या हितासाठीं आपण होईल तेवढा प्रयत्न केला म्हणजे आपणाकडून योग्य वर्तन होईल असें मीं ठरविलें आहे. "

" बाबा, अपत्यांसंबंधानें तुमचे विचार इतके स्वतंत्र असतील आणि ते आपण व्यवहारांत आणाल अशी मला कल्पना नव्हती ! मला असें वाटत होतें कीं मधुमालती पळून गेली हें कळल्याबरोबर तुम्ही, फारच रागावाल आणि तिनें कुळाला काळिमा

लावला असें म्हणाल."

"मी तुला हेंच म्हणत असतों कीं, तुम्हीं दोघी पोरींनी माझ्याशीं मोकळेपणाचें वर्तन ठेवलें नाहीं. तुमच्या मनांत जे किंतु येतील ते तुम्ही दूर करून घ्यावयास हवे होते."

"मधुमालती आणि आठवले यांचें प्रेम आज अनेक महिने आहे, ही गोष्ट मीं तुमच्यापासून लपवून ठेवली नसती तर बरें झालें असतें असें आतां मला वाटतें."

"एवंच; तुला ही गोष्ट बरेच महिने ठाऊक होती?"

"होय."

"आणि ज्या अर्थी तूं ही गोष्ट माझ्यापासून गुप्त राखलीस, त्या अर्थी तुला या दोघांचा प्रेमसंबंध वाढावा आणि त्यास मीं अपाय करूं नये असेंच वाटत असले पाहिजे, हें खरें ना?"

"होय."

"तूं मधुमालतीचा प्रेमसंबंध गुप्त राखण्यांत आणि वाढूं देण्यांत जी एवढी दक्षता दाखविलीस, तीमध्यें केवळ भगिनीप्रेम असावें असें वाटत नाहीं. कांहींतरीं स्वार्थबुद्धि असावी असें मला वाटतें. हो, समजलों!"

"माझी स्वार्थबुद्धि काय?"

"काय म्हणजे? अगदीं उघड आहे. मीं डोळे झांकलेले नव्हते. माधवराव घरीं येत असे तेव्हां तो प्रथम तुझ्याकडे आकर्षिला जात नसून मधुमालतीकडे आकर्षिला जात होता. आणि तूं शाळेंतून यावयाच्या अगोदर तिच्याशींच त्याचें संभाषण चालत असे. असें असतां देखील त्याचें व तुझें लग्न झालें. त्यानें तुझी निवड केली याचें कारण तूं कुमारी आहेस व मधुमालती विधवा आहे एवढेंच असेल असें मला वाटत नाहीं."

"तर मग?"

"तुझ्या नवऱ्यानें तुझी निवड करण्यापूर्वी तूं त्याची निवड केली असली पाहिजेस. कारवाई तुझी आहे आणि ती यशस्वी झाली आहे. मी तुला सांगितलेंच कीं, तुझा नवरा माधवराव हा आयतोबा आहे आणि त्याला पगार मिळवून पोटाला घालील अशी बायको पाहिजे, हें एक कारण झालें असेल; त्याप्रमाणेंच आठवले प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला आहे, तर मधुमालतीचा नाद आपण सोडावा असेंहि वाटलें असेल; आणि मधुमालती ही माधवावर आसक्त व्हावी यासाठीं तूंहि प्रयत्न केला असशील. एरवीं मधुमालतीचे हे व्यवहार माझ्यापासून गुप्त राखण्याचें तुला कारण नव्हतें."

"तुम्ही कांहींतरीच शंका घेतां! मीं तुम्हाला सांगितलें नाहीं याचें कारण, मला चुगलखोरपणा बिलकूल आवडत नाहीं."

"उगाच खोट्या गोष्टी सांगूं नकोस. आजपर्यंत तिच्या चुगल्या काय कमी सांगितल्यास? ती रस्त्यांतच कॉलेजांतील बाळोबाच्या मित्रांशीं बोलत उभी राहाते, अशां-

सारख्या गोष्टी कांहीं थोड्याथोडक्या नाहीं सांगितल्यास. तथापि आजच्या एकंदर वृत्तांतावरून असें दिसतें कीं, तुझा नवरा आयतोबा तर आहेच पण तो थोडासा भ्याडहि असावा. ज्या मुलीसाठीं दुसरा कोणी प्रतिस्पर्धी आहे तेथे आपली हुषारी अधिक दाखवून तिला पटकाविण्याविषयीं त्याला आत्मविश्वास नसावा."

"तुम्ही अशी त्यांची वेडीवाकडी निंदा करू नका." विचक्षणा फणकाऱ्यानें म्हणाली.

"मला असें वाटतें, तुला हा जो राग आला आहे, तो, मी जें बोलतों तें खरें आहे या जाणिवेमुळेंच आला आहे. शिवाय मीं जें विधान केलें तें तुला थोडासा कमीपणा आणणारें आहे. तुझ्या नवऱ्यानें तुझी जी पसंती केली, ती तुझ्या द्रव्यार्जन-शक्तीप्रमाणेंच स्पर्धेत आपला पराभव होईल याच्या जाणिवेमुळें केलेली आहे; म्हणजे तुझा विजय मधुमालतीच्या पराजयाचें द्योतक नसून तुझ्या नवऱ्याच्या पराजयाचें द्योतक आहे."

"वरील वाक्य उच्चारतांच आतांपर्यंत आवरून धरलेला राग व दुःख यांस आपल्या मनोनिश्चयानें विचक्षणेनें जो बांध घातला होता, तो फुटून विचक्षणा एकदम रडूं लागली. प्रो. लोंढे यांनीं तिला पांच मिनिटें रडूं दिलें आणि नंतर तिचें सांत्वन करण्यासाठीं तें म्हणाले,

"विचक्षणे, तुला हें जें मी बोललों तें दुखविण्यासाठीं नव्हें; स्त्रीनें स्वतःविषयीं, नवऱ्याविषयीं आणि दोघांच्या संबंधांविषयीं सत्य समजणें अत्यंत अवश्य आहे, खोट्या कल्पना अत्यंत घातुक आहेत, एवढ्यासाठींच बोललों आहें."

[ विचक्षणा :—प्रकरण ७ वे, पृ. ५१ ते ५८ ]

# विभाग ३

केतकरांनी ज्ञानकोश महाराष्ट्रीयांसाठी लिहिला होता. ज्ञानकोश पुरा झाल्यानंतर त्यांनी प्राचीन महाराष्ट्राविषयी संशोधन सुरू केले होते व त्यांच्या अकाली मृत्यूमुळे ते अपुरे राहिले. तिसऱ्या विभागात महाराष्ट्रासंबंधीच्या उताऱ्यांचा समावेश केलेला आहे. महाराष्ट्रात व्यापारी कर्तृत्व पूर्वीपासूनच कमी आहे आणि ते वाढविण्यासाठी कशी खटपट करता येईल हे अकराव्या उताऱ्यात सांगितलेले आढळेल. हा उतारा ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या पहिल्या विभागातून घेतला आहे.

महाराष्ट्रीयांच्या काव्याभिरुचीचे केतकरांनी केलेले समाजशास्त्रीय परीक्षण फार महत्त्वाचे होते. असा प्रयत्न प्रथमच झाला होता. वाङ्मयाभिरुचीचे समाजशास्त्र या विषयाला पाश्चिमात्य देशातही अगदी अलीकडच्या वर्षांत महत्त्व येत चालले आहे. महाराष्ट्रीयांच्या वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासातील एक प्रकरण लिहून केतकरांनी एक नवी पायवाट पाडली. बारा व तेरा क्रमांकांचे उतारे केतकरांच्या या अपूर्व ग्रंथातून घेतले आहेत.

चौदाव्या उताऱ्यात ज्ञानकोशाच्या रचनेमागची भूमिका स्पष्ट केलेली आढळेल. माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास या पुस्तकातून हा उतारा घेतला आहे.

## ११. महाराष्ट्राचा विशेष विचार

महाराष्ट्राचा आपल्याला शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करणें आहे. शास्त्र म्हणजे सामान्य तऱ्हेचें जें ज्ञान असेल त्यास मोजमाप लावून अधिक निश्चित केलेलें ज्ञान. आज सामाजिक स्थितीचा अभ्यास करतांना फारच थोडें समाजविषयक ज्ञान आपणांस परिमाणात्मक करतां येतें. संपत्तीचे आकडे देशादेशांचे मिळवून कोणत्याहि दोन देशांच्या संपत्तीची तुलना करतां येते. विवक्षित देशांतील लोकांच्या मृत्यूंचे आंकडे गोळा करून तेथील लोकांचा शिक्षणोत्तर उत्पादनकाल मोजतां येतो. तथापि आंकडेशास्त्र समाजाच्या सर्वच अंगांचा विचार करण्यास उपयोगी पडत नाहीं. आंकड्यांचें अस्तित्व आणि आंकडे मिळवण्याची शक्यता या दोन गोष्टींचा विचार करून समाजशास्त्रीय प्रश्नाकडे वळावें लागतें. आंकडेरूपी साहित्याच्या अभावामुळें किंवा अशक्यतेमुळें, जेथें आंकडेशास्त्र लंगडें पडतें तेथेहि समाजशास्त्राच्या अभ्यासकास कांहीं परिश्रमक्षेत्र असतें. प्रथमतः हे लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, परिमाणात्मक ज्ञान ज्ञानार्थयत्नाच्या उत्तरकालीं प्राप्त होतें. पहिल्यानें जें ज्ञान मिळतें तें गुणबोधक असतें. पाणी कढत आहे हें सांगणें निराळें आणि पाण्याचा कढतपणा ८० डिग्री सेंटिग्रेड आहे असें सांगणें निराळें. मापानें मोजतां येण्यापूर्वी म्हणजे परिमाणात्मक ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी गुणात्मक ज्ञान मिळवितां येतें. असो.

आज भाषेच्या तत्त्वावर प्रांत पडले नाहींत त्यामुळें महाराष्ट्र व इतर भाग यांची तुलना करण्यासाठीं आंकडे मिळत नाहींत. प्रांतांचे आंकडे मिळतात पण त्यांचा शास्त्रास फारसा उपयोग नाहीं. मुंबई इलाख्यांतील ब्राह्मण व मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांतील ब्राह्मण यांच्या आंकड्यांची तुलना करून काय उपयोग ? एकीकडे सुशिक्षित महाराष्ट्रीय ब्राह्मण व पाणीभरे गुजराथी ब्राह्मण यांचे आंकडे एकत्र करावे लागतात तर दुसरीकडे महाराष्ट्रीयांचे आंकडे रांगड्यांशी मिश्र होतात. समाजशास्त्राचा अभ्यास जो करावयाचा असतो तो विशेषतः समाजाचें हित साधण्यासाठींच करावयाचा असतो. शास्त्रीय दृष्टीचें म्हणजें पद्धतशीर अवलोकन जर व्यवहारांत त्या अवलोकनाचा उपयोग होणार असेल तरच होतें. सामाजिक अथवा कोणतीहि शास्त्रीय तत्त्वें विशिष्ट प्रश्न हातीं घेतल्यानेंच खुलीं होतात, आणि तीं लोकांपुढें सोदाहरण मांडलीं तरच त्यांस समजतात. समाजाचा पद्धतशीर अभ्यास कसा करावयाचा हें समजून घ्यावयाचें म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजाचें हित करण्याची बुद्धि जागृत ठेवून तो समाज अधिक सुखी कसा होईल याचे उपाय शोधीत बसावयाचें. आपणांस भारतीय या दृष्टीनें व महाराष्ट्रीय या दृष्टीनें साधावयाचें आहे, तसेंच तें हिंदु या दृष्टीनें व महाराष्ट्रीय या दृष्टीनें साधावयाचें आहे. महाराष्ट्रीय दृष्टीनें आपलें हित साधण्यासाठीं खटखट करण्याकरितां समाजाचीं आजचीं वैगुण्यें शोधण्याकडे

आणि नंतर त्यांवर उपाययोजना करण्याकडे आपण अगोदर लक्ष दिलें पाहिजे, कारण महाराष्ट्रीयांस पुढें सारणें आपलें हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें कर्तव्य आहे. जोपर्यंत महाराष्ट्र दुर्बल आहे तोपर्यंत त्याच्याकडून इतर भागांशीं चांगल्या तऱ्हेनें सहकार्य व्हावयाचें नाहीं.

महाराष्ट्रीय समाजाचें स्थूल वर्णन येणेंप्रमाणें करतां येईल. हा सुमारें दोन कोटी लोकांचा समूह बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशावर पसरला आहे. ज्या प्रदेशांत महाराष्ट्रीयांचें आधिक्य आहे तो महाराष्ट्र असें म्हटल्यास महाराष्ट्र मोठा विस्तृत प्रदेश आहे असें म्हणावें लागेल. जर या प्रदेशांतील लोकांस कार्यस्वातंत्र्य मिळालें तर बऱ्याच मोठ्या प्रदेशावर महाराष्ट्रीय मंडळीचा अधिकार चालेल. महाराष्ट्रेतर प्रदेशांमध्ये अशी स्थिति नाही. या प्रदेशांतून स्थानिक भाषा बोलणाऱ्या लोकांचें दार्ढ्य दृष्टीस पडतें. महाराष्ट्रामध्यें समाजाचा विचार अधिक होऊन दार्ढ्य कमी झालेलें दिसतें. या परिस्थितीचा पुढेमागें महाराष्ट्रास हितकर असा परिणाम होईल. महाराष्ट्रांत आलेले परके लोक महाराष्ट्रीय होतील. महाराष्ट्राचा विकास होण्यास ही स्थिति उपकारक आहे. महाराष्ट्रांत येऊन वस्ती करून राहिलेले लोक जर पुढेंमागें महाराष्ट्रीय झाले तर आजचें जे समाजदौर्बल्य आहे तें नाहींसें होईल.

ही इष्ट स्थिति घडवून आणण्यासाठीं जी एक गोष्ट अवश्य आहे ती ही कीं, महाराष्ट्रीय जनतेची सामुच्चयिक आणि वैयक्तिक कार्यशक्ति आज आहे त्यापेक्षां पुष्कळच अधिक विकसित झाली पाहिजे. ती याप्रमाणें विकसित होण्यासाठीं काय केलें पाहिजे हें शोधणें कर्तव्यात्मक समाजशास्त्राचा म्हणजे सामाजिक सुधारणेचा मुख्य भाग होय. समाजाची अंतर्गत स्थिति कशी असावी, तेथें सामाजिक भेदभाव कमी असावा अगर अधिक असावा हें समाजाच्या पुढें जें कार्य असेल त्यावरून ठरतें. महाराष्ट्रापुढें जें कार्य पूर्वी होतें त्यामुळें आजची स्थिति उत्पन्न झाली आहे. हें पूर्वीचें कार्य येणेंप्रमाणें होतें. महाराष्ट्रानें हिंदुस्थानांतील बऱ्याच मोठ्या भागावर राज्य करावयाचें, लोकांनीं सैनिक वृत्तीनें रहावयाचें आणि जमिनीची मालकी मिळवावयाची. या ध्येयामुळें व्यापार वगैरेकडे दुर्लक्ष झालें, आणि पुष्कळ प्रदेश थोड्या संख्येनें व्यापावयाच्या प्रयत्नामुळें देशास जें स्वरूप येतें तें प्राप्त झालें. याविषयींचें विशेष आंकडे महाराष्ट्रीय वाङ्मयसूचीच्या प्रस्तावनेंत दिले आहेत.

आतां आपणापुढील जो प्रश्न आहे तो व्याप्त केलेल्या प्रदेशास महाराष्ट्रीय स्वरूप कसें काय द्यावें याविषयींचा आहे, आणि पुढील प्रयत्न या दृष्टीनें होईल असा अजमास आहे. महाराष्ट्रीयांनीं अधिकांशानें व्यापिलेल्या प्रदेशास महाराष्ट्रीय स्वरूप यावें यासाठीं भाषेनुसार देशविभागणीच्या तत्त्वाचा अंमल झाला पाहिजे. देशाचे विभाग भाषेच्या तत्त्वानुसार पाडावें हें तत्व आतां लोकांस हळूहळू मान्य होऊं लागलें आहे आणि कै. लोकमान्य टिळकांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाचें जें कार्य म्हणून पुढें मांडलें त्यांत हें तत्त्व गोंवून दिलें आहे.

सामुच्चयिक कार्यशक्ति :— आतां यानंतर मुख्य प्रश्न हा आहे कीं, आपली सामुच्चयिक कार्यशक्ति कशी वाढवावयाची ?

एखाद्या समाजाची कर्तृत्वशक्ति मोजावयाची. ही मोजतांना आपण दोन प्रश्न विचारले पाहिजेत.

( १ ) समाजाची संघटित कार्यशक्ति काय आहे ?

( २ ) समाजांतील व्यक्तींची प्रत्येक व्यक्तीच्या कार्यानें उत्पन्न झालेली शक्ति एकत्र केली असतां किती होतें ?

समाजातील व्यक्तींची संघटित स्थितींत उत्पन्न झालेली कार्यशक्ति प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्रपणें कार्य करतांना दृग्गोचर होणाऱ्या शक्तीपेक्षां पुष्कळ पटीनें अधिक असते. राष्ट्र म्हणजे व्यक्तींची संघटित स्थिति. कंपनी, ट्रस्ट वगैरे संघ वस्तूंच्या उत्पादनासाठीं झालेले असतात आणि त्यांचें कार्यक्षेत्र नियमित असतें. ज्या संघांचें कार्यक्षेत्र नियमित नसून सर्वव्यापी आहे आणि मनुष्यमात्राच्या सामुच्चयिक स्थितीची पूर्णावस्था ज्या संघांत दृग्गोचर होते तो संघ म्हटला म्हणजे राष्ट्र होय. सर्वच राष्ट्रें आपल्या सर्व सभासदांचें म्हणजे नागरिकांचें सर्व प्रकारे श्रेय साधण्यासाठीं आपलें अस्तित्व आहे हें ओळखतात असें नाहीं. जें राष्ट्र हें कर्तव्य अधिक ओळखतें तें राष्ट्र अधिक प्रगमनशील आहे असें समजलें जातें. स्वातंत्र्यनाश म्हणजे नागरिकांच्या सामुच्चयिक हितास अत्यंत उत्कटतेस पोंचवावयाच्या संधीचा नाश होय. स्वराज्याची इच्छा म्हणजे सामुच्चयिक हित अधिकाधिक साधतां येईल अशा परिस्थितीची इच्छा होय. ही इच्छा जोपर्यंत अस्तित्वांत नाहीं तोपर्यंत स्वराज्याची इच्छा म्हणजे समाजांतील कांहीं चळवळ्या व्यक्तींना अधिक महत्त्वाचें पद मिळावें ही इच्छा होय.

महाराष्ट्रास स्वराज्य नाहीं म्हणजे महाराष्ट्रीयांस आपलें हितसाधन सामुच्चयिक प्रयत्नानें करण्याची संधि नाहीं. ही संधि नसतां महाराष्ट्रीयांचें सामुच्चयिक कार्य किती झालें याची मोजदाद करणें व्यर्थ वाटतें. आपणांस सोळा आणे सामुच्चयिक हितसाधन करून घेणें शक्य होण्यास दोन गोष्टी पाहिजेत. एक स्वराज्य पाहिजे आणि दुसरें सामुच्चयिक हितसाधनाची राष्ट्रांत आकांक्षा पाहिजे.

महाराष्ट्राची स्थिति एकंदरींत फार विलक्षण आहे. महाराष्ट्रांतील मुख्य राज्यकर्ते परके आहेत. इंग्रज, पोर्तुगीज व निजाम या त्रयीनें महाराष्ट्रांतील बहुतेक भाग व्यापला आहे. महाराष्ट्रीय संस्थानिक महाराष्ट्राबाहेर आहेत. तेथें जर राजांमध्ये प्रजेच्या हिताविषयीं दक्षता उत्पन्न होऊं लागली तर तिचा फायदा महाराष्ट्रीयांस न मिळतां इतरांस मिळणार. महाराष्ट्रीय हिताची वृद्धि स्वजातीय राज्यकर्त्यांमार्फत व्हावयासारखें क्षेत्र म्हटलें म्हणजे कोल्हापूर संस्थान आणि सांगली मिरजेसारख्या जहागिरी होत. तेथें स्वदेशीय लोकांच्या हातीं कांहीं तरी सत्ता आहे. महाराष्ट्रीय संस्थानांत देश्य लोकांच्या हितसाधनाचा प्रयत्न फारसा झालेला दिसत नाहीं याचें कारण तेथें असलेला एतद्विषयक विचारभाव होय. सामुच्चयिक प्रयत्नाचें क्षेत्र :— सोळा आणे हित साध्य होण्यासाठीं

काय आवश्यक गोष्टी आहेत त्यांची कल्पना मागें दिली आहे. स्वराज्य नसतां प्रयत्नास कांहीं एक क्षेत्र नाहीं असें मात्र नाहीं. सामुच्चयिक प्रयत्नास सध्यां जें क्षेत्र आहे त्याची स्थूल कल्पना येणेंप्रमाणें देतां येईल.

( १ ) भांडवलाच्या एकीकरणानें होणारे मोठे प्रयत्न.

( २ ) म्युनिसिपालिट्यांसारख्या संस्थांकडून होणारे प्रयत्न.

या दोन तऱ्हेच्या प्रयत्नांनीं कांहीं तरी सामुच्चयिक हित साध्य होईल.

सामुच्चयिक हिताची कल्पना अधिकाधिक वृद्धिंगत व्हावयासाठी सामुच्चयिक स्पर्धेची कल्पना स्पष्ट झाली पाहिजे. सर्व हिंदुस्थानामध्यें द्रव्यानें दुर्बळ असा जर वर्ग असेल तर तो महाराष्ट्रीयांचा होय आणि तो वर्ग सबल करणें हें प्रत्येक महाराष्ट्रीय संस्थेचें कर्तव्यकर्म आहे. ही कल्पना महाराष्ट्रीयांस जितकी अधिकाधिक पटेल तितका स्वकीय जनांच्या सामुच्चयिक हिताच्या वृद्धीसाठीं त्यांजकडून अधिकाधिक प्रयत्न होईल.

महाराष्ट्रीय लोकांना जगांतील स्पर्धेत ज्या अडचणी आहेत त्या भासावयास नुकताच प्रारंभ झाला आहे. आज समाजाचें धंद्यांच्या दृष्टीनें पृथक्करण केलें तर असें दिसतें कीं, महाराष्ट्रीय वर्ग दोन कार्यांत गुंतला आहे. एक कार्य शेतकी करणें व दुसरें व्यापारी अगर सरकारी नोकरी करणें हें होय. महाराष्ट्रांतील राजकीय किंवा सार्वजनिक चळवळी करणारा वर्ग एकंदर हिंदुस्थानाच्या सांपत्तिक स्थितींविषयीं आपल्या बुद्ध्यनुसार चळवळी करतो. पण महाराष्ट्रांतील कसाबसा जीव धरून काम करणारा जो व्यापारी वर्ग आहे त्याच्या हिताकडे लक्ष देऊन त्याविषयीं चळवळ काय करावी याविषयीं महाराष्ट्रांतील विचार करणाऱ्या वर्गांत फारशी फिकीर असल्याचें दिसत नाहीं. महाराष्ट्रांत सामान्यपणें व्यापार करणारा वर्ग जर अत्यंत लहान, थोड्या भांडवलाचा आणि दुर्बल आहे तर तो भांडवलाचें एकीकरण करून मोठमोठीं कार्यें घडविण्यासाठीं कसा प्रवृत्त होणार ? त्याची सामुच्चयिक महत्त्वाकांक्षाच लहान आहे. सर्व जगाच्या चळवळींत आपणांस कांहींतरी स्थान मिळावें या बुद्धीनें तो प्रेरित झालेला दिसत नाहीं. धंद्यांतील वाकबगारीः—मोठमोठ्या कल्पना करून मोठें कार्य पार पाडण्यासाठीं आणि देशांतील व्यापार आपल्या हातीं घेण्यासाठीं आज प्रयत्न नाहीं तर नाहीं, आज निदान एवढें तरी झालें पाहिजे कीं, मुख्य कार्यसूत्रें परक्याच्या हातीं असोत, पण दुय्यम सूत्रें तरी आपल्या हातीं रहावीं असा प्रयत्न पाहिजे. मोठ्या प्रमाणावर जे धंदे अगर कार्यें होतात त्यांची मुख्य कार्यशक्ति त्या कार्यास जो भांडवल पुरवतो त्याच्या ठायींच स्थित होते. भांडवलाच्या अल्पत्वानें अडचणींत पडलेल्या महाराष्ट्रीयांच्या हातांत हीं मुख्य कार्यसूत्रें येणे शक्य नाहीं, दुय्यम मुख्यपणाची सूत्रें विशिष्ट कामांत जो वाकब असेल त्याच्या हातीं असतात. भांडवलवाला त्याला जरी भाड्यानें घेतो तरी त्याच्या तंत्रानें बराचसा वागतो. महाराष्ट्रीयांच्या अंगीं हीं दुसऱ्या प्रकारचीं सूत्रें असल्याचेंहि दिसत नाहीं. तीं सूत्रें हातीं येण्यासाठीं कामांत वाकबगारी पाहिजे. ही वाकबगारी आज महाराष्ट्रीयांच्या अंगांत नाहीं; आणि असें करण्यास

कारणेंहि आहेत. एकतर महाराष्ट्रामध्यें साक्षरवर्ग गुजराथ्यांपेक्षां फारच लहान आहे. गुजराथी हिंदूमध्यें ( १० वर्षांपेक्षां अधिक वयाच्या ) साक्षरतेचें प्रमाण शेंकडा साडेबावीस आहे व तेंच महाराष्ट्रीयांच्या समाजांत शेंकडा सहा आहे. यामुळें व्यापारधंद्यांमधील वरच्या जागा मिळविणें आज महाराष्ट्रीयांस शक्य नाहीं. मुंबईच्या बहुतेक मोठमोठ्या व्यापारी संस्था गुजराथी, मारवाडी, पारशी यांसारख्या लोकांच्या आहेत, एवढेंच नव्हे तर त्या संस्थांतील मुख्य मदतनीस देखील त्यांच्यांतलेच आहेत. मराठी कुणबी ओझीं उचलण्याचें हमाली काम करण्यास उपयोगी पडतो व कधींकधीं महाराष्ट्रीय मनुष्य व्यापारी कारकुनी करतांना दिसतो, इतकेंच काय तें. व्यापारी कारकुनींत देखील महाराष्ट्रीय विरळाच.

या तऱ्हेची स्थिति असल्यामुळें जे प्रयत्न झाले पाहिजेत त्यांचें स्वरूप येणेंप्रमाणें सांगतां येईल.

( १ ) साक्षरता अधिकाधिक वाढविली पाहिजे.

( २ ) तरुण मंडळीपैकीं बरेच लोक अधिक विविध धंद्यांत शिरावे म्हणून संघटित प्रयत्न झाला पाहिजे.

( ३ ) लोकांच्या भांडवलाचें एकीकरण होऊन मराठी बोलणाऱ्या व्यापारी वर्गास प्रामुख्य मिळावें म्हणून प्रयत्न झाला पाहिजे.

आर्थिक महत्त्वाकांक्षा : महाराष्ट्राला आर्थिक महत्त्वाकांक्षा नाहीं. महाराष्ट्र या देशाला मोठी महत्त्वाकांक्षा उत्पन्न होईल काय? महाराष्ट्र हा आज संपन्न देश नाहीं. मोठमोठ्या रकमा एकत्र होऊन त्या लोकांच्या हातीं येऊन त्यांचा अधिकद्रव्योत्पादनार्थ उपयोग कसा काय करावा या तऱ्हेचा प्रश्न लोकांपुढें उत्पन्न झाला म्हणजे देशांतील भौतिक संपत्तीचें आणि त्या भौतिक संपत्तीच्या अनेक उपयोगांचें आणि उद्यमांस उपयुक्त होणाऱ्या भौतिक शक्तींच्या लीलांचें ज्ञान करून घेण्याची वृत्ति देशांत उत्पन्न होते. कारखान्यांस साहित्य जवळ मिळालें नाहीं तर दुरून मिळवावें, या प्रकारची कल्पना देखील व्यक्तीचें अवलोकनक्षेत्र विस्तृत करावयास लावते. या प्रकारची चोदना आज महाराष्ट्रास नाहीं. महाराष्ट्राच्या मोठमोठ्या रकमा फारशा कोठें गुंतल्या नाहींत आणि अनेक मनुष्यांच्या शिलका गोळा होऊन जो संचय होतो त्या प्रकारचा संचय महाराष्ट्रीयांच्या ताब्यांत नाही. त्यामुळें सर्व जगाकडे आर्थिक दृष्टीनें पाहण्याची महाराष्ट्रीयांची प्रवृत्तीच नाहीं.

व्यापाराची वृद्धि होण्यास अवश्य लागणारी एक गोष्ट म्हणजे राजधानीची किंवा उतारपेठेचीं ठिकाणें. अशी ठिकाणें महाराष्ट्रांत आजपर्यंत होऊन गेलीं त्यांपैकीं हिंदुकालामधील अवशेष देवगिरी, चौल व सोपारे याखेरीज दुसरे आढळत नाहींत. मुसुलमानी काळांत प्रसिद्धीला आलेलीं ठिकाणें म्हणजे विजापूर, अहमदनगर आणि इलिचपूर हीं होत. येथें चोहोंकडची संपत्ति येऊन खर्च होत गेल्यामुळे थोडीबहुत कला

वाढलेली दिसत असे. मराठी अमदानींत पुणें, नागपूर, कोल्हापूर हीं शहरें भरभराटीस आलीं आणि मराठी राहणीस उपयोगी पडणारी कला येथें थोडीशी वाढली.

व्यापारी राष्ट्र बनण्यास महाराष्ट्रीयांस अगदीं प्रारंभापासून अडचणी होत्या. अगोदर हें दण्डकारण्य उशिरा वसलेलें; त्यांत पुष्कळ भाग डोंगराळ. भेळघाट, बालाघाट, सह्याद्रि व सातपुडा हे डोंगर मालाच्या ने-आणीस बरीच गैरसोय करणार. महाराष्ट्राला जवळचें असें बंदर तरी कोणतें होतें ? येऊन जाऊन चौल. तेथील व्यापारी वर्ग कोणता होता याविषयीं आज स्पष्ट माहिती नाहीं. गुजराथची गोष्ट निराळी आहे. गुजराथला बंदरें पुष्कळ सुरत व भडोच हीं फार जुनीं बंदरें आहेत. त्यामुळें येथें बराच मोठा व्यापारी वर्ग येऊन राहिला. गुजराथी लोक व्यापारी बनले व महाराष्ट्रीय बनले नाहींत असें विधान करण्यापेक्षां व्यापार करणारे लोक गुजराथेकडे गेले असें विधान केलें असतां तें अधिक बरोबर होईल. गुजराथेमध्यें वाणी पुष्कळ आहेत, पण महाराष्ट्रांत वाण्याची जात जवळ जवळ नाहींच. कोंकणपट्टीला कांहीं कुडाळे वाणी, वैश्य वाणी म्हणून विड्यांचा धंदा करितात आणि पुण्याकडे थोडेसे काथर वाणी व कुळवंत वाणी आहेत. पण या सर्वांचे धंदे लहान प्रमाणावर आहेत. जे लोक मोठ्या उतारपेठेंत नाहींत ते लोक धंदा तरी काय करणार ? मराठी वाण्यांची कार्यशक्ति लहानशा दुकानदारीपलीकडे फारशी गेलेली दिसत नाहीं. पेशवाईमध्यें किंवा मराठेशाहीमध्यें सावकारीच्या धंद्यास एक निराळें क्षेत्र होतें. तें म्हटलें म्हणजे लढाया करणें, मुलुख जिंकणें इत्यादि खटपटींना पैसा पुरविणें हें होय. या प्रकारची सावकारी पुण्यास बरीच होती. त्याशिवाय सावकारीचें सध्यांचें जें जुजबी काम आहे तेंहि पूर्वी असेच. जमिनीवर किंवा दागिन्यांवर पैसा देणें हा व्यवहार जितपत सध्यां समजतो तितपत पूर्वीही समजत असे. कलाकौशल्य वाढविण्याच्या बाबतींत खटपट केली अशा तऱ्हेचा आरोप मराठेशाहीवर कधींच येणें शक्य नाहीं, तेव्हां कलाकौशल्याच्या संवर्धनासंबंधींच्या सावकारीचा हिशोब कशास घेत बसायचा ? महाराष्ट्रामध्यें जीं लुगडीं खपतात त्यांच्यादेखील महत्त्वाच्या पेठा म्हणजे अहमदाबाद, महेश्वर, इरकल या पेठा महाराष्ट्राच्या बाहेरच आहेत. कुणब्याच्या बायकांना वापरतां येण्याजोगीं लुगडीं आणि घरांत वापरतां येण्याजोगीं मडकीं हीं मात्र चोहोंकडे आढळतात. सध्या मराठी सुतारहि कोठें दिसेनासा झाला आहे. पांचकळशांनी तर आपला सुतारीचा धंदा सोडून दिल्यासारखाच आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हटल्यास चहाचीं दुकानें, किरकोळ वाणसौदा व स्टेशनरी आणि मधूनमधून सामान्य कापडाचें दुकान यापलीकडे महाराष्ट्राच्या हातांत कांहीं व्यापार नाहीं. कलाकौशल्य नाहीं आणि धंद्यास उत्तेजन देणारी सावकारीही नाहीं.

... पूर्वोक्त विवेचनावरून एवढें स्पष्ट होईल, कीं जगाच्या कोणत्याहि भागापेक्षां महाराष्ट्रांत व्यापारी कर्तृत्व पूर्वीपासूनच कमी आहे आणि तें वाढविण्यासाठीं जितकी खटपट करावी तेवढी थोडीच. व्यापारी शिक्षण, अथवा प्रत्यक्ष चढाओढीच्या धंद्यांत नोकरी आणि पुढें स्वतंत्रपणें व्यापार या प्रगतीच्या पायऱ्या आहेत. धंद्यांत प्रवेश व्हावा

यासाठीं तरुणांस व्यापारी नोकऱ्या लावून देण्याची खटपट झाली पाहिजे आणि सामान्य तऱ्हेच्या व्यापारी शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे.

पण या सर्वांपेक्षां एक गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. ती म्हटली म्हणजे खात्रीचें पण थोडें उत्पन्न मिळवावयाचें सोडून पुष्कळ उत्पन्न मिळवावें आणि त्यासाठीं साहस करावें ही वृत्ति वाढली पाहिजे. भर्तृहरि म्हणतो—

कुसुमस्तबकस्येव द्वयी वृत्तिर्मनस्विनाम् ।
मूर्ध्नि वा सर्वलोकस्य विशीर्येत वनेऽथवा ॥

हा उपदेश जयिष्णु महाराष्ट्रानें लक्षांत ठेवला पाहिजे.

[ ज्ञानकोश— प्रस्तावनाखंड, विभाग पहिला— हिंदुस्थान आणि जग पृ. ४५८–४६१...४६५ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६५९
दा. क्र. २३९९५
निबंध स्वतंत्र
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

# १२. महाराष्ट्राची काव्यग्राहकता

काव्य आणि ग्राहकता यांविषयीं येथें थोडेसें तात्त्विक विवेचन केलें पाहिजे. काव्य परीक्षण हे परीक्षकाच्या अभिरुचीचें द्योतक आहे आणि लोकांत अभिरुचि उत्पन्न करण्याचें साधन आहे. लोकांची अभिरुचि ही देखील दुय्यमच गोष्ट आहे. ती लोकांकडून जे काव्यग्रहण होतें तें ठरविण्याचें यंत्र आहे. समाजशास्त्रीय दृष्ट्या समाजाची ग्राहकता अनेकविध व्हावयास पाहिजे व अधिक सुशिक्षित झाली पाहिजे. समाजाकडून होणारें वस्तुग्रहण जसें जास्त कार्यकारी होतें तसा तो समाज अधिक समर्थ होतो. उदाहरणार्थ अन्न घ्या. समाज जितकें अधिक पौष्टिक अन्न खाऊं लागेल तितकी समाजाची अन्नग्राहकता सुधारेल, आणि समाज जर अपायकारक अन्नें किंवा पेयें यांचें ग्रहण करूं लागेल तर तितकी त्याची ग्राहकता कमी योग्यतेची ठरेल; यासाठीं समाजाकडून जें प्रत्यक्ष काव्यग्रहण होतें तो विषय चर्चेचा केला पाहिजे.

महाराष्ट्रीय जनतेच्या ज्या अनेक गरजा असतात त्यांत वाङ्मय ही किंवा काव्य ही गरज कितपत आहे ही गोष्ट आपण जाणली पाहिजे आणि तीवरून समाजाची या बाबतींतील उच्चनीचता ठरविली पाहिजे. ज्या समाजाला अधिक वाङ्मयाची गरज आहे तो समाज अधिक विकास पावलेला असें समजण्यास हरकत नाहीं. काव्याची गरज काढतांना काव्याचें सामाजिक कार्य ओळखलें पाहिजे. तें कार्य उत्पन्न झालेल्या काव्यवाङ्मयानें जितके अधिक चांगलें होईल तें काव्यवाङ्मय अधिक कार्यकारी होय. महाराष्ट्रीय काव्यग्राहकता तपासावयाची म्हणजे पुढील गोष्टींसंबंधानें विचार करावयाचा.

१ ) समाजाच्या एकंदर व्यापार समूहांत काव्य हें कोणतें कार्य करते ?

२ ) काव्याचा जो हेतु असेल तो हेतु काव्याच्या एकंदर कार्यांत समाविष्ट होतो काय ? तो हेतु जास्त कार्यकारी होण्यास काय करावें लागतें ?

३ ) काव्य नांवानें जी कृति उत्पन्न होते तिचें समाजाकडून ग्रहण होतें काय ? म्हणजे तें काव्य समाजाच्या मनोरचनेचा भाग होतें काय ?

४ ) दस्तूचा खप हें ग्रहण आहे काय ?

५ ) समाजाकडून जें ग्रहण होतें त्यांत तात्कालिक ग्रहण कोणतें व चिरकाल ग्रहण कोणतें ?

या प्रश्नांस उत्तरे येणेंप्रमाणें देतां येतील—

समाजांतील काव्याचें कार्य काय हें सांगावयाच्या पूर्वी काव्य याचा अर्थ कांहीं तरी निश्चित आहे असें गृहीत धरावयास पाहिजे, आणि कित्येक असें म्हणतील कीं काव्य या शब्दाची कायमची व्याख्या तर ठरलीच नाहीं. आपल्याकडे तरी बऱ्याच

लोकांचा " वाक्यं रसात्मकं काव्यं " इतपत विचारनिश्चय झाला आहे. इंग्रज साहित्य-शास्त्रांत तितपत देखील निश्चय झाला नाहीं. तर मग काव्य समाजांत काय कार्य करतें याचें विवेचन कसें करणार ? याला उत्तर असें आहे कीं, व्याख्या जरी लोकांस करता आली नाहीं तरी अमुक कृति काव्य आहे काय हें लोकांस समजतें. स्त्री सुंदर आहे किंवा नाहीं हे लोक सांगू शकतात. त्यांस सौंदर्याची व्याख्या करतां येत नाहीं; पण तशीच ही गोष्ट आहे. तर प्रस्तुत प्रसंगीं काव्य काय आहे या वादांत न शिरतां मी " लोकांस आकर्षक अशी पद्यमय रचना " या अर्थानें हा शब्द वापरीत आहें एवढेंच सांगतों. पद्यमय काव्य लोकांस अगोदर परिचित असतें, त्यांत त्यांना पद्यस्वरूपाशिवाय दुसऱ्या गोष्टींतहि कांहीं सादृश्य वाटतें; आणि काव्यास काव्यत्व पद्यस्वरूपामुळें न येतां दुसऱ्याच कांहीं गोष्टींमुळें येतें असें ते म्हणूं लागतात. काव्य हें गद्य असूं शकतें हा नंतरचा विचार उत्पन्न होतो, आणि त्या दृष्टीनें जरी गद्य काव्य हें काव्य आहे असें शास्त्रज्ज्ञ सांगतात तरी त्यास लोक मानीत नाहींत. तें म्हणणें साहित्यशास्त्रज्ञापाशींच रहातें. जेव्हां आकर्षक असा मजकूर पद्यांत असतो तेव्हां त्याला लोक काव्य म्हणतात. ती रचना " रसात्मक " असली म्हणजे लोकांस आकर्षक होते हें देखील सत्य नसून आकर्षकतेचें कारण शोधून काढण्याचा प्रयत्न आहे. पद्यस्वरूप, उपमा, इतर अलंकार, रस या सर्व गोष्टी वाक्यास काव्यत्व देतील.

आकर्षकता हा सामुच्चयिक परिणाम आहे. काव्य जें लोकांस आकर्षक होतें, तें अनेक कारणांनीं होतें. कित्येकदां सुगम अर्थामुळें काव्य आकर्षक होतें, तर कधीं कधीं गूढ भाषेमुळें होतें. ज्ञानेश्वरी हें काव्य नाहीं तथापि ज्ञानेश्वरींतील बरींच अंगें काव्य आहेत ही गोष्ट कोणी नाकबूल करणार नाहींत. साधीच गोष्ट किंवा साधेंच वाक्य पद्यांत सांगितलें असतां तें लोकांच्या मनांत लवकर अडकतें व आकर्षकहि होतें. धातूंच्या कारिका किंवा संस्कृत शास्त्रीय ग्रंथ पद्यमय असतात, म्हणून ते काव्य होत नाहींत, वगैरे म्हणणें खरें आहे आणि काव्य गद्यांत असणे शक्य आहे हेहि खरें आहे; पण हीं दोन्हीं आत्यंतिक स्वरूपाचीं उदाहरणें सोडून दिलीं तर काव्याला काव्यत्व येण्यास पद्यमय रचना उपयोगी पडते हेंहि कबूल केलेंच पाहिजे. केवळ पद्यमय रचनाच नव्हे, तर अलंकारशास्त्रांत ज्यांस हलके अलंकार समजतात, असे जे अनुरूप यमकादि अलंकार त्यांची योजना गद्यांत झाल्यामुळें गद्य देखील आकर्षक होऊं शकतें. जेव्हां आपण वेश्या, वैद्य व वकील ही त्रयी उच्चारतों, तेव्हां त्या तीन गोष्टींमध्ये कांहीं तरी संबंध आहे आणि तो अनुप्रासाचा आहे, एवढेंच नव्हे तर दुसरा कांहीं सारखेपणा त्यांमध्यें आहे असा लोकांत आभास होतो. मनुष्याच्या वित्ताचे हे तीन चोर अशी कल्पना ही शब्दत्रयी उत्पन्न करणाऱ्याच्या मनांत वावरत असली पाहिजे. असा अनुप्रासयुक्त शब्दसमुच्चय तयार झाला म्हणजे तो लोकांत पसरतो. तो लोकांत पसरतो याचें कारण त्यांत वकील आणि वैद्य यांच्या उपहासाची भावना असते, प्रास असतो वगैरे अनेक कारणें असतात व यामुळें या तीन शब्दांच्या एकत्र स्थितीस काव्य म्हणतां येईल. लोकांस त्यांना हें कां

आवडतें तें सांगता येणार नाहीं पण ते शब्दसमुच्चय आवडून ते ते पसरवितात हें मात्र खरें. लोकांमध्यें काय ग्रहण होईल या विषयीची वस्तुस्थिती पाहून काव्यनियम काढण्याची कृति अजून झाली नाहीं. लोकप्रियता अगर लोकग्रहण या काव्याच्या अंतिम कसोट्या ठरवून धैर्यानें त्याप्रमाणें प्रत्यक्षमूलक शास्त्ररचना करणें ही क्रिया साहित्यशास्त्रांत अजून व्हावयाचीच आहे. या दृष्टीनें आपणांस अभ्यास करावयाचा झाल्यास पुस्तकांचा खप, नाटकास गर्दी यांची मोजदाद वगैरे गोष्टी उपयोगी पडतील.

समाजाच्या व्यापारग्रामांत काव्य हें जें काम करतें, तें विचार किंवा कथा यांस मोहक करून ती समाजास ग्राह्य करण्याचें होय. ज्याप्रमाणें अन्न ही मनुष्याची आवश्यक गोष्ट आहे पण गोडी ही अन्नग्रहणास साहाय्य करते, त्याप्रमाणेंच काव्य हें विचार व कथा यांची ग्राह्यता वाढवितें. विचार, कथा वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टींस गोडी ज्या ज्या कारणांनीं उत्पन्न होते त्या त्या गोष्टी काव्य होत. तथापि ज्याप्रमाणें आपणांस भाव अथवा गुण पदार्थानें व्यक्त होतो, पदार्थनिरपेक्षगुण आपणांस बुद्धिगोचर होत नाहीं, त्याप्रमाणेंच काव्य आपणांस वस्तूशिवाय म्हणजे कृतीशिवाय गोचर होत नाहीं. यासाठीं काव्याचें भाववाचक वर्णन म्हणजे कवित्व लोक चटकन ओळखत नाहींत ते कृतीतच ओळखतात. मनुष्यास प्रथमतः वस्तूच दृग्गोचर होते, व सदृश गोष्टी अनेक दिसल्या म्हणजे त्यांत असलेला गुण मनुष्यास कळू लागतो; विचार आणि कथा या गोष्टी लोकांस परिचयाच्या आहेत त्यांस लोक काव्य म्हणत नाहींत पण त्यांची विशिष्ट तऱ्हेनें मांडणी झाली म्हणजेच लोक त्यास काव्य म्हणतात, व त्या स्थितींत विचार आणि कथा लोकांस अधिक ग्राह्य होतात. तर काव्याचें कार्य म्हटलें म्हणजे समाजाच्या ज्या इतर अनेक गरजा आहेत, त्यामध्यें माधुर्यानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी आकर्षकतेनें ग्राह्यता उत्पन्न करणें हें होय. समाजामध्यें लोकांस उपदेश पाहिजे. लोकांस जी संस्था टिकवावयाची असेल, ती संस्था टिकविण्यासाठीं तिच्याभोंवती तेजोमंडळ निर्माण झालें पाहिजे, आणि यासाठीं त्या संस्थेशीं संबद्ध ज्या व्यक्ती असतात त्या गौरविल्या पाहिजेत. समाजास जुन्या आठवणी राखावयाच्या असतात. तर त्या आठवणी आकर्षक रीतीनें लोकांपुढें आल्या पाहिजेत, यासाठीं उपदेश, संस्थासंबद्ध व्यक्ती, जुन्या आठवणी यामध्यें जो गुण किंवा द्रव्य मिसळावयाचें तो गुण किंवा तदाश्रयी द्रव्य हें काव्य होय. तर समाजांतील काव्य आपलें इष्ट कार्य करीत आहे किंवा नाहीं, हें पहावयाचें म्हणजे ज्या गोष्टी समाजांत अवश्य आहेत, त्या गोष्टींचें संरक्षण करण्याकरितां त्यासंबंधी वाङ्मयांत काव्य हें द्रव्य मिसळलें आहे किंवा नाहीं हें म्हणजे आकर्षकता मिसळली आहे किंवा नाहीं हें पहावयाचें, व त्या दृष्टीनें समाजास लागणारें वाङ्मय पुरवीत रहावयाचें. जर हें कार्य चांगल्या रीतीनें बजावलें गेलें नाहीं तर समाजांतील कविताकौशल्य उत्तम रीतीनें खर्ची पडलें नाहीं असें समजावें.

काव्य ह्या गुणाचा उपयोग अधिक कार्यकारी रीतीनें होण्यासाठीं आपण जे प्रश्न उत्पन्न करावयाचे ते हे कीं ( १ ) समाजग्राह्य अशा ज्या गोष्टी आहेत त्यांपैकी जितक्या

अनेक गोष्टींत काव्य मिसळलें जाईल, तितक्या अनेक गोष्टींत काव्य मिसळलें गेलें आहे किंवा नाहीं ? (२) काव्य मिसळलें गेल्याच्या योगानें जो इष्ट परिणाम व्हावयाचा तो झाला आहे किंवा नाहीं ? या दोन दृष्टींनीं विचार केला तर समाजाची काव्यशक्ति उत्तम तऱ्हेनें कारणीं लागली नाहीं असें म्हटलें तरी चालेल. स्वराज्यास व स्वसाम्राज्यास कवींनीं उत्तेजन दिलें नाही व राज्यकर्त्यांनीं कवींचे याबाबतींतील महत्त्व ओळखलें नाही असें शिवकालोत्तर कालाकडे पाहिलें असतां वाटतें. शिवकालीं मात्र कवींचा उपयोग करण्यांत आला. मराठी राज्याच्या स्थापनेनंतर त्या राज्यास स्थैर्य देण्यासाठीं जी गोष्ट अवश्य होती, ती म्हटली म्हणजे शिवाजीसारख्या राज्यसंस्थापकाविषयीं लोकांच्या मनांत आदर उत्पन्न करणें. हा आदर उत्पन्न करावयाचा होता तो शिवाजीभोंवतीं तेजोवलय उत्पन्न करण्यासाठीं करावयाचा होता. आणि शिवभारतकारांकडून यासाठीं शिवाजीला ईश्वरांश किंवा अवतारी पुरुषपणा देण्यांत आला. शिवाजीकालीं जें तेजोवलय निर्माण करण्यांत आलें तें वाढवितां येण्याजोगें होतें, ही गोष्ट, या राजघराण्याविषयीं आदर सर्व हिंदुस्थानभर पसरला होता व शाहूस बंगाली काव्य महाराष्ट्रपुराण यांत नंदीचा अवतार बनविलें होतें यावरून स्पष्ट होईल. एवंच काव्यगुणाचा शासनसंस्थेच्या अभिवृद्धीसाठीं नियमित कां होईना पण उपयोग झाला तसेंच भक्तिधर्माचें महत्त्व लोकांत स्थापन करावयाचें होतें, यासाठीं भक्तांभोंवतीं त्यांच्या चमत्कारांचीं तेजोमंडळें मिर्माण करण्यांत आलीं. व या दोन गोष्टींनीं समाजांतील काव्य शक्तीचा उपयोग झाला व हे दोनहि परिणाम बरेच स्थायी स्वरुपाचे झाले. महानुभाव, जैन, इत्यादि संप्रदायांनीं आपापल्या पुरुषांचा तसाच गौरव केलेला आहे.

आतां महाराष्ट्राच्या प्रत्यक्ष काव्यग्रहणाकडे वळूं.

काव्याचा खप व काव्यग्रहण या गोष्टी भिन्न आहेत. पुस्तकाचा खप होणें म्हणजे ग्रहण नव्हे, ग्रहण म्हणजे वाचनहि नव्हे तर ग्रहण म्हणजे वाङ्मयांतील भाग समाजानें उपयोगी करून घेणें होय; या दृष्टीनें वाङ्मयाचें अवलोकन झालें पाहिजे.

मराठी राज्यांत जरी या दोन बाबतींत काव्याचा पुष्कळ उपयोग झाला, तरी जें काव्य निर्माण झालें, त्यांतील शब्द चीरजिवी झाले नाहींत. काव्यांचा एकंदर गोळाबेरीज परिणाम मात्र चीरजिवी झाला, व पूर्वीची जीं कथानकें होतीं, ती कथानकें ज्या व्यक्तींवर होतीं, त्या व्यक्तींत शिवाजीमहाराज व संतमंडळी यांखेरीज इतर मंडळाची भर पडली नाहीं, याचें कारण राजपुरुष व कवि यांची एकमेकांच्या कार्यमहत्त्वासंबंधानें अनभिज्ञता हें तर आहेच, पण दुसरीहि कारणें आहेत. शिवाजी इतकीच दुसरी कोणतीच व्यक्ति महाराष्ट्रीय मनावर परिणामकारी झाली नाहीं. संभाजीच्या वधामुळें त्यास एक तऱ्हेचें कवीस प्रेरणा करण्याजोगें गौरव आलें होतें. परंतु संभाजीकडे लोकांचें लक्ष गेलें नाहीं याचें कारण संभाजीची क्रूर कृति लोकांच्या नजरेंत होती हें होय. संभाजी व कलुषा हे दोघेहि हिंदी कवितेचे आश्रयदाते होते पण मराठीचे नव्हते हेंहि कारण असावें. ताराबाईचा पक्ष हा संभाजीच्या वंशपरंपरेच्या विरुद्धच होता. व त्याच्यानंतर पेशवे आले.

पेशव्यांस महाराजपद नव्हतेंच, आणि लोकांची भक्ति त्यांच्या एकंदर वैभवावर जडली नाहीं. बऱ्याचशा लोकांस पेशवे केवळ परराज्य आणि परद्रव्य यांचे अभिलाषी वाटले. व त्यामुळें त्यांच्याभोंवतीं तेजोवलयें निर्माण झालीं नाहींत. असो.

ऐतिहासिक वीरपुरुषांस महापुरुषत्व यावें याशिवाय लोकांची दुसरी गरज होती ती म्हणजे सामान्य उपदेशाचीं वाक्यें होत; तर त्या बाबतींमध्यें अनेक काव्यांमधून लोकांनीं आपणांस आवडणारे अंश काढून घेतले व ग्रहण केले असा सामान्यपणें लोकांच्या काव्य-ग्रहणाचा अगदीं स्थूल इतिहास देतां येईल. वस्तूंचा रूप हें ग्रहण आहे काय, व तात्कालिक ग्रहण व चिरकालीन ग्रहण या मुद्यांकडे सध्यां वळत नाहीं. महाराष्ट्रीय समाजांत चालू असलेलें वाङ्मयग्रहण अधिक तपासलें पाहिजे.

काव्य हें समाजाची प्राथमिक गरज नाहीं असें पुष्कळांस वाटेल पण तशी स्थिति नाहीं. अगदीं रानटी लोकांत देखील काव्य असतें वा चित्र असतें. तें काव्य फार सुंदर असतें अशातला भाग नाहीं. आणि तो मनाला चेतना देणारा विषय असतो असेंहि नाहीं. उलट रानवट, लोकांचीं गाणीं पाहिलीं म्हणजे ती देवांची स्तुति, जादू, व्यावहारिक गोष्टी वगैरे सतरा पंधरा गोष्टींची भेसळ असते. त्यांच्यामध्यें भक्ति फार असते असेंहि नाहीं. त्यांचीं देवस्तोत्रें उलट "देवा तूं जर मला हें देशील तर तुला मी तें देईन." म्हणून सांगणारींच असतात. पुष्कळ असंस्कृत लोकांचीं प्रेमकाव्यें म्हणजे मीं तुला काय देईन हेंच प्रेमपात्र झालेल्या स्त्रीस सांगणारीं असतात. पण अगदीं जंगली लोकांचें देखील वाङ्मय बरेंच असतें. त्यांचीं गाणीं, त्यांच्या पूर्वजचरितांच्या कथा, स्तोत्रें इत्यादि गोष्टी त्यांच्यापाशीं असतातच. त्यांच्या वाङ्मयांत देखील कांहीं वाङ्मय धंदेवाइकांचें व कांहीं प्रत्येक मनुष्याचें असतें. गोंड वगैरे लोकांमध्यें त्यांच्या बड्या देवांच्या कथा प्रत्येक गोंडास ठाऊक असतात असें नाहीं. पण एक दोन गाणीं प्रत्येक मनुष्यास येत असतातच. पण त्यांच्यातील उपाध्ये वर्गास पुष्कळच जास्त गोष्टी ठाऊक असतात. आजच्या महाराष्ट्रीयांचें वाङ्मय संस्कृत, मराठी व इंग्रजी या तीन भाषांत आहे. आणि तें अनेक प्रकारचें आहे. प्रत्येक पांढरपेशा महाराष्ट्रीय मनुष्याकडून वापरलें जाणारें वाङ्मय हें बरेंच असतें. त्याचा आढावा घेऊं.

हें विशेषेंकरून पंचवीस वर्षांपूर्वीच्या पिढीविषयीं सांगतों. सध्यां स्थिति बदलत आहे व अनेक गोष्टींचा लोप होत आहे, व नवीन परिस्थितीची घडी बसली नाहीं अशी स्थिति आहे. पंचवीस वर्षांपूर्वी साधारण स्थिति होती ती येणेंप्रमाणें—

( १ ) अर्भक लहान असतां 'अडगुलं मडगुलं' वगैरे कांहीं अर्थ न समजणारी वाक्यें आईकडून मूल ऐकत असे शिवाय आई मुलाला पाळण्यांत घालून तुळशीखालीं पोथी वाचणाऱ्या रामाच्या कांहीं ओंव्या म्हणत असे.

( २ ) लहान मुलगे मुंजीपूर्वी स्तोत्रें पाठ करीत, व कांहीं निवडक श्लोक पाठ करीत. कांहीं ठिकाणीं भूपाळ्या सकाळीं म्हणण्याचा प्रघात होता.

( ३ ) मुली गाणीं पाठ करीत. तीं गाणीं राम, कृष्ण वगैरेंची असत.

याशिवाय निश्चयात्मक नित्य वापरलें जाणारें कोणतेंच मराठी वाङ्मय सर्वतोमुखीं नाहीं.

नैमित्तिक पाठ झालेलें वाङ्मय म्हटलें म्हणजे आरत्या होत.

ब्राह्मणांच्या रोजच्या वाचनांत येणाऱ्या ग्रंथांमध्यें गुरुचरित्र, दासबोध व शिवलीलामृत हे ग्रंथ होते. मुक्तेश्वर सर्वश्रेष्ठ मराठी असेल पण घरोघर शिरलेले आख्यानवाङ्मय श्रीधराचें होतें. नित्य वापरल्या जाणाऱ्या संस्कृतवाङ्मयामध्यें संध्या, पुरुषसूक्त व पूजामंत्र यांचा अंतर्भाव करतां येईल. स्त्रियांच्या नैमित्तिक वाङ्मयामध्यें मंगळागौरीची आरती वगैरे वाङ्मय घालतां येईल. "तपेलीची लांब दोरी । तपेली संबळपूरी" वगैरे महामंत्र या सदरांतच येतात.

महाराष्ट्रीय पांढरपेशा समाजाची गरज म्हणून असलेलें वाङ्मय पण जें धंदेवाईकांच्या हातीं गेलेलें होतें असें म्हटलें म्हणजे—

( १ ) संस्कारप्रसंगीं किंवा श्रौतस्मार्त किंवा पौराणिक कर्मे करण्याच्या प्रसंगीं लागणारे मंत्र वगैरे.

( २ ) लग्नमुंजीनंतर घातला जाणारा गोंधळ. या वेळेस पवाडे म्हटले जातात.

नैमित्तिक पण धार्मिक किंवा रूढीची सक्ति नसलेलें पण स्वेच्छेचें असें वाङ्मय.

( १ ) जेव्हां चार बायका गव्हले, शेवया करण्यास किंवा वाती करण्यास जमत तेव्हां प्रत्येक बाई आपणांस ठाऊक असलेलें गाणें म्हणून दाखवी. असल्या गाण्यांत सीता सावित्री वगैरेंचीं गाणीं येत.

( २ ) पुराण व कीर्तन यांचें श्रवण. पुराण व कीर्तन हीं देवळें व मठ याशीं संयुक्त असतात किंवा खाजगी होतात. या पुराणांमार्फत रामायण, महाभारत व पुराणें व विशेषेंकरून महात्म्यें यांची ओळख लोकांस होत असे.

( ३ ) भोजनप्रसंगी म्हणावयाचे श्लोक.

पुराण व कीर्तनें यांत अनेक प्रकारचें वाङ्मय येत असे. भागवताचे सप्ताह चालत व रामायणाचेंहि चालत त्यामुळें हे दोन ग्रंथ ऐकवले जातच होते. शिवाय जर कधीं चांगला पंडित आला तर विद्यारण्याच्या पंचदशीवर देखील "पुराण" चालत असे. तसेंच कांहीं कीर्तनांतून कथाभाग मुळींच न येतां केवळ ब्रह्मनिरूपणाचीं कीर्तनें चालत. जास्त उच्च प्रकारचें जें वाङ्मय आहे तें खासगी रीतीनें जो तो घरीं वाची. तथापि सामाजिक चाल म्हणून आवश्यक झालेलें वाङ्मय एवढेंच. येणेंप्रमाणें वाङ्मयोपयोग मोठ्या शहरांतून असे.

महाराष्ट्रांत ग्रहण होणाऱ्या वाङ्मयाचा मी वर समाजांत वाङ्मय वापरल्या जाणाऱ्या प्रसंगाचा आढावा दिला आहे तो एकदेशीय म्हणजे शहरांत राहणाऱ्या ब्राह्मण व पांढरपेशा समाजाचा आहे. शेतकरी लोकांच्या दैनिक आयुष्यक्रमांत वाङ्मयोपयोगाचे प्रसंग निराळे असतात, त्यामुळे ब्राह्मणी वाङ्मय व अनागर वाङ्मय असे वाङ्मयाचे दोन भेद लक्षांत घेऊन पृथक्करण केलें पाहिजे. प्रत्येक समाजांत सामान्यजनवाङ्मय आणि पंडित-

वाङ्मय किंवा उच्चजनवाङ्मय असे वाङ्मयग्रहणाच्या दृष्टीनें भेद आहेत. या भेदांचें कारण केवळ दोघांचे विषय भिन्न किंवा अभिरुचि भिन्न किंवा दोघांच्या सभ्यतेच्या मर्यादा भिन्न हें नव्हतें. त्या भिन्नतेंत कांहीं अंशीं जातिभेदाचा वास येतो. जें वाङ्मय कुणबी वापरतात तें ब्राह्मणांनीं कसें वापरावयाचें अशी वृत्ति समाजांत होती व आहे. ब्राह्मणांचें व सामान्य जनतेचें वाङ्मय असा भेद वारंवार दृष्टीस पडतो, तो वेदकालापासून आजतागाईत चालू आहे. मधून मधून लौकिक वाङ्मयावर संस्कार होऊन सामान्य जनांचें जें वाङ्मय आहे तें ब्राह्मणांचें वाङ्मय होत असे. संगीतशास्त्रांत असें झालें आहे कीं, वैदिकांचें सामसंगीत चालू असतांच लौकिक गानास शास्त्र लागून संगीत रत्नाकरादि ग्रंथ निर्माण झाले. त्या संगीतास ब्राह्मणांनीं आश्रय दिल्यानंतर सामसंगीत बुडालें, तसाच इतिहास वाङ्मयाचा आहे. वैदिक वाङ्मय लोकप्रचारांतून जाण्याची क्रिया सूतवाङ्मयास ब्राह्मणी संस्कार मिळाल्यानें झाली, आणि सूतवाङ्मय म्हणजे महाभारत व पुराणें यांच्यासारखे ग्रंथ हेच ब्राह्मणी ग्रंथ झाले. तीच कथा उपासनापद्धतींतहि झाली. लोकांचीं दैवतें हींच ब्राह्मणांचीं दैवतें झालीं, आज खंडोबा हें झाडून साऱ्या देशस्थ ब्राह्मणांचें दैवत बनलें आहे.

ब्राह्मणी वाङ्मय हें नेहमीं उच्च दर्जाचें होतें असें नाहीं; पण त्यांत भाषाशुद्धि जास्त असे, त्यांत मराठी ग्रंथांच्या ऐवजीं संस्कृत ग्रंथांचा उपयोग जास्त होई. उदाहरणार्थ, रामरक्षा व संस्कृत स्तोत्रें यांची वाङ्मयाच्या दृष्टीनें व धार्मिक वाङ्मय या दृष्टीनें योग्यता मराठी भक्तिवाङ्मयापेक्षां कमीच आहे; पण तीच ब्राह्मणांमध्यें प्रचलित आहेत.

कुणब्यांचें वाङ्मय अश्लील असतें व ब्राह्मणांचें नसतें असें नाहीं. ब्राह्मणांचें प्राकृत वाङ्मय सामान्यतः प्रतिष्ठित दिसतें. पण तो प्रतिष्ठितपणा भाषेच्या स्वरूपांतच कायतो असतो. वामनाचें राधाविलास, राधाभुजंग या काव्यापेक्षां होनाजी बाळाच्या लावण्या खास अश्लील नाहींत. उलट अनेक लावण्यांत उत्तम प्रकारचें काव्य सांपडतें. त्यांत जितके प्रेमी जनांच्या अंतःकरणांतील उमाळे व्यक्त केले आहेत तितके वामनाच्या राधाविलास किंवा राधाभुजंगांत नाहींत. त्यांत नुसतेंच संभोगशृंगाराचें वर्णन आहे. लावण्याविषयीं तुच्छता दाखवावयाची आणि वामनपंडितादि कवींच्या श्लोकबद्ध शृंगारिक कवितेला प्रतिष्ठित वाङ्मय मानावयाचें हा समाजांतील सांपत्तिक दृष्ट्या व शिक्षणदृष्ट्या कनिष्ठ वर्गाच्या व गरीब जातींच्या तुच्छतेचा प्रकार आहे. दुसरें कांहीं नाहीं. संस्कृत कवी तर प्राकृत कवींपेक्षां फारच अश्लील आहेत. संस्कृत काव्य सामान्यांना समजत नाहीं तेव्हां चार संस्कृत जाणणाऱ्या मंडळींना आपापसांत अत्यंत अश्लील भाषण करावयास सांपडावें, आपण तसें करतांना आपल्याला रसिक म्हणवून घ्यावें, आणि संस्कृतज्ञांच्या कोंडीबाहेर पडल्यानंतर गंभीर मुद्रा धारण करावी, आणि अत्यंत सभ्यपणाच्या गोष्टी बोलूं लागावें, असा हा अव्वल इंग्रजींतल्या शास्त्री मंडळींचा परिपाठ होता. तो परिपाठ सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वर्गांत अजून चालू आहे. तो परिपाठ एका पूर्वीपासून आलेल्या सामान्यजनवाङ्मयाच्या तिरस्काराचा परिणाम होता आणि त्या प्रकारची वृत्ति अजून देखील दृष्टीस पडते.

ब्राह्मणांचें वाङ्मय आणि शूद्रांचें वाङ्मय हा भेद केवळ शृंगारिक वाङ्मयांत होता असें नाहीं, धार्मिक वाङ्मयांत होताच आणि यामुळें संस्कृत स्तोत्रांसारख्या कर्मा भावनेच्या वाङ्मयाचीच किंवा संस्कृत शब्दमिश्रित प्राकृत वाङ्मयाची ब्राह्मणांत चहा होती. ब्राह्मणांमध्यें संत व भक्त बरेच झाले आहेत पण ब्राह्मणांची एकंदर वृत्ति भक्तीकडे फारशी दिसत नाहीं. पांडित्य आणि भक्ति यांची थोडीशी फारकत दिसते, आणि या फारकतीचा परिणाम काव्याभिरुचीवर होई. जें काव्य संस्कृत शब्दांनीं युक्त व प्रतिष्ठित वृत्तांत रचलेलें असेल त्याची ब्राह्मणांत चहा होई. एवढेंच नव्हे तर जें काव्य गूढ अर्थाचें असेल त्याचा अर्थ सांगण्याच्या पैजा लावाव्यात, एकानें तो गूढ अर्थ उकलून सांगण्याची ऐट करावी, असले प्रकार कोंकणांतल्या व त्याप्रमाणें वऱ्हाडांतल्या ब्राह्मणांच्या ओस्र्यांवर पंचवीस वर्षांपूर्वी नेहमीं चालत असलेले दिसत असत, व अजूनहि हे प्रकार खुद्द पुण्यामध्यें कांहीं ठिकाणीं दिसतात.

[ विद्यासेवक वर्ष ४ अंक ११–१२ पृ. १०९ ते ११५ ]

## १३. सामाजिक परिस्थिति, ग्रंथपरीक्षण आणि ग्रंथक्षेत्र

इंग्रजी राज्यापूर्वी चालू असलेलें ग्रंथपरीक्षण खुद्द ग्रंथोत्पत्ति करणारांकडूनच झालें. त्यामुळें ग्रंथरचनाकारांची व परीक्षण करणारांची दृष्टि एकच होती. तीमुळें ज्या ग्रंथोत्पत्तीस मर्यादा उत्पन्न झाल्या त्याच मर्यादा ग्रंथपरीक्षणास देखील उत्पन्न झाल्या. ज्या प्रकारचे ग्रंथ लोक करीत त्या प्रकारचेच ग्रंथ त्यांस आवडत. ते हरिभक्तीची काव्यें करीत, आणि ज्या काव्यांत हरिभक्ति नसेल त्या काव्यांस नांवें ठेवीत. तर काव्यपरीक्षकांची मनोभूमिका समजावून घ्यावयाची झाली तर ग्रंथकारांचीच मनोभूमिका समजावून घेतली पाहिजे, आणि ग्रंथकारांची मनोभूमिका समजावून घ्यावयाची म्हणजे ज्या सामाजिक आणि वैज्ञानिक परिस्थितींत ती मनोभूमिका उत्पन्न झाली ती परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. ग्रंथाभिरुचि व ग्रंथक्षेत्र हीं वैज्ञानिक त्याचप्रमाणें सामाजिक कारणांनीं मर्यादित झालीं आहेत.

लोकांच्या मनोवृत्तीचा आणि काव्योत्पादनाचा निकटचा संबंध आहे. काव्याचें परीक्षण लोक आपल्या मनोवृत्तीप्रमाणेंच करणार, व लोकांची मनोवृत्ति काव्योत्पत्तीची नियामक होणार; एकंदर वाङ्मयोत्पत्तीचें स्वरूप लोकांच्या गरजा आणि मनोवृत्ति यामुळें ठरत असतें तर मराठी वाङ्मयाचें स्वरूप ठरविणारी जी एकंदर जनतेची सामाजिक स्थिति आणि सामाजिक व्यापारविषयक मनोवृत्ति होती त्यांचें स्वरूप नीट लक्षांत घेऊन त्यांचा ग्रंथोत्पत्तीवर आणि परीक्षणावर काय परिणाम झाला हें मांडलें पाहिजे.

सामाजिक परिस्थितीचा परिणाम पाहतांना मराठी भाषा कोणत्या सामाजिक व्यापारांकडे लावली गेली व गेली नाहीं; आणि कोणत्या बाजूंनीं मराठी वाङ्मयाची वाढ आणि संकोच हीं झालीं या बाबतींत पाहिला पाहिजे. मराठी वाङ्मयाची वाढ सर्व बाजूंनीं न होतां कांहीं बाजूनीं तेवढीच झाली. धार्मिक विधि, राजकारण इत्यादि गोष्टींवर मराठींत ग्रंथ झाले नाहीत. विधि संस्कृतमध्येंच राहिले, व राजकारणविषयक पत्रव्यवहार प्रथम फारसींत होत होता. व तो मागाहून थोडाबहुत मराठींत होऊं लागला होता. मराठींत शास्त्रीय उच्च स्वरूपाचें वाङ्मयच झालें नाहीं. कारण समाजाची गरजच त्या प्रकारची होती. उच्च प्रकारचें शास्त्रीय वाङ्मय ज्यासाठी होतें त्यांना सर्व हिंदुस्थानशीं संबंध ठेवावयाचा होता. यासाठीं त्यांना शास्त्रांची भाषा संस्कृतच ठेवावी लागली. आतां संस्कृत शास्त्रांचा आढावा घेऊन मराठींत त्यांचा कितपत अंश येणें असलेल्या परिस्थितीस शक्य होतें आणि जास्त येण्यास काय पाहिजे होतें, हें पाहिलें पाहिजे आणि नंतर मराठींत जें वाङ्मय ज्या स्वरुपांत आलें त्याची कारणें पाहिलीं पाहिजेत.

संस्कृत शास्त्रापैकीं कांहीं शास्त्रें भाषासंबद्ध आहेत. अशीं शास्त्रें म्हटलीं म्हणजे

शिक्षा, व्याकरण, निरुक्त, छंद, साहित्य आणि मीमांसा हीं होत. न्याय आणि वैशेषिक दर्शनें हीं कांहीं अंशी भाषासंबद्ध तर कांहीं अंशी विचारसंबद्ध शास्त्रें आहेत. या शास्त्रांचा अभ्यास संस्कृत ग्रंथांच्याच अनुषंगानें व्हावयाचा व मराठींत न्यायावर वाङ्मय व्हावयाचें तें प्रथम टीकारूपाचेंच व्हावयाचें व तसें थोडेसें झालेंहि आहे. साहित्यशास्त्र-विषयक तुरळक पोथ्या सांपडतात, तसेंच तर्कसंग्रहासारख्या पुस्तकांचें भाषांतर इंग्रजीपूर्वीच्या काळांत झालेंच आहे. तरी त्यांचें विशेष महत्त्व नाहीं. संस्कृत भाषेचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करतां करतां जें भाषाशास्त्रज्ञान उत्पन्न झालें त्यापैकीं मराठी भाषेच्या अभ्यासाला किती लागलें हें पाहतां असें दिसतें कीं मराठी भाषेचा शास्त्रीय तऱ्हेनें अभ्यास होण्यास महानुभावांनीच थोडीशी सुरवातहि केली होती. ज्योतिष आणि वैद्यक या शास्त्रांनीं मराठीचा अल्पप्रमाणांत आश्रय केलाच. वैद्यकाचीं बाडें बऱ्याच जुन्याकाळा-पासून सांपडतात. पण पद्धतशीर वैद्यक यांत नाहीं. जर मराठी राज्यानें शास्त्रीय शिक्षणाकडे लक्ष दिलें असतें तर अनेक शास्त्रीय विषयांवर मराठी वाङ्मय उत्पन्नही झालें असतें. पण हेंहि प्रथम टीकारूपाचेंच असतें. तथापि त्यांत नावीन्य नसतेंच असें नाहीं. संस्कृत टीकांत जशी पुष्कळ ठिकाणीं नवीन माहिती असते तशी यांतहि आली असती. ज्योतिषावर मराठींत ग्रंथ झाले पण ते अगदीं थोडे आहेत. पहिला मराठी ग्रंथ म्हणून उपलब्ध असलेलें श्रीपतीचें रत्नमाळ हें पुस्तक ज्योतिषावरच आहे. लोकांना ज्योतिषाची जरूर दोन कारणामुळें पडते; नाक्षत्रज्योतिष त्यांस पावसाविषयीं अंदाज करण्यास आणि पिकें पिकविण्यास पाहिजे होतें; व कुंडल्या करण्यास, लग्नें जुळविण्यास, अरिष्टें टाळण्यास आणि आशा उत्पन्न करण्यास फलज्योतिष पाहिजे होतें. त्यामुळें या दोहोंवरहि वाङ्मय उत्पन्न झालें. सहदेवभाडळीच्या नांवावर खपणारी पुस्तकें, व किरकोळ फलज्योतिषावर लिहिलीं गेलेलीं गद्य चोपडीं या स्वरूपाचा प्रयत्न दाखवितात. कल्पशास्त्र म्हणजे श्रौत व गृह्य धर्मांचें शास्त्र, हें ज्या कर्मांसाठीं उत्पन्न झालें तीं कर्में बंद पडत चाललीं होतीं; आणि मराठी वाङ्मयाचा एकंदर भर ती कर्में बंद पडावींत याच तऱ्हेचा होता. तर यांवर मराठींत ग्रंथ नसणें रास्तच आहे.

शिक्षण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुरु झालें असतें तर शास्त्रीय विषयावर मराठींत वाङ्मय वाढलेंहि असतें.

धर्मशास्त्र देखील मराठींत वाढलें नाहीं. व्यवहारधर्म बरेच दिवस मुसलमानांच्या ताब्यांत होता. व्यवहारधर्म वगळतां उरलेला धर्म म्हटला म्हणजे आचारधर्म व प्रायश्चित्त धर्म. आचारधर्म हा ज्यांस ज्या कर्माचा अधिकार असेल त्यांसाठींच होता. अगोदरच आचारधर्माचा लोकांस कंटाळा आणि तो करावयाचा झाल्यास तो करण्यास "अधिकाराचा प्रश्न" उत्पन्न होणार. अर्थात या स्थितींत त्याचा प्रसार होणें शक्य नव्हतें आणि त्यावर वाङ्मय वाढणें देखील शक्य नव्हतें. आता उरला प्रायश्चित्तधर्म; यावरहि वाङ्मय उत्पन्न होण्याची जरूर नव्हती. ज्या व्यक्तीच्या मनास आपण कांहीं वाईट केलें अशी रुखरुख लागेल त्या व्यक्तीनें प्रायश्चित्त मागण्यासाठीं ब्राह्मणाकडे जावें

व ब्राह्मणांनीं पोथी पाहून निकाल द्यावा, या तऱ्हेची स्थिति होती; त्यामुळें धर्मशास्त्रावर देखील वाङ्मय उत्पन्न होण्याची आवश्यकता नव्हती. आतां येऊन जाऊन उरलेला वाङ्मय प्रकार म्हणजे सामान्य जनाच्या करमणुकीसाठीं लागणारें किंवा त्याच्या मनांत कांहीं तरी चांगल्या भावना उत्पन्न करण्यास अवश्य असणारें वाङ्मय तें मात्र मराठींत झालें.

ब्रिटिश कालापूर्वीच्या मराठी ग्रंथरचनेचें एकंदर स्वरूप पाहतां त्याचें पुढीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल. ( १ ) अध्यात्मिक वाङ्मय ( २ ) पौराणिक कथावाङ्मय ( ३ ) बखरी स्वरूपाचें गद्यवाङ्मय ( ४ ) पोंवाडे ( ५ ) लावण्या ( ६ ) प्रेमवाङ्मय ( ७ ) संतचरित्रात्मक वाङ्मय ( ८ ) ऐतिहासिक व्यक्तीसंबंधानें पोंवाड्याखेरीज काव्यवाङ्मय ( ९ ) कथावाङ्मय ( १० ) शिक्षणात्मक गद्य वाङ्मय ( ११ ) शास्त्रीय वाङ्मय.

या वर सांगितलेल्या यादीवरून सर्व तऱ्हेचें मराठींत वाङ्मय झालें आहे असें वाटेल. तथापि अध्यात्मिक वाङ्मय, पौराणिक कथावाङ्मय व संतचरित्रात्मक वाङ्मय यांचाच भरणा पद्यवाङ्मयांत सपाटून आहे. पोंवाडे, लावण्या हें वाङ्मय अल्प आहे आणि पोंवाड्याखेरीज इतिहासिक व्यक्तींवर अनंतफंदीच्या माधवग्रंथासारखें काव्यवाङ्मय तर अत्यंत अल्प आहे. प्रेमवाङ्मयामध्यें लोलिंबराजाच्या रत्नकलेवरील वाङ्मय व लावण्यांसारखें कांहीं स्वतंत्र वाङ्मय आहे तर बिल्हणचरित्रासारखें कांहीं भाषांतर वाङ्मयहि आहे. पण हें सर्व अल्प आहे. बखरी स्वरूपाचें वाङ्मय जरी बरेंच आहे तरी त्याचें उत्पादनविषयक विवेचन करण्याचें कारण नाहीं. बखरी लिहिणें ही राज्यांत कारकुनीच्या नोकऱ्या करूं इच्छिणारांची गरजच होती. शास्त्रीय वाङ्मयाची कथा मागें सागितलीच आहे. शिक्षणात्मक गद्यवाङ्मय थोडेसें तयार होत असावें. याला उदाहरण, राजवाड्यांच्या चौथ्या खंडांत सवाईमाधवरावाच्या शिक्षणासाठीं झालेलें पुस्तक देतां येईल.

काव्यवाङ्मय हें लोकांचें मनोरंजन करणारें किंवा लोकांचें मनोरंजन करतां करतां कर्त्याचा दुसरा कांहीं हेतु साधणारें वाङ्मय होय. हें मराठींत झालें पण त्याची व्याप्ति फार नियमित होती. वाङ्मयाला जें कांहीं स्वरुप आलें तें येण्यास कारणें होतीं. संस्कृत ग्रंथ ज्या प्रकारचा धर्म सांगत त्यापेक्षां निराळ्या प्रकारचा धर्म प्राकृत जनांस हवा होता; या कारणांमुळें निराळें धार्मिक वाङ्मय तयार झालें. तें वाङ्मय भक्तिस्वरूपाचें होतें. आणि भक्तीचें शास्त्रदृष्ट्या समर्थन करणारें होतें. शंकराचार्य हे " ज्ञानादेव तु कैवल्यं " म्हणत व मंडनमिश्र ज्ञानोत्तर स्थितींत कर्ममार्ग चालूच ठेवावा म्हणत; तर तोच सिद्धांत मराठी अध्यात्मिक वाङ्मयांत ज्ञान झालें तरी भक्ति चालू ठेवावी या स्वरूपांत मांडला गेला.

या परिस्थितींत काव्यास जें क्षेत्र मिळालें तें भक्तीचें मिळालें आणि काव्य आपली भक्तिस्वरूपाची भावना व त्याबरोबर आपले विचार प्रगट करण्याकडे लागलें; आणि यामुळें मराठी कवितेस संस्कृत कवितेपेक्षां निराळेपणा आला. काव्यानें जे पुरुष गौरवावयाचे तेदेखील निराळेच बनले. शंभर ऋतू करवून इंद्रपद मिळवूं पहाणारे राजे

किंवा उग्र तपश्चर्या करून सिद्धि पावणारे पुरुष हे चरित्रविषय न होतां भक्त व संत चरित्रविषय झाले.

काव्य म्हणजे कोणतेंहि वर्णन किंवा कथन आकर्षक तऱ्हेनें करणें. समाजाचे पुढारी जें पूज्य आहे म्हणून ठरवितात, तेंच कवी आकर्षक करतात. सामान्य वस्तुवर्णन-विषयक काव्य हें वारंवार झाल्यानें त्यांतील रहस्य नाहींसें होतें. प्रातःकाळचीं शेंकडों वर्णनें समाजांत कधींच जिरत नाहींत. व्यक्तिविषयक काव्याची मागणी समाजांत नेहमींच असते, त्या व्यक्ती खऱ्या असोत वा काल्पनिक असोत. व्यक्तिविषयक काव्य उत्पादन व ग्रहण हीं मोठ्या प्रमाणावर व्हावींत म्हणून पद्यसमुच्चयाचें रूप सोडून गद्यकथेचें किंवा कादंबरीचें रूप पत्करतें, आणि व्यक्तिविषयक काव्याचा विकास त्या तऱ्हेनें दृष्टीस पडतो. कविता जेव्हां मनुष्याश्रयी असते तेव्हां जो वर्ग अगर ज्या व्यक्ती समाजाला पूज्य बनवावयाच्या असतात त्या व्यक्तींच्या भोंवतालीं काव्य जमा होतें. बुद्धसंप्रदायामुळें बुद्धाभोंवतीं तेजोवलय निर्माण करावें लागलें आणि विविध प्रकारचें काव्य बुद्धाश्रयी बनले. ब्राह्मणांस व ब्राह्मणानुयायी जनतेस काव्य दोन प्रकारचें करावें लागलें; एक तर ब्राह्मणांची महति वर्णन करणारें व दुसरें ब्राह्मणानुयायी क्षत्रियांची महति गाणारें ब्राह्मणवर्गास पूज्य करण्यासाठीं परशुरामानें एकवीस वेळ पृथ्वी निःक्षत्रिया केली, विश्वामित्र राजा ब्राह्मणत्वाची आकांक्षा धरीत होता, आणि मोठ्या कष्टाने त्याची आकांक्षा पूर्ण झाली, ब्राह्मणांस त्रास देणाऱ्या लोकांचा वध ज्या क्षत्रियांनीं केला ते क्षत्रिय खरोखर ईश्वरी अवतार होते, म्हणजे ब्राह्मणांस त्रास होऊं नये ही परमेश्वरी इच्छा आहे, अशा दृष्टीनें काव्य रचलें गेलें. दुर्वासासारखे ब्राह्मण रागावले म्हणजे ते देवांना देखील शाप देऊन पंचायतींत पाडतात व यासाठीं ब्राह्मणांना भ्यालें पाहिजे वगैरे कथा सांगण्यांत आल्या. क्षत्रियांसंबंधानें काव्य लिहावयाचें म्हणजे त्यांचे पराक्रम वर्णन करणारे काव्य लिहावयाचें तें लोकप्रिय होण्यास किंबहुना राष्ट्रीय ग्रंथ होण्यास कांहीं गोष्टी अवश्य आहेत. पण त्या काव्याला स्तुतिपाठक काव्याचें स्वरूप येऊं नये म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. तें काव्य समकालीन राजावर लिहिलें न जातां पूर्वकालीन राजावर लिहिलें गेलें पाहिजे आणि त्या राजाचें वैभव स्थानिक विशिष्ट राज्यविषयक न रहातां अतिराष्ट्रीय झालें पाहिजे. तसा काळ काव्यविषयक राजा दिवंगत झाला म्हणजे अनेक पिढ्यांनीं उत्पन्न होणार, ताबडतोब उत्पन्न होत नाहीं. कालांतरानेंच लोकांस तो पूज्य होतो. तर क्षत्रियगौरव करणारें राष्ट्रीय महाकाव्य मराठींत तयार होण्यास सवड झालीच नाहीं.

ब्राह्मणगौरवात्मक वाङ्मय न होतां संतगौरवात्मक झालें याला कारणें होतीं. मुसुलमानी राज्य आलें तेव्हां ब्राह्मण हे पूज्यविषय करण्यासाठीं काव्य करण्याची आवश्यकता नव्हती कारण हिंदूमध्यें ब्राह्मणांस प्राधान्य आलेंच होतें आणि मुसलमान राजामध्यें ब्राह्मणभय उत्पन्न करण्याची शक्यता नव्हती. हिंदूमध्यें देखील ब्राह्मणशक्ती-संबंधाने अतिशयोक्तीचें विधान करतां आलें नसतें. ब्राह्मण हे शापानें वाटेल त्यास भस्म करूं शकतील अशी कल्पनाच मांडणें शक्य नव्हते. अशा बाता जर ब्राह्मणांस

गौरव देऊं इच्छिणारे कवी मारूं लागले असते तर लोक म्हणणार कीं, उगाच खोट्या गमजा कशाला करतां. रोज मुसुलमान उरावर बसत आहेत तर ब्राह्मणाची शत्रूस भस्म करण्याची शक्ति कोठें गेली आहे? ब्राह्मणांचे पूर्वीप्रमाणें पराक्रम वर्णन करणें शक्य नव्हतें. ब्राह्मणवर्गाच्या अभिमानी लोकांनीं तसे प्रयत्न केलेहि नाहींत. हा संतमंडळींचा भक्तिप्रधानवर्ग संस्कृत विद्येच्या अभिमान्यांकडे साशंकवृत्तीनें पहात होता. त्यांना आपल्या वर्गाचा गौरव करावयाचा होता त्यामुळें जें काव्य निर्माण झालें तें भक्तगौरवात्मक निर्माण झालें. भक्तांच्या अंगी दैवी शक्ति दाखविण्यांत आली. तथापि ही शक्ति "कर्तुमकर्तुं" अशी दाखविण्यांत आली नाहीं. मुसुलमानांची लाथ दररोज मिळतच होती, त्यामुळें मुसलमानांस भस्म करण्याची शक्ति संतांस आहे अशा तऱ्हेचें देखील काव्य झालें नाहीं. संतांचा परमेश्वर हिंदूसाठीं भांडणारा मुळींच दाखविला गेला नाहीं. तर जो भक्त संकटांत पडेल त्याला सोडविणारा झाला. म्हणजे संतांच्या परमेश्वराची ताकद देखील संकटांतून सोडविण्यापुरतीच झाली.

"समर्थाचिया सेवकां वक्र पाहे
असा सर्व भूमंडिळी कोण आहे?"

अशा तऱ्हेचें निर्भय अंतःकरणाचें वाक्य बोलण्याची ताकद रामदासाखेरीज कोणाच्या वाक्यांत दिसत नाही.

"मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास
कठीण वज्रांस भेदूं ऐसे"

असलीं वाक्यें तुकरामाच्या अभंगांत जरी सांपडलीं तरी तुकारामाच्या अभंगांत निर्भय मनोवृत्तीच्या व्यक्तीचें तेज मुळींच दिसत नाहीं.

पौराणिक धर्म ज्ञानेश्वराच्या पूर्वी अनेक शतकें आला होता व त्यांतील अनेक व्रतादींचा परिणाम हेमाद्रींत दिसत आहे पण लोकांच्या भावनांस दिशा सर्व पुराणांनीं दिली नसून फार थोडक्या पुराणांनीं दिली त्यांत भागवत पुराणास प्राधान्य आहे आणि भविष्यकालीन वाङ्मयाचें बीज गीता आणि भागवत या दोन ग्रंथांत आहे. मराठींत ग्रंथरचनेस जी दिशा लागली ती ज्या विशिष्ट मनोवृत्तीमुळें लागली ती मनोवृत्ति तेराव्या शतकापूर्वीपासूनच तयार होत होती.

मराठीं संतकवींचा धर्म जरी पूर्वकालीन लोकांच्या धर्मापेक्षां अधिक उच्च तऱ्हेचा भासतो तरी त्या धर्मामध्यें देखील बरेंच वैगुण्य होतें. धार्मिक भावनांमध्यें केवळ भक्तीच नव्हती तर खुळ्या समजुती देखील होत्या. संतमंडळीमधील मोठे पुरुष चमत्कार करणारे म्हणून प्रसिद्ध होते ते चमत्कार करण्याची शक्ति त्यांस ईश्वरी कृपेमुळें येते अशी त्यांची कल्पना होती. आणि त्या चमत्कारांच्या अनेक कथांमुळें या संप्रदायास भक्तिदृष्ट्या थोडेसें गौण स्वरुप आलें आहे.

भागवतामध्यें ज्या कथा आहेत त्या कथांचेच मराठी संतमंडळीचा संप्रदाय हें विस्मरण होतें. भागवतामध्यें कर्ममार्गी ब्राह्मणांचा उपहास केला आहे व ब्राह्मणपत्न्यादेखील

कृष्णाच्या लीलांमध्यें चित्तग्रस्त झाल्या असें दाखविलें आहे. हीच परंपरा ज्ञानेश्वरादिकांपासून संवर्धिली गेली. भक्ति हा योग आहे. भक्तांसाठीं ईश्वर वाटेल तें करतो एवढेंच नव्हे तर भक्त वाटेल तें करूं शकतो असें दाखविलें आहे. हा भक्तिसंप्रदाय त्यांस गौरवावयाचा होता आणि त्यासाठीं सर्व काव्य खर्ची पडलें. भक्तिमार्ग आणि वेदविद्या यांमध्यें जो विरोध दाखविला आहे तो संतकवींच्या काळांतदेखील चालूच होता आणि हा विरोध गागाभट्टाचा उपहास करून महिपतीनें दाखविला आहे.

पूर्वोक्त विवेचनाचा मथितार्थ येणेंप्रमाणें देतां येईल– धार्मिक वाङ्मय आणि संतचरित्रें आणि पौराणिक कथा याखेरीज इतर विषयांवर ग्रंथोत्पत्ति होण्यास महत्त्वाच्या अडचणी होत्या. धार्मिक वाङ्मयाचें क्षेत्र देखील नियमित झालें होतें. हिंदुस्थानच्या पारमार्थिक प्रयत्नाच्या इतिहासांत संतकवींचा जो काल होता तो इतर पारमार्थिक मार्गांची अनुपयुक्तता वाटून भक्तीकडेसच वळण्याचा काल होता. व या काळांतील महापुरुष म्हणजे भक्तच होते, व यामुळें व जेव्हां पौराणिक विषयाखेरीच काव्य करावयाची वेळ आली तेव्हां लेखक भक्तांच्या चरित्राकडेसच वळले. व हें कार्य करण्यास त्यांस स्वाभाविक प्रेरणा झाली. तिचें कारण कांहीं अंशी तरी आत्मभावनाकथनविषयक काव्य अगोदरच झालें हें होतें.

सामाजिक व वैज्ञानिक परिस्थितीचा वाङ्मयोत्पादनावर झालेला परिणाम आतांपर्यंत दिलाच आहे. आतां त्याच परिस्थितीचा काव्यपरीक्षणावर परिणाम कसा झाला तें दिलें पाहिजे. काव्य परीक्षणरुपी जें कार्य मुद्रणपूर्वकालांत झालें तें आदरव्यक्ति, अनुकरण, मराठी ग्रंथांचें भाषांतर, संस्कृत ग्रंथांचें मराठींत भाषांतर होतांना होणारें मूलपरीक्षण आणि अशिष्ट वाङ्मयाचें शिष्टीकरण आणि सामान्यजनांकडून होणारें काव्यग्रहण इतक्या बाजूंनी झालें आहे. एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास हें सर्व परीक्षण अहेतुक झालें आहे. यापेक्षां निराळ्या तऱ्हेनें म्हणजे सहेतुक झालें नाहीं. याचें कारण संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासकांना मराठी ग्रंथांचे स्वरुप समजलें नाहीं, किंवा त्यांनीं समजून घेण्यासाठीं फिकीर केली नाहीं हें होय. त्यांना देशी कथावाङ्मयाचा अंगिकार करतां आला. साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें मराठी वाङ्मयास अभिज्ञता उत्पन्न होण्यास जरा निराळें साहित्यशास्त्र लागत होतें. तर देशी वाङ्मय पाहून त्याचें साहित्यशास्त्रीय परीक्षण करून साहित्यशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याइतका विद्वान् मुद्रणपूर्वकालीन महाराष्ट्रांत निघालाच नाहीं. शिवाय चरित्रकार बनणें वगैरे क्रिया संप्रदायप्रकर्षासाठीं झाल्या. त्या संप्रदायवृद्धीच्या भावनांमुळें लेखकाच्या परीक्षणवृत्तींतहि दौर्बल्य आलें होतें.

[ विद्यासेवक : वर्ष ४ अंक ११–१२ पृ. ११८–१२३ ]

## १४. ज्ञानकोश म्हणजे महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकारांचें कर्तव्य काय याचें स्पष्टीकरण होण्यासाठीं, ज्ञानकोशाचें मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत स्थान कोणतें आहे याविषयीं विचार आपोआपच उत्पन्न होतो. या विषयावर ज्ञानकोशकारांनीं आपल्या मनाशींच विचार केला आहे, तो येणेंप्रमाणें—

( १ ) महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे पूर्वपरंपरागत ज्ञान आणि भविष्यकालीन स्थिति यांस जोडणारा दुवा होय.

( २ ) आतापर्यंत झालेल्या वाङ्मयांतील ग्राह्य भाग निवडणें त्याचें कर्तव्य आहे.

( ३ ) मराठी भाषेंत अनेक लेखकांनीं आपले एका विषयावरील विचार व्यक्त करण्यासाठीं निरनिराळे शब्द योजिले असतां जें भाषाद्वैत उत्पन्न झालें असेल तें काढून टाकून भाषा स्थिर करणें त्याचें कर्तव्य आहे.

( ४ ) महाराष्ट्रांतील पंडित वर्गांत वागत असलेलें विविध ज्ञान मराठी भाषेनें व्यक्त झालेंच नसल्यास तें व्यक्त करण्याची संधि त्यास देणें हेंहि ग्रंथकाराचें कर्तव्य होय.

( ५ ) पाश्चात्य संस्कृति व परंपरागत संस्कृति यांचें एकीकरण करण्याचें स्थान महाराष्ट्रीय ज्ञानकोश होय.

( ६ ) शेतकी व सुशिक्षित वर्गाचे धंदे हे करण्यापलीकडे महाराष्ट्रीय समाजामध्यें कार्यक्षमता नाहीं, तर समाजाचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत होणें शक्य होण्यासाठीं वाङ्मय-द्वारें जी मदत करणें शक्य असेल ती करणें ज्ञानकोशाचें कर्तव्य होय.

( ७ ) समाजांत ज्या क्रिया येथें होत असतात त्यांचें उत्तान अगर परिणत स्वरूप कोठें अन्यत्र दृग्गोचर होत असेल तर तें दाखविणें हेंहि ज्ञानकोशाचें कर्तव्य होय.

( ८ ) हिंदु समाजाचे व विशेषेंकरून महाराष्ट्रीय समाजाचे हितसंबंध ओळखून तद्विषयक माहिती वाचकांपुढें ठेवणें हेंहि ज्ञानकोशाचें ध्येय आहे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचीं शेंकडा ३५ पृष्ठें भारतीय संस्कृतीच्या स्पष्टीकरणासाठीं दिलीं आहेत, आणि केवळ शेंकडा १५ पृष्ठें बाह्य संस्कृतीच्या उद्बोधनासाठीं दिलीं आहेत. आमची योजना ज्या वेळेस प्रसिद्ध झाली त्यावेळेस कांहीं पत्रकारांनीं याबद्दल ज्ञानकोशकारांस पक्षपाताचा दोषहि दिला होता. त्यावेळेस जें स्पष्टीकरण केलें होतें, तेंच पुनः एकदां करतों.

परक्या देशांची आपणांस केवळ स्थूल माहिती हवी असते; तथापि आपल्या

देशाची आपणांस सूक्ष्म माहिती पाहिजे असते. आपल्या देशाची माहिती देतांना, आपल्या देशांतील पंडित वर्गास उपयोगी पडेल असा ग्रंथ केला पाहिजे. सामान्य जनता व आपल्या देशासंबंधानें संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानांत जें आज जमीनअस्मानाचें अंतर आहे, तें काढून टाकावयाचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रीय जनतेची ही मोठी बौद्धिक गरज आहे, आणि ज्ञानकोशकारांनीं ती लक्षांत घेतलीच पाहिजे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचें बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठीं झालेला प्रयत्न होय. महाराष्ट्राचें बौद्धिक स्वातंत्र्य कसें प्रस्थापित होईल हा विचार करण्यासाठीं बौद्धिक स्वातंत्र्याचा अभाव म्हणजे काय हें समजलें पाहिजे.

जेव्हां मनुष्य स्वतःच्या विचारापेक्षां परक्याच्या मतास अधिक मान देतो तेव्हां त्यास बौद्धिक परावलंबित्व थोडें तरी म्हटलेच पाहिजे. तथापि समाजांत बरेंचसें बौद्धिक परावलंबित्व असतेंच. उदाहरणार्थ, आपण डॉक्टरचा, वकिलाचा किंवा खरेदीविक्रीच्या प्रसंगी दलालाचा सल्ला घेतों. हा अर्थात योग्यच प्रकार आहे. तज्ज्ञाकडे जाणें कोणासहि लांच्छनास्पद नाहीं. आपणांस हें बौद्धिक परावलंबित्व नष्ट होऊं द्यावयाचें नाहीं; उलट वृद्धिंगत करावयाचें आहे. समाजांतील अनेक व्यवहार तज्ज्ञांच्या सल्ल्यानें झाले म्हणजे हातून होणाऱ्या खटपटींची कार्यकारिता वाढते व समाजाचें कल्याण होतें. तज्ज्ञांच्या सल्ल्यानें चालणें म्हणजे तज्ज्ञांकडून स्वतःस ठकवून घेणें मात्र नव्हे; तर स्वतः कांहीं ज्ञान मिळवून कार्य अधिक योग्य व्हावें म्हणून विशेषज्ञांकडे जाणें होय. समाजांतील परस्परालंबित्व कायम पाहिजेच; पण एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून रहावें लागावें हें हितावह नाहीं. व्यापारांत कांहीं अंशीं परावलंबन प्रत्येक राष्ट्रास भाग आहे. तथापि बौद्धिक बाबतीत परावलंबन धोक्याचें व राष्ट्रास अत्यंत कमीपणा आणणारें आहे. त्यांतल्यात्यांत जें ज्ञान राष्ट्राच्या हिताशीं निकटतेनें संबद्ध आहे, त्यांत परावलंबित्व फारच धोक्याचें आहे. उदाहरणार्थ, वेदांत काय आहे, हें आपण इंग्रजास अगर जर्मनास विचारावें आणि त्यानें आपणापुढें पांडित्य करावें, यासारखी खेदाची दुसरी कोणती गोष्ट आहे बरें ? पण आज वस्तुस्थिति मात्र तशी आहे, हें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. पण येथें नुसतें अश्रू ढाळून काय उपयोग ? या परावलंबित्वाची कारणमीमांसा केली पाहिजे.

तर्कशास्त्रांत ज्याप्रमाणें साधारण कारणें म्हणजे ईश्वर, काल, दिक् हीं आहेत पण कारणमीमांसेंत ती बाजूस ठेवून असाधारण कारणें शोधावयाचीं असतात. त्याप्रमाणें दारिद्र्य, देशांतील ऊष्ण हवा, परराज्य या प्रकारचीं सर्व प्रकारच्या अवनतीचीं साधारण कारणें बाजूस ठेवून बौद्धिक दास्याचीं निकट कारणें कोणतीं आहेत, इकडे लक्ष दिलें पाहिजे.

आज आपणांस आपल्या देशाविषयींच्या अनेक गोष्टींविषयीं माहिती मिळविण्यासाठीं पाश्चात्य ग्रंथकारांच्या ग्रंथांकडे पहावें लागतें आणि पाश्चात्य भाषा अवगत झाल्याशिवाय किंवा संस्कृत भाषेचें पांडित्य असल्याशिवाय आपणांस कोणत्याहि

विषयावर माहिती मिळत नाहीं. मृत भाषा सर्वांस समजणें शक्य नाहीं, म्हणून भाषांतरें लागतात. जितक्या संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें इंग्रजी, फ्रेंच किंवा जर्मन या भाषांमध्यें झाली आहेत, तितकीं हिंदुस्थानांतील कोणत्याहि भाषांत झालीं नाहींत! आज पुष्कळांस संस्कृत ग्रंथांतील अर्थाचें ज्ञान इंग्रजी पुस्तकांवरून करून घ्यावें लागतें. त्यामुळें परावलंबित्व उत्पन्न होतें.

परावलंबित्वाचें दुसरें कारण असें आहें कीं, पाश्चात्य देशांतील सामान्य ठिकाणीं जशीं ग्रंथालयें आहेत, तशी मुंबईस किंवा कलकत्त्यासहि नाहींत. संस्कृत भाषेंत जें ज्ञान आहे त्याचा गोषवारा देणारे, त्यावर ऐतिहासिक विचार प्रदर्शित करणारे, जगाच्या इतिहासांत त्यांचें स्थान मोजणारे जसे ग्रंथ व लेख पाश्चात्य भाषांत आहेत, त्याच्या शतांशहि आपल्याकडे नाहींत. त्यांच्या बाबतींत परावलंबित्व घालवून देण्याचा प्रश्न येतच नाहीं. एकंदर ज्ञानक्षेत्राविषयीं तर बोलावयासच नको. ज्ञानविषय किती आहेत याची कल्पना जेव्हां येईल तेव्हां प्रत्येक विषयावर काय लिहिलें आहे हें जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होणार. अनेक विषयांसंबंधानें प्राथमिक स्वरूपाचीच माहिती ज्ञानकोशांत येईल. यापेक्षां अधिक दिली तर वाचक वर्गास पचावयाचीच नाहीं. 'प्राथमिक स्वरूपाची' याचा अर्थ हायस्कुलांतील विद्यार्थ्यांस साजेलशी असा मात्र नव्हे. आज अखिल ज्ञानक्षेत्राची कल्पनाहि नाहीं तर त्यावर ग्रंथ कोठून निर्माण होणार? अनेक ज्ञानक्षेत्रांशीं निदान ओळख करून देणें ज्ञानकोशाचें कर्तव्य आहे, विस्तृतज्ञानक्षेत्रांकडे दुर्लक्ष केलें तरी नेहमीं आपल्या परिचयांतील व्यवहारांची माहिती आपणांस कितपत असते? नेहमींचे बोलण्याचे विषय असून त्यासंबंधानें माहिती सामान्य सुशिक्षितांस कितपत असते, याविषयीं कल्पना ज्याची त्यास खालील प्रश्नांची उत्तरें द्यावयाचा प्रयत्न करावा म्हणजे कळून येईल. हे प्रश्न जितके अगदीं सामान्य शोधून काढतां येतील तितके शोधून घातले आहेत.

(१) प्रवर म्हणजे काय? गोत्रें आणि प्रवर याची माहिती कोणत्या ग्रंथांत आहे? सगोत्र लग्न करण्यास कोणते ग्रंथकार संमति देतात व कोणते देत नाहींत?

(२) आश्वलायन ही "शाखा" आहे काय?

(३) वैद्यकांत "चिकित्सा" म्हणजे काय?

(४) यजुर्वेदाच्या मुख्य मुख्य शाखांची, निदान ज्या शाखांचे ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत त्यांचीं नांवें सांगावीत.

(५) सामवेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत काय? अथर्ववेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत काय? माध्यंदिन, काण्व, मैत्रायणीय, चरक, जाबाल या शाखांच्या जशा निरनिराळ्या जाती आहेत, तशा सामवेदी आणि अथर्ववेदी अशा कांहीं निरनिराळ्या जाती आहेत कीं, एखाद्या निराळ्या नांवाच्या जातींत या वेदांच्या ब्राह्मणांचा अंतर्भाव होतो?

(६) जैन व इतर हिंदु यांचीं लग्नें होतात काय? शीख व इतर हिंदु यांचीं

लग्नें होतात काय? खिस्ती व हिंदु यांचीं लग्नें कोठें होतात? मुसुलमानांच्या मुली करण्यास कोणत्या हिंदूस हरकत नाहीं?

(७) एका जातीचा मनुष्य दुसऱ्या जातींत जाऊं शकत नाहीं याला अपवाद कोठें कोठें आहेत?

(८) "मराठे" या नांवानें ओळखली जाणारी जात कितपत जुनी आहे?

(९) १६२७ सालीं शिवाजी जन्मला कशावरून?

(१०) महाराष्ट्रीय ब्राह्मणांमध्यें पुरुष अधिक आहेत कीं बायका अधिक आहेत?

भौतिक शास्त्रें व तज्जन्य कला यांच्या बाबतींत आपण केलेली पाश्चात्यांची व आपली तुलनाच हास्यास्पद होईल. तथापि आपल्या संस्कृतीच्या अभ्यासाच्या बाबतींत आपण त्यांची बरोबरी करूं, असा जर आपला भ्रम असेल तर तोहि सोडून दिला पाहिजे. संस्कृत ग्रंथांचा अभ्यास पाश्चात्य पंडित करतात, आणि आज आपल्या देशांतील लोकांच्या संस्कृत ग्रंथांविषयींच्या ज्ञानाकडे तुच्छेतेनें पहाण्याचें धैर्य त्यांस आलें आहे व आपलें अध्यापकत्व पटकावण्याची त्यांची तयारी आहे. त्यांस येतो हा जोर कशानें येतो याविषयीं तर आपण विचार केला पाहिजे ना? आज त्यांस जोर येत आहे, याचीं कारणें अनेक आहेत, त्यांपैकीं मुख्य कारणें येणेंप्रमाणें :—

(१) आपल्या अभ्यासापेक्षां त्यांचा अभ्यास अधिक पद्धतशीर आहे.

(२) प्रत्येकानें अभ्यास करून जें शोधात्मक ज्ञान संपादन केलें तें लेखी व्यक्त करून त्यानें पुढील पिढीसाठीं ठेवलें आहे.

(३) हिंदुस्थानाबाहेर झालेल्या ग्रंथांचें, जगाच्या इतिहासाचें आणि शास्त्रांचें ज्ञान आपणापेक्षां त्यांस फारच अधिक आहे. भारतीय पांडित्यास या सर्व गोष्टींची जरूरी आहे. इतिहासाची किंवा ज्ञानाची अशी गोष्ट आहे कीं, एका देशांतील ज्ञानाचें, राजकीय इतिहासाचें किंवा कलेचें जगांतील एकंदर ज्ञानाच्या राजकीय अगर कलेच्या इतिहासापासून पृथक्त्व नसतें. आणि यामुळें जगांतील इतर हालचालींचें ज्ञान ज्यांस असतें त्यांस हिंदुस्थानविषयक गोष्टी अधिक स्पष्टपणें समजावयास मार्ग असतो, आणि अशा लोकांच्या लेखांतील चुका काढणें इतरांस शक्य होत नाहीं.

आपल्या अभ्यासापेक्षां त्यांचा अभ्यास अधिक पद्धतशीर कसा असतो याची कल्पना येण्यासाठीं, त्यांच्या अभ्यास पद्धतीची कल्पना एकदोनच गोष्टींचा निर्देश केला असतां येईल.

पाश्चात्त्यांच्या अभ्यासांतील पहिला प्रयत्न म्हणजे ज्या विषयावर आपणांस परिश्रम करावयाचा असेल त्या विषयावर आजपर्यंत कोणी काय लिहिलें आहे याचा संपूर्ण तपास लावून तद्विषयक वाङ्मयसूचि तयार करणें. ही वाङ्मयसूचि करण्यास त्यांचीं साधनें येणें-प्रमाणें — एकतर त्यांच्या ग्रंथशाला बरेच दिवसांच्या स्थापन झाल्या असल्यामुळें आणि ग्रंथसंग्रहविषयक परिश्रम दांडगा असल्यामुळें जो हिंदुस्थानविषयक ग्रंथ येथें मिळण्यास फार यातायात पडेल तो ग्रंथ पाश्चात्त्य विद्यापीठांतील विद्यार्थ्यास आपल्या ग्रंथालयांत सहज

मिळूं शकतो. ऑक्सफर्ड, केंब्रिज, लंडन, बर्लिन, सोर्बन, कार्नेल, कोलंबिया, येल, हार्वर्ड या विद्यापीठांत जीं हिंदुस्थानविषयक पुस्तकें सहज पांच मिनिटांत मिळतील तीं मुंबईस अगर कलकत्त्यासहि मिळावयाचीं नाहींत. हिंदुस्थानच्या काँग्रेसचे जुने रिपोर्ट मला अमेरिकेंत सहज मिळत, पण हिंदुस्थानांत चार पांच वर्षांपूर्वींचे रिपोर्ट्स मिळवावयास यातायात पडते. ग्रंथोपलब्धी संबंधानें जेवढी सोय तेथें आहे तेवढी इकडे नाहीं, एवढेंच नव्हे तर अमुक विषयावर ग्रंथ कोणता ही माहिती मिळविण्यास मारामार पडते. निरनिराळ्या प्रकाशकांचे व लायब्ऱ्यांचे क्याटलॉग, वाङ्मय प्रसिद्धिविषयींच माहिती देणारीं मासिकें व ग्रंथ यांची पाश्चात्त्य विद्यापीठांत रेलचेल असते. असो.

प्रत्येक पंडित आपल्या अभ्यासाचा विषय स्वतंत्र व नवीन करण्यासाठीं खटपटत असतो. निदान दुसऱ्यानें जे अभ्यासक्षेत्र घेतलें असेल, त्या क्षेत्रावर पुन्हां निराळा ग्रंथ लिहिण्याचें काय प्रयोजन झालें याविषयीं त्याला आपल्या ग्रंथांत स्पष्टीकरण करावें लागतें. अमुक विषयावर जें संशोधन झालें त्याचें सिंहावलोकन जर्मनमध्यें होतें. कोणत्याहि पंडितास आपण ज्या विषयावर ग्रंथ प्रसिद्ध करतों त्या विषयावरील पूर्वीचा ग्रंथ ठाऊक नसणें हें लज्जाकारक वाटतें आणि त्यानें त्याचा उपयोग केला नसल्यास किंवा त्याकडे दुर्लक्ष केलें असल्यास अज्ञान किंवा मत्सराचा आरोप त्याजवर येतो. या तऱ्हेच्या प्रगतीमुळें सर्व अभ्यासामध्यें एकवाक्यता होते. वाटेल त्या लेखकानें मनास वाटेल तें लिहावें, दुसऱ्याच्या परिश्रमाकडे दुर्लक्ष करावें असें करून चालत नाहीं. शोधकांच्या संस्था आहेत, त्यांत प्रत्येकास दुसऱ्याशीं प्रसंग येतो त्यामुळें जबाबदारी वाढते, व निरंकुशता कमी होते.

संस्कृत ग्रंथविषयक पाश्चात्त्यांच्या अभ्यासांत केवळ शिस्तीची जोड मिळाल्यामुळें विशेष काय साध्य झालें आहे हें सांगितलें पाहिजे.

प्रथमतः मूलपाठाच्या संशोधनाविषयीं त्यांची पद्धतशीर खटपट होऊन तीस चांगलें यश आलें आहे. मनुस्मृतीची आवृत्ती त्यांस काढावयाची आहे असें समजा. त्यासाठीं ते प्रथम अनेक हस्तलिखितें गोळा करतील. तीं गोळा करणेंहि त्यांस सोपें आहे. निरनिराळ्या ग्रंथशालांच्या हस्तलिखितांचे क्याटलॉग असतातच, त्यांतहि एका पुस्तकाच्या अनेक हस्तलिखित प्रती असतात. त्या अनेक प्रतींची साग्र वर्णनेंहि त्यांत असतात. तीं वाचून एखादा ग्रंथ मागवावा असें अभ्यासकास वाटलें तर तो संस्थेच्या लायब्ररीमार्फत तीं हस्तलिखितें मागवूं शकतो. अनेक हस्तलिखितें गोळा केल्यानंतरचा प्रयत्न म्हटला म्हणजे शुद्ध पाठ पुरविणें हा होय. शुद्ध पाठ याचा अर्थ ज्यांत व्याकरणशुद्धि अधिक असेल किंवा ज्यापासून अर्थनिष्पत्ति अधिक चांगली होते तो शुद्धपाठ असें नाहीं. तर ऐतिहासिक दृष्ट्या जो मूळ पाठ असेल तो. उदाहरणार्थ-आपण असें घेऊं कीं, एखाद्या मासिकाच्या संपादकास आलेला लेख प्रसिद्ध करावयाचा आहे. आलेल्या लेखांत व्याकरणाच्या पुष्कळ चुका असतात. त्या दुरुस्त करून तो प्रसिद्ध करतो. तेव्हां प्रसिद्ध केलेला लेख म्हणजे मूळ नव्हे. ऐतिहासिक दृष्टीनें किंवा कायद्याच्या दृष्टीनें जबाबदारी प्रसिद्ध-

लेखापेक्षां मूळ पाठविलेल्या लेखाबद्दलच लेखकावर असते. बदललेल्या लेखाबद्दल कमी. यासाठीं तपासून शुद्ध न केलेला पाठ खरा व शुद्ध केलेला खोटा, याप्रमाणेंच जुन्या लेखांचे आहे. अस्सल व नक्कल यामध्यें नकलेला महत्त्व कमी. अनेक हस्तलिखितें जमा करून त्यांतून मूळ पाठ कोणता होता, मूळ मिळविणें शक्य नसेल तर मूळपाठाच्या जवळ जवळ पाठ कसा शोधावा याविषयीं शोध करण्याची पद्धति अनुभवानें ठरली आहे. पाश्चात्त्य अभ्यासांत मूलशोधनाचा भाग महत्त्वाचा आहे. ग्रंथाचें मूळ शुद्ध असलें म्हणजे त्याच्या-वरून तत्कालीन परिस्थितीचा पुढल्यामागल्या परिस्थितीशीं संबंध पाहून इतिहासाची जुळवा-जुळव करणें या खटपटी पुढें शक्य होतात. संस्कृत ग्रंथाच्या शुद्ध आवृत्त्या पाश्चात्त्यांच्याच आहेत.

आतां भारतीय ज्ञानाच्या बाबतींत त्यांची कशी काय प्रगति होत आहे याची अंधुक तरी कल्पना दिली पाहिजे. प्रगतीचीं कारणें दोन आहेत; नवीन साहित्याचा उपयोग, आणि जुन्या साहित्याचा नवीन पद्धतीनें उपयोग. प्राचीन भारतीय विषयांपैकीं पाश्चात्त्य पंडित ज्या विषयांत आपल्या पुढें फार गेले आहेत, ते विषय म्हटले म्हणजे इतिहास आणि तदनुषंगिक शास्त्रें हे होत. जी शास्त्रीय पद्धति त्यांनीं आपल्या देशांत स्वकीय संस्कृतीच्या व राजकीय घडामोडींच्या इतिहासास लावली तीच पद्धत त्यांनीं इकडे लावली आणि जी माहिती जुन्या पंडितांस नव्हती अशा प्रकारची माहिती पैदा केली. त्या माहितीचें स्वरूप मुख्यतः येणेंप्रमाणें :—

(१) चिरंजीवी लिखाणांचा अभ्यास :— ताम्रपट, शिलालेख हीं अनेक जमवून, त्यांच्या नकला घेऊन, त्यावरील लिपि ओळखून, त्या लिपीच्या अनुसंधानानें अर्थ लावून, त्यांतील मजकुरावरून, देशांत झालेल्या घडामोडींची शकावलि, राजमालिका हीं तयार करणें.

(२) मुद्राविज्ञान :— नाण्यांचा अभ्यास करणें.

(३) पुराणवस्तुसंशोधनशास्त्र :— जुनीं शहरें, देवालयें, कलाकुशलतेच्या जिनसा हीं जमा करून त्यांचा अभ्यास करणें.

(४) मानववंशशास्त्र :— निरनिराळ्या मनुष्यांच्या जातींचा, म्हणजे त्यांच्या चालीरीती, त्यांच्यांतील जुन्या कालाचे अवशेष, त्यांचीं दैवतें, उपासना, खाणेंपिणें इत्यादि गोष्टींचा अभ्यास.

याप्रमाणें साहित्यावरून शास्त्रांचीं नांवें तयार झालीं आहेत. तथापि या शास्त्रांच्या अभ्यासांत जी माहिती पैदा झाली आहे तिचें संकलन होऊन "लिपिविज्ञान" म्हणजे देशांतील आजच्या लिपींचा अशोककालीन लिपीपासूनचा इतिहास, इत्यादि अनेक शास्त्रें अगर शास्त्रांगें तयार होत आहेत.

वर सांगितलेलीं अभ्यासक्षेत्रें पाहिलीं असतां असें दिसून येईल कीं नवीन साहित्य पैदा करून त्यावर हा अभ्यास रचला गेला आहे. पण पूर्वीपासून ब्राह्मणांस परिचित असें साहित्य म्हटलें म्हणजे श्रुति-स्मृति पुराणें. त्यांचा अभ्यास कसा काय होत आहे इकडे लक्ष देऊं.

उदाहरणार्थ "वेद" घेऊं. वेदांचा अर्थ कसा लावावा हें जाणण्यासाठीं प्रथम यास्कसायणादि ग्रंथांच्या साहाय्यानें त्यांनीं अभ्यास केलाच. पण त्यांत कांहीं थोडीशी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. यास्क हा देखील वेदकालानंतर बऱ्याच कालानें होऊन गेला. त्याअर्थीं त्यास वेदकालीन संस्थांचें ज्ञान स्पष्ट नसेल, व त्यामुळें त्यानें दिलेले अर्थ चुकलेले असतील, ही शक्यता मनांत धरून वेदवाक्यांच्या दिलेल्या अर्थाविषयीं संशयवृत्ति तयार झाली. शिवाय अर्वाचीन पंडितांस झेंदावेस्ताचें व यूरोपीय भाषांचें ज्ञान यांची जोड मिळाली. तेव्हां त्यामुळें त्यांस प्राचीन यूरोपीय, प्राचीन भारतीय व प्राचीन इराणी या तीन लोकसमूहांच्या भाषा, शब्द व संस्था यांतील सादृश्य लक्षांत आलें, व जी संस्था व जे शब्द वेदांत व या पाश्चात्य ग्रंथांत सदृश्य असतील तीं पुढें हिंदुस्थानांत नष्ट झाल्यामुळें यास्कादिकांस न समजणें व अर्वाचीन संशोधकांस समजणें शक्य आहे असें त्यांस वाटून त्यांनीं तौलनिक पद्धति अंमलांत आणली आणि वेदार्थज्ञान स्वतंत्रपणें करून घेण्यास सुरूवात केली.

शब्दांचा अर्थ स्वतंत्रपणें लावावा, वेदग्रंथांतील भाषेची ऐतिहासिक चिकित्सा करून वेदवाक्यांचा कालानुक्रम काढावा, वेदांत व्यक्त झालेल्या कथांचा (Myths) अर्थ काय याविषयीं स्वतंत्र बुद्धीनें शोध करावा, वेदांत ज्यांचा नामनिर्देश आला आहे असें ऋषी, राजे, जाती, राष्ट्रें, स्थलांतरें, युद्धें यांच्या उल्लेखांवरून राजकीय व बौद्धिक इतिहास जुळविण्याची खटपट करावी, प्राकृत, वेदभाषा, अवेस्ती भाषा, यूरोपीय भाषा यांचा तौलनिक अभ्यास करून अपभ्रंश व भाषेंत होणारे बदल यांचे नियम शोधून काढावेत, या प्रकारचा परिश्रम त्यांनीं अनेक वर्षें चालविला आहे. रामायण, महाभारत व वेद यांतील कथांचा मेळ घालण्यासाठींहि प्रयत्न पुष्कळ झाला. विचारसंप्रदाय व शास्त्रें यांचाहि ऐतिहासिक अभ्यास झाला आहे.

ग्रंथांतील शब्दांची सूची, विशेषनामांच्या सूची, श्लोकांची सूची, एतद्विषयक पुस्तकांच्या याद्या, मूलपाठशोधनांत घेतलेली खबरदारी यांची पाश्चात्य बुद्धीस जोड मिळाल्यामुळें आणि हीं साधनें आपणांस नसल्यामुळें संशोधनशास्त्र परिचित अशा इकडील पंडितांस जाळ्यांत सांपडलेल्या सिंहासारखे व्हावें लागतें. दैत्यांनीं ग्रासलेल्या अरण्यास ज्याप्रमाणें ऋषी सोडून जातात अगर तेथें येत नाहींत त्याप्रमाणें, पांडित्यास अपकर्षक अशा परिस्थितीनें ग्रासलेल्या हिंदुस्थानांत येऊन शिकविण्यास देखील खरा पाश्चात्य पंडितांचा वर्ग तयार नाहीं.

आपल्या सुशिक्षित वर्गापैकीं पुष्कळांमध्यें पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्याविषयीं तुच्छता वाटत असते. ती सर्वांशीं योग्य नाहीं असें म्हणणें भाग पडतें. देशांतीलच नवीन साहित्य शोधणें व वापरणें भारतेतिहासास उपयोगी असें बाह्य साहित्य जमा करणें, सर्व साहित्य पद्धतशीर रीतीनें जमा करून उपयोगांत आणणें, आपण केलेल्या अभ्यासानें जमा झालेलीं अनुमानें लिहून ठेवणें, अभ्यासासाठीं नवीन पद्धति स्वीकारणें या सर्व बाबतींत थोर परिश्रम पाश्चात्त्यांनींच केले आहेत. त्यांच्याच पद्धति घेऊन

आपणहि अभ्यास करूं लागलों म्हणजे आपण त्यांच्या मागें न रहातां पुढेंहि जाऊं हें खरें आहे व जे थोडे भारतीय पंडित पाश्चात्त्य संशोधनपद्धतींनीं अभ्यास करून निर्भयपणें नवे नवे सिद्धांत पुढें मांडीत गेले त्यांचा पाश्चात्त्यांनीं योग्य आदरहि केला आहे. आपलें कर्तव्य आपली उच्चता परिश्रमानें स्थापित करण्याचें आहे, तुच्छता व्यक्त करण्याचें नाहीं. पाश्चात्त्यांचें संशोधन गोळा करावें, तपासून पहावें, ग्राह्य असेल तें घ्यावें, त्याज्य असेल तें टाकावें. सर्व जगाचें ज्ञानविषयक रणमैदान एक होत आहे. आपण केलेलें संशोधन जगानें आदरावें असें आपणांस वाटत असेल तर पूर्वी परिश्रम करणारांचे ग्रंथ आपण अवलोकिले पाहिजेत.

पण हें सर्व कोणी करावें ? गचाळपणा व इंग्रजी भाषा भारतीय तरुणांच्या घशांत कोंबण्याची हांव, या दोन्ही चिन्हांनीं अंकित झालेल्या मुंबई, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद येथील युनिव्हर्सिट्यांकडून हें काम पुढील पन्नास वर्षांतहि होईल अशी अशा वाटत नाहीं. हिंदु युनिव्हर्सिटीकडून जर कांहीं खटपट झाली तर यश येणें शक्य आहे; पण तिच्याकडूनहि कांहीं होईल असें सध्यांच्या परिस्थितीवरून वाटत नाहीं. ज्ञानकोश करतांना पाश्चात्त्यांचें भारतीय पांडित्य तपासून त्यांतील ग्राह्यांश घेण्याचें काम चालू आहे आणि पाश्चात्त्यांचें भारतीय पांडित्य सर्वांशीं तपासण्याचें काम जरी ज्ञानकोशकारांस अशक्य आहे तरी या कार्यांत भावी परिश्रम करणारांस आगाऊ तयारी म्हणून कार्य करतां येईल असें वाटतें. माहितीचे ग्रंथ आपल्या शहरांत दुर्मिळ आहेत. पुस्तकें मिळवावी कोणतीं याचीच माहिती आपल्या लोकांस नाहीं, आणि त्यामुळें एकत्र जमविलेल्या माहितीची जरूर आपल्या लोकांस मोठी आहे.

पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्यांत दोष नाहींत असें नाहीं. दोष आहेतच. सामान्य वाचकांच्या नजरेस येणारा त्यांचा दोष म्हटला म्हणजे भाषांतर करतांना होणारा दोष होय. कांहीं अंशीं हा दोष त्यांचा पांडित्यदोष नसून अपरिहार्य दोष असतो. संस्कृत शब्दांची अर्थकक्षा पूर्णपणें लक्षांत आली तरी इंग्रजी अगर इतर पाश्चात्त्य भाषेंतील शब्दांत व्यक्त करावयाची असल्यामुळें ती अर्थकक्षा पूर्णपणें योजलेल्या प्रतिशब्दांत उतरत नाहीं. त्यामुळें भाषांतरांत मूळांतील अर्थ उतरला नाहीं असें वारंवार ध्यानांत येतें आणि वाचक एकदम भाषांतरकारास दोष देऊं पहातो. इंग्रजी भाषेंत प्रतिशब्द नसतो आणि संस्कृत शब्दांतील अर्थकक्षेचा एक भाग ज्या इंग्रजी शब्दांचें अर्थक्षेत्र विस्तृत आहे अशा शब्दांनीं व्यक्त होतो. एकदां भाषांतर झालें असलें म्हणजे पुढील लेखकांची प्रवृत्ति मूळाकडे न जातां भाषांतरावरून तहान भागवून घेण्याकडे होते. आणि पुढील लेखक इंग्रजी शब्दांतील भलताच अर्थ घेऊन पुढें जातात. या प्रकारच्या गडबडीमुळें पुष्कळ घोंटाळे झाले आहेत.

हा दोष पाश्चात्त्य भाषांतरांत वारंवार होणारा आहे आणि महाराष्ट्रीय वाचकांनीं पाश्चात्त्यांनीं केलेलीं भाषांतरें वाचलीं असतां सहज लक्षांत येणारा आहे, आणि त्यामुळें महाराष्ट्रीयांस त्यांच्या पांडित्याविषयीं संशय एकदम उत्पन्न होतो. इंग्रजी ग्रंथांवरून

स्वदेशाची माहिती घेऊं पहाणारांनीं आणि त्यासाठीं संस्कृत पंडित तयार करण्याच्या योजनेस अडथळा करूं पहाणाऱ्या नामदार परांजप्यांसारख्यांनीं प्रस्तुत ज्ञानविषयक दोष लक्षांत घेणें अवश्य आहे.

पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्यांतील दुसरा एक दोष म्हटला म्हणजे त्यांचा स्वतःच्या देशाच्या संस्कृतीविषयीं आणि संप्रदायाविषयीं असलेला अभिमान होय. हिंदुस्थानांतील अनेक गोष्टी फारच अर्वाचीन आहेत, असें दाखविण्याचा त्यांस मोह पडतो. याकोबी आणि ब्लूमफील्ड यांच्यासारखे लेखक सोडून दिले तर इतर लेखकांस वेदांच्या किंवा नंतरच्या ग्रंथांच्या प्राचीनत्वावर गदा घालण्याची प्रबल इच्छा आहे काय असा संशय वारंवार येतो. आपलें मत सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं आणलेले आधार सर्वस्वी उपेक्षा करण्याजोगे नसतात, आणि त्यामुळें त्यांच्या म्हणण्याकडे बरेंच लक्ष द्यावे लागतें. हापकिन्ससारखे लेखक असें म्हणूं लागतात कीं, आम्ही सर्व ग्रंथ बरेचसे अर्वाचीन धरूं; पुराव्याचा बोजा प्राचीनत्व सिद्ध करूं पहाणारांवर आहे. अर्थात असल्या प्रकारच्या विधानांत पंडितांची मनःप्रवृत्ति दिसून आली तरीं तिला मान देणें भाग पडतें.

पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्याविषयीं आम्ही जी अपेक्षा करतों व जी अपेक्षा फारशी पूर्ण झाली नाहीं, ती म्हटली म्हणजे तटस्थपणाची होय. आपणांस असें वाटतें कीं, ब्राह्मण पक्ष किंवा बौद्ध पक्ष यासारख्या कोणत्याहि पक्षास पाश्चात्त्य ग्रंथकार मिळणार नाहीं आणि हिंदुस्थानच्या ऐतिहासिक प्रश्नांवर निर्विकार मनानें ते लिहितील पण ही अपेक्षा व्यर्थ आहे असें वाटावयास लागतें. ख्रिस्ती संप्रदायावरील आसक्ति वारंवार घोंटाळा करते. हिंदी संस्कृतीच्या पुरस्कर्त्या म्हणून समजल्या जाणाऱ्या मॅक्समुल्लर नांवाच्या पंडिताची अशी अपेक्षा होती कीं, ख्रिस्त संप्रदायाच्या उच्चतम गुणांची माहिती हिंदूंस पन्नासएक वर्षांच्या शिक्षणानें होऊन सर्व हिंदु लवकरच ख्रिस्ती होऊन जातील! त्यानें ही अपेक्षा व्यक्त केल्याला साठ वर्षें होऊन गेलीं. तथापि त्यानें अपेक्षिलेला परिणाम मात्र घडून आला नाहीं.

कित्येक ग्रंथकार ब्राह्मण लबाड आहेत, त्यांच्या भिक्षुकी लेखांवर विश्वास ठेवूं नये, प्रामाणिक बौद्धांच्या ग्रंथांवर विश्वास ठेवावा असा आग्रह धरतात. वेदग्रंथांचे अभ्यासक आणि अवेस्त्याचे अभ्यासक यांमध्यें आपल्या अभ्यासविषयाच्या ग्रंथांसंबं-धानें अभिमान असून एकानें दुसऱ्याच्या ग्रंथास अर्वाचीन ठरविण्याचा प्रयत्न करावा अशी धडपड आहेच. जसजसें अर्वाचीन कालाकडे यावें, तसतसें पाश्चात्त्य पंडितांचें मन अधिकाधिक दूषित झालें आहे असें दिसून येतें.

पाश्चात्त्य पांडित्यांतील दोष त्यांच्या गुणांमुळें भयंकर होतात. जे ग्रंथ आदरणीय नाहींत, त्यांतील दोषांमुळें कोणाचें कांहीं नुकसान होत नाहीं तथापि जे ग्रंथ आदरणीय आहेत, त्यांतील दोष लोकांवर परिणाम घडवितात आणि यामुळें त्यांतील दोष शोधणें अवश्य असते. पाश्चात्त्य ग्रंथकारांचे दोष शोधण्याची दृष्टि अहितकारक नाहीं, ती अवश्य आहे. ग्रंथांत दोष शोधण्याची दृष्टि नेहमींच चांगली असते असें नाहीं. पण

एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांतील पंडितवर्गाच्या पांडित्यामुळें दिपून जाऊन वाचाहीन व्हावें यापेक्षां दोषैकदृक् बुद्धि देखील वाईट नाहीं. पाश्चात्त्यांचें शिष्यत्व योग्य आहे पण तें जगांतील चढाओढींत जय पावण्यासाठीं आहे. पाश्चात्त्य पांडित्यामुळें घाबरून हतवीर्य होणें आणि बाबावाक्यं प्रमाणम् या प्रकारची दृष्टि त्यांच्याविषयीं ठेवणें, हें केवळ उद्धटपणानें पाश्चात्त्य पंडितांच्या लेखांचें महत्त्व कमी समजण्यापेक्षाहि वाईट आहे."

वर सांगितलेल्या गोष्टी आम्हीं ज्ञानकोश तयार करतांना जागृत ठेवल्या होत्या हें आम्ही आश्वासन देतों. आम्हीं या गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं अशी जर उदाहरणें सांपडलीं तर तीं आमचा प्रयत्न अपुरा पडल्यामुळें झालीं असें समजावें.

[माझे बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास : १९२७ पृ. ११० ते १२३.]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९७९
दा. क्र. २३८१८
निबंध २८/११/८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# विभाग ४

संबंध असलेल्या भाषाशास्त्र, तौलनिक दैवतशास्त्र इत्यादि शास्त्रांशीं ओळख देखील हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या अनुषंगानें देतां येईल.

जगाच्या इतिहासाशीं परिचय करून देण्यासाठीं हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या अनुषंगानें सुरुवात करावी हें कित्येकांस बौद्धिक औद्धत्य वाटेल. कां कीं, इतिहासाविषयीं हिंदुस्थानाची अनास्था प्रख्यात आहे. भारतीयांचा इतिहास स्पष्ट करण्यासाठीं परक्यांची मदत घ्यावयाची ही जर पद्धति आहे, तर भारतापासून प्रारंभ करून जगाची ओळख करून देण्याचा प्रयत्न आपण कसा करणार? या प्रश्नास उत्तर एवढेंच कीं, जगाच्या अत्यंत प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडणारा माल म्हणजे अत्यंत प्राचीन भाषा व शब्द हे भारतांत शिल्लक आहेत. त्यांचे निरनिराळ्या काळांतले अवशेषहि शिल्लक आहेत. फक्त या अवशेषांचा पृथ्वीच्या सूर्याभोंवती होणाऱ्या परिभ्रमणाच्या आंकड्यांशीं संबंध लावावयाचा, हा इतिहास संशोधकांचा कर्तव्यभाग आहे.

शिवाय हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, इतिहास लिहिण्याची कला भारतीयांस अगदीं अपरिचित होती असें नाहीं. ज्या भावना इतिहासोत्पत्तीस व इतिहासरक्षणास कारणीभूत होतात त्या भावना भारतांत जागृत होत्या.

त्या भावनांचे परिणाम ज्या स्वरूपांत आपणांस दृष्टीस पडतात त्या परिणामांस आपण आज कदाचित् इतिहास म्हणणार नाहीं. शिलालेखांवरील राजावली व पुराणांतील कथा व कुलपरंपरा यांस आजचे लोक इतिहास म्हणणार नाहींत. तथापि ज्या भावना इतिहासग्रंथांच्या उत्पत्तीस कारण झाल्या त्या याहि कृतींच्या उत्पत्तीस कारण झाल्या. काश्मीरची राजतरंगिणी, सिंहलद्वीपांतील वंसोग्रंथ व आसाम आराकानकडील राजांचे इतिहास, यासारखे प्रकार पाश्चात्त्य लोकांस इतिहासासारखे वाटतात; परंतु राष्ट्राच्या ज्या अनेक उलाढाली झाल्या, त्यांचें वर्णन करणारे हे वंसोग्रंथ खास नाहींत. ऋग्वेदांत ज्याप्रमाणें ब्राह्मणांस गाईचें दान करणाऱ्या राजेलोकांच्या जंत्री सांपडतात, त्या जंत्रीस पौराणिक, काल्पनिक, भाकडकथांची जोड दिली असतां जें स्वरूप येईल तें या वंसोग्रंथाचें आहे. पुष्कळवेळां तर ज्या कथा हिंदुस्थानांतील कित्येक राजांच्या नांवांनीं खपत होत्या त्या सिंहलांतील कांहीं राजांच्या नांवांनीं दडपून दिल्या आहेत. आहोम राजांच्या इतिहासाचे आहोमी (आसामी) भाषेंतील ग्रंथ भाषांतरित झाले नाहींत आणि त्यामुळें त्या ग्रंथांवर विवेचन करतां येत नाहीं; परंतु पौराणिक ग्रंथांत जे दोष असतील अथवा जे दोष बखरींत आढळतात तेच दोष तेथेंहि असतील अशी आमची समजूत आहे.

इतिहास लिहिण्याची मनुष्याची प्रवृत्ति झाली तिचें कारण आपण काय केलें तें लिहून ठेवावें ही मनुष्याची इच्छा होय. या इच्छेमुळें हिंदुस्थानांतील अनेक राजांनी आपले विजय शिलालेखांत कोरून ठेविले. ते सर्व इतिहास होत. इतिहासावर भारतीयांची आस्था नव्हती असें नाहीं. तथापि इतिहास या स्वरूपाचें वाङ्मय भारतांत फारसें वाढलें नाहीं, हें मात्र कबूल केलें पाहिजे. याचें मुख्य कारण राष्ट्राची इतिहासविषयक अनास्था होती असें नाहीं. वेदरक्षण झालें तें वाङ्मयरक्षणाच्या हेतूमुळें झालें असें

मुळींच नाहीं तर प्राचीन ऋचांचा यज्ञाकडे उपयोग करण्यांत येई, यज्ञ करण्यासाठीं तें ज्ञान शिकावें लागे, अशी परिस्थिति असल्यामुळें त्या ग्रंथांचें जतन तरी झालें. भाटांचा जो वर्ग होता त्यानें राजस्थानाच्या बऱ्याच इतिहासाचें जतन केलें. तथापि भाट हे वाङ्मयाचे कर्ते होते. काव्यें करणें हें त्यांचें कार्य असून इतिहासरक्षण करणें हें त्यांचें कार्य नव्हतें. त्यांचें कार्य लोकरंजन किंवा दात्याचें रंजन करण्याचे होतें. आपणांस या प्रवृत्तीमुळें थोडासा इतिहास उपलब्ध झाला आहे. करमणूक हा जेव्हां उद्देश असतो तेव्हां इतिहास हा चांगला काळजीपूर्वक रक्षिला जातो असें नाहीं. जीं कथानकें मनोरंजक असतात त्यांस प्राधान्य दिलें जातें. जो मोठा दिग्विजयी योद्धा असेल त्याच्या चरित्रापेक्षां ज्याच्या प्रेमविषयासंबंधानें लोकांना अधिक मौज वाटेल त्याचेंच चरित्र रक्षिलें जातें. श्रोत्यांवर परिणाम घडवावयाचा असतो तेव्हां साध्या वर्णनापेक्षां तिखटमीठ लाविलेलें वर्णन लोकांस सहजच अधिक आवडणार. लोकरंजनास जेव्हां प्राधान्य दिलें जातें तेव्हां व्यक्तीचें ऐतिहासिक महत्त्व आणि सत्य या दोन्ही तत्त्वांची राखरांगोळी होते. बाजीरावाच्या मोठमोठ्या लढायांपेक्षां सामान्य लोकांस त्याच्या मस्तानीचें नांव अधिक परिचित आहे. हिंदुस्थानांत इतिहासरक्षणाचें प्रयत्न आपणांस वारंवार दृष्टीस पडतात. पण तें प्रयत्न लोकरंजन प्रयत्नांत किंवा विशिष्ट उपासनेचा किंवा तत्त्वाचा पुढाकार करण्याच्या प्रयत्नांत विलीन झालेले दृष्टीस पडतात.

कित्येक इतिहास ग्रंथामध्यें खोटें लिहिण्याची इच्छा लेखकास जास्त असते आणि पुष्कळदां खोटे लिहिण्याकरितांच इतिहास जन्मास येतात. जगाची ऐतिहासिक भावना किंवा इतिहास महत्त्वाची जाणीव सत्य लिहिण्याच्या प्रयत्नावरून जशी दिसून येणार आहे तशीच खोटें लिहिण्याच्या प्रयत्नावरूनहि दिसून येणार आहे. जो खोटें लिहून ठेवितो तो भावी वाचकांस फसविण्याच्या उद्देशानें लिहून ठेवितो आणि त्यास इतिहास-महत्त्व असल्याशिवाय तो खोटें लिहिण्याचे परिश्रम करील असें संभवत नाहीं. प्रत्येक इतिहास ग्रंथामध्यें कांहीं तरी खोटें अगर पक्षाभिमानानें अर्धेमुर्धें खरें लिहिणें दृष्टीस पडतेंच. तर जो ग्रंथ अगोदरच काव्य आहे त्यावर वैयक्तिक इच्छेनें किंवा आकांक्षेनें परिणाम होऊन त्याचें स्वरूप विकृत होतें हें आपल्या रामायण महाभारतादि ग्रंथांवरून व व पुराणांवरून स्पष्ट होतें. खोट्या व लपंडावीच्या विधानांवरून खोटेपणाचीं व लपंडावीचीं कारणें शोधिलीं असतां आजच्या संशोधकांस इतिहास अधिक खुला होतो. त्याप्रमाणेंच आपल्या देशांतील सर्व प्रकारचे ग्रंथ घेऊन आपणांस इतिहास खुला करावा लागेल.

ग्रीकांचा प्रख्यात इतिहासकार हिरोडोटस याचें स्तोम बरेंच माजविलेलें आपणांस दृष्टीस पडतें. त्यास सत्यवक्ता म्हणणारे लोक आंधळे आहेत असें वाटावयास लागतें. हिरोडोटसचा ऐतिहासिक प्रामाणिकपणा देखील वर्णिला जातो. आज आपण हिरोडोटसचा ग्रंथ वाचूं लागलों म्हणजे कर्णोपकर्णी ऐकलेल्या कितीतरी गोष्टी त्यानें लिहून ठेविलेल्या दृष्टीस पडतात. शिवाय लोकरंजन हा हेतु त्याच्या ग्रंथांत प्राधान्यानें दृष्टीस

पडतो. त्याच्या इतिहासांत कादंबरीवजा अनेक गोष्टी त्यानें भरल्या आहेत असें दिसून येतें. जिज्ञासूस ज्ञान देण्याच्या करामतीपेक्षां टवाळ व चावट गोष्टींचे शोकी असे जे गृहस्थ आहेत त्यांना खूष करण्याच्या करामतीवर त्याच्या ग्रंथाची लोकप्रियता रचली गेली असावी आणि त्यानेंहि लोकप्रियताच मिळविण्यासाठीं खटपट केली असावी असें ग्रंथ वाचतांना वाटतें. असें वाटण्यास एकच कारण देतों. हिरोडोटसनें हिंदुस्थानांतील लोकांसंबंधानें ते मनुष्यभक्षक आहेत अशी आपली समजूत व्यक्त केली आहे. ( Herodotus III–99 ). त्यास सत्य जाणण्याची संधि होती. तथापि जी गोष्ट मनोरंजक आहे, तिच्यांतील सत्य शोधून तिचा मनोरंजकपणा कशास घालवावा या भावनेनें तरी त्यानें सत्य शोधलें नसावें. किंवा मुद्दाम असत्य प्रसृत करण्याची त्याची इच्छा असावी असें दिसतें. हिरोडोटसचा ग्रंथ इतिहास या दृष्टीनें पुन्हां मांडणी करण्यास अवश्य असा आहे. हिरोडोटसची इतिहासविषयक कल्पना फारशी उज्ज्वल दिसत नाहीं. तो ऐतिहासिक टीपांनीं युक्त व थोड्याबहुत चावट गोष्टींनी लोकप्रिय झालेलें असें प्रवासवर्णन होय असें आम्ही म्हणूं.

इतिहास लिहितांना ज्या कांहीं क्रिया होतात त्यांकडे आपण थोडेंसें लक्ष देऊं.

( १ ) माहिती जमा करणें. ( २ ) वृत्तांचें महत्त्वमापन करणें. ( ३ ) माहितीच्या अभावाच्या प्रसंगीं माहित असलेल्या गोष्टीवरून संयोजक कल्पना करणें. ( ४ ) लेखनीय माहितीची व्यापकता नियमित करणें. ( ५ ) जगाच्या किंवा राष्ट्राच्या विकासक्रमाविषयीं सिद्धान्त करणें.

या क्रियांपैकीं प्रत्येक क्रिया प्राचीन वाङ्मयांत झालेली दिसते. रामायण, महाभारत व पुराणें यांत जुनी माहिती जमा करून ठेवल्याचे पुरावे वारंवार दिसतात.

इतिहास कसा लिहावा यासंबंधानें विचार नेहमीं बदलत असतात. कालची स्थिति आज समजावी हें सर्वांसच वाटतें. पण कालच्या कोणत्या गोष्टींस महत्त्व द्यावयाचें यासंबंधानें कल्पना असेल तर इतिहास लिहिण्यास दिशा मिळेल. वृत्तांच्या महत्त्वासंबंधानें प्राचीनांची जी बुद्धि असेल ती अवगमिली पाहिजे. " कार्यमहत्त्वविवेचकता " हा इतिहासकाराचा अवश्य गुण तो प्राचीनांत होता काय हें आपणांस पाहिलें पाहिजे. हा गुण त्यांत होता असें केवळ पुराणाच्या व्याख्येवरून दिसतें.

प्राचीनांची इतिहास-विषयक कल्पना आणि पुराण-विषयक कल्पना आज आपणांस जाणणें अवश्य आहे. पुराण म्हणजे फार जुना इतिहास. प्राचीन पुराणांची व्याख्या येणें-प्रमाणें आहे.

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चेति पुराणं पंचलक्षणम् ।।

पंचमहाभूतात्मक जगाची उत्पत्ति कशी झाली, मूलभूत तत्त्वांपासून इतर चराचर कसें निर्माण झालें, निरनिराळे वंश कोणते झाले, त्यांच्या कामगिऱ्या काय झाल्या, कालाचे अत्यंत मोठे विभाग म्हणजे जीं मन्वंतरें, त्या निरनिराळ्या मन्वंतरांत कोणकोणत्या गोष्टी

होऊन होऊन गेल्या, या सर्वांची माहिती पुराणांत दिली पाहिजे अशी प्राचीनांची भावना होती. अत्यंत जुन्या गोष्टींची माहिती फारशी कालानुक्रमानें सांगतां येत नाहीं आणि त्या गोष्टींतील महत्त्वाच्या गोष्टी केवळ जुन्या म्हणून विशेष कालविषयक चर्चा केल्याशिवाय उतरून घेणें व ग्रंथीं समाविष्ट करणें याशिवाय दुसरा कोणताहि पक्ष ग्रंथकारांस उरत नाहीं. असें असल्यामुळें पुष्कळशा प्राचीन कथा कालानुक्रमानें मांडणीशिवाय व कालविषयक विधान केल्याशिवाय पुराणांत ग्रथित केलेल्या दिसतात.

इतिहासाचा एक हेतु असा असतो कीं, आज लोकांना जें दिसत आहे त्याची उत्पत्ति अगर विकास सांगून तें स्पष्ट करावें. या हेतूचा इतिहास हा एक शक्य परिणाम आहे तथापि तो एकच नाहीं. या हेतूमुळें जें वाङ्मय उत्पन्न होतें तें केवळ इतिहासरूपी होत नाहीं. जेव्हां एखाद्या गोष्टीची आपणांस साधार माहिती नसेल किंवा ती माहिती उपलब्ध होण्याजोगी नसेल तेव्हां पुढील प्रश्न सोडविण्यासाठीं मनुष्य कल्पना लढवूं लागतो. विश्व उत्पन्न कसें झालें ? जाती उत्पन्न कशा झाल्या ? राष्ट्रें उत्पन्न कशी झालीं ? इत्यादि जाडे प्रश्न एखाद्या काळच्या जाणते म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांना साहित्य असो अगर नसो सोडविणें भाग पडतें, आणि ते त्यांस उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें कल्पना करूं लागतात. या कल्पनांचें परीक्षण न होतां शेंकडों वर्षें त्या कल्पना लोकांस पढविल्या म्हणजे त्यांवर लोकांची इतकी श्रद्धा बसूं लागते कीं, त्या कल्पनांवर विश्वास न ठेवणारा मनुष्य लोकांस नास्तिक अगर पाखंडी वाटावयास लागतो. पुष्कळ वेळा त्या कल्पनांनी एखादा काल्पनिक इतिहासहि तयार होऊं लागतो. या तऱ्हेचा "इतिहास" आपल्या पुराणांतून व रामायणमहाभारतादि आर्ष काव्यांतून आणि त्याप्रमाणेंच वेदांतील अर्थवादांतून पुष्कळ दृष्टीस पडतो. भारतीयांस इतिहासाविषयीं अनास्था असलेले लोक म्हणून शिक्का मिळाला आहे आणि यांत तथ्यहि पुष्कळ आहे; पण याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं प्राचीनांस इतिहासजिज्ञासा होती. ज्या गोष्टींचा इतिहास ठाऊक नाहीं तों ज्ञानाचा खळगा विचार करून आणि तत्त्वज्ञान लावून भरून काढणें ही क्रिया ते करीत होते. पुष्कळदा ही क्रिया करतांना केवळ काव्यरूपी कल्पनाच उत्पन्न होत. काव्यरूपीच त्यांची कल्पना होई ही गोष्ट प्राचीन भारतीयांच्या विरुद्ध मांडतां येईल. पण याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, माहितीचा अभाव निव्वळ कल्पनेनें भरून काढणारे लोक भारतीयांतच केवळ नाहींत तर ते चोहोंकडे आहेत. प्रत्येक राष्ट्र आडाम-पासून किंवा त्याच्या वंशांतील एखाद्या पुरुषापासून झालें आहे अशा समजुतींनीं ग्रीकांचे, अरबांचे व मुसुलमानांचे इतिहास यथास्थित भरलेले दिसतात. बौद्ध ग्रंथकारांनीं देखील आपल्या कथांचें चांगलें यथास्थित ग्रहण केलेलें दिसतें. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं जेथें माहिती नसेल तेथें इतिहासकारानें वस्तुस्थिति कशी असावी यासंबंधानें कल्पना करणें ही क्रिया आजच्या शास्त्रीय पद्धतीनेंहि इतिहासलेखनाचें अंग आहेच. फरक हा कीं आजचा इतिहासलेखक कल्पनेस कल्पनाच म्हणून पुढें मांडील. प्राचीन पुराणकार तसें करीत नसत.

इतिहासाचें क्षेत्र काय व त्याचें इतर ज्ञानक्षेत्रापासून पृथक्करण कसें करावें हें आजहि निश्चितपणें ठरलें नाहीं. लोकांच्या इतर ज्ञानावर क्रियांच्या महत्त्वाचें ज्ञान अवलंबून असणार आणि त्यावर लेखन अवलंबून असणार. जगांत झालेल्या सर्व प्रकारच्या घडामोडी या इतिहासाचा विषय होत. इतिहास या विषयाचें स्वरूप दिवसानुदिवस अधिकाधिक विकसित होऊं लागलें आहे. इतिहास या शब्दाचा म्हणजे इति + ह + आस या शब्दसमुच्चयाचा मूळ अर्थ 'असें झालें' असा आहे. ग्रीक लोकांमध्यें हिस्टोरिया हा शब्द प्रथम जन्मास आला आणि त्याचा अर्थ शोध किंवा माहिती असा होता. ज्ञानाचें वर्गीकरण करूं इच्छिणारे लोक इतिहास हें शास्त्र आहे किंवा नाहीं याची बरीच पंचाईत करतात. ते म्हणतात कीं, इतिहास हें शास्त्रच नव्हे.कोणी म्हणतात मनुष्य हा एक प्राणी आहे, तेव्हां मनुष्याच्या जगावरील क्रिया हा एकंदर प्राणिशास्त्राचा विषय होईल. कित्येक असें म्हणतात कीं इतिहास हें एकच जगांतील शास्त्र होय. इतर शास्त्रें म्हणजे मनुष्यप्राण्याचें ज्ञान या सदराखालीं इतिहास या शास्त्रांत सर्व कांहीं समाविष्ट करतां येईल. कारण कोणासहि वास्तविक ज्ञान होतच नाहीं. वस्तूंचे इंद्रियगोचर स्वरूप व त्यावर रचलेलीं अनुमानें तेवढीं मनुष्यास ठाऊक आहेत. तेव्हां शास्त्रीय ज्ञान हा केवळ मनुष्येतिहासाचा भाग होय.

मनुष्याचा ऐतिहासिक घडामोडींवर विचार होऊं लागतो आणि त्याचे जगाच्या क्रमाविषयीं सिद्धान्त बनूं लागतात. ही क्रिया देखील आपल्या वाङ्मयांत दृष्टीस पडते. 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी' म्हणून एक अभ्यासक्षेत्र यूरोपांत दृष्टीस पडतें त्यावर पुष्कळ ग्रंथ निर्माण झाले आहेत. त्या ग्रंथांचे विषय साधारणपणें खालील प्रकारचे दृष्टीस पडतात.

जगांतील अनेक घडामोडी पाहून त्यांतून कांहीं ईश्वरी संकेत दृष्टीस पडतो काय हें पहावयाचें आणि त्यांतून ईश्वराचे हेतू ओळखावयाचे. समाजाचा क्रम पाहून त्यांतून ईश्वराचे हेतू व नियम ओळखून आपला ईश्वराविषयींचा भाव दृढ करावा या इच्छेनें कित्येक ग्रंथकार प्रवृत्त झाले आहेत.

कित्येक ग्रंथांतून इजिप्त, खाल्डिया, ग्रीस, रोम इत्यादि राष्ट्रांचा विकास व विनाश हें पाहून संस्कृतीची मशाल एका हातांतून दुसऱ्या हातांत अधिक प्रभावयुक्त होण्याकरितां कशी दिली इत्यादि गोष्टी लिहिल्या आहेत.

कित्येकांनीं असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, 'रिव्हिलेशन' मध्यें जीं विधानें केलीं आहेत तींच इतिहासाचें तत्त्वज्ञान होत.

समाजशास्त्रामध्यें समाजविकासात्मक जे नियम सांपडले त्यांसहि कोणी 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी' असें नांव दिलें आहे.

कित्येकांनीं जगाच्या इतिहासांत दूरदूरच्या काळांस एकत्र जोडणारें कांहीं अर्थशास्त्रीय नियम सांपडतात काय यासाठीं झालेल्या शोधांच्या फलास 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी' हें नांव दिलें आहे. कोलंबियाचे प्रोफेसर डॉक्टर सेलिग्मन यांनीं यास

'एकानामिक इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी' म्हणजे जगाच्या इतिहासाचें अर्थशास्त्रीय स्पष्टीकरण असें नांव दिलें आहे.

प्राचीनांचें इतिहासविषयक ज्ञान शोधावयाचें म्हणजे जगांतील क्रियांचें महत्त्व ते मोजीत होते काय, आजच्या महत्त्वाच्या गोष्टींस कारण शोधून त्या गोष्टींच्या अस्तित्वाचें स्पष्टीकरण करणें यास ते महत्त्व देत होते काय, व्यवहारनियम इतिहासावरून शिकण्याचे ते पत्करीत होते काय आणि मनुष्यक्रियाविषयक वाङ्मय त्यांस आवडत होतें काय हे प्रश्न उपस्थित होतात. या सर्व प्रश्नांस होय म्हणूनच उत्तर द्यावें लागतें. एवढें खरें कीं, इतिहासशास्त्राची जोपासना पाश्चात्यांमध्यें जितक्या प्रमाणानें झाली तितक्या प्रमाणानें आपल्याकडे झाली नाहीं.

आपल्याकडे इतिहासावर जें तत्त्वज्ञान तयार झालें त्यांत जे अनेक सिद्धांत मांडले गेले, आणि लेखनविषयक कृति तयार झाली त्यांचें सामान्य स्वरूप येणेंप्रमाणें :—

(१) स्मृत्यर्ह काय व विस्मृत्यर्ह काय याविषयीं विचार करून इतिहासविषयक ग्रंथाची व्याख्या करणें.

(२) युग, अवतार, मन्वंतर असे महत्त्वाचे कालविभाग निर्देशिणें.

(३) मोठ्या कार्यकर्त्या पुरुषाचें अस्तित्व विशिष्ट क्रिया विकासाचें सिद्धांत सांगून स्पष्ट करणें.

(४) युद्धें, राज्यक्रांत्या यांचे युक्तायुक्त परिणाम व्यक्त करणें.

(५) मानवी क्रिया पाहून त्या क्रियांचा अंतिम हेतु काय याविषयीं विचार करणे आणि त्या हेतूंनी क्रियांची योग्यायोग्यता ठरविणें.

(६) इतिहासविकासाचे नियम राजकीय घडामोडींतच केवळ व्यक्त होतात असें नाहीं तर वैचारिक इतिहासांत व पारमार्थिक क्रियांमध्यें व्यक्त होतात हें जाणून वैचारिक व पारमार्थिक इतिहासाचा प्रयत्न करणें.

(७) विशिष्ट राजकीय घडामोडींविषयीं औदासीन्य ठेवणें.

(८) राजवंशावली व गुरुपरंपरा यांचें रक्षण करणें.

या सर्व क्रिया व भावना पुराणग्रंथांत दिसत आहेत. त्या पुराणग्रंथकारांना ऐतिहासिक तत्त्वज्ञानाची भावना तीक्ष्णपणें होती हें दाखवितात.

प्राचीनांचें इतिहासविषयक तत्त्वज्ञान पुराणाच्या व्याख्येंत अंशतः आहे. ती व्याख्या व तिचे स्पष्टीकरण मागें दिलेंच आहे. आपल्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाची एक महत्त्वाची कल्पना म्हटली म्हणजे युगकल्पना होय. गेला तो दिवस सोन्याचा या शिशु-कल्पनेचेंच हें जास्त उत्तान स्वरूप होय. कृतयुगामध्यें चतुष्पाद धर्म होता, त्रेतायुगामध्यें त्रिपाद धर्म होता, द्वापारामध्यें द्विपाद धर्म होता आणि कलियुगामध्यें एकपाद धर्म राहाणार. या तऱ्हेची कल्पना आपल्याकडे पुराणांतून व धर्मशास्त्रांतून प्रसृत केली गेली.

आपल्याकडील दुसरी एक कल्पना म्हटली म्हणजे अवतार कल्पना होय. अवतार कल्पना—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

या गीतावाक्यांत स्पष्टपणें मांडली आहे. जगांत जीं मोठालीं कार्ये होत असतात, त्या कार्यांचा कर्ता म्हणून कोणीतरी पुरुष उदयास येतो अशा पुरुषास अवतारी पुरुष म्हणण्याचा प्रघात आहे. अवतारी पुरुष म्हणजे स्वर्गांतील एखादा देव नाहींसा होऊन मनुष्यरूपानें वागतो अशी प्राचीनांची समजूत होती असें दिसत नाहीं. कां कीं, धर्म आणि विदुर या दोघांस यमाचे अवतार महाभारतकारांनीं मानलें आहे आणि ते दोघेहि पृथ्वीवर असतां यमधर्महि आपल्या लोकांत होता असें धरलें आहे.

अवतारी पुरुष अधिक महत्त्वाचे किंवा परिस्थिति अधिक महत्त्वाची याविषयीं परस्परविरुद्ध भावना देखील लोकांच्या विचारांत दृष्टीस पडतात. कार्यकर्ता पुरुष अनेक प्रसंगीं असें म्हणतांना दाखविला आहे कीं, "मी केवळ होणाऱ्या कार्याला निमित्तमात्र आहे, कार्य करणारी आणि कार्य माझ्या हातून घडविणारी शक्ति निराळीच आहे."

इतिहासाचा विषय जगांतील राजकीय घडामोडी होत एवढेंच केवळ नाहीं तर जगांतील ज्ञान हाहि इतिहासाचा विषय होय असें प्राचीन मानीत असत. आणि प्रत्येक शास्त्राचा इतिहास देण्याचा ते प्रयत्न करीत. प्रसंगीं ते शास्त्र देवानेंच दिलें असें दाखवीत. पुष्कळ शास्त्रें वेदमूलक आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न करीत.

इतिहासज्ञानामुळें जी कार्यकारणपरंपरा लक्षांत येते तिचें ज्ञान पुष्कळ प्रसंगीं जतन करून ठेवलेलें दिसतें.

इतिहासाच्या योगानें राजनीतिशास्त्र विकास पावतें. हें नीतिशास्त्र आपल्याकडे पुष्कळ विकसित झालें होतें व त्या शास्त्रावर अनेक ग्रंथकार होऊन गेले हें चाणक्याचा ग्रंथ वाचला असतां सहज लक्षांत येईल, लोकांमध्यें ऐतिहासिक भावना कितपत पसरली आहे हें कालक्रमाविषयीं कल्पना किती प्रचलित आहेत हें पाहून त्यावरून ठरवावयाचें. अवतारकल्पना, युगकल्पना हिंदूंमध्यें सामान्य मनुष्यासहि परिचित असतात; म्हणजे सामान्यांमध्येंहि ऐतिहासिक भावना आहे असें म्हणतां येईल. सामान्य वाङ्मयामध्यें देखील इतिहासमूलक सिद्धांत व भावना दृष्टीस पडतात. त्या आपणांस तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत देखील सांपडतील.

[ महाराष्ट्रीय ज्ञानकोश – प्रस्तावना खंड विभाग तिसरा बुद्धपूर्व जग पृ. १–५ ]

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२५७९
दा. क्र. २३८७८
निबंध २८।८।७३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# १६. भारतीय संस्कृतिविकासाचें अवलोकन

हिंदुस्थानच्या इतिहासावर बाह्य जगाचा परिणाम अत्यंत प्राचीन कालापासून एकसारखा होत आहे आणि तसाच हिंदुस्थानचा बाह्य जगावर परिणाम झाला आहे. विशिष्ट ऐतिहासिक घडामोडींचें आकलन करण्यास केवल स्थानिक अवलोकन करून चालेल; तथापि दीर्घकालीन वृत्तविकासाची कारणमीमांसा आपण करूं लागलों म्हणजे आपणांस आपलें अवलोकनक्षेत्रहि विस्तृत केलें पाहिजे. भारतांतील राजकीय आणि धार्मिक त्याचप्रमाणें कलाविषयक घडामोडींचा जागतिक इतिहासाशीं संबंध इतका आहे कीं, तो सांगितल्याशिवाय भारतीय घडामोडींचें ऐतिहासिक स्पष्टीकरण होणार नाहीं, ही गोष्ट पुढें वारंवार दृष्टीस पडणार आहे. चेंडूच्या माळेंतील एका टोंकाच्या चेंडूस ठोका मारला म्हणजे तो धक्का शेजारच्या चेंडूस लागतो आणि त्यामार्फत त्याच्या पलीकडच्या चेंडूस लागतो हा नियम राष्ट्रांच्या इतिहासांत देखील कार्य करीत आहे. फरक एवढाच आहे कीं वरील नियमाशिवाय दुसरेहि नियम कार्य करीत आहेत. प्रत्येक राज्य चेंडूप्रमाणें निर्जीव नसून स्वेच्छेनें चलनवलन करण्यास, दुसऱ्यास धक्का देण्यास, आलेल्या धक्क्याचा प्रतिकार करण्यास किंवा धक्का देणाऱ्यावरच उलटण्यास समर्थ असूं शकतें. आघात करणारा चेंडू पुढील चेंडूचें स्थान न घेतां त्यास किंवा पुढील अनेकांस बाजूला सारून स्वतः पुढें जातो तसाहि प्रकार होतो. एखादा मोठा जेता झाला म्हणजे तो आपली विजयसेना तयार करतो. तिचे विजय फार दूरवर जातात. एवंच या बाराशें वर्षांच्या दीर्घकालांत महाराष्ट्राचा अगर हिंदुस्थानचा इतिहास लिहिताना बाहेरच्या घडामोडींकडे एकसारखें लक्ष ठेवलें पाहिजे.

शातवाहनकालाच्या प्रारंभीच्या भागांतच महाराष्ट्रांत बुद्धसंप्रदाय स्थापन झालेला दिसत आहे त्याअर्थी शातवाहन कालाची सामाजिक स्थिति जाणावयाची असल्यास बुद्धाच्या कालापासूनच सुरुवात करावी लागेल. हें मागें सांगितलेंच आहे. लोकांचे एकमेकांशी आर्थिक व्यवहार सामाजिक तसे राजकीय कारणांनीं नियमित होत असतात. आणि यामुळें सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनें देखील धार्मिक आणि राजकीय स्थित्यंतरास प्राधान्य द्यावें लागतें. परराष्ट्रीय व्यापाराविषयी राजाची ज्याप्रमाणें वृत्ति असेल तिच्या अनुरूप व्यापारी लोकांचें आगमन आणि परदेशगमन निश्चित होतें, त्याप्रमाणें धार्मिक व्यवहाराचा एकंदर आयुष्यक्रमावर फारच परिणाम होतो. पूज्य विषय कोणते, त्यांचें संरक्षण किंवा अलंकरण कसें करावें, उत्सवदिन कोणते पाळावे, व त्या

उत्सवदिनाच्या प्रसंगीं खर्च कोणत्या प्रकारचा करावा हें देखील धार्मिक चळवळींच्यामुळें ठरत असतें. त्यामुळें सर्व आयुष्यक्रमावर ज्या चळवळीचा परिणाम होतो त्या चळवळींचा जितका प्रारंभापासून इतिहास मिळवावा तितका चांगला. परदेशीं जो व्यापार चालतो त्याचा धार्मिक मतांशीं संबंध असतोच. उदाहरणार्थ, साबुदाणा हा उपासाला चालतो त्यामुळें साबुदाण्याच्या व्यापाऱ्यास महाराष्ट्रांत आजहि महत्त्व आहे. यासाठीं शातवाहन-कालीन समाजस्वरूपनिर्णायक गोष्टी समजावून घ्यावयाच्या झाल्यास बौद्ध संप्रदायाच्या प्रसारास महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. आणि सामाजिक इतिहासास बुद्धकालापासून सुरुवात केली पाहिजे. महाराष्ट्रातील बरीचशी कला, दानप्रवृत्ति, सामाजिक कर्तव्यासंबंधानें बुद्धि या सर्व गोष्टी बौद्धसंप्रदायाच्या अनुषंगानेंच वृद्धिंगत झाल्या. शातवाहनांच्या कालाचा अगदीं प्रारंभकाल म्हणजे सिमुक शातवाहनाचा काल जरी आपण घेतला तरी देखील त्याच्या पूर्वीच बौद्ध संप्रदायाची वाङ्मयविषयक प्रगति पुष्कळच झालेली आहे. अशोकाच्या कालांत मौर्य राज्य कोंकणांत आलें आणि त्याच कालांत सिंहलद्वीपांत बौद्ध संप्रदायानें प्रवेश केला. बौद्ध संप्रदायाच्या प्रसारासाठीं अशोकाची खटपट भोजक व पेतनिक आणि राष्ट्रिक यांच्या प्रदेशांत सत्कर्मप्रसाराच्या रूपानें चालली होती याबद्दल पुरावा आपणांस अशोकलेखातच आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां खिस्तपूर्व ५०० वर्षें या कालापासून खिस्तोत्तर पांचसहाशें वर्षें या कालापर्यंत एक हजार वर्षें महाराष्ट्रांतील धार्मिक इतिहासाकडे आणि त्यांतल्या त्यांत बौद्ध संप्रदायाच्या विस्तारसंकोचाकडे लक्ष देणें आपणांस अवश्य आहे. बौद्ध राज्य फार पिढ्या टिकलें नाहीं याच्या योगानें बुद्ध-संप्रदायास ताठरपणा उत्पन्न होण्यास अवकाश सांपडला नाहीं, आणि युरोपांत ज्याप्रमाणें धर्मच्छळ लांबलचक इतिहासाचा विषय झाला तसा तो हिंदुस्थानांत झाला नाहीं.

या दीर्घ कालांत पश्चिमेचा परिणाम महाराष्ट्रावर कांहींच झाला नसेल असें समजणें योग्य होणार नाहीं. जेव्हां दोन लोक एकत्र येतात तेव्हां एकमेकांच्या संस्कृतीचा एकमेकांवर परिणाम घडतोच. तो तसा घडत नसला तर परस्परव्यवहार मुळींच शक्य होणार नाहीं. परदेशांशीं व्यापार हें सामाजिक आयुष्यक्रमाचें स्थित्यंतर करण्यास बरेंच कारण होत असतें. आणि ज्या लोकांचा एकमेकांशीं व्यापार असतो त्या लोकांचा एकमेकांवर परिणाम झालाच पाहिजे. ज्याप्रमाणें आपल्या देशांतील माल परदेशीं गेला तर त्याच्या बदला परदेशाचा कांहींतरी माल हा आपल्याकडे आलाच पाहिजे, त्याप्रमाणेंच सामाजिकें व्यवहाराचे आहे. परदेशांचा परिणाम अधिक होण्यास माणसांचा व्यापार हें एक मोठें कारण प्राचीनकाळीं होतें तें कारण अस्तित्त्वांत असतां कार्य झालें नाहीं असें कसें समजावें ? प्राचीन कालीं स्त्रियांचा व्यापार चालत होता. इकडील स्त्रिया परदेशीं विकल्या जात होत्या त्याप्रमाणें परदेशच्या स्त्रिया इकडे विकल्या जात होत्या. या स्त्रियांच्या व्यापाराचा धार्मिक भावनांवर व समजुतीवर किती परिणाम होत होता ही गोष्ट देखील विचार करण्याजोगी आहे. आणि तीसंबंधानें कांहीं चर्चा पुढें येईलच. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या अवगमनासाठीं पश्चिम किनाऱ्याशीं जगाचें जें

दळणवळण होतें त्याचा व त्याजबरोबर नौकानयनाचा आणि चांचेगिरीचा इतिहासदेखील जवळ करावा लागतो.

पश्चिम एशियाचा राजकीय इतिहास हिंदुस्थानच्या इतिहासाशीं संबद्ध आहे आणि ग्रीक व रोमन साम्राज्यांचा इतिहास पश्चिम एशियाशीं संबद्ध आहे. पश्चिम एशिया किंवा मध्य एशियांत जी शक्ति उत्पन्न होई ती शक्ति पूर्व यूरोपास तशीच हिंदुस्थानास जाणवे. हें शक, हूण आणि इस्लाम यांच्या इतिहासावरून दिसून येतें. बुद्धोत्तर सहस्रकांत हिंदुस्थानांत दोन तीन घराणीं होतीं. ती म्हटली म्हणजे मौर्य, शातवाहन गुप्त आणि वाकाटक होत, तर याच कालांतील हिंदुस्थानबाहेरच्या मोठ्या स्पर्ध्यमान सत्ता म्हटल्या म्हणजे रोमन साम्राज्य, ग्रीक संस्थानसंघ, इराणी साम्राज्य आणि शकराज्य ह्या होत. या सर्व सत्तांचा हिंदुस्थानशीं संबंध आला आहे आणि हिंदुस्थानच्या सम्राटास त्या विविध सत्तांशीं झगडावें लागलें आहे. इराणी साम्राज्य हिंदुस्थान व ग्रीस या दोन बाजूंनीं सत्ता वाढवूं पहात होतें. आणि दरायसनें हिंदुस्थानचा कांहीं भाग आपल्या ताब्यांत ठेवलाहि होता. या काळांतील इराणी आणि हिंदु यांच्या सामाजिक संबंधांचा इतिहास शोधण्याकडे संशोधकांचे लक्ष लागूं लागलें आहे. तथापि संशोधन सुफल झालें नाहीं. ग्रीस देशांत जेव्हां अलेक्झांडर उत्पन्न झाला तेव्हां तो इराणी साम्राज्य पादाक्रांत करून गंगेच्या थडीपर्यंत येऊन पोहोंचला. ग्रीकांस जिंकणाऱ्या रोमन साम्राज्याची हिंदुस्थानशीं सत्तावर्धनार्थ झटापट झालेली नाहीं; तथापि हिंदुस्थानचा व्यापार रोमपर्यंत होता आणि हिंदुस्थानच्या राजांना रोमशीं राजकारण देखील करावें लागत होतें. कारण प्रथम ग्रीक सत्तेच्या छत्राखालीं व नंतर स्वतंत्र पृथूचें व इराणी साम्राज्य स्थापन झालें तेव्हां त्याला एका बाजूनें रोम तर दुसऱ्या बाजूनें हिंदुस्थान हे दोन शेजारी होते. आणि बराच कालपर्यंत इराणकडून हिंदुस्थानला उपद्रव झाला नाहीं. याचें कारण रोमची वाढती सत्ता हेंच असलें पाहिजे. इराणास तंबी देण्यांत हिंदुस्थानानें रोमशीं सहकारिता केली काय वगैरे प्रश्न साहित्याच्या अभावीं सोडवितां येण्याजोगे नाहींत. तथापि त्या प्रकारची शक्यता वाटण्यास कारक अशा गोष्टी पुष्कळच आहेत.

बुद्धापासून चालुक्यांच्या कालापर्यंत हिंदुस्थानांत बौद्धसंप्रदायाचा उगम, भरभराट आणि लय हीं सर्व पाहिलीं त्याप्रमाणें त्याच कालामध्यें इराणानें झरथुष्ट्र धर्माचा विकास आणि विनाश हीं पाहिलीं. या कालामध्यें हिंदुस्थानांत त्याप्रमाणेंच इराणांत ग्रीकांच्या स्वारीचे परिणाम झाले. इराण ग्रीकांनीं व्यापला तर हिंदुस्थान व्यापला गेला नाहीं एवढेंच. तथापि इराणवर ग्रीक संस्कृतीचें आवरण पक्कें बसलें तरी त्यामुळें इराणी साम्राज्यांतील जातींस भारतजेतृत्व उत्पन्न झालें आणि ग्रीक आणि इराणी या दोहोंच्या मिश्रणानें झालेली पृथुयवन ज्ञाति हिंदुस्थानावर राज्यकर्ती झाली. पृथुयवनांच्या संस्कृतीला दार्ढ्य नव्हतें त्यामुळें त्याची स्वतंत्र संस्कृति हिंदुस्थानवर परिणाम करती झाली नाहीं, तर तीं परकीय कुळें भारतीय संस्कृतीचींच अंशभाक बनलीं. सत्याश्रय पुलकेशीच्या सुमारास इराणी प्राचीन धर्माचें महत्त्व अजीबात नष्ट झालें आणि इराण हें महंमदीय

बनलें. भारताची आणि इराणची या हजार वर्षांची तुलना करतां असें म्हणतां येईल कीं या कालांत या दोन्ही प्रदेशांत उत्पन्न झालेले संप्रदायधर्म त्या जागेवर टिकले नाहींत. पण त्याचीं कारणें भिन्न होतीं. इराणातील झरथुष्ट्रधर्म ग्रीक सत्तेच्या काळांत दुर्बल झाला आणि बौद्ध संप्रदायास ब्राह्मणी संस्कृतीच्या व सत्तेच्या उदयाबरोबर हिंदुस्थानांत दौर्बल्य येण्यास प्रारंभ झाला.

शातवाहनांच्या सत्तेचा काल अनेक शतकें आहे असें विधान मागें केलें आहेच. आज त्या सत्तेचा इतिहास सातत्यानें देतां येणार नाहीं, तथापि त्याच्या कालाविषयीं माहिती खरीखोटी पुष्कळच आहे, आणि तिच्या सत्यतेचा आज जरी निर्णय करतां आला नाहीं तरी प्रश्न अनेक उपस्थित करण्याइतकें आज साहित्य जमा झालें आहे ही गोष्ट देखील उपेक्षणीय नाहीं. खिस्तपूर्व २५० च्या सुमारास या कुलाचें अस्तित्व दिसलें तरी त्यास शककर्तृत्व पुष्कळ उशिरानें आलें आहे. शालिवाहन यांनीं राज्य कोठें कोठें केलें, शातवाहनांच्या नांवावर शक स्थापन झाला आहे, पण तो त्यांनींच स्थापन केला, कीं दुसऱ्यांचा शक चुकून यांच्या खात्यावर पडला, शातवाहन बौद्ध कितपत होते, जैन कितपत होते आणि ब्राह्मणानुयायी कितपत होते, यांच्यामध्यें मातृसत्ताक कुटुंबपद्धति व मातृकन्या परंपरा हीं होतीं काय, असल्यास किती कालपर्यंत होती, हे ब्राह्मण होते कीं हे शूद्र होते, यांच्या घराण्यास आंध्रभृत्य हें नांव केव्हां पडलें व कां पडलें, यांना "आंध्र" असें तरी नांव कां पडलें ? यांनीं यज्ञसंस्थेचा पुरस्कार कोणत्या कालांत केला व कोणत्या कालांत तो त्यांनीं सोडून दिला, संस्कृत वाङ्मयांत यांचें नांव अल्प कां असावें, आणि जैन वाङ्मयांत त्यांच्या कालासंबंधानें उल्लेख विपुल कां असावेत, त्यांचा आणि विक्रमादित्यांचा संबंध काय होता, विक्रमादित्य आणि शालिवाहन हे एका कुळांतील होते कीं शत्रु होते, त्यांचा पंजाबशीं काय संबंध होता, पंजाबांत पतियाळा संस्थानांत कलहत मुक्कामीं सालवाहनाचीं चार देवळें आहेत, अलाहाबादजवळ झालेल्या खणतींत त्यांच्या अधिकाऱ्यांचे शिक्के सांपडले आहेत. या गोष्टी कोणत्या कालाच्या व इतिहासाच्या दर्शक आहेत, पंजाबांतील प्राचीन कालचे लेखांवर शक वर्ष दिलें आहे, त्यावरून काय समजावयाचें, हे शकांचे जेते असून राजे झाले होते काय, यांस शकराज देखील कां म्हटलें आहे, यांचा सिंधू नदापलीकडे अंमल होता काय, असल्यास किती वर्षे किंवा पिढ्या होता, यांचा पैठण, नाना घाट, कोल्हापूर इत्यादि ठिकाणांशीं काय संबंध होता, यवतमाळ जिल्ह्यांतील आंध जात हिचा प्राचीन "आंध्रां"शीं व शातवाहनांशीं काय संबंध आहे, शातवाहनाचा काश्मीरच्या राजघराण्याशीं काय संबंध आहे ? कोंकणांतील कुंभार आपणांस शातवाहन-वंशीय म्हणवून कांहीं अंशी उपाध्येपणाहि करतात, तर या गोष्टींचा शातवाहनांनीं ब्राह्मण्यावरील सांगितलेल्या हक्काशीं आणि तसाच लोककथेंत त्यांस मिळालेल्या कुलालत्वाशीं काय संबंध आहे, शातवाहनसेवक असलेल्या शूद्रक नांवाच्या एका शूर ब्राह्मणाच्या कथाचरित्रांत कितपत तथ्य आहे, त्यांचा प्राकृत भाषेचा अभिमान त्यांच्या असंस्कृतत्त्वाचा दर्शक कितपत होता, वगैरे प्रश्नांवर कांहीं तरी विवेचन करणें

भागच आहे. खास राजकारणाच्या क्षेत्रांत उत्पन्न होणारे प्रश्न म्हटले म्हणजे नवीन सार्वभौमाचे जुन्या राजांशीं आणि मांडलिकांशीं संबंध आणि त्या राजघराण्याचे इतर राजांशीं संबंध, या गोष्टींवर पूर्ण प्रकाश आज जरी पडला नाहीं तरी अनुमानशक्तीला थोडासा ताण दिला तर उल्लेखिलेल्या प्रश्नावर आणि शातवाहनांच्या साम्राज्याचें अखिल भारतीयत्व यांवर देखील थोडींशीं टिपणें लिहितां येतात. हाल सातवाहन यानें संग्रह केलेल्या सप्तशतीच्या ७०० गाथा तत्कालीन सामाजिक स्थितीविषयीं काय अनुमानें दर्शवितात. शातवाहनकालीन म्हणून मान्य झालेले ब्राह्मी लिपींतील सुमारे ४०० अंकित लेख महाराष्ट्रांत आहेत व शातवाहनाशीं संबद्ध अनेक अंकित लेख बाहेर आहेत; त्यांपासून शातवाहनकालाविषयीं काय ऐतिहासिक सत्य हातीं लागतें, या विषयावर आजच्या कोणाहि इतिहासलेखकाला बरेंच लिखाण करावें लागणार यांत शंका नाहीं.

शातवाहनांचे राजकीय संबंध म्हणजे अरिमित्रता ज्या राजघराण्यांशीं आलीं आहेत, त्यांतील मोठालीं घराणीं म्हटली म्हणजे मौर्य, पांड्य, चेर, विदर्भ, क्षत्रप, खारवेल, काण्व, शक, मुरुंड, इत्यादि होत. शातवाहनांच्या मांडलिकांतून पुढें भारशिवांचें घराणें त्याचप्रमाणें गुप्तांचें घराणें निघालें असणे शक्य आहे. या सर्व गोष्टींचा इतिहास लिहितां लिहितां संबंध भारताचाच इतिहास लिहिणें प्राप्त होतें. एवंच केवळ भारताचा इतिहास आणि महाराष्ट्राचा इतिहास यांत फरक एवढाच उरतो कीं इतर भारतभागांपेक्षां महाराष्ट्राची माहिती महाराष्ट्राच्या इतिहासांत अधिक द्यावी लागेल. व्यापकक्षेत्राच्या अवलोकनाशिवाय म्हणजे भारताच्या किंबहुना जगाच्या इतिहासांतील मुख्य गोष्टी लक्षांत घेतल्याशिवाय महाराष्ट्राच्या इतिहासाचें स्पष्टीकरणच होणार नाहीं.

बुद्धजन्मकाल हा जगाच्या अर्वाचिनीकरणाचा आरंभबिंदु धरला तर चालुक्योदयकाल हा ती क्रिया पूर्ण झाल्याचा बिंदु धरतां येईल. बुद्धपूर्व कालीं जग जातिदैवतें, स्थानिक दैवतें आणि विशिष्ट शक्तिदैवतें यांच्या उपासनांनीं भरलें होतें, तें आतां व्यक्तिसंस्थापित विचारयुक्त संप्रदायांनीं व्यापिलें गेलें आहे. चालुक्यांच्या उदयकालाच्या स्थितीचें स्थूलपणानें जरी पर्यालोचन केलें तरी त्या काळांत जग अर्वाचीनत्त्व कसें पावलें होतें हें स्पष्ट होतें. आज पूर्व एशिया बौद्ध आहे. पश्चिम एशिया मुसलमान आहे. इराणी मगधर्म जवळ जवळ नष्ट झाला आहे. त्यांतील झरथुष्ट्रसंप्रदाय मात्र उरला आहे आणि त्याचें मुख्य निवासस्थान हिंदुस्थानचा पश्चिम किनारा झालें आहे. आयर्लंडपासून ग्रीसपर्यंत सर्व प्रदेश खिस्ती आहे. हिंदुस्थानाबाहेर जातिधर्म, कुलधर्म आणि राष्ट्रधर्म हे नष्ट होऊन विशिष्ट संस्थापकनिर्मित संप्रदायधर्मांचेंच प्राबल्य चोहोंकडे आहे. यहूद्यांचा धर्म जातिधर्म राहिला, पण त्यांत अनेक दैवतें नष्ट झालीं प्रवक्त्यांच्या उपदेशास महत्त्व आलें. धार्मिक अगर सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीनें चालुक्योदय कालानंतर झालेले मुख्य फेरफार तीन आहेत. ते म्हटले म्हणजे अमेरिका, आफ्रिका व आस्ट्रेलेशिया. या प्रदेशांचा शोध आणि त्या प्रदेशांची खिस्ती यूरोपीयांकडून वसाहत; हिंदुस्थानांत मुसलमानी संप्रदायाची वाढ, आणि उत्तर यूरोपांत खैस्त्याचा प्रसार, या तीन गोष्टी वगळल्या तर

आजचें जग चालुक्योदयकालीन, आहे, आणि त्यास तें स्वरूप यावयास प्रारंभ बुद्धकाळीं झाला. हिंदुस्थानांत देखील जातिदैवतें अगदी नष्ट झाली नसलीं तरी दुय्यम झालीं. पण तीं दोन कारणांनीं झालीं. एक गोष्ट म्हटली म्हणजे अनेक देवतांना आहुति आणि हविर्भाग देणारा यज्ञधर्म नाहींसा होऊन त्यांच्या जागीं आरण्यकीय धर्म आला, आणि त्याबरोबर सर्वव्यापी परमेश्वराची कल्पना अधिक लोकप्रिय झाली. दुसरें कारण म्हटलें म्हणजे पौराणिक वीरांचा उदय होय. त्यांच्या पूज्यतास्थापनामुळें जुन्या जातिदेवतांचें पूजन मागें पडलें.

केवळ महाराष्ट्रविकासापुरता विचार करतां प्रस्तुत पर्वकाळाचें वैशिष्ट्य पुढीलप्रमाणें सांगतां येईल. या काळांत महाराष्ट्राचें संघटन झालें, आणि त्यामुळें या काळास "महाराष्ट्रसंघटना काळ" म्हणतां येईल. वेदांत आलेला शब्द दक्षिणापथ हा बौद्ध कालांत देखील वापरला जात होता असें सुत्तनिपातांत आलेल्या एका उल्लेखा ( ९७६ ) वरून स्पष्ट होतें. या दक्षिणापथांत पतिट्ठान येत होतें, तथापि दंडकारण्य किंवा दक्षिणापथ यांत विदर्भ येत नव्हता व अपरांत येत नसावा. कोंकण, देश आणि वऱ्हाड या तिन्ही नांवाचा उपयोग अजून चालू आहे आणि महाराष्ट्र हा शब्द सर्वांना लावण्याचा आग्रह धरण्याची आवश्यकता अजून ज्या अर्थी महाराष्ट्राच्या अभिमान्यांना वाटते त्या अर्थी महाराष्ट्राचें ऐक्य अजून सर्वमान्य झालें नाहीं हें उघड आहे. चालुक्योदय कालांत "महाराष्ट्र" शब्द प्रचलित दिसतो आणि तीन महाराष्ट्रकें यांचा उल्लेख चालुक्य लेखांत आला आहे, तर "महाराष्ट्र" कल्पना या कालांत दक्षिणपथापासून विकास पावत होती हें स्पष्ट आहे. "महाराष्ट्र" ही कल्पना विकास पावत होती असें म्हणतांना त्या विधानांत आपण कांहीं भाषाविषयक सत्य सूचीत करीत आहों. राष्ट्र हा शब्द भाषाविशिष्ट समुच्चयास लावला जात नाहीं. तरी लोकांची सामाजिक कल्पना म्हणजे "एकलोककल्पना" भाषानुसारी आहे हें खचित. चालुक्योदयकालांत देशभाषांना प्राधान्य देण्याचा काल येऊं लागला होता व कानडीला देखील महत्त्व येऊं लागलें होतें.

[ प्राचीन महाराष्ट्र :- शातवाहनपर्व : कुरुयुद्धापासून शकारंभापर्यंत विभाग पहिला. पृ. ९ – १४ ]

# १७. समाजशास्त्र आणि धर्म यांचा परस्परसंबंध

हिंदुस्थानास समाजशास्त्राचे अभ्यासाची फारच आवश्यकता आहे; सामाजिक परिस्थितीचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करण्याची पद्धत आपल्या देशांत अजून पडली नाहीं. समाजशास्त्र्यांचा वर्ग उत्पन्न होण्यापूर्वी सुधारकांचा वर्ग निर्माण झाला आहे. व ही परिस्थिति जरी फारशी अस्वाभाविक नसली तरी समाजसुधारक गेलीं तीस चाळीस वर्षें वाग्युद्ध करीत असतां शास्त्रीय पद्धतीनें आपल्या समाजाचा अभ्यास करणारा वर्ग देशांत उत्पन्न होऊं नये ही मोठी खेदाची गोष्ट आहे. पुष्कळ प्रसंगीं असेंहि आढळतें, कीं ज्या लोकांस आपल्या समाजाचें यत्किंचितहि ज्ञान नाहीं, असलेच लोक आपला समाज सुधारूं पाहतात. उदाहरणार्थ, मिशनरी लोक वगैरे. व समाजाचें ज्ञान नसणारे सुधारक लोकोपहासास याच त्यांच्या गुणांमुळें पात्र होतात. समाज सुधारकांपैकीं बहुतेक लोक तर धर्मशास्त्रासारख्या समाजशास्त्रांतर्गत एका महत्त्वाच्या शास्त्रास पूर्णपणें पारखे असतात, आणि कित्येक स्वयंमन्य विद्वान अगर "बॉम्बे युनिव्हर्सिटी मान्य" विद्वान् तर असें म्हणूं लागले आहेत कीं धर्मशास्त्र हें लवकर नष्ट होईल तितकें चांगलें, तें जितक्या लवकर बुडेल तितकी समाज सुधारणा लौकर होईल. समाजशास्त्राविषयीं उपेक्षा व धर्मशास्त्राविषयीं अनुदारता आज जी लोकांस दिसत आहे तिचें महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे दोन्ही शास्त्रांसंबंधानें लोकांत असलेलें अज्ञान होय. पूर्वी पुण्याच्या "काळ" नांवाच्या एका पत्रांत "सगळेच नरसू" या नांवाची एक मजेदार गोष्ट आली होती. सुधारकांचा बौद्धिक इतिहास लक्षांत घेतला म्हणजे त्या गोष्टींत पुष्कळ तथ्य होतें असें वाटूं लागतें. "नरसूनें" सुधारक बनण्याचा विचार केला, व तो आपल्या मित्रास कळविला. नरसू दोन चार इयत्ता इंग्रजी शिकलेला होता, व यामुळें त्याचा मित्र त्यास म्हणाला कीं, सुधारक होणें सोपें नाहीं, देशाचे सुधारक बनण्यास पुष्कळ ज्ञान लागतें, व यावर नरसू उत्तर करितो "छे, हें सगळें चुकलें! मला देशाचें जें ज्ञान आहे तेंच मी कसें विसरून जावें याच्या फिकीरींत मीं पडलों आहे." काळ पत्राचा हा अंक मजजवळ सध्यां नसल्यामुळें नरसूच्या गोष्टीचा सारांश केवळ स्मृतीवर भिस्त ठेवून दिला आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख सुधारकांत कोणी इतिहासकार नाहीं, समाजशास्त्री नाहीं, व धर्मशास्त्रवेत्ताही नाहीं. रानडे व चंदावरकर हे दोघे गृहस्थ सुधारकांचे अग्रणी होते. दोघांचाही धर्मशास्त्राशीं अतिशय संबद्ध असलेले जें कायद्याचें क्षेत्र त्या क्षेत्राशीं त्यांचा निकट संबंध आला होता; पण त्या दोघांसहि पाश्चिमात्य कायदेशास्त्र अवगत होतें असें

दिसत नाहीं. व धर्मशास्त्रास ते दोघेहि पूर्णपणें पारखे होते. सुधारणेचे जे अग्रणी त्यांची स्थिति या प्रकारची, तर मग इतरेजनांची स्थिति काय असणार ?

'समाजशास्त्राचें अध्ययन म्हणजे काय,' याची थोडक्यांत कल्पना देतों. व धर्मशास्त्र, म्हणजे काय व त्याचा समाजशास्त्राशीं संबंध कोठें कसा काय येतो हें थोडक्यांत येथें सांगतों. शास्त्र म्हणजे व्यवस्थित केलेलें ज्ञान, व समाजशास्त्र म्हणजे समाजाच्या संबंधाचें बरेचसें जमविलेलें व चांगल्या तऱ्हेनें रचना केलेलें ज्ञान. येथें 'समाज' म्हणजे 'हिंदी समाज' धरून समाजशास्त्राचें ज्ञान असावयास पाहिजे म्हणजे हिंदुस्थानसंबंधाचें कोणत्या प्रकारचें ज्ञान असावयास पाहिजे, हें सांगतों.—

एकतर हिंदुस्थानच्या अर्वाचीन स्थितीचें ज्ञान. या ज्ञानामध्यें हिंदुस्थानांत ज्या निरनिराळ्या जाती आहेत त्यांचे आचार, विचार, मनोधर्म, अभिरुचि, महत्त्वाकांक्षा, इत्यादिकांचें ज्ञान.

दुसरें महत्त्वाचें ज्ञान म्हटलें म्हणजे हिंदुस्थानच्या विशेषेंकरून हिंदूंच्या समाजाच्या पूर्वेतिहासाचें ज्ञान. आजची जी सामाजिक परिस्थिति आहे, आज देशांत जीं जीं बंधनें आहेत, जे जे विरोध आहेत, समाजाचे जे निराळे तुकडे दिसत आहेत, त्यांचीं कारणें काय आहेत इत्यादि विषयासंबंधाचें ज्ञान.

तिसरें महत्त्वाचें ज्ञान म्हटलें म्हणजे हिंदुस्थानच्या बौद्धिक इतिहासाचें ज्ञान, म्हणजे आज जीं लोकांचीं अनेक मतें आहेत त्यांचा पूर्वेतिहास काय या विषयाचें ज्ञान.

चौथें एक महत्त्वाचें ज्ञान म्हटलें म्हणजे सामाजिक कार्यकारणसंबंधाचें ज्ञान. म्हणजे कोणत्या सामाजिक कृत्याचा काय परिणाम होतो, व संस्थांच्या स्वरूपांमध्ये फेरबदल कसे होतात इत्यादि सामाजिक सृष्टिनियमाचें ज्ञान.

आतां आपण धर्मशास्त्र म्हणजे काय तें पाहूं. व त्याचा समाजशास्त्राच्या ज्ञानाशीं काय संबंध येतो याचा विचार करूं.

धर्मशास्त्र म्हणजे ज्या गोष्टी मनुष्यास योग्य आदरणीय व कर्तव्य आहेत त्या संबंधाचें सुव्यवस्थित केलेलें ज्ञान. मनुष्यास काय करणें योग्य आहे हें त्यांच्या परिणामांवरून निश्चित होते. उदाहरणार्थ, धर्मशास्त्रकारांचा दारुविषयींचा निषेध घ्या. अर्थात् या प्रकारचा निषेध दारु प्याल्यानें होणाऱ्या परिणामांचें ज्ञान असल्यामुळें संभवतो.

तसाच मौंजीबंधनादि संस्कार करण्यासंबंधाचा उपदेश घ्या. या उपदेशाचें कारण लोकांस संस्कारहीनत्वामुळें समाजांत इष्ट नसलेली गति प्राप्त कशी होते, याविषयींचें त्यांस ज्ञान होतें हें होय. पत्नीस घरीं कसें वागवावें या संबंधाचा धर्मशास्त्रकारांचा उपदेश लक्षांत घ्या. अर्थात त्यांचा तो उपदेश उत्कृष्ट गृहसौख्य कसें प्राप्त होईल या विषयासंबंधानें त्यांचें जें ज्ञान होतें ( अगर कल्पना होत्या ) त्याचाच परिणाम होय. धर्मशास्त्रानें जे अनेक श्राद्धादि विधि सांगितले अगर कर्मे उपदेशिलीं याचें कारण पारलौकिक उत्कृष्ट गति मनुष्यास अगर त्याच्या पितरांस कशानें प्राप्त होईल यासंबंधाचें यांचें ज्ञान ( अगर कल्पना ) होय. अर्थात धर्मज्ञान हें अनेक प्रकारच्या ज्ञानांवर

अवलंबून असतें, व ज्या ज्ञानाच्या साहाय्यावर धर्मशास्त्रकार आपला उपदेश बसवितात त्या ज्ञानाच्या शुद्धतेवर धर्मशास्त्राच्या ज्ञानाची शुद्धता अवलंबून असते. जर एखाद्या समजुतीवर धर्मशास्त्रकारांनी आपला एखादा नियम घालून दिला व ती समजूत चुकीची घडली, तर धर्मशास्त्राचा नियमहि अर्थात् चुकीचा ठरणार. परलोकासारख्या अदृश्य व अज्ञात गोष्टींसंबंधानें आपलें जें काय असावयाचें तें अनुमानच असणार. व परलोकांसंबंधाच्या कालच्या अनुमानांत व आजच्या अनुमानांत जर फरक झाला, तर त्याचा परिणाम देखील धर्मशास्त्रावर होणार.

मनुष्याचें आचरण सामान्यतः ऐहिक आणि पारलौकिक ध्येयांनीं नियमित केलें जातें. कधींकधीं असें होतें कीं ऐहिक ध्येय मनुष्याच्या अगर राष्ट्राच्या मनांत तीव्र असतें. व कधींकधीं पारलौकिक ध्येय तीव्र होतें. येथें ऐहिक शब्द जो वापरला तो केवळ व्यक्तिविषयक नसून व्यक्ति व व्यक्तींचा समूह– मग तो समूह राष्ट्र असो अगर राष्ट्रांहून अधिक महत्त्वाचा जो मानवसमूह आहे तो असो– या दोहोंसहि उद्देशून वापरला आहे. सामाजिक ध्येय, अर्थशास्त्रविषयक ध्येय, राजकीय अगर शासनविषयक ध्येय, इत्यादि सर्व ध्येयांचा समावेश ऐहिक या शब्दांत केला आहे. ऐहिक ध्येयानें वागणारा मनुष्य म्हणजे केवळ पोटभरू, स्वतांच्या पोळीवर तूप ओढून घेणारा, अगर इंद्रियांचें कोड पुरवून घेणारा नव्हे. ऐहिक ध्येयानें जो मनुष्य प्रेरित होईल व पारलौकिक ध्येयानें जो प्रेरित होईल त्या दोघांचें पुष्कळ सामाजिक बाबतींत मतैक्य होईल. उदाहरणार्थ, चोरी करूं नये, व्यभिचार करूं नये, इत्यादि गोष्टी दोघांसहि मान्य असतील, तथापि दोघांची चोरी व व्यभिचार या कृत्यांचा निषेध करण्यांत कारणें निरनिराळीं असतील.

पारलौकिक ध्येय बेसुमार झालें म्हणजे मात्र पुष्कळदां ऐहिक ध्येयानें प्रेरित झालेला मनुष्य पारलौकिक ध्येयानें प्रेरित झालेल्या मनुष्याचा निषेध करील. उदाहरणार्थ, पारलौकिक इष्टस्थिति मनुष्यानें जी कल्पिली असेल ती मिळविण्यासाठीं केवळ कर्मांत आणि उपासनांत मनुष्य गढून गेला म्हणजे ऐहिक ध्येयवादी त्याचा निषेध करील. समजा, एखाद्या राष्ट्रावर परचक्र आलें व राष्ट्रांतील लोक शत्रूंशीं लढण्याची तयारी न करितां "आमच्यावर कोणी का राजा येईना, आम्हाला त्याच्याशीं काय करावयाचें आहे," असें म्हणून संध्या, पूजा, वैश्वदेव, होमहवनें, उपासना इत्यादिकांत जर गढून गेले तर या सर्व लोकांच्या पाटीवर कोरडा ओढावा असें ऐहिक ध्येयवादी मनुष्यास वाटेल. ज्याप्रमाणें युद्धास प्रवृत्त न होतां वैश्वदेवांस आणि उपासनांस प्रवृत्त झालेल्या लोकांचा सामाजिक मुत्सद्दी धिःकार करतील त्याप्रमाणेंच राष्ट्राच्या बलवृद्धिसाठीं अवश्य असलेल्या अर्थवृद्धींत व उद्यमांत न गुंततां राष्ट्रांतली मनुष्यें इष्ट परलोकांत उडी मारण्यासाठी धडपडतील तरी देखील ऐहिकध्येयवादी पारमार्थिकांचा धिःकार करील.

धर्मशास्त्रांत फेरबदल होण्यास दोन गोष्टी कारण होतात. त्या म्हटल्या म्हणजे ज्ञानांत झालेला फेरबदल व ऐहिक व पारलौकिक ध्येयांच्या परस्परप्रमाणांत झालेला फेरबदल होय, हें वर केलेल्या विवेचनांवरून लक्षांत येईल.

ज्ञान व प्रगतीचा कर्तव्यबुद्धीशीं, व धर्मशास्त्राशीं संबंध येथवर व्यक्त केला. समाजशास्त्राचें ज्ञान हें सर्व ज्ञानाचा केवळ एक भाग आहे. तर या समाजशास्त्राच्या ज्ञानाचा परिणाम धर्मशास्त्रावर कसा होतो तें आपण वैशिष्ट्यानें पाहूं. समाजशास्त्राचें ज्ञान पुष्कळ व व्यवस्थित होण्याच्या अगोदर मनुष्य आपल्या अल्पबुद्धीप्रमाणें विचार करूं लागतो. जेव्हां समाजाचा इतिहास अवगत नसतो तेव्हां मनुष्याचे विचार अगदीं कोते असतात. व समाजांत ज्या घडामोडी होतात त्या घडामोडींचें व त्या घडामोडींवरून दृश्य होणाऱ्या वृद्धि घटना नाशादि स्थित्यंगांचें ज्ञान नसलें म्हणजे समाजानें आपलें पुढील आयुष्य कसें क्रमावें हें मनुष्यास स्पष्टपणें समजत नाहीं. ज्या वेळेस सामाजिक ज्ञानच कोतें असतें त्यावेळेस सामाजिक ध्येयें अस्पष्ट असतात. समाजाच्या इतिहासाचें व बरोबर सामाजिक कृत्यांच्या व घडामोडीच्या कार्यकारणसंबंधाचें ज्ञान मनुष्यास होऊं लागलें म्हणजे त्याच्या सामाजिक कर्तव्याची भावना त्यास तीव्रत्वानें होऊं लागते. जोंपर्यंत प्रगतीचे नियम समजले नसतात व जोपर्यंत कोणत्या मार्गानें समाज गेला म्हणजे त्यास प्रगति म्हणावें या संबंधानें अज्ञान असतें तोंपर्यंत आपल्या ऐहिक कर्तव्याचेंच त्यास ज्ञान नसते. पारलौकिक इष्ट गतिच्या ध्येयानेंच मनुष्याचें आयुष्य नियमन होतें. सामाजिक विचारांची मालिका तत्त्ववेत्त्यांनीं देशासमोर ठेविली, व सामाजिक ध्येयें लोकांस कशीं-बशीं जरी समजूं लागली, तरी त्याचा महत्त्वाचा परिणाम होता तो हा कीं अदृष्ट, व पारलौकिक कल्पनामुळें मनुष्य बहकून जात नाहीं, व अतींद्रिय द्रष्ट्यांचा सुकाळ जरासा कमी होतो. सामाजिक सुधारणा करण्यासाठीं ईश्वरासंबंधानें व त्याच्या इच्छेसंबंधानें वेडगळ अगर शहाणपणाचें सिद्धांत ठोकून देणारे, व त्यावर म्हणजे अतींद्रिय स्थिती-बद्दलच्या कल्पनांवर, एखादा संप्रदाय उत्पन्न करणारे लोक, उदाहरणार्थ प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज, इत्यादि संस्थांचे उत्पादक, सामाजिक सुधारणांचे खरोखर मित्र नसून शत्रु आहेत असें मला वाटतें याचें व असल्या संस्थांविरुद्ध मी बारंवार टीका केली आहे तिचें एक महत्त्वाचें कारण आहे तें हें कीं, या लोकांनीं अतींद्रिय विषयांवरच चळवळ करून पारलौकिक गोष्टींकडे लक्ष लावण्याचा प्रयत्न केला. "संक्रांतीच्या तिळगूळां"तील प्रार्थना समाजावरील डॉ. भांडारकर यांनीं लिहिलेल्या लेखांत प्रार्थनासमाजाचें सामाजिक धोरण स्पष्ट केलें आहे, तो लेख म्हणजे सामाजिक सुधारणेशीं या समाजाचें सख्खेपणाचें नातें नाहीं यासंबंधाचा एक कबुलीजबाब आहे. सामाजिक सुधारणा करण्यासाठी आपण प्रत्यक्ष सामाजिक, राजकीय, धर्मशास्त्रीय विचार प्रसृत केला असतां जितकें लोकांचें लक्ष विसरलेल्या आयुष्यक्रमाच्या पुनरुज्जीवनाकडे लागेल, तितकें परमेश्वराच्या स्वरूपाविषयीं व परलोकीं नेमकें जाऊन पडण्याच्या युक्त्यासंबंधानें चर्वितचर्वण केल्यानें लागणार नाहीं. मनुष्याच्या मनाची भावनाशक्ति नियमित असते, व भावमूलक कर्तृत्वशक्ति देखील नियमित असते. मनुष्याचें मन आनंददुःखादि विकारांचें व अनेक प्रकारच्या इच्छांचें क्रीडास्थान आहे. कोणत्या विचारांचें, अगर विकारांचें अगर इच्छांचें प्रामुख्य जनतेच्या मनावर कितपत ठेवावें हें पुष्कळांशीं समाजाच्या धुरीणांवर अवलंबून असते. समाजाचे

धुरीण जोपर्यंत जागृत व कर्तव्यदक्ष आहेत तोपर्यंत समाज दुर्गतीस पोंचणार नाहीं. समाजांत ज्या अनेक क्रिया घडत आहेत त्या क्रिया नेहमीं माणसांच्या हातूनच व्हावयाच्या. समाजांस सुस्थितींत रहाण्यासाठीं प्रत्येक क्रियांचे पुढारी समाजांत पाहिजेत. समाजांत औद्योगिक पुढारी पाहिजेत, नीतिवेत्ते पाहिजेत; व समाजाच्या कामकरी वर्गांचे अनेक जातींचे पुढारी समाजास अवश्य आहेत. "सामाजिक पुढारी" म्हणजे समाजाच्या सर्वांगीण स्वरूपाकडे लक्ष देऊन, समाज एकांगी होऊं नये, यासाठीं समाजास सर्व तऱ्हेनें चलन देणारे लोक. यांचें एक मुख्य कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे सर्व तऱ्हेनें सामाजिक विचार जागृत राखणें. पारलौकिक विचार कांहीं अंशीं सामाजिकच आहे, कारण परलोकासंबंधाच्या कल्पना लोकांस कांहीं अंशीं इष्ट तऱ्हेचें आचरण ठेवण्यास प्रवृत्त करितात, व सामाजिकांस व धर्मशास्त्रीयांस पारमार्थिक विचारांचे महत्त्व एवढेंच. देशांत राजकीय चळवळी व विचार, व अर्थशास्त्रीय चळवळी आणि विचार, शासनविषयक अनेक खटपटी, कला व शास्त्र यांच्या प्रगतीसाठीं खटपटी सामाजिक परिस्थितीचें सूक्ष्म संशोधन, योग्य सामाजिक स्थिति म्हणजे काय या संबंधीं अनेक दर्शनें; हीं सर्व चाललीं असतां, पारमार्थिक विचार जर प्रसृत केले तर त्यापासून फारसा अपाय होणार नाहीं, तथापि या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून केवळ परमार्थैकदृक् बनविण्यास लोकांस जे प्रवृत्त करितात ते लोक मूढ होत. सामाजिक व राजकीय विचार देशांत अत्यंत अल्प असतां जेव्हां पारमार्थिक विचार उचल खातो तेव्हां तो लोकांस धर्ममूढ बनवितो, आणि शास्त्रीय ज्ञान देशांत ज्यावेळेस अत्यंत अल्प असतें, तेव्हां प्रसृत होणारें पारमार्थिक ज्ञान देशास पूर्णपणें मूढ बनवितें. "थिआसफी"नांवाचें जें थोतांड एक हुशार इंग्रज वृद्धा आपल्या देशांत माजवीत आहे त्याच्या योगानें सध्यां देशांत मूढपणा वाढत आहे. या थोतांडाच्या प्रसाराचें मुख्य कारण एक हें आहे कीं, शास्त्रीय ज्ञानाच्या पायावर आमचे सिद्धांत उभारले गेले आहेत असें हें लोकांस भासवितें. शास्त्रीय परिभाषेनें युक्त तथापि ज्यांत वेडगळपणाच बराचसा भरला आहे असे ग्रंथ रेम्याडोक्या थिआसाफिस्ट शास्त्रज्ञांनीं प्रसिद्ध केले आहेत. मूर्खपणाचें ग्रंथ देशांत उत्पन्न झाले तर त्यापासून देशाचें तादृश नुकसान नाहीं तथापि मूर्खपणाच्या ग्रंथामुळें देशाचें बौद्धिक नुकसान न होण्यास एक दोन गोष्टी अवश्य असतात. त्या म्हटल्या म्हणजे देशांत तीव्रबुद्धीचे शास्त्रज्ञ बरेच असावे लागतात, व त्या वर्गाचें वजन देशावर पडत असावें लागतें. थिआसफीचा प्रचार इंग्रज चिकित्सक व शास्त्रज्ञ मंडळींत नाहीं व अमेरिकेंतील सामान्य सुशिक्षितांतहि नाहीं. बऱ्याच सुशिक्षितांस "थिआसफी" हा शब्दहि ठाऊक असेल कीं नसेल याची वानवाच आहे. तेथील युनिव्हर्सिट्यांच्या ज्या लायब्ऱ्यांमध्यें पांच पांच लाखावर पुस्तकें असतात, व हिंदुस्थानीय गीर्वाणाचे दहाहजारपर्यंत ग्रंथ असतात त्या लायब्ऱ्यांत थिआसफीचें पुस्तक एकहि असेल नसेल. कार्नेल युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत थिआसफी-वर जें पुस्तक गेलें तें मी नजर केलें होतें. एखादें मूर्खमत पसरविण्याचा प्रयत्न अमेरिकेंत

जर कोणी करूं लागला तर तेथील शास्त्रज्ञाचा वर्ग त्या मताचें परीक्षण करील. लोकांचा त्यांच्या विद्यापिठांतील शास्त्रज्ञांवर विश्वास असतो. व रेम्या डोक्या शास्त्रज्ञांच्या मताची किंमत त्या राष्ट्रांत ठाऊक असते. अमुक अमुक प्रयोग केला म्हणजे अमुक अमुक दिसतें अगर सिद्ध होतें अशा कोणी गप्पा मारल्या तर इतर शास्त्रज्ञ तो प्रयोग करून पाहतात व खऱ्या खोट्याचा निवाडा करितात. जर एखादा मनुष्य आपल्या अतींद्रिय द्रष्टेपणाचें ( occult sight ) स्तोम माजवूं लागला तर, सुशिक्षित लोक त्या बरळण्याकडे दुर्लक्ष करितात, व भोळसर मंडळी व बायका याच मनुष्याच्या नादीं लागतात.

हिंदुस्थानामध्यें देशांत परक्यानें पसरविलेल्या मताचें शास्त्रीय दृष्टीनें परीक्षण करणारा वर्ग नाही. शुद्ध ज्ञान असलें म्हणजे भ्रष्ट ज्ञान ओळखतां येतें. शुद्ध ज्ञानाचा संग्रह देशांतील लोकांत नाही, व तो संग्रह वाढविण्याची साधनें म्हणजे ग्रंथालयें (लायब्ऱ्या) व शास्त्रकार्यमंदिरें (लेबारेटऱ्या) देशांत नाहींत व त्यामुळें पाश्चात्त्य ज्ञानावर रचलेला मूर्खपणा तपासून पहाणें लोकांस शक्य नाहीं. पाश्चात्त्य देशांतील शास्त्रीवर्गाच्या विद्वत्तेसंबंधानें एखादें कवन गाऊन त्यांच्या नांवानें कांहीं बोललें तरी येथें चालेल. पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याचें अगर संशोधकाचें नांव सांगितलें अगर आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ पाश्चात्त्याच्या मताचा उतारा दिला म्हणजे आपलें मत आपण सिद्ध केलें असें वाटतें. आपल्या मनाची खात्री करून घ्यावयाचें कारण नाहीं. "माझ्या मनाची खात्री झाल्याशिवाय मला जगांतील सर्व विद्वानांच्या मताची किंमत नाहीं" अशा प्रकारचा मनाचा खंबीरपणा आपल्या देशांत आला नाहीं.

देशांतील ज्ञानवृद्धीचा सामान्य परिणाम म्हटला म्हणजे पारमार्थिकांच्या, व अतींद्रियद्रष्ट्यांच्या प्रयत्नावर एक तऱ्हेचें दडपण रहातें. समाज व राष्ट्र याविषयीं विचार जागृत झाल्यानें, पारलौकिक विचार मनुष्याच्या मनाचा पूर्णपणें ताबा घेत नाहींत, व सामाजिक नीति पारमार्थिक विचारांनीं निश्चित न होतां सामाजिक व राजकीय विचारांनीं निश्चित होते.

समाज व त्याचें शासन यासंबंधीं जो विचार व्हावयाचा तो केवळ समाजाच्या वरवर अवलोकनानें न होतां अधिक सूक्ष्मदृष्टीनें व समाजाच्या परिपक्व ज्ञानानें व्हावा, हें कोणीही कबूल करील. समाजाचें उत्तम प्रकारचें ज्ञान म्हणजेच समाजशास्त्र होय. समाजाचें शासन उत्तम प्रकारें व्हावें यासाठीं जीं शास्त्रें निर्माण होतात, त्यांपैकींच धर्मशास्त्र हें एक होय. धर्मशास्त्रशोधन करण्यासाठीं समाजशास्त्रांत शोध करणें हें आपलें कर्तव्यकर्म होय.

[ डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे संकीर्ण लेख, पृ. ८२ ते ८९ ]
१९१५ । श्रुतिबोध मुद्रामंदिर, मुंबई.

# विभाग ५

भविष्यकाळीं भारतीय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतील अशा समस्यांचा वेध समकालीन परिस्थितीच्या संदर्भात घेण्याचा केतकरांनी सतत प्रयत्न केला. या दृष्टीने या विभागातील उताऱ्यांची निवड केली आहे. अठरा, एकोणीस व एकवीस क्रमांकांचे उतारे केतकरांच्या 'विद्यासेवक' या नियतकालिकातून घेतले आहेत. विसावा उतारा म्हणजे केतकरांनी 'वात्स्यायन' यांच्या रतिशास्त्रमीमांसा या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना आहे. केतकरांनी हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या त्यांपैकी ही एक प्रस्तावना आहे. बाविसावा उतारा निःशस्त्रांचे राजकारण या पुस्तकातून घेतला आहे.

हिंदुस्थानमध्ये एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास करण्यासाठी समान नागरी कायदा आवश्यक आहे याबद्दल केतकरांना शंका नव्हती. या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून किमान सर्व हिंदुंसाठी एक कायदा करण्याची जरूरी आहे असे केतकरांचे मत होते, ते अठराव्या उताऱ्यात व्यक्त झालेले दिसेल.

ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद निकराला येऊ लागला तेव्हा त्याचे स्वरूप व परिणाम विशद करणे केतकरांना आवश्यक वाटले. एकोणिसाव्या उताऱ्यात यासंबंधीचे विवेचन केलेले दिसेल.

रशियातील राज्यक्रांतीनंतर जगभर ऐंद्रियविषयक नीतिमत्तेच्या विचाराची व स्त्रीपुरुषसंबंध विषयक कल्पनांची नव्याने तपासणी होऊ लागली. आपल्या देशातही हे व्हावयास हवे असे केतकरांना वाटे. विशेषतः मुलांच्या ऐंद्रियविषयक मानसशास्त्राच्या अभ्यासक्रमास शिक्षणसंस्थांनी स्थान द्यावे असे त्यांचे मत होते. यासंबंधीचे विवेचन विसाव्या उताऱ्यात केलेले दिसेल.

स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुरुषावर विसंबून न राहता स्त्रियांनीच पुढाकार घेऊन ते सोडवावेत असे केतकरांना वाटत होते. पाश्चिमात्य देशातील सध्याच्या स्त्री-मुक्ती-आंदोलनाच्या एखाद्या पुरस्कर्त्याने हा लेख लिहिला आहे की काय असे क्षणभर कोणास वाटेल असा या एकविसाव्या उताऱ्यातील काही भाग आहे.

राजकीय विषयासंबंधीही केतकर लिहीत असत. "निःशस्त्रांचे राजकारण आणि समाजसंघटना यांची तत्त्वे" काळजीपूर्वक प्रचारात आणण्यासाठी त्यांनी स्वयंनिर्णयी संघ स्थापन केला होता. १९२९ साली डोमिनियन स्टेटस म्हणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळविणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. "परचक्रापासून मुक्तता मिळवून अंतर्गत वाढ प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या हिंदुस्थानास इंग्लंडच्या सहकार्याची जरूरी आहे" असा केतकरांचा युक्तिवाद होता. प्रातिनिधिक लोकशाही राज्यपद्धतीत सुधारणा मंदगतीने होत असली तरी तिचा प्रवाह अधिक पद्धतशीर व अखंड वाहतो असा केतकरांचा विश्वास होता. त्यांच्या या विचारसरणीचा बाविसाव्या उताऱ्यामुळे परिचय होईल.

# १८. राष्ट्रीकरण आणि मतविशिष्ट कायदे

हिंदुस्थानमध्यें एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास करण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांत सर्वांना म्हणजे निरनिराळ्या जातींच्या व धर्मांच्या लोकांना एकच कायदा असणें ही एक महत्त्वाची गोष्ट होय. कांहीं बाबतीत सर्वांना एक कायदा आज आहेच. उदाहरणार्थ, फौजदारी किंवा शासनविषयक कायदा घ्या. हा सर्वांना एकच आहे. तथापि वारसाहक्काचा कायदा, विवाहाचा कायदा हे कायदे निरनिराळ्या समाजांस निरनिराळे आहेत. त्यांतील द्वैत दूर करणें हें कार्य कमी महत्त्वाचें नाहीं. समाजांतील निरनिराळ्या व्यक्ती निरनिराळ्या कायद्यानें बांधल्या जाव्यात कीं सर्व लोकांस सर्वसामान्य एकच कायदा असावा या विषयावर विचारजागृति व्हावी म्हणून हा लेख लिहीत आहें. समाजांत मतविशिष्ट कायदा नसावा, आणि सर्व लोक एकाच कायद्यानें बांधले जावेत, या दिशेनें समाजाची प्रगति होऊं लागली तर ती स्वागत करण्याजोगी गोष्ट आहे असें माझें मत आहे.

निरनिराळ्या समुच्चयांस निरनिराळा कायदा ठेवणें ही गोष्ट आज कांहीं अंशीं धार्मिक गोष्टीसाठीं अवश्य असेल. पण धर्मसमजुतींच्या भिन्नत्वामुळें कायदा कितपत निराळा ठेवणें अवश्य आहे याच्या मर्यादा तपासल्या पाहिजेत. हिंदूंच्या कायद्याचें आज जें स्वरूप आहे ते सर्वस्वी धार्मिक कारणांवर खास झालेलें नाहीं. कांहीं स्थानिक चालीरीती, कांहीं न्यायाधीशांच्या खऱ्याखोट्या बऱ्यावाईट समजुती यांचा कायद्यावर परिणाम होऊन आजचा कायदा बनला आहे. आणि बरेंचसें समाजद्वैत त्या कारणामुळेंच राखलें गेलें आहे.

"हिंदु कायदा" म्हणून जी नियमावली कोर्ट उराबर बसवितें तीस लोकसमाजांतील भावनांचें पाठबळ आहे असेंहि नाहीं. पुष्कळ प्रसंगीं कायदा लोकमतास किंवा लोकांच्या भावनांस विरोध करील असाच आहे. उदाहरणार्थ, एखाद्या इंग्रजानें हिंदु रखेली ठेवली तर तिचा मुलगा हिंदूच राहूं शकतो ही गोष्ट घ्या. ही गोष्ट सर्व हिंदूंस कितपत आवडेल हा प्रश्नच आहे. हा हिंदु कायद्याचा नियम धर्मशास्त्रकारांनीं ठरविला नाहीं पण इंग्रज कोर्टानें आज ठरविला आहे आणि त्यामुळें तो आपणास मान्य केलाच पाहिजे. आजच्या हिंदु कायद्यांत बऱ्याच चुका शिरल्या आहेत, त्या काढून टाकणें आणि कायदा समाजाच्या गरजांस अनुरूप असा बनविणें हें स्वराज्यास आपण पात्र आहों असें समजणाऱ्या भारतीयांचें उपेक्षा न करण्याजोगें कर्तव्य आहे.

स्वराज्य म्हणजे जातीच्या भवितव्यावर जातींतल्या श्रेष्ठ किंवा सुसंस्कृत व्यक्तींनीं ताबा मिळविणें. या कल्पनेस आज लोकमत जितकें तयार व्हावें तितकें झालें नाहीं. हिंदु कायद्यांत सुधारणा करावी या हेतूनें म्हणजे हिंदु जनतेंत जे विचार उत्पन्न होतात त्यांनीं आजचा हिंदु समाज बांधला जावा या हेतूनें जर कोणी प्रयत्न केला, तर त्यांस "सुधारक" म्हणून जे विरोध करीत, आणि सरकारनें सामाजिक किंवा धार्मिक प्रश्नांत हात घालूं नये असें म्हणत या लोकांचें स्वराज्याच्या वरील महत्त्वाच्या कल्पनेकडे दुर्लक्ष झालें. सरकार संस्थेचा सामाजिक सुधारणेकडे उपयोग करू नये ही समजूत स्वराज्यवर्धक नसून स्वराज्यद्रोही आहे. समाजाचें नियंत्रण समाजांतील बुद्धिमान वर्गानें सरकारसंस्थेचा उपयोग करून करावयाचें तें केलें नाहीं तर इतर अनिष्ट शक्ती समाजाचें नियंत्रण करीत राहतात या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. कायद्याचे निवाडे करण्यांत चुका करून समाजांत इंग्रज न्यायाधीश काय ढवळाढवळ करूं शकतात याजकडे लक्ष दिलें पाहिजे. सामाजिक कायदे करण्याच्या तत्त्वास विरोध करणें म्हणजे न्यायाधीशांस स्वैरपणा देऊन जनतेस दुर्बल करणें होय. सामाजिक कायदे करण्याचा कायदेमंडळाचा हक्क म्हणजे न्यायाधीशानें निकाल देतांना जर समाजाच्या कल्पनानुरूप निकाल दिला नाहीं, तर समाजाचें मत प्रस्थापित करण्याचा समाजाचा हक्क होय आणि तो बजावणें हें समाजांतील जबाबदार मंडळींचें कर्तव्य आहे.

प्रत्येक समाजास ज्या कायद्याखालीं समाजांतील व्यक्ती वागत आहेत त्या कायद्यासंबंधानें जागरूकता पाहिजे. स्वयंशासनास पात्रता म्हणजे स्वतःला उपयोगी असे कायदे करण्यास लागणारी हुशारी. विशिष्ट कायद्यानें समाजाचें कल्याण होईल किंवा अकल्याण होईल यासंबंधानें विचार करण्याची पात्रता समाजांतील सुशिक्षितांस हवी, तसेंच समाजांत काय चाललें आहे, यांविषयीहि समाजांतील सुशिक्षित वर्गास ज्ञानहि पाहिजे. समाजांत काय चाललें आहे, त्यांतील अनिष्ट गोष्टी कायद्यांतील कोणत्या फटींमुळें उत्पन्न होतात, आणि जे अनिष्ट प्रकार आहेत ते बंद करण्यासाठीं, व नियम स्पष्ट करणें, वैयक्तिक सामर्थ्यास चेतना देणें इत्यादि क्रिया करण्यासाठीं कायद्यांत कोणत्या सुधारणा पाहिजेत या गोष्टींत समाजांतील कायदेपंडितांनीं मन घातलें पाहिजे.

जागरूकता उत्पन्न झाली म्हणजे सुधारणेच्छा क्रमानेंच उत्पन्न होईल. आज सुधारणेच्छा नाहीं. याचें कारण जागरूकताच नाहीं असें वाटतें. असें दिसून येतें कीं जे लोक अनेक व्यवहाराच्या कायद्याविषयीं सरकारनें अमुक नियम केले पाहिजेत असें म्हणतात तेच लोक विवाहासारखे प्रश्न आले म्हणजे थोडेसे बुजतात. ज्या गोष्टी "धर्मांत" येतात म्हणून त्यांची समजूत होते त्या गोष्टींविषयी कांहीं कायदे करण्याचें कोणी योजलें तर देशाभिमान बाळगणाऱ्या अनेक व्यक्तींचा फार विरोध होतो. वैयक्तिक आणि आणि सामाजिक आयुष्यक्रमांत ज्या गोष्टी येतात त्या सर्वांवर विधिनिषेधात्मक विचार व्यक्त करणें ही क्रिया प्राचीन धर्मशास्त्रकार आणि नीतिवेत्ते यांनीं केली असल्यामुळें खरोखर धर्मशास्त्राच्या कक्षेखालीं येत नाहीं असा आयुष्यांतील एकहि विषय नाहीं. व

यासाठीं कांहीं केलें तर धर्माचें अतिक्रमण केलें म्हणून ओरड करण्यास समाजांतील कांहीं लोकांस क्षेत्र मिळतेंच. ही गोष्ट जो लक्षांत ठेवील त्यास सामाजिक सुधारणेच्या विशिष्ट बाबींस "धार्मिक" विरोध आहे काय ? या प्रश्नांत विशेष शिरण्याचें कारण भासणार नाहीं.

स्वयंशासनाला आपण पात्र आहों असा बाणा बाळगणारे पण आपल्या गृह्य बाबतींत केवळ परंपरेच्या कशाबशा तयार झालेल्या कायद्यानें आपणांस बांधून घेणारे आणि स्वतःच्या आयुष्यक्रमाची सुधारणा करण्याला कोणते नियम उपयोगी पडतील त्याप्रमाणें नियम करून ते अंमलांत आणण्याच्या समाजांतील विचारी माणसाच्या क्रियेस विरोध करणारे लोक स्वयंशासनाच्या तत्त्वाचेच विरोधक होत. त्यांस धर्मशास्त्रकारांपेक्षां आजचे लोक कमी अकलेचे वाटत असावेत. पण त्यांनीं अशी भावना ठेवण्याचें कारण नाहीं. ज्या लोकांना राजानें ज्या नियमानें कर घ्यावयाचा तो त्यांनीं निर्माण केलेल्या नियमांनीं घ्यावा असें वाटतें, त्या लोकांना वारसा, स्त्रीधन इत्यादि गोष्टींविषयीं स्वेच्छेनें नियमन करण्यास अक्कल नाहीं असें कसें म्हणतां येईल.

आजचा "हिंदूंचा कायदा" म्हणजे कोर्टानें केलेल्या निकालाचा संग्रह या स्वरूपाचा आहे, त्या स्वरूपांत न रहातां त्याचा "कोड" करावा याबद्दल कायदेमंडळांत थोडीशी खटपट झाली. पण या प्रश्नाकडे देशी पत्रकारांचें फारसें लक्ष ओढलें गेल्याचें दिसत नाहीं; व हा सार्वजनिक चर्चेचा विषय मुळींच झाला नाहीं. हिंदूंचा कायदा कोडरूपानें अवतीर्ण होण्यापूर्वी सामाजिक कायद्याच्या कोणत्या बाबतीत हिंदु वैशिष्ट्य ठेवावें आणि कोणत्या बाबतींत मतविशिष्ट कायदा न ठेवता सर्व जातींस आणि मतांस एकच कायदा ठेवावा याची कमिशनमार्फत चौकशी झाली पाहिजे.

निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना निरनिराळे कायदे आहेत, या वस्तुस्थितीविरुद्ध प्रयत्न तर पाहिजेच पण सर्व हिंदूंस तरी एक कायदा असावा या गोष्टीकडे अधिक लक्ष पाहिजे. हिंदूंमध्येंच ब्राह्मणांस व ब्राह्मणेतरांस निरनिराळे कायदे लागू आहेत व त्यामुळें कित्येक प्रसंगीं विषमतारक्षणापलीकडे कांहीं क्रिया होत नाहीं. उदाहरणार्थ, शूद्रास मुलीचा मुलगा दत्तक घेतां येतो; ब्राह्मणास तो घेतां येत नाहीं. पुष्कळ ब्राह्मणांस मुलीचा मुलगा दत्तक घ्यावा असेंहि वाटतें पण कायद्याची अडचण येते म्हणून मग त्यांस अनेक लटपटी कराव्या लागतात. ब्राह्मणसदृश आयुष्यक्रम आचरावा, आणि वैदिक संस्कारांस हक्क सांगावा या स्वाभाविक इच्छेनें प्रेरित झालेल्या ब्राह्मणेतरांस तर मोठीच अडचण येऊन पडते. त्यांस आपलें घराणें क्षत्रिय आहे असें म्हणण्याची इच्छा असते. घराणें क्षत्रिय धरलें तर जुन्या रीतीप्रमाणें मुलीचा मुलगा दत्तक घेण्यास अडचण पडते व घेतला तर तें दत्तविधान बेकायदेशीर ठरतें. एकदां मराठ्यांतल्या एका मोठ्या सावकार घराण्यानें मुलीचा मुलगा दत्तक घेतला. त्या घराचें कांहीं पैसे येणें होतें, तेव्हां ते येणें वसूल करण्यासाठीं दत्तकानें फिर्याद केली. तेव्हां ऋणकोनें दत्तविधान बरोबर नाहीं असा आक्षेप घेतला. आणि खुद्द दत्तकाच्या व त्याच्या आप्तांच्या तोंडून "आम्ही शूद्र नाहीं क्षत्रिय

आहों," असा कबुलीजबाब मिळवला, आणि त्याच आधारानें दत्तविधान बेकायदेशीर ठरविलें. या प्रकारची परिस्थिती पाहून स्वाभाविकपणें असा प्रश्न उपस्थित होतो कीं ब्राह्मणांस आणि ब्राह्मणेतरांस दत्तकाचे कायदे निराळे ठेवण्यानें कोणते धर्मरक्षण झालें आहे.

हिंदुस्थानांत कायद्याची सुधारणा करतांना कांहीं गोष्टी, एकंदर कायद्याची स्थिति सुगमतेच्या दृष्टीनें सुधारावयाची म्हणून कराव्या लागतील तर कांहीं सुधारणा हिंदुमुसलमान इत्यादि समाजांच्या हितासाठीं घडवून आणाव्या लागतील; म्हणजे त्या समाजात न्याय आणि सौख्य ही वाढविण्यासाठीं प्रत्येक समाजांतील कमी सुखी वर्गांविषयीं त्या समाजांतील शिष्टांनीं उदार मन करावें याची आज फारच आवश्यकता आहे. हिंदु कायद्याच्या सुधारणेविषयीं विचार करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं बरेचसे धर्मनियम अशा वेळेस ठरले गेले कीं ज्या वेळेस समाजांत नवीन सदस्य मिळविण्यासाठीं प्रतिस्पर्धी समाज देशांत नव्हते. आतां ख्रिस्ती, मुसलमान असे निरनिराळे समाज देशांत आहेत. जो समाज आपली कायदेपद्धति अधिक चांगली करील तो समाज आपले आकर्षकत्व वाढवील. समाजाच्या विशिष्ट कायदेपद्धतीमुळें ज्या वर्गाचें नुकसान होत असेल त्या वर्गास त्या कायदेपद्धतीनें बांधलेला समाज सोडून जाण्याची इच्छा होईल. तर प्रत्येक समाजानें आपला समाज स्पर्धाक्षेत्रांत आहे हें जाणून सुधारणा केली पाहिजे.

या गोष्टीचें महत्त्व स्त्रीशिक्षण वाढल्यानंतर अधिकाधिक भासून येईल. हिंदु कायद्यांत विधवांस इस्टेटीचे हक्क बेताचेच आहेत. आणि यामुळें हिंदु कायद्यापेक्षा अन्य कायद्याप्रमाणें आपला विवाह व्हावा अशी जर हिंदु स्त्रियांची इच्छा झाली तर तीस गैर कसें म्हणतां येईल.

याशिवाय अनेक गोष्टींमुळें पूर्वीच्या निषेधांचें व निर्बंधांचें आज महत्त्व राहिलेलें नाहीं: उदाहरणार्थ "धर्मत्याग" ही गोष्ट घ्या. जेव्हां विशिष्ट धर्मानें सबंध देश व्यापलेला असतो तेव्हां धर्मत्यागास समाजाकडून म्हणून देशाकडून बहिष्काराचें स्वरूप येतें, आज तें तसें उत्पन्न होणार नाहीं. आज कोणत्याहि हिंदूनें मॅजिस्ट्रेटपुढें जाऊन मी हिंदु नाहीं असें विधान केलें तर त्या मनुष्याचें कांहीं एक नुकसान होणार नाहीं. ख्रिस्ती व मुसलमान यांचें समाज सदस्यत्व मतांवर अवलंबून असतें, तथापि हिंदुसमाजाची तशी स्थिती नव्हती. तथापि ख्रिस्ती व मुसलमान या संप्रदायांप्रमाणेंच हिंदु संप्रदाय आहे अशी कोर्टांनीं आपली समजूत करून संप्रदाय धर्माचे कायदे हिंदु समाजास लागू केले आहेत. विशिष्ट संप्रदायाच्या मंडळीस मी त्या संप्रदायाचा म्हणजे मताचा नाहीं असें म्हणून त्या कायद्याचें बंधन तोडतां येतें एवढेंच नव्हे तर त्या कायद्यामुळें जे हक्क किंवा जबाबदाऱ्या उत्पन्न झाल्या असतील त्यांस चुकवितािह येतें. उलटपक्षी समाजत्याग स्वेच्छेनें करूं पहाणाऱ्या व्यक्तीचें हे नियमित समाज फारसें नुकसान करूं शकत नाहींत.

समाजबाहुल्य, तसेंच प्रत्येक समाजाच्या नियमांची मर्यादित बंधनकारकता, इत्यादि गोष्टींमुळें त्या समाजाच्या कायद्याखालीं विवाहासारख्या ज्या ज्या म्हणून क्रिया येतील

त्यांस अस्थैर्य उत्पन्न होतें, आणि एका मनुष्यानें दुसऱ्याची बायको पळवावी यासारख्या निंद्य कृत्यासहि कायदेशीरपणा आणतां येतो. कोणत्याहि मनुष्यास आपलीं मतें पसरविण्याचा कायदेशीर हक्क आहे. त्याप्रमाणेंच कोणत्याहि मनुष्यास नास्तिकपणा आणि ब्राह्मोमत किंवा मुसुलमानी मत पसरविण्याचा हक्क आहे. त्यामुळें जर एखाद्यास दुसऱ्याची बायको पळवावयाची असली तर त्यानें त्या बाईस तिच्या पूर्वीच्या मताचा त्याग करण्यास सांगावें आणि तें तिनें केलें म्हणजे पूर्वीच्या अधिकारांतून व जबाबदाऱ्यातून ती मोकळी होईल आणि लगेच मागाहून तिच्या बरोबर कायदेशीर रजिस्टर केलेलें लग्न लावावें किंवा तिला केवळ रखेलीसारखे ठेवावें या सर्व गोष्टी आज राजरोसपणें आणि कायदेशीरपणें करतां येतील. हिंदूंस मुसुलमान किंवा खिस्ती होण्याचेंहि कारण नाहीं. नुसतें 'हिंदुधर्मावर माझा विश्वास नाहीं' असें म्हटलें म्हणजे झालें. या प्रकारच्या अडचणीपासून केवळ हिंदु समाजच बद्ध आहेत असें नाहीं तर खिस्ती व मुसुलमान समाजहि बद्ध आहेत. एवढेंच नव्हे तर रजिस्टर करून जे लग्नसंबंध उत्पन्न केले जातात तेंहि मोडतां येतील. व एका मताशीं संलग्न असलेल्या कायदेपद्धतीखालीं जो करार झाला असेल तो करार, मत बदललें या सबबीखालीं मोडण्याची संधि असूं नये. सामान्य देण्याघेण्याचे करार जर 'माझें परमार्थविषयीं मत बदललें' या सबबीवर मोडतां येणार नाहींत, तर त्याहूनहि गंभीर स्वरूपाचा विवाहासारखा संबंध कां मोडता यावा. या सर्व गोष्टींचा समाजांतील कायदे करणारांनीं विचार केला पाहिजे. कायद्याचा हेतु समाजांत स्थैर्य उत्पन्न करण्यासाठीं आहे. करार मोडण्यांत किंवा जबाबदारी चुकविण्यांत सौकर्य उत्पन्न करण्याचा नाहीं. यासाठीं स्त्रीपुरुषांत विवाहानें जे बंध उत्पन्न होतात त्या बंधांतून मत बदलल्याचें निमित्त करून सुटका करून घेण्याची सोय समाजानें ठेवतां कामा नये. मनुष्यानें ज्या कायदेपद्धतीच्या अंमलाखालीं विवाहासारखे संबंध उत्पन्न केलें ते संबंध ती कायदेपद्धति जरी त्यानें त्यागिली तरी नष्ट होत नाहींत हें तत्त्व कांहीं अंशीं सर्वमान्य आहे. एक मनुष्य दुसऱ्या देशाचा नागरिक झाला तर त्यास पूर्वीच्या देशाची कायदेपद्धति बंधनकारक होत नाहीं तरी तेवढ्यानें त्यानें पूर्वी केलेल्या विवाहासारख्या करारांतून त्याची सुटका होत नाहीं. धर्मत्यागामुळें विवाहाचा करार नष्ट कां व्हावा ?

## सिंहावलोकन.

वर सांगितलेल्या विचाराचा गोषवारा येणेंप्रमाणें :—

( १ ) स्वतः आपण ज्या सामाजिक कायद्यानें बांधले जात आहोंत त्या कायद्याचा विचार करून त्यांत योग्य सुधारणा नित्य करीत जाणें, हें स्वयंशासनास लायक अशा समाजांचें अवश्य लक्षण आहे.

( २ ) आज "हिंदु कायदा" म्हणून जो आपल्यावर राज्य करीत आहे, तो कायदा इंग्रज न्यायाधीश व त्यांचे अनुयायी हिंदु न्यायाधीश यांच्या निकालांचा संग्रह आहे. धर्मशास्त्रकारांचे नियम आपणांवर राज्य करीत नसून इंग्रज न्यायाधीशांचे नियम राज्य करीत आहेत आणि यामुळें ती हिंदु कायद्यांत सुधारणा करण्याची चळवळ व

धर्मशास्त्राविरुद्ध चळवळ नसून कोर्टांच्या निकालांच्या अपूर्णतेविरुद्ध किंवा अयोग्यतेविरुद्ध चळवळ आहे.

( ३ ) ‘ सामाजिक प्रश्नांच्या विशिष्ट बाबी धर्माचें अंग आहे ’ या प्रकारच्या विधानानें सुधारणाप्रवर्तकांनीं बुजण्याचें कारण नाहीं. कां कीं, समाजाच्या सर्वच अंगांवर धर्मशास्त्रकारांनीं आपल्या कालमानाप्रमाणें व पूर्वानुभवाप्रमाणें विचार व्यक्त केले. व धर्मशास्त्रानें अस्पृष्ट असा विषय जवळ जवळ कोणताच नाहीं. त्यामुळें अमुक एक गोष्ट धर्माशीं संबद्ध आहे म्हणून बुजण्याचें कारण नाहीं. कां कीं, धर्माशीं अशा अनेक प्रकारच्या गोष्टींवर कायदे करण्याची देशांत प्रवृत्ति आज आहेच.

( ४ ) हिंदु समाजाचा कायदा तपासतांना हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हिंदु समाजाचें सदस्यत्व टाकून देऊन बाहेर पडा किंवा आमच्यांत मिळा असें सांगणाऱ्या दुसऱ्या स्पर्धमान कायदेपद्धति अनेक आहेत. व ज्या समाजाची कायदे-पद्धति अधिक चांगली, त्या समाजाची आकर्षकता अधिक होणार ही गोष्ट हिंदु कायद्यावर विचार करणारांनीं अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे.

( ५ ) कायद्यामध्यें सौकर्य उत्पन्न करणें व कायद्यानें लोकांस आत्महितासाठीं प्रेरित करणें या दृष्टींनीं कायद्याची सुधारणा केली पाहिजे हें खरेंच. तथापि विविध समाजाचें पृथक्त्व ज्या समाजविशिष्ट कायदेपद्धतींमुळें विनाकारण उत्पन्न होतें त्या प्रकारच्या कायद्याविषयीं अधिक विचार करून व अनवश्य म्हणजे परमार्थाशीं असंबद्ध कारणामुळें उत्पन्न झालेली भिन्नता काढून टाकून सर्व समाजांस सामान्य कायदा निर्माण करण्याकडे देशाची एकंदर प्रवृत्ति असावी; कां कीं, येणेंकरून समाजांत अधिक सारखेपणा वाढून राष्ट्रीयत्वाचा विकास होईल.

( ६ ) विवाहासारख्या ज्या सार्वलौकिक संस्था आहेत, त्यांचें गंभीर स्वरूप राखण्यासाठीं मतासारख्या गोष्टीवर त्याची स्थिति किंवा च्युति अवलंबून ठेवूं नये.

[ विद्यासेवक वर्ष २ अंक ३ नोव्हेंबर १९२५ पृ. १ ते ६ ]

# १९. सामाजिक क्रांति आणि तिची तयारी

ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद हा जो आपणांपुढें दृष्टीस पडत आहे तो एका विशिष्ट प्रकारच्या आर्थिक क्रांतीचें एक अंग आहे. समाजांतील निरक्षर वर्गांपैकीं कांहीं भाग साक्षर होऊन जुन्या साक्षर वर्गांशी स्पर्धा करीत आहे. आणि श्रमविभागाची सध्या बसलेली घडी बदलूं पहात आहे. त्या स्पर्धेचें राजकीय अंग काय तें लोकांच्या विशेष नजरेस आलें आहे. आम्ही जातीच्या दृष्टीनें बहुसंख्यांकांचे प्रतिनिधी, त्या अर्थी राज्य-व्यवस्थेंत आमच्या जातीचे लोक अधिक घेतले जावेत इत्यादि आकांक्षा मराठ्यांनी व्यक्त केल्या एवढेंच नव्हे तर त्या आकांक्षांस त्यांनीं राजमान्यता मिळविली आहे आणि कारकुनीची नोकरी करणारा वर्ग उत्पन्न झाल्यामुळे, हा सुशिक्षित वर्गास मोठा "प्रश्न" म्हणून वाटत आहे. ब्राह्मणादि मध्यम वर्गानें इंग्रज भोगीत असलेले अधिकार आपल्या हातीं यावेत म्हणून जी खटपट केली तिचा परिणाम असा झाला कीं, इंग्रज आपल्या स्थानावरून फारसा घसरला नाहीं पण मध्यम वर्गांत मोडणाऱ्या जाती जे अधिकार भोगीत होत्या, किंवा ज्या जीवनोपायांस चिकटून होत्या त्या अधिकारांस व जीवनोपायांसच हिसकावून घेण्यास कमी सुधारलेल्या जाती प्रवृत्त झाल्या आहेत. इंग्रज व ब्राह्मण या स्पर्धेच्या ऐवजीं ब्राह्मण व ब्राह्मणेतर हीच स्पर्धा उत्पन्न झाली याबद्दलच कित्येकांना चुटपुट लागली असण्याचा संभव आहे.

पुढारलेल्या वर्गांपैकीं कांहीं जणांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, लोकांसाठीं म्हणजे जनतेचे अधिकार विस्तृत व्हावेत म्हणून आम्ही भांडणार, भांडण्याचा परिणाम कांहीं हक्क मिळण्यांत होणार, हक्क जास्त मिळाले म्हणजे समाजांतील अडाणी वर्ग जागृत होणार, आणि आम्ही निरक्षर जातीतली सुशिक्षित मंडळी सरकारशीं भांडलों नाहीं, आम्ही सरकारला पेंचात टाकलें नाहीं. यासाठीं जे भांडले त्यांस राजद्रोही ठरवा आणि तूप असेल तें आमच्या पोळीवर वाढा अशा तऱ्हेची मागणी करीत राहणार. म्हणजे ब्राह्मणादि जातींनी, लोकराज्याच्या वाढीस उत्तेजन देणें हें केवळ स्वतःची भाकरी गमावण्याचें म्हणजे आत्मघातकी काम आहे, हें जाणून या फंदांत आपण कधीं पडूं नये. अशा तऱ्हेच्या कल्पना जरी वर्तमानपत्रांत फारशा व्यक्त होत नाहींत तरी सुशिक्षित वर्गाच्या खाजगी चर्चेंत बऱ्याच व्यक्त होतात. मध्यम वर्ग आणि खालचा वर्ग यांत आज उत्पन्न झालेलें द्वैत कांहीं अंशीं लोकशिक्षणाचा तर अंशानें लोकराज्याचा परिणाम आहे. ही परिस्थिति आज नवीनच उत्पन्न झाली आहे. व ती जागतिक विकासाच्या विशिष्ट अंगाची बोधक आहे. व यासाठीं या परिस्थितीकडे पाहून लोकराज्याच्या

तत्त्वाविषयीं वाईट वाटण्याचें कारण नाहीं, सरकारी नोकरी करण्यास लायक असा एखादा वर्ग तयार झाला आणि त्यास विशेष सवलती मिळाल्या नाहींत तरी तो आज उद्यां सरकारी नोकरी मिळविण्यांत स्पर्धा करणार. स्वतंत्र सवलती कमी झाल्या तरी त्याचा प्रवेश हळूहळू होणार आणि त्यामुळें ब्राह्मण वर्गास आपली अन्यत्र सोय करण्याची आवश्यकता नाहींशी होणार नाहीं. व इंग्रज सरकार ब्राह्मणेतरांना चेतवून देतें असें म्हणून प्रश्नाच्या खऱ्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करण्याचें कारण नाहीं. अज्ञानी व अशिक्षित वर्गाची महत्त्वाकांक्षा जागृत झाली असतां भविष्यकालीन समाजाचें स्वरूप कसें असेल ? ही जागृति मध्यमवर्गास हितावह आहे काय ? तिला अत्यंत विस्तीर्ण आणि समाजास अत्यंत हितकर असें क्षेत्र कसें द्यावयाचें, आणि त्या महत्त्वाकांक्षेमुळें समाजामध्यें कोणते बदल होणार हे ओळखून ब्राह्मणादि पुढारलेल्या वर्गानीं तयारी कशा प्रकारची करावयाची हा प्रश्न सर्वांस विचारार्ह आहे व यासाठीं तो येथें विवेचनासाठीं घ्यावयाचा आहे.

सध्यांच्या सामाजिक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासाठीं त्याचे दोन विभाग करूं आणि क्रमाक्रमानें प्रत्येक विभाग विचारास घेऊं. वर्गपरिवर्तनात्मक समाजक्रांतीचीं जी कारकें आहेत त्यांत ( १ ) साक्षरतेचा सर्व जनतेंत प्रसार. ( २ ) निकृष्ट समाजास, आपल्या प्रयत्नानें आपलें राजकीय महत्त्व वाढविण्याची संधि व ( ३ ) बाहेरच्या जगाची सामाजिक आणि नैतिक स्थिति, या गोष्टी प्रमुख आहेत. या तीनही कारकांचे परिणाम इतके व्यापक आणि तीव्र आहेत कीं त्यांची दिशा समजण्याइतपत विवेचन इथें करतां येईल.

साक्षरतेच्या वाढीमुळें समाजाच्या औद्योगिक आयुष्यक्रमावर काय परिणाम होतात ते अजमावणें झाल्यास साक्षरतेमुळें समाजाच्या कोणत्या गरजा वाढतात, तिचा उत्पादनावर व त्याप्रमाणेंच मजुरीच्या दरावर काय परिणाम होतो तें जाणलें पाहिजे. उदाहरणार्थ, वाचणारा वर्ग वाढला म्हणजे पुस्तकें, वर्तमानपत्रें इत्यादि धंद्यांना क्षेत्र उत्पन्न होईलच, पण जाहिरातीनें विकण्याची पद्धति वाढून विक्रयपद्धतीवर परिणाम होईल. एवढेंच नव्हे तर त्यामुळें मोठ्या प्रमाणावर उत्पादनहि अवश्य होत जाईल असे अनेक आर्थिक फरक होणार आहेत. ते अजमावल्याशिवाय चालू असलेल्या क्रांतीची कल्पना बरोबर होणार नाहीं.

साक्षरतेच्या वाढीमुळें निरनिराळ्या कामांच्या किंमतीत कसा फरक होत जातो तें आपण पाहून व सामाजिक आयुष्यक्रमावर महत्त्वाचे फरक होतील ते जाणून त्याप्रमाणें आपला आयुष्यक्रम बदलण्यास निरनिराळ्या वर्गाची तयारी झाली पाहिजे. जे फरक होणार त्यांचें स्थूलस्वरूप येणेंप्रमाणें—

केवळ लिहिण्यावाचण्यावर ज्यांचें जीवन अवलंबून आहे त्यांच्या मजुरीवर मोठाच परिणाम होईल; त्यांत स्पर्धा वाढेल, आणि आज जी कारकुनास प्राप्ति आहे ती उद्यां राहणार नाहीं. आज सामान्य कारकून तीस पासून पन्नास रुपये मिळवितो, व सामान्य सुतार जवळ जवळ तितकेंच मिळवितो, व बिनकौशल्याचा मजूर सोळापासून वीस रुपये मिळवितो. कारकुनी करण्यास लायक असा वर्ग वाढल्यास केवळ कारकुनीच्या कामाच

दर सोळापासून पंचवीस रुपयांवर येईल आणि त्यामुळें त्या धंद्यांतून बऱ्याच लोकांस बाहेर पडावें लागेल, असें अधिक सुशिक्षित देशांच्या स्थितीवरून दिसून येतें. अमेरिकेंत सार्वत्रिक शिक्षणाचा परिणाम झाला आहे तो असा : लिहिणें, वाचणें सार्वत्रिक झालें, त्यामुळें १४ व्या वर्षापर्यंत मुलगा शाळेंत शिकतो आणि मग तो सुतारकाम, गवंडीकाम, नळवाल्याचें काम, खाटीककाम, इत्यादि कामें शिकण्यासाठीं व शिकतां शिकतां दोन पैसे मिळविण्यासाठीं बाहेर पडतो. चवदा वर्षांचा मुलगा जरी कामासाठीं बाहेर पडला तरी मुलीस तसें पडतां येत नाहीं. त्यामुळें मुलगी शाळेंत शिकतच राहते आणि ती अठरा एकोणीस वर्षांची होऊन शाळा सोडते व नंतर कामाला लागते. त्यामुळें कारकुनी, दुकानांत नोकरी, इत्यादि गोष्टींचे दर कमी होतात आणि त्यामुळें त्या कामावर पुरुष टिकत नाहींत. अलीकडे अठरा वर्षांपर्यंत कांहीं संस्थानांत सक्तीचें फुकट शिक्षण केलें आहे. त्यामुळें पुरुष शिक्षण वाढेल, तथापि या तऱ्हेच्या परिस्थितीचा परिणाम असा होतो कीं मध्यम वर्गांत शोभतील अशा स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षां अधिक होत जाते. आपल्याकडे देखील कामकरी जातींत तीच स्थिति कालांतरानें दिसूं लागेल. शिक्षणप्रसाराचा परिणाम समाजावर येणेंप्रमाणें अत्यंत विविध प्रकारचा होत आहे. आणि त्यामुळें होणाऱ्या आर्थिक फरकाची जाणीव सर्वांस पाहिजे.

शिक्षणाच्या वाढीबरोबर मध्यमवर्गांत मोडणाऱ्या वर्गामध्यें खालच्या वर्गांतल्या मंडळीचा दिवसेंदिवस अंतर्भाव होत जातो व त्याचा स्त्रियांच्या स्थितीवरहि परिणाम होतो. या बाबतींत समाजाचें परिवर्तन पाश्चात्त्यांत जसें होत जात आहे तसेंच परिवर्तन आपल्याकडेहि होत आहे ही गोष्ट थोड्याशा अवलोकनानें सहज दिसून येणार आहे. बेने इस्रायलांची गोष्ट घ्या. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी यांच्यांत शिक्षण नव्हतें आणि यांची जात त्यामुळें सांपत्तिकदृष्ट्या अगदीं खालावलेल्यापैकीं व सामान्य कुणब्यांपेक्षां जराशी वरच्या दर्जाची दिसणारी होती. तथापि गेल्या पिढींत शिक्षणप्रसार पुष्कळ होऊन जातीचें स्वरूप अगदीं पालटून गेलें आहे. गेल्या पिढींत यांस "तेली" म्हणत असत. आणि अजूनहि कोंकणांत तेलीच म्हणतात पण आज तेल्याचे घाणे आतां जवळ जवळ नष्ट झाले आहेत, व नष्ट झाले ते देखील इतके नष्ट झाले आहेत कीं, त्यांचा पत्ता लावावयाचा म्हणजे सामाजिक संशोधनच करावें लागेल. शिक्षणप्रसार पुरुषांपेक्षां स्त्रियांतच झाला आहे. आणि डॉक्टरणी व मास्तरणी यांचें प्रमाण या जातींत, त्या जातीच्या अल्पतेकडे पाहिलें असतां बरेच मोठें आहे असें दिसेल. आज ही जात मागासलेल्या जातीपैकी कोणीहि म्हणणार नाही तर ब्राह्मण प्रभूंप्रमाणें मध्यम वर्गांतली आहे असें कबूल करावें लागेल. तथापि स्त्रियांची अधिक अनुकूल शैक्षणिक स्थिती त्यांच्यामध्यें आहेच. व ती भावी एकंदर औद्योगिक क्रांतीची सूचक आहे.

समाजस्वरूपांत फरक जसा शिक्षणानें होतो तसा राजकीय दर्जा बदलल्यानेंहि होतो. खालच्या वर्गास नागरिकत्वाचे अधिकार जसजसे मिळत जातात तशी त्यांची महत्त्वाकांक्षा वाढत जाते, आणि ती महत्त्वाकांक्षा समाजास निराळें स्वरूप देण्यास कारण होते. विशिष्ट

वर्गाच्या महत्त्वाकांक्षेनें समाजाच्या स्वरूपांत फरक पडण्याचें कारण नाहीं असें लोकांस वाटेल पण तसें नाहीं. विशिष्ट वर्गास महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली म्हणजे तीबरोबर तो वर्ग हळुहळु कांहीं असे विशिष्ट गुण आपल्या अंगीं आणूं लागतो कीं त्यामुळें त्या वर्गास समाजांत पूर्वींपेक्षा उच्चपद मिळावयास लागतें. महत्त्वाकांक्षा जागृत झाल्याबरोबर तीस अनुरूप असे गुण किंवा शिक्षण हीं एकदम उत्पन्न होत नाहींत. आजचा समाज महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झाला तरी तो तदनुरूप गुणांशिवाय असणार आणि त्याच्या आकांक्षेप्रमाणें त्यास स्थान मिळणार नाहीं, म्हणून आज जागृत झालेला पण गुणहीन वर्ग तडफडतच रहाणार. महत्त्वाकांक्षेशीं अनुरूप असे गुण आपल्या अंगीं नाहींत ही जाणीवच निकृष्ट समाजांतील थोड्याबहुत जागृत व्यक्तींना एकदम येणार नाहीं. गुणवृद्धि झाली नाहीं, पण महत्त्वाकांक्षांच जागृत झाली म्हणजे तो समाज किंवा त्यांतील चळवळ करणाऱ्या व्यक्ती हास्यास्पद होऊं लागतात आणि पुढें कालांतरानें सुमारें दुसऱ्या पिढींत महत्त्वाकांक्षेनुरूप त्या समाजाची तयारी होऊं लागते.

समाजाची वर्गविषयक सुधारणा जी होत आहे ती कांहीं अंशीं उच्च वर्गाच्या प्रयत्नानें होते तर कांहीं अंशीं कनिष्ठ वर्गाच्या प्रयत्नानें होते. उच्च वर्गातील मंडळी समाजाच्या एकंदर स्थितीबद्दल जबाबदार अशी धरली जातात. त्यांना समाजांतील एकंदर लोकसमूहाचा दर्जा वाढवावा अशी त्यांची सामाजिक महत्त्वाकांक्षा जागृत होते. आपला देश व इतर देश या दोहोंची तुलना मनांत करून आपल्या देशाचीं वैगुण्यें शोधतांना आपल्या बहुजनसमाजाचें निरक्षरत्व हें फार स्पष्टपणें डोळ्यांत भरतें आणि त्यामुळें या बहुजनसमाजास साक्षरता देण्याकडे नामदार गोखल्यांसारख्या पुढाऱ्यांचें लक्ष गेलें. तथापि अशिक्षित समाजाला जेव्हां त्याच्या हक्काची जाणीव होऊं लागली तेव्हां त्या समाजांतच त्यांचे पुढारी उत्पन्न होऊन शिक्षणप्रसारासाठीं भांडूं लागले. दहा वर्षांपूर्वी इंग्रज ( उदाहरणार्थ, सर बी. फुलर यांचे नाइन्टीन्थ सेंचरी मधील लेख पहा ) म्हणे कीं लोकांना शिक्षण नको आहे, तें चळवळ्या ब्राह्मणांनांच राजद्रोहाचा प्रसार करण्यासाठीं साधन म्हणून हवें आहे. या तऱ्हेच्या विधानास आज जागा नाहीं. ब्राह्मणेतर पुढाऱ्यांमध्यें देखील सक्तीच्या लोकशिक्षणाबद्दल ज्यांस आस्था आहे असे दृष्टीस पडूं लागले आहेत. एवढेंच नव्हे तर लोकांस ब्राह्मण निरक्षर ठेवतात म्हणून ते ब्राह्मणांनाच दोष देऊं लागले आहेत.

बाहेर देशाच्या परिस्थितीचा आपल्यावर परिणाम होत जाणार पण त्या परिणामांचें स्वरूप आज स्पष्ट भासूं लागलें नाहीं, तथापि मजूर वर्गामध्यें साक्षरता वाढल्याबरोबर बाहेरदेशचे विचार आपल्याकडे परिणाम करूं लागतील व सामान्य जनतेस मिळत आहे त्यापेक्षां अधिक आयुष्यसौख्य मिळावें म्हणून प्रयत्न होईल, आणि त्याचा परिणाम समाजाच्या गरजा वाढण्याकडे होईल. मजूर वर्गामध्यें " अंतर्लक्षंबहिर्दृष्टिः " ही वृत्ती वाढत आहे. गेल्या मजुरांच्या संपामध्यें कांहीं मदत परक्या ठिकाणच्या मजूरवर्गानें केली, त्यामुळें आपण, व इतर देशचे मजूर हे कोणी

सगेसोयरे असूं अशी अंधुक कल्पना तरी या वर्गांत उत्पन्न झाली असावी, व तशीच त्यांस आपल्या राजकीय सामर्थ्याची थोडीबहुत जाणीव होणेंहि शक्य आहे. यंदांचा सर्वव्यापी संप जो मोठा निग्रहानें चालविला त्याचा परिणाम शासनतंत्रावर होऊन एक्साईजड्यूटी बंद झाली ही गोष्ट मजूरवर्गास भासल्याशिवाय राहणार नाही; हिंदुस्थानसरकारची मँचेस्टरवाल्यापुढें परतंत्रता आहे व बाहेरदेशच्या कारस्थानाचा परिणाम आपल्या भाकरीपर्यंत कसा होत जातो या गोष्टी मजूरवर्गापर्यंत जाऊन बाहेर-देशच्या चळवळीकडे मजूरवर्गाचें लक्ष ओढलें गेलें असेलच; पण साक्षरतेच्या वाढीबरोबर तें अधिक ओढलें जाऊं लागेल. कामाचा मोठेपणा, कामकरी वर्गास शासनसंस्थेंत अधिकार, या गोष्टी जसजशा वाढत जातील तसतसे कामाच्या हलकेमोठेपणामुळें सामाजिक उच्चनीचतेचे निर्बंध कमी होत जातील.

सारांश, वर्गपरिवर्तनात्मक समाजक्रांति कोणत्या क्रिया होऊन होत आहे ही गोष्ट आपणांस जाणली पाहिजे आणि त्या क्रांतीचे नियम लक्षांत घेऊन चढूं पाहणाऱ्या वर्गाविषयीं त्यांच्या आजच्या बिन तयारीमुळें दिसून येणाऱ्या ग्राम्यत्वाची घाण येऊं न देतां चढूं पहाणाऱ्यांविषयीं सहानुभूति ठेवून ब्राह्मणब्राह्मणेतर प्रश्नाचा विचार केला पाहिजे. हा विचार राजकीय फारच अल्प प्रमाणांत आहे. हा बहुतांशीं आर्थिक आहे. खालीं असलेल्यांमध्यें महत्त्वाकांक्षा जागृत होणें या क्रियेचें सामाजिक विकासदृष्ट्या महत्त्व मोठें आहे. साक्षरतेची वाढ ही सामाजिक परिवर्तनाचें प्रधानांग आहे; ही वाढ जसजशी होत जाईल तसतसें कनिष्ठ वर्गाच्या रहाणीस मध्यम वर्गाच्या रहाणीचें स्वरूप येत जाईल व आज महत्त्वाकांक्षी जातींत जें ग्राम्यत्व दिसतें तेंहि नष्ट होईल. साक्षरतेच्या विकासामुळें अक्षरजीवी वर्गाच्या आयुष्यावर मोठा परिणाम होणार आहे आणि यासाठीं या वर्गांतल्या लोकांनीं आपल्या उपजीविकेसाठीं साधनें व्यापक करण्यास सुरुवात केली पाहिजे. सध्यांच्या साक्षरवर्गानें सरकारी नोकरीकडे जाण्याऐवजीं अन्यत्र जावें ही जी चळवळ गेल्या पिढींत सुरू झाली होती त्या चळवळीची आजहि फारच आवश्यकता आहे. वस्तूंच्या उत्पादन–नयन–विनिमय इत्यादि व्यवहारांत शिरण्यासाठीं त्या मार्गांतले कांटे निश्चयानें काढून टाकण्यासाठीं आणि त्या सर्व व्यवहारसमूहास आपल्या बुद्धीनें शिस्त लावण्यासाठीं प्रयत्न करण्याची जरूरी आहे. तिकडे ब्राह्मणादि जातींची बुद्धि वळल्यास त्यांस काम भरपूर आहे. व त्यामुळें देशाची मनुष्यपोषणशक्ति वाढणार आहे.

[ विद्यासेवक वर्ष २ अंक ४ डिसेंबर १९२५ पृ. १ ते ५ ]

## २० 'वात्स्यायन' यांच्या 'रतिशास्त्र मीमांसा' या पुस्तकाची प्रस्तावना

१. समाजशास्त्राला अनेक शास्त्रांचा विचार करावा लागतो. त्यापैकीं "कामशास्त्र" हे होय. अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र ही जितकी महत्त्वाची आहेत, तितकेंच कामशास्त्र महत्त्वाचें आहे, अशा तऱ्हेची भावना प्राचीनांनीं बाळगली होती; आणि या शास्त्राचा जो विकास त्यांनीं साध्य केला त्याचा अर्वाचीन पाश्चात्य ग्रंथकार सस्पृह भावनेने स्वीकार करूं इच्छित आहेत. तथापि हिंदुसंस्कृतीच्या विनाशकालापासून अर्वाचीन जागतिक युद्धानंतरच्या कालापर्यंत भारतेतर जगाची, त्याप्रमाणेच भारताचीही, वृत्ति या शास्त्रास विरोधक अशीच होती. कांहीं शोधक वर्ग मात्र, या शास्त्राच्या ग्रंथांशीं परिचय झाल्यानंतर, या शास्त्राचा प्रसार करण्यास प्रवृत्त झाला.

२. शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीस विरोधक जी सोंवळी वृत्ति होती ती आता नाहींशी होऊं लागली आहे, आणि ज्या जुन्या सामाजिक कल्पनांना लोक चिकटून राहात होते त्या कल्पना देखील बदलत आहेत. अर्वाचीन जागतिक युद्धकालांतच रशियांत राज्यक्रांति झाली, आणि त्या राज्यक्रांतीनंतर समाजाच्या प्रत्येक विधिनिषेधात्मक नियमाची तपासणी होऊ लागली त्यांतच ऐंद्रियविषयक नीतिमत्तेच्या विचाराची तपासणी होऊं लागली. ईश्वरानें अमुक धर्म सांगितला आहे असें एखाद्या लठ्ठ पुस्तकाने सांगितले म्हणजे तें खरें मानावयाचें या प्रवृत्तीस प्रतिक्रिया पश्चिम युरोपांत जी संथपणानें पण नेटानें चालली होती ती प्रतिक्रिया रशियांत मोठ्या जोरानें सुरु झाली, व सत्ताधिश वर्गानें ती क्रिया करावयाचें अंमलांत आणल्यामुळें देशांत मोठे स्थित्यंतर घडून आलें. जुन्या वैवाहिक आणि स्त्रीपुरुष संबंधविषयक कल्पना नवीन समाजसत्तावादाच्या शिळेवर आपटून ठार झाल्या आहेत. रशियाचा परिणाम सर्व जगभर प्रत्यक्ष संसर्गाने होईल अशी अपेक्षा नाहीं; तथापि त्यांच्या देशांत जे विचार निर्माण झाले ते विचार जगभर स्थित्यंतर घडवितील यांत शंका नाहीं. रशियांतील विचारास उचलून धरणारा एक वर्ग हिंदुस्थानांतही निर्माण झाला आहे. हा वर्ग ब्रह्मचर्यधर्म आणि पातिव्रत्यधर्म या धर्मांच्या उपयुक्ततेबद्दल एक मोठें प्रश्नचिन्ह लोकांच्या मनोफलकावर कोरूं पाहात आहे.

३. आर्थिक विचार आणि ऐंद्रियनीतिविषयक विचार यांचा एकमेकांशीं संबंध आहे. द्रव्य मिळविणें ही महत्त्वाची गोष्ट आहे; त्यामुळें ज्या गोष्टी द्रव्य मिळविण्यास साहाय्यक त्या गोष्टी चांगल्या आणि ज्या गोष्टी तशा साहाय्यक नसतील त्या गोष्टी वाईट अशी नैतिक विचारांची पार्श्वभूमिका आहे. लग्नाची बायको आणि रखेली यांत मुख्य फरक हा आहे कीं, लग्नाच्या बायकोच्या संततीस स्वाभाविकपणें वारसा हक्क मिळतो

आणि रखेलीच्या संततीस तसा मिळत नाहीं. वारसाहक्क ज्या संततीस मिळत नाहीं ती संतति अर्थात् निकृष्ट होय; आणि त्या संततीस उत्पन्न करणाऱ्या क्रिया देखील अश्रेयस्कर होत. रखेलीच्या आणि लग्नाच्या बायकोच्या हक्कांतही फरक आहे. नवऱ्याच्या संपत्तीवर जसा बायकोचा हक्क चालतो तसा रखेलीचा आपल्या प्रियकराच्या संपत्तीवर चालत नाहीं त्यामुळें तिची स्थिति देखील सांपत्तिकदृष्ट्या हीन होय. येणेंप्रमाणें ऐंद्रियविषयक नीतिसंबंधाच्या बाबतींत उत्पन्न झालेलें नीतिशास्त्र द्रव्यविषयक अपेक्षांच्या विचारावरच रचलें गेलें आहे. नीतितत्त्वाच्या मुळाशीं आर्थिक कल्पना आहेत ही गोष्ट लोकांस एकाएकीं पटणार नाहीं. नीतीच्या विशिष्ट विचारास निराळी कारणें कदाचित् लोकांच्या डोळ्यांसमोर असतील; पण तेवढ्यानें त्या तत्त्वांच्या आर्थिक पायाचें दूरीकरण होत नाहीं. ज्यावेळेस विशिष्ट विचार उत्पन्न होतो त्यावेळेस त्यास तात्कालिक उर्फ निमित्तकारणें अनेक असतात, त्याप्रमाणेंच येथेही असतील; तथापि विशिष्ट कल्पनास जें पिढ्यान् पिढ्या सातत्य मिळतें तें मात्र या कल्पनांच्या पाठीशीं आर्थिक कारण असल्याशिवाय मिळत नाहीं.

४. पतिव्रताधर्माचें महत्त्व स्थापन होण्यास कारण स्त्रियांचें आर्थिकदृष्ट्या पुरुषावलंबन होय. पुरुषानें स्त्रीचें पोषण करावें ही गोष्ट स्त्रियांस उत्पन्न होणाऱ्या गर्भधारणमूलक वैकल्यानें उत्पन्न झालेली आहे; त्यामुळें स्त्रीचा नियामक आणि शास्ता पुरुष झाला आहे. सर्व समाजांची आर्थिक विवंचना करणें हें जोपर्यंत संस्थानांनीं पत्करिलें नाहीं तोपर्यंत राज्य किंवा संस्थान अगर समाज हा पुरुषांचा स्त्रियांवरील अधिकार फारसा दूर करूं शकणार नाहीं; आणि त्यामुळें समाजांतील धर्मनियमांचें म्हणजे ऐंद्रियविषयक विचारांचें नियामिकत्व देखील पुरुषांकडेच राहील. जो स्त्रीसमाज स्त्रिया स्वेच्छेने स्वायत्त ठेवतील तो समाज नेहमीं थोडकाच राहणार; आणि यासाठीं समाजाचें कामशास्त्र देखील पुरुषांकितच राहील.

५. मनुष्य नेहमी द्रव्याच्या इच्छेनें प्रवृत्त होतो तसाच कामेच्छेने देखील प्रवृत्त होत असतो; तथापि कामेच्छा आणि द्रव्येच्छा यांत द्रव्येच्छा समाजाचे अधिक नियमन करूं शकते; याचें कारण द्रव्याची संग्रहणशक्ति हें होय. आज जमा करून ठेवलेलें द्रव्य उद्यां उपयोगास येतें, पण कामेच्छातृप्ति रचून ठेवता येत नाहीं; आणि ती दुसऱ्यास देताही येत नाहीं. तसेंच ‘काम’ हा पुरुषार्थ विशिष्ट वयांतच प्रेरक होतो; पण अर्थ हा पुरुषार्थ वृद्धपणीं देखील कार्य करीत रहातो. या प्रकारच्या कारणामुळें कामाचा प्रभाव द्रव्येच्छेच्या प्रभावापेक्षां कमी कार्यकारी आहे; तथापि एका दृष्टीनें तो प्रभाव अधिक कार्यकारी आहे. वंशसातत्य हा कामाचा सर्वांत महत्त्वाचा प्रभाव होय. आणि ज्याप्रमाणें द्रव्यार्जन हे कितपत यशस्वी किंवा अयशस्वी झालें हें जमलेल्या संपत्तीच्या आंकड्यांनीं सांगता येईल, त्याप्रमाणेच कामशास्त्राची यशस्वीता ज्या जातींत

तें शास्त्र उत्पन्न झालें त्या जातीच्या दृष्टीनें सांगता येईल; तथापि कामशास्त्राचें मुख्य ध्येय जातीची वृद्धि हें नव्हे. कारण, जातीची वृद्धि कामास पूर्ण कार्यक्षेत्र मिळाल्याशिवाय देखील होऊं शकेल. तरी देखील कामशास्त्रामध्यें तदंतर्गत नीतिशास्त्रें आहेत. भिन्नलिंगसमागमसौख्य अधिक चांगल्या तऱ्हेनें उपभोगितां यावें यासाठीं कांहीं भिषग-निर्मित नियम पाळावे लागतातच. उद्यांच्या सौख्यासाठीं आजच्या सौख्याकडे दुर्लक्ष करावयाचे या प्रकारची देखील क्रिया अवश्य होते आणि या दृष्टीनें कामशास्त्रविषयक नियमांचा निर्मिती झाली आहे, होत आहे व तें शास्त्र जसें विकसेल तशी अधिकाधिक होत जाईल, व प्रजाजनन आणि संततिसातत्य या दोन गोष्टी जर एखाद्या लोकांचें कामशास्त्र साध्य करूं शकलें नाहीं तर त्याचें कामशास्त्र कच्चें ठरलें असें म्हणावें लागेल. स्त्रीपुरुषसंयोगक्रिया ही खरोखर स्वार्थत्यागात्मक आहे ही गोष्ट जीविशास्त्रज्ञांस मान्य आहे. अनेक प्राणिजातींत संयोगानंतर पुल्लिंगीपक्ष मृत्यू पावतो. संभोगापासून जें सौख्य मिळतें तें जननोत्पादक परिश्रम सुलभ व सुखावह करण्यासाठीं आहे आणि कामशास्त्र अर्थात् तीच क्रिया अधिक यशस्वी तऱ्हेनें करतां यावी यासाठीं आहे.

स्त्रीपुरुष संयोग घडून यावा व जातिसातत्य राहावें यासाठीं निसर्गाचीच कृति म्हटली म्हणजे संयोग सुखावह करणें होय, आणि मानवाची कला अगर कलेच्या मागें असलेलें शास्त्रज्ञान हें निसर्गाचाच संकल्प अधिक परिणामकारी करण्यासाठीं आहे ही गोष्ट लक्षांत घेतली असतां कामशास्त्राचें एकंदर जिविशास्त्रांत स्थान काय आहे हें लक्षांत येईल. प्रजासातत्य रहावें म्हणून प्रत्येक जातींत आपापल्या अनुभवानें संयोगविषयक नियम केलेले आढळतात. लग्नें केव्हां करावींत, किती जवळच्या आप्तांमध्ये विवाह वगळावेत, रजस्वलेपासून दूर असावें कीं नसावें. दूर असावें असें असल्यास किती दिवस दूर असावें, या सारख्या प्रश्नावर भिन्नभिन्न नियम आढळून येतात. हे सर्व नियम मिळून त्या जातीचें कामशास्त्र तयार होतें, आणि त्या कामशास्त्राचा पुढें धर्मशास्त्रांत संग्रह होतो. आणि पुढें ते धार्मिक नियम म्हणूनच समाज ओळखूं लागतो. प्रत्येक जातींत आणि राष्ट्रांत कांहीं विशिष्ट मर्यादेंत कामशास्त्राचा विकास होऊन तो विकास धर्मशास्त्राचा भाग म्हणून स्वीकारला जातो तेव्हा त्याला कामशास्त्रांतर्गत धर्मशास्त्र किंवा धर्मशास्त्रांतर्गत अगर समाजशास्त्रांतर्गत कामशास्त्र असें म्हणावें लागेल.

७. कामशास्त्रामध्यें वैयक्तिक कामशास्त्र आणि सामाजिक कामशास्त्र असे दोन भेद केले पाहिजेत. सामाजिक कामशास्त्राचा हेतु काममूलक सामाजिक सौख्य समाजांत चांगल्या तऱ्हेनें प्रसृत व्हावें व अधिकाधिक व्यक्तीस तें लाभावें हा होय. सुप्रजाजनन-शास्त्र हें एक सामाजिक शास्त्र आहे, व तें कामशास्त्राला स्पर्श करून जाणारें आहे, पण तें कामशास्त्र नव्हे. सामाजिक कामशास्त्रकार आणि सुप्रजाजननशास्त्रकार यांचे हेतु एकच असतील असें नाहीं. सुप्रजाजननशास्त्रकार पुढच्या पिढीच्या फिकिरींत असतात. भावी प्रजा चांगली व्हावी यासाठी आजच्या प्रजेला सल्ला देणें व ती क्रिया साध्य होण्यासाठीं

उपाय अंमलांत आणणें ही गोष्ट श्रेयस्कर आहे यांत शंका नाहीं; तथापि आजच्या पिढीला देखील आयुष्यक्रम आहे ही गोष्ट विसरून चालावयाचे नाहीं. कामशास्त्र हे भविष्यकालाकरिता; त्याचप्रमाणें वर्तमानकालासाठीं देखील लागणारें शास्त्र आहे. सुप्रजाजननशास्त्रज्ञ सांगतील कीं, अमुक लोक प्रजाजननास अयोग्य आहेत; असतील कदाचित्; तथापि त्यांनादेखील काममूलक आयुष्यक्रम आहे कीं नाहीं, असल्यास त्याचें नियंत्रण कसें व कितपत करावयाचें ? सामाजिक आयुष्यक्रमाच्या आचरणामध्यें सर्वलोकसौख्यवर्धन कसें साधावयाचे इत्यादि विचार सामाजिक कामशास्त्रांत अवश्य आहेत. व्यक्ति आणि आधुनिक वर्ग विसरून जीं धर्मशास्त्रें तयार होतात तीं सर्व शंकनीय आहेत. धर्मशास्त्रकार असें सांगतील कीं, ब्राह्मणादि जातींनीं आपलें आचरण ब्राह्मणेतर जातीपेक्षा श्रेष्ठ दिसावें यासाठीं आपल्या विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाची मोकळीक ठेवूं नये. हा जातिविषयक निर्बंध त्या जातीची एकंदर समाजांत उच्चता रहावी एवढ्याच दृष्टीनें झाला; तथापि सामाजिक कामशास्त्रज्ञ असें म्हणतील कीं, या नियमामुळें एका मोठ्या वर्गाची फार हानी होत आहे, आणि ती हानी पत्करून जातीची प्रतिष्ठा या लाभाशीं तुलना करतां हानीच फार मोठी आहे. अर्थात् धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र या गोष्टींना ज्याप्रमाणें सामाजिक बाजू आहे त्याप्रमाणेंच कामशास्त्रास देखील सामाजिक बाजू आहे, आणि तिकडे दुर्लक्ष होतां कामा नये.

८. अर्वाचीनकालीं युरोपामध्यें कामशास्त्राकडे जी दृष्टी जाऊ लागली आहे ती किती अर्वाचीन आहे हें थोडक्या गोष्टीवरून दृष्टीस येतें. हॅव्हलॉक एलिस यानें “ सायकॉलॉजी ऑफ सेक्स ” या नावाचें जें पुस्तक लिहिलें त्या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या वेळेस त्याला बराच त्रास झाला. मी अमेरिकेंत विद्यार्थी असतांना देखील हे एलिसचे ग्रंथ उघडपणें लायब्ऱ्यांमध्यें ठेवित नसत, व वाटेल त्यास द्यावयाचे असा प्रकार नव्हता; तर कांहीं नियमित अभ्यासकांपुरतीच हीं पुस्तकें ठेवावीं अशी प्रवृत्ति या युनिव्हर्सिट्यांत होती. कार्नेल युनिव्हर्सिटींत वात्स्यायनाचें ‘ कामसूत्र ’ देखील बंद पेटींत ( Locked-Press ) ठेवलें होतें, व जेव्हां जरूर लागलें तेव्हां तें पुस्तक मला कां पाहिजे हें लायब्रेरियननें माझ्याकडून लिहून घेतलें. ब्रिटिश म्युझियममध्यें देखील असलीं पुस्तकें वाचूं देण्याविषयीं बराच निर्बंध आहे, तथापि युरोपच्या द्वीपकल्पभागांत जननेंद्रियशास्त्रासंबंधानें व तदंतर्गत मानसशास्त्रासंबंधानें अधिक शास्त्रीय दृष्टी बाळगण्यांत येते. “ सायकॉलॉजी ऑफ सेक्स ” हा विषय एकाच व्यक्तीनें शिकवावा एवढा व्यापक राहिला नाहीं; तर या विषयाचे देखील पोटभाग पाडिले गेले आहेत. आणि अल्पवयी मुलांतील ‘ ऐंद्रियविषयक मानसशास्त्र ’ ( Sexual Psychology of Children ) यासारख्या विषयावर युनिव्हर्सिटीतर्फे व्याख्यानें होत, आणि त्या व्याख्यानसमुच्चयाचा अभ्यास शिक्षकांना अवश्य समजला जाई ! शिक्षकांना ज्या मुलांचें शिक्षण संगोपन करावयाचें त्या मुलांचें मन पूर्णत्वानें समजलें पाहिजे. ही गोष्ट ज्यांस समजेल त्यांना या प्रकारच्या अभ्यासक्रमास

शिक्षणसंस्थांनीं स्थान देणें किती अवश्य आहे हें पटल्याशिवाय राहणार नाहीं. सौ. शीलवती केतकर यांनीं, त्या शिक्षक असतां, त्या पेशाला उपयुक्त म्हणून येना ( yena ) विद्यापिठांत हा अभ्यासक्रम अभ्यासला होता.

९. समाजानें लोकांच्या कामेच्छातृप्तीची सोय राजरोस करावी काय हा एक प्रश्न आहे. यासंबंधानें हिंदुस्थानांत प्राचीन भारतीयांचें मत अव्वल इंग्रजांच्या माताहून भिन्न प्रकारचें आहे. हिंदुसमाजाप्रमाणें अनेक बाबतींत इंग्रज लोकांची ही वृत्ति अशीच आहे, आणि ती म्हटली म्हणजे अनेक अनिष्ट वाटणाऱ्या गोष्टींचा शास्त्रीय दृष्टीनें विचार न करतां जें होईल तें होऊं दे अशी चालढकल करीत राहण्याची आहे. या तऱ्हेची वृत्ति विचार भिरुत्वाची द्योतक आहे. जुन्या तऱ्हेच्या विचारापासून आपण च्युत होऊं लागलों तर नवीन तऱ्हेचे विचार त्यांचा अंत न लागल्यामुळें आपणांस भोंवळ आणतील या भावनेनें प्रेरित होऊन विचार बंद करण्याची प्रवृत्ति ज्या लोकांत दिसते त्या लोकांप्रमाणेंच इंग्रज समाजाचे आजचे स्त्रीपुरुषसंबंधविचाराविषयींचें वर्तन दिसतें. उघड्या डोळ्यांनीं जुन्या परंपरागत आलेल्या नियमांत फेरबदल करावयाचा नाहीं, ते नियम असह्य होण्यामुळें जे दुष्परिणाम होतात ते जर कोणी दाखवूं लागले तर डोळे मिटावयाचे या प्रकारची वृत्ति सामान्यांत असणें गैर नाहीं; कारण सामान्यांना बुद्धिभेद नको असतो; तथापि समाजांत जे विचार करणारे लोक आहेत, आणि विशेषेकरून न्यायदानाचें काम किंवा कायदे करण्याचें काम ज्यांच्यावर येऊन पडतें त्यांना ही घट्ट डोळे मिटण्याची वृत्ति मुळींच श्रेयस्कर नाहीं. समाजामध्यें विवाहक्षमता व्यक्तीस येण्यास त्याची आर्थिक स्थिति चांगल्या प्रकारची लागते, आणि त्याच्या कामभावना अगोदरच जागृत होतात; तर या मधल्या काळांत काय करावयाचें ? संयमनवृत्ति बाळगावी हे ध्येय चांगलें असेल, पण तें सर्वांस शक्य होत नाहीं, आणि त्यामुळेंच अनेक लोकांस आर्थिक कारणामुळें घर सोडून दूरवर जावें लागतें. अशा परिस्थितीमध्यें या गोष्टी अजिबात होऊं नयेत असें म्हटल्यानें थांबतात असें नाहीं. तर या परिस्थितीमध्यें जो वेश्याव्यवसाय चालू होतो तो आजपर्यंत कोणतेंही राज्य बंद करूं शकलें नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें समाजानें काय दृष्टि ठेवावी हा प्रश्न खरोखरच विचारपूर्वक सोडविला पाहिजे. धर्म या शब्दाचा अर्थ काय तर ज्या गोष्टी स्वाभाविकपणें घडतात त्याच गोष्टींना योग्यायोग्यतेच्या नियमांनीं बद्ध करणें. स्वाभाविक गोष्टीचें उन्मूलन धर्मशास्त्रास किंवा कायदेपद्धतीस शक्य नसतें तर शक्याशक्य गोष्टीचा विचार करून पद्धति बसविणें हेंच धर्मशास्त्राचें कार्य होय. धर्मशास्त्राचा हेतू स्वाभाविक गोष्टीचें उन्मूलन करणें हा नसून नियम करणें हा आहे. तर यासाठीं समाजानें वेश्याविषयक प्रश्नाकडे, त्या समाजाची एक गरज आहे या दृष्टीनें, पाहून त्यांच्या एकंदर व्यवहाराचें नियमन करणें हीच गोष्ट समाजाच्या अंतिम हिताची होईल असें वाटतें. प्राचीन भारतीयांची वृत्ति वेश्याव्यवसाय मान्य करून त्यालाही लागणारे कायदे करावे अशा प्रकारची होती. जपानची वृत्ति वेश्याव्यवसाय ही एक उत्पन्नाची बाब म्हणून तो व्यवसाय

राष्ट्रानें स्वतः करावा अशा प्रकारची आहे; आणि अर्वाचीन युरोपांत वेश्यावर्ग निराळा न करतां स्त्रीपुरुष व्यवहार अधिक स्वेच्छाचारयुक्त करावा या प्रकारची आहे. अर्वाचीन रशियामध्यें या स्वेच्छाचारास कोणत्याही तऱ्हेचा आळा नसावा या तऱ्हेची परिस्थिति निर्माण झाली आहे. याविषयीं चांगला मार्ग कोणता आणि वाईट मार्ग कोणता यासंबंधी अधिक विवेचनांत आपणांस पडण्यांत फायदा नाहीं. समाजाचें स्थित्यंतर होतें तें समाजांतच असलेल्या पूर्वकालीन प्रवृत्तीचा परिणाम होत होतें. समाजाचा आयुष्यक्रम पूर्वीच्या आयुष्यक्रमापासून एकदम निराळा होत नाहीं; आणि यासाठी समाजांत होणारे फरक पाहात राहून त्यांत योग्य गोष्टी कोणत्या व अयोग्य गोष्टी कोणत्या याचें नियमन करण्यांतच प्रत्येक समाजाचा विकास होत जाईल.

१०. हिंदुस्थान हें अत्यंत मोठें असें खंड आहे. यातील जनता सामाजिक शासनाच्या दृष्टीनें भिन्न भिन्न स्थितींत आहे. जातीच्या पंचायतीच्या नियमानें अर्धाअधिक समाज बद्ध आहे, तर अर्ध्या अधिक समाजावर सरकारी नियंत्रणाखेरीज कोणतेंही नियंत्रण नाहीं. लोकमत देखील बऱ्याच अंशीं जात्यनुसारी आहे.

११. हिंदुस्थानचें सरकार ज्या अर्थी अजून लोकविचारानींच बद्ध झालें नाहीं तोपर्यंत समाजांतील विचारही नपुंसकच राहणार. जो सामाजिक विचार समाजाचें नियमन करूं शकत नाहीं तो सामाजिक विचार देखील नपुंसकच होय. सामाजिक आयुष्यक्रमासंबंधानें कायदे करण्याचें स्वातंत्र्य, सत्ता हातांत घेऊन बसलेले इंग्रज, हिंदी लोकांच्या प्रतिनिधींना द्यावयास तयार नाहींत तोपर्यंत नपुंसकच राहणार. आपण सामाजिक बाबतींत लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देत आहोंत असें ते दाखवितात; पण जोपर्यंत संपूर्ण समाजशासन लोकांच्या हातीं आलें नाहीं तोपर्यंत एकांगीं दिलेले अधिकार कोणत्याही तऱ्हेनें उपयोगी पडत नाहींत. उदाहरणार्थ, बऱ्याच इस्टेटवाल्या स्त्रियांचे पालकत्व सरकारकडे जातें; आणि त्या स्त्रियांची लग्नें लावून देणें हें देखील सरकारचें कर्तव्य होऊन बसतें. अशा प्रसंगीं उदार कायद्याला समाजानें परवानगी देणें म्हणजे आपणांस जबाबदार नसलेले सरकार ज्याचे पालक आहे अशा अज्ञानांचें भवितव्य बिघडविण्याची संधि सरकारला देणें आहे असेंच लोकांना वाटेल. नामदार बसू यांना विरोध करणाऱ्या लोकांमध्यें विवाहविषयक स्वातंत्र्य हवें असें मानणारा वर्ग देखील त्यांच्या विरुद्ध गेला त्याचें हें एक कारण होतें. स्त्रियांच्यामुळें समाजांत बखेडे उत्पन्न होतात. स्त्रियांना पळविणारे गुंड देखील समाजांत असतात. आणि पुष्कळदां असे गुंड सरकारी अधिकाऱ्यांच्या आश्रयानें असतात. ही स्थिति ज्या समाजात आहे त्या समाजांतील लोकांस स्त्रियांचें लग्नाचें वय वाढवूं इच्छिणारा कायदा देखील समाजांत येऊं देणें हें एक विघ्नच वाटेल. स्वातंत्र्य अर्थात् एकांगीं कधींच चालूं शकत नाहीं. तें जेव्हां पूर्ण होईल तेव्हांच सामाजिक कायदे करण्यास लोकांस धैर्य उत्पन्न होईल. आजच्या स्थितींत कांहीं अन्य हेतु मनांत ठेवणाऱ्या किंवा आपल्या सुधारणा पुरतीच

जाहिरात करूं इच्छिणाऱ्या व्यक्तीशिवाय इतरांची सामाजिक कायदे करण्याकडे देखील प्रवृत्ति होणार नाहीं. आणि त्यामुळें लोकांच्या मनांत जे सामाजिक विचार येतील ते विचार नपुंसकच राहणार असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१२. तथापि राजकीय स्थित्यंतराचा काळ जवळ आहे, आणि लोकांस आपल्या भवितव्याचें नियमन करण्याची शक्ति स्वतंत्र राष्ट्राइतकी येण्याचा काल म्हणजे राष्ट्र-स्वातंत्र्याचा काल माझ्या दृष्टीच्या टप्प्यापलिकडचा नाहीं; आणि त्यावरून असें वाटतें कीं, जेव्हां संपूर्ण स्वातंत्र्य आपण प्राप्त करून घेऊं तोपर्यंत समाजामध्यें समाजशास्त्रज्ञांचाही वर्ग वाढेल आणि आपलें सामाजिक भवितव्य इष्ट करण्यासाठीं यशस्वी प्रयत्नही करण्यांत येतील. त्याप्रमाणें आपला समाज प्रयत्न करूं लागला म्हणजे तो अर्थशास्त्राप्रमाणें कामशास्त्राची देखील मदत भवितव्याच्या नियमनास घेईल.

१३. प्रस्तुत ग्रंथकाराचा प्रयत्न प्राचीन भारतीय कामशास्त्र आणि अर्वाचीन पाश्चात्य कामशास्त्र यांचें एकीकरण करण्याचा आहे. या हेतुसारखा महत्त्वाकांक्षी हेतु ग्रंथकाराच्या मनांत असतां कृति यापेक्षां खरोखर बरीच मोठी व्हावयास पाहिजे होती; तथापि समाजांत प्रगति करूं इच्छिणारांना समाजाच्या अपेक्षांच्या पलिकडे फारसें जाता येत नाहीं. समाजांत या अभ्यासक्षेत्राविषयीं थोडीशी तिरस्कारबुद्धि आहे ती दूर झाली पाहिजे, व समाजाच्या या मानसिक परिस्थितींत लेखकाचे प्रयत्न देखील मर्यादितच होणार ही गोष्ट निर्विवाद आहे. या प्रकारचें वाङ्मय बहुजन समाज त्याज्य मानतो असें नाहीं, तथापि कामशास्त्रीय प्रयत्नास विरोध करून आपल्या सभ्यपणाची जाहिरात करूं इच्छिणारा ज्या प्रकारचा वर्ग समाजांत आहे त्या प्रकारच्या वर्गाच्या कोलाहलानें सामान्य वाचकांची दिशाभूल होऊन या क्षेत्रांतील शास्त्रीय वाङ्मयाच्या निर्मितीस अवरोध होत असतो; आणि यासाठीं जी कांहीं प्रस्तावना लिहावयाची ती विषय गौरवासाठींच लिहिली आहे.

[ वात्स्यायन यांच्या ‘ रतिशास्त्र मीमांसा ‘ या पुस्तकाची प्रस्तावना पृ. १ ते १० १९३४ ‘ काव्यशास्त्रविनोद ग्रंथमाला,’ धोंडो तुकाराम तोंडवळकर, कोल्हापूर. ]

# २१ स्त्रियांचें वाङ्मय आणि स्त्रियांच्या चळवळी

आपल्याकडे स्त्रियांसाठीं नियतकालिकें अजून तयार झाली नाहींत. स्त्रीवाचक म्हणून कोणी व्यक्ति आहे याची जाणीव आमच्या वर्तमानपत्रकर्त्यांस आणि मासिकांस होत नाहीं. गोष्टींचीं मासिकें हीं स्त्रियांसाठीं मासिकें म्हणून समजलीं जातात. जणूं काय बायकांनीं केवळ गोष्टीच वाचाव्यात, आणि गोष्टींची मासिकें पुरुषवर्ग वाचीतच नाहीं. सौ. अवंतिकाबाई गोखले यांचें पत्र वगळतां स्त्रियांसंबंधानें खऱ्या सामाजिक व राजकीय वाङ्मयास जन्मच झाला नाहीं, असें मी म्हणेन. वाङ्मय एकाकी जन्मास येत नाहीं. एकंदर सामाजिक आणि राजकीय विकासाचा वाङ्मय हा एक भाग आहे आणि यासाठीं स्त्रियांच्या वाङ्मयाकडे त्यांच्या बौद्धिक व राजकीय विकासाचा भाग या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. स्त्रियांकरितां चळवळी आज बऱ्याच अंशीं पुरुषच करीत आहेत. स्त्रियांसाठी स्त्रिया चळवळी करूं लागल्या नाहींत. त्यामुळें स्त्रियांचें खरें वाङ्मय पैदा होऊं लागलें नाहीं. कांहीं दिवसामागें साधारणपणें असा नियम होता कीं, स्त्रियांनीं सामाजिक परिषदांतून बोलावयाचें किंवा मासिकांतून लिहावयाचें म्हणजे तें केवळ स्त्री-शिक्षण व पुनर्विवाह याच विषयांवर. जणूं काय स्त्रियांनीं दुसऱ्या कोणत्या विषयावर बोलूंच नये. स्त्रियांच्या विचारांचे क्षेत्रनियमन याप्रमाणें पुरुष करीत होते. पुण्याला प्रागतिकांची राष्ट्रीय परिषद एका वर्षापूर्वीं भरली होती तेथें स्त्रियांनीं संमति वयाच्या कायद्यावर बोलावें अशी योजना केली होती ! म्हणजे या विषयावर बोलण्यास स्त्रिया केवळ स्त्रिया म्हणूनच लायक आहेत. स्त्रियांनीं कोणत्या विषयावर बोलावें, कोणत्या विषयावर लिहावें यासंबंधानें पूर्वतयारी पुरुषांनी करून स्त्रियांना आपल्या हातांतील हत्यार म्हणून वापरण्याची चाल पुण्यांतल्या गेल्या पिढींतल्या सुधारकांनीं पाडली आहे. ती लवकरच नष्ट झाली पाहिजे, आणि आपली चळवळ स्त्रियांनीं पुरुषांवर न विश्वासतां स्वतः हातांत घेतली पाहिजे. स्त्रियांच्या सामाजिक परिषदांतून जी पुरुषांशीं थोडीबहुत सहकारिता दिसते तींत एक मौजेचा प्रकार दिसतो तो असा कीं चांगलें शिक्षण झालेल्या स्त्रिया समाजांत आतां बऱ्याच झाल्या आहेत. तरी स्त्रियांसंबंधाच्या प्रश्नांवर अर्धशिक्षित बायकाच बोलतांना दिसतात. महाराष्ट्रांत ४०–५० डॉक्टरणी, ४००–५०० मास्तरणी व तितक्याच शिकलेल्या सुईणी आहेत. असें असतां स्त्रियांच्या चळवळींत विशेषतः भाग घेणाऱ्या कोण तर तमक्या चळवळ्या वकीलाची पढवून तयार केलेली बायको. एवंच

स्त्रियांची चळवळ स्त्रियांच्या हातीं नाहीं. प्रसंगीं असाहि अनुभव पुरुषांना येतो कीं, स्त्रियांची सध्यांची चळवळ म्हणजे कांहीं मतलबी पुरुषांना आपली तुतारी फुंकण्यासाठीं स्त्रियांचा उपयोग करून घेण्यापुरती आहे एवढेंच. या प्रकारचें परावलंबन आजच्या महाराष्ट्रांतील सुशिक्षित स्त्रीवर्गास खरोखरच लाज उत्पन्न करणारें आहे. महाराष्ट्रांतील स्त्रियांनीं धैर्यानें पुढें जाऊन आतां आपली चळवळ आपल्या हातीं घेतली पाहिजे. त्यांनीं आपल्या उन्नतीविषयीं स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे. त्यांच्या उन्नतीसाठीं करावयाच्या परिश्रमाचा बोजा पुरुषांवरच कमी कमी करीत व स्वतः पत्करीत गेलें पाहिजे. त्यांच्यामध्यें व्यावसायिक विविधता सध्या बरीच आहे व ती वाढतहि आहे. आतां पुण्याच्या कायद्याच्या शाळेंत देखील मुली दिसूं लागल्या आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. आतां स्त्रियांची स्थिति सुधारण्यासाठीं कायद्यांत काय दुरुस्त्या करावयाच्या हें स्त्रियांनींच सुचविलें पाहिजे. स्त्रियांनीं आपलें डोकें सामाजिक प्रश्नांत घातलें तर समाजसुधारणेची उपयुक्त पुरवणी करण्याचें श्रेय त्यांना मिळेल. स्त्रियांस स्त्रियांच्या कैवारी पुरुषांवर पूर्णपणें विसंबता येणार नाहीं. स्त्रियांची व पुरुषांची दृष्टि नेहमीं एकच असेल असें नाहीं व पुरुष स्त्रियांचे कैवारी असले तरी त्यांच्या स्त्रियांनीं काय करावें यासंबंधाच्या त्यांच्या कल्पनांस पुष्कळच मर्यादा असणार हें सुशिक्षित स्त्रियांनीं पक्कें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. मुलानें काय करावें यासंबंधानें बापाच्या व मुलाच्या विचारांत जसा फरक असतो तसाच स्त्रियांनीं काय करावें व सामाजिक आयुष्यक्रमांत स्त्रियांना कोणतें स्थान असावें याविषयीं फरक असणार. देशाच्या उन्नतिक्रमांत आम्हांस स्वतंत्र विचाराच्या स्त्रिया पाहिजेत. स्त्रियांचे कैवारी जे पुरुष असतील त्यांच्या मतास हो करणाऱ्याच स्त्रिया नको आहेत. त्यांनीं स्वतंत्रपणें विचार करण्याचा व चळवळ करण्याचा उपक्रम केला नाहीं तर स्त्रीशिक्षणाचें सार्थक झालें नाहीं असें मी समजेन. स्त्रियांनीं केवळ स्त्रियां-संबंधाच्याच प्रश्नांत लक्ष घालावें असें नाहीं— त्यांनीं अनेक व्यापक सामाजिक प्रश्नांकडे पाहिलें पाहिजे. समाजापुढें येणाऱ्या प्रत्येक प्रश्नांवर विचार करणाऱ्या स्त्रिया आमच्यांत असल्या पाहिजेत. व तशा असल्या तरच त्यांस जे राजकीय हक्क मिळाले आहेत त्यांचे समर्थन होईल.

मुंबई इलाख्यांत व मद्रास इलाख्यांत स्त्रियांना मताचे अधिकार फाजील लवकर मिळालें, त्यांनां त्याबद्दल संग्राम करावा लागला नाहीं; ही गोष्ट बरी झाली असें मला वाटत नाहीं; या सहज लाभामुळें स्त्रियांना स्वतः कांहीं एक तयारी करावी लागली नाही. स्त्रियांच्या चळवळीचे किंवा तयारीचे द्योतक ते अधिकार खास नाहींत. त्यांनीं हे अधिकार जरा भांडून मिळवले असते तर अधिक बरें झालें असतें. त्यांत आपलें संख्याबल वाढविण्यासाठीं व परिणामकारी करण्यासाठीं सुशिक्षित व कामकरी स्त्रियांची संघटना करावी लागली असती व ती संघटना व सार्वजनिक काम करण्याची संवय हे देशाचे कायमचे फायदे झाले असते. कागदी अधिकारापेक्षां समाजांत जागरूकता अधिक अवश्य

आहे. ती जागरूकता उत्पन्न करण्यास कांहीं तरी रस्त्यांत अडचण असावी लागते व ती अडचण भासणारांनीं स्वप्रयत्नानें दूर केली तरच त्यामुळें समाजविकास होत जातो. आज स्त्रियांमध्यें राजकीय जागृति मुळींच नाहीं. राजकीय प्रश्नांचा खल करणाऱ्या संस्था पुण्यामध्येंही मुळींच नाहींत. सुशिक्षित स्त्रीवर्गामध्यें कामकरी स्त्रियांसंबंधानें आपलेपणा वाटत नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यासंबंधानें जिज्ञासाहि वाटत नाहीं. सुशिक्षित स्त्रियांनीं आज स्त्रियांच्या आर्थिक व नैतिक उन्नतीचा प्रश्न विचारास घेतलाच पाहिजे. स्त्रीशिक्षणाचें ध्येय, स्त्रियांना पुरुषांना आवडेल असा गोड घांस कसा बनवावा एवढेंच खास नाहीं. त्या नागरिक आहेत आणि त्यांच्यामध्यें उच्च नागरिकास शोभतील असे गुण उत्पन्न झाले पाहिजेत. स्त्रियांमध्यें आत्मविश्वास उत्पन्न होऊन त्यांनीं चळवळ करावी हें जसें अवश्य आहे तसेंच पुरुषांनीं स्त्रियांस त्यांच्या गुणावगुणांबद्दल जबाबदार धरण्याची वृत्तीहि समाजांत वाढली पाहिजे. अलीकडे कांहीं स्त्रियांच्या व पुरुषांच्या अयोग्य संबंधाचीं उदाहरणें झालीं व त्या प्रकरणांतील स्त्रिया कॉलेजांतील शिक्षण झालेल्याहि होत्या. एका स्त्रीस लग्न झाल्यानंतर महिन्या दीड महिन्यांनी मूल झालें. दुसरी एक सुशिक्षित स्त्री एका मनुष्याची पहिली बायको असतां त्याची दुसरी बायको झाली. पण दोन्ही प्रसंगीं टीकेचा वर्षाव पुरुषांवरच झाला. यावरून सुशिक्षित स्त्रियांसहि त्या जबाबदार व्यक्ती आहेत असें पुरुष धरीत नाहींत असें दिसतें. स्त्रियांनीं जर थोडेंसें कांहीं केलें तर त्याची टिमकी करण्याची प्रवृत्ति बंद झाली पाहिजे. स्त्रियांविषयीं दाक्षिण्य नसावें असें मुळींच नाहीं. पण फाजील कौतुक करण्याच्या प्रवृत्तीचें आतां कांहीं कारण नाहीं. वर्तमानपत्रकारांनीं स्त्रियांचे लेख म्हणजे मग ते गचाळ असले तरी घ्यावयाचे ही प्रवृत्ति सोडून दिली पाहिजे. स्त्रिया व पुरुष यांच्याविषयीं संमति बाळगावयाची म्हणजे जे कठोर नियम पुरुषांस लावावयाचे तेंच स्त्रियांसहि लावायचे. असें केल्यानेंच स्त्रियांनीं अधिक परिश्रम करण्यांस चेतना उत्पन्न होईल आणि स्त्रियांच्या कार्यक्षमतेचा विकास होईल.

स्त्रियांनी कांहीं थोडें जरी केलें तरी त्याचें कौतुक करण्यानें त्यांच्या संबंधानें आपल्या अपेक्षा मुद्दाम अल्प करणें आहे. आजच्या सुशिक्षित स्त्रियांचें सार्वजनिक आयुष्यक्रमांत दिसून येणारें आलस्य पाहून कांहीं तरी व्यक्तीस खेद वाटला पाहिजे. आज मध्यमवर्गांतील स्त्रियांनीं अविवाहित किंवा वैधव्यदशेंत असतां द्रव्यार्जनाच्या बाबतींत अधिकाधिक पुढाकार घेतला पाहिजे. म्हणून स्त्रियांमध्यें चळवळ पाहिजे. त्यांनीं या बाबतींत कुणब्यांच्या स्त्रियांइतकी तरी कर्तव्यतत्परता दाखविली पाहिजे. घरांतल्या अठरा वर्षांच्या मुलाला कुटुंबसंरक्षणासाठीं कामाला जावें लागतें पण त्याच घरांतली त्याची थोरली वीस वर्षांची अविवाहित बहिण मात्र घरीं बसून असते अशीं उदाहरणें आज आपल्यापुढें दिसत नाहींत काय? स्त्रियांना आज बाहेर जाऊन काम करण्यास खऱ्या अडचणी काय आहेत व काल्पनिक किती आहेत यांचा विचार केला पाहिजे. स्त्रियांनीं आर्थिक व्यवहारांत आपलें योग्य स्थान मिळविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय इतर प्रकारची

उन्नति मर्यादितच होणार ही गोष्ट नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. स्त्रियांच्या वर्तमानपत्रांनी यासंबंधानें चळवळ विशेष केली पाहिजे; व चालू परिस्थितींतल्या ज्या दोषांमुळें स्त्रियांना भाकरी मिळविण्याच्या परिश्रमांत अडचणी उत्पन्न होऊन परावलंबन पत्करावें लागतें त्या अडचणी दूर करण्यासाठीहि लोकमत तयार केलें पाहिजे. स्त्रियांचें पुढारीपण आजच्या सुशिक्षित स्त्रियांनी केल्याशिवाय स्त्रियासंबंधाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नास इष्ट दिशा लागणार नाहीं. वाङ्मयहि कनिष्ठ स्वरूपांतच राहील.

स्त्रियांनीं आपल्या चळवळींत मुख्य चळवळ अशाकरतां करावी कीं स्त्रियांस मोकळेपणानें हिंडण्यास निर्भयता उत्पन्न होईल अशी समाजाची स्थिति बनावी. ही निर्भयता त्यांच्या आर्थिक उन्नतीस अत्यंत अवश्य आहे. ही चळवळ जर स्त्रिया करणार नाहींत तर त्या आपली आर्थिक स्थिति हीन ठेवतील एवढेंच नव्हे तर शासनसंस्था स्त्रीसंरक्षणास दुर्बल ठेवण्याचें आणि पुरुषवर्गास सदाचाराचें शिक्षण न देण्याचें पाप त्यांसच लागणार आहे. स्त्रियांचे हक्क आज बरेचसे नकली आहेत हे त्यांनी विसरता कामा नये. जे नकली आहेत ते त्यांनीं खरोखरीचे केले पाहिजेत. आज स्त्रियांना राजकारणांतील मनुष्याची पात्रापात्रता पाहून मत देतां येतें, पण आज एकवीस वर्षांच्या अविवाहित तरुणीस पुरुषांची ओळख करून घेण्याचें स्वातंत्र्य आहे काय? जोंपर्यंत स्त्रियांना मोकळेपणानें हिंडता येणार नाहीं तोंपर्यंत स्त्रियांची आर्थिक स्थिति निकृष्टच रहाणार आणि त्यांचा एकंदर समाजाला उपयोग कमी होणार. म्हणजे स्वतःचें स्वातंत्र्य वाढवीत नेणें हें त्यांचें महत्त्वाचें राष्ट्रीय कर्तव्य होय. स्त्रियांनीं आत्मसंरक्षणाची जबाबदारी स्वतःवर घेऊन आपला शिक्षणक्रम बनविला पाहिजे. इंग्लंडमध्यें चांगले पोलीस आणि समाजांतील दाक्षिण्य या गोष्टी स्त्रियांस अनुकूल असूनहि दांडपट्टा व जिऊजित्सू ( जपानी मल्लविद्या) यांचें शिक्षण स्त्रियांमध्यें वाढविण्याची खटपट चालूच आहे. आपल्या स्त्रियांच्या संरक्षणासाठी पडदापद्धती न वापरतां स्त्रियांस ठोसे देण्याचें शिक्षण दिलें पाहिजे, म्हणूनहि वाटल्यास स्त्रियांनीं खटपट करावी. स्त्री एकटी असतां तिच्यावर कोणी हात टाकला तर मदत मिळेपर्यंत तिनें स्वसंरक्षण करावें इतपत तरी शिक्षण त्यांस पाहिजे. स्त्रियांचें कर्तव्य स्त्रियांसंबंधानें चळवळ करून संपावयाचें नाहीं. लहान मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न स्त्रियांनींच विचारास घेतला पाहिजे. शिवाय समाजांत नीतिमत्ता अधिक असावी म्हणून जे जे प्रयत्न व्हावयाचे त्यांत स्त्रियांनीं पुरुषांबरोबर सहकार्य केलें पाहिजे. शिवाय त्यांनीं हेंहि लक्षांत ठेवले पाहिजे कीं भारतीयांस जगांत जो कमीपणा येतो त्याचें कारण एकटे पुरुष नसून स्त्रियाहि आहेत. जोपर्यंत स्त्रियांच्या मोकळेपणाच्या अभावामुळें पुरुषांच्या रहाणींत व चालीरीतींत उद्धटपणा आहे, तोपर्यंत हिंदु हा युरोपीयांस आपल्या बरोबरीचा वाटणार नाहीं. आपल्यामध्यें स्वच्छता अधिकाधिक वाढावी हें ध्येय पार पाडण्यास पुरुषांकडून परिश्रम फारसे होणार नाहींत व झाले तर ते परिणामकारी होणार नाहींत यासाठी तिकडे स्त्रियांनींच लक्ष्य दिलें पाहिजे. हिंदुस्थानचे लोक यूरोपीयन लोकांना आपल्या

वस्तींत नकोत याचें कारण केवळ राजकीय नाहीं. याचें जें कारण आहे तें दूर करण्यास स्त्रियांचेच परिश्रम अधिक फलदायी होतील. यासाठीं हिंदुस्थानी लोकांस उच्च प्रकारचे नागरिक बनविण्यासाठीं स्त्रियांमध्यें जोराची चळवळ पाहिजे हें कोणीहि कबूल करील. तुर्कांसंबंधी इतर यूरोपीयांत आज आदर वाटत आहे याचें कारण त्यांच्या स्त्रियांना अधिकाधिक समता मिळत आहे हें नाहीं काय ? ही समता मिळविण्याच्या बाबतींत स्त्रियांनीं गेली पन्नास वर्षें पुष्कळच खटपट केली आहे. भारतीय स्त्रियांनीं तशी खटपट केल्यानें एकंदर भारतीय जनतेचा दर्जा वाढणार आहे. स्त्रियांच्या कर्तव्याचें पूर्ण स्वरूप येथें देण्यास अवकाश नाहीं. एवढेंच येथें सांगतां येईल कीं, नागरिक म्हणून पुरुषांचें जें जें कर्तव्य आहे त्यांत स्त्रियांचाहि भाग आहे. तें कर्तव्य पुरुषांकडून स्त्रियांच्या सुशिक्षित सहकारितेशिवाय पार पडणार नाहीं. स्त्रियांना आपल्या कर्तव्याचें अत्यंत व्यापक स्वरूप समजूं लागले तर त्यांच्यासाठीं तयार होणाऱ्या वाङ्मयामध्यें अत्यंत मोठी क्रांति झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

[ 'विद्यासेवक' वर्ष १, अंक ८, एप्रिल १९२५, पृ. १० ते १२. ]

## २२. स्वराज्यकल्पना, लोकजागृति व सरकारची कार्यक्षमता

निःशस्त्रांचें राजकारण करावयाचें म्हणजे संग्राम चुकवावयाचा असें नव्हे. संग्रामाशिवाय कोणतीच वस्तु साध्य होत नाहीं, आणि राष्ट्राचा राज्यकारभार चालवावयास लागणारी लायकीहि यावयाची नाहीं. हा संग्राम करावा लागणार तो निःशस्त्र होय. संग्राम चुकवावयाचा नाही हें जरी खरें आहे, तरी जी गोष्ट संग्रामाशिवाय साध्य होण्याजोगी आहे तीसाठीं विनाकारण संग्राम कशासाठीं ? आपणांस यासाठीं काय साध्य करावयाचें तें निश्चित केले पाहिजे.

आतांपर्यंतच्या अनुभवावरून आपणास हें ठाऊक झालें आहे कीं, आपलें भवितव्य परक्या लोकांच्या हातीं ठेवणें हें बरोबर नाहीं. कोणी मनुष्य कितीहि प्रामाणिक असला तरी राज्यव्यवस्थेसाठीं जर ज्यावर तो राज्य करणार त्यापेक्षां अन्य व्यक्तीस किंवा मनुष्यसंघास जबाबदार असला तर त्याला ठेवणे किंवा काढणें हें ज्यांच्या हातांत आहे त्यांच्या हितासाठी ज्यांवर तो राज्य करीत आहे त्यांचें अहित करावयास प्रवृत्त होईल. म्यान्चेस्टर शहराचा सर्व कारभार जर एका अधिकाऱ्याच्या ताब्यांत दिला आणि त्या अधिकाऱ्याला ठेवणें किंवा काढणें हें म्यान्चेस्टरच्या लोकांच्या हातांत न ठेवतां लंडनच्या लोकांच्या हातांत ठेवलें तर तो म्यान्चेस्टरचें हित पूर्णांशानें पाहील काय ? या तऱ्हेच्या व्यवस्थेस म्यान्चेस्टरचे लोक क्षणभर तरी कबूल होतील काय ? अर्थात् नाहीं. तेथें लोक एक रक्ताचे कीं दोन रक्ताचे हा प्रश्न येत नाहीं. तरी देखील अशा व्यवहाराला कोणीहि कबूल होणार नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची गोष्ट याहून निराळी नाहीं. हिंदुस्थानाचा राज्यकारभार हिंदुस्थानच्या लोकांस जबाबदार असावा असें म्हणणें हें प्रत्येक शहराचा कारभार दुसऱ्या शहराच्या लोकांना जबाबदार नसून त्याच लोकांना जबाबदार असावा या तत्त्वाचेंच जास्त विस्तृत प्रमाणावर प्रसारण आहे. पुढे असें दाखविण्यांत येईल कीं, हिंदुस्थानाचा आर्थिक विकास आणि शिक्षणविषयक विकास होऊं न देण्यांत इंग्लंडचेंहि कल्याण झालें नाहीं, म्यान्चेस्टरचा कारभार लंडनच्या लोकांच्या हातीं ठेवल्यानें म्यान्चेस्टरचें नुकसान झालेंच असतें, पण म्यान्चेस्टरचा विकास चांगला न झाल्यानें लंडनचेंहि नुकसान झालें असतें. एवंच कोणत्याहि मनुष्यवर्गाला दुसऱ्या मनुष्यवर्गाच्या तावडींत ठेवणें हें दोघांसहि अहितकारक आहे, आणि यासाठीं दोघांमध्यें संबंध श्रेष्ठकनिष्ठतेचे नसून सहकारित्वाचे असावेत हेंच योग्य आहे.

स्वराज्यासाठी आज आपली चळवळ चालली आहे तिचे यथार्थ स्वरूप लोकांस समजणें हीं स्वराज्यस्थापनेची पहिली पायरी आहे. जुनी स्वराज्याची कल्पना म्हणजे हिंदु राजा असणें आणि त्यानें धर्माप्रमाणें म्हणजे सर्व लोकांस संमत असा जो कायदा असेल त्याप्रमाणें राज्य चालविणें ही होय. वेदकाळी "स्वराज्य" म्हणजे काय होतें याची कल्पना स्पष्ट नाहीं. मंत्रपुष्पांजलींत स्वीकारलेलें वैदिक वाक्य जें 'ओं स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं' यांतील स्वाराज्य शब्द म्हणजे दक्षिणेंतील स्वतंत्र राजे यांचा दर्शक होय, भोज्य म्हणजे राजपुताना व वैराज्य म्हणजे लोकसत्तात्मक राज्यें असा अर्थ कांहीं संशोधक ( उदा. रमेशचंद्र दत्त ) करीत आहेत; तर कांहीं लेखक "स्वाराज्य" याचा अर्थ स्वतःच्या मनावर ताबा असा आध्यात्मिक करीत आहेत. पुढें शिवाजीच्या काळांत स्वराज्य हा शब्द निराळ्याच अर्थानें वापरला गेला. आज स्वराज्य या शब्दाचा अर्थ प्रातिनिधिक संस्था असलेलें लोकांचें राज्य असा झाला आहे. जुन्या बुधल्यांत नवीन दारू ओतण्याचा हा प्रयत्न आहे. या प्रयत्नाचा हेतु असा आहे कीं, स्वकीय जातीचा राजा असल्यानें जो राज्याविषयीं आपलेपणा उत्पन्न होतो तो आपलेपणा प्रातिनिधिक संस्था असलेल्या राज्यपद्धतीच्या ठायीं स्थापित व्हावा. प्रातिनिधिक राज्यपद्धति हें खरोखर स्वराज्य होय ही भावना लोकांत जागृत व्हावी.

ही एक तऱ्हेची चळवळ करणाऱ्यांची हातचलाखी होती. परराज्य नको, स्वराज्य पाहिजे असें प्रत्येक व्यक्तीस वाटतें. तेव्हां प्रातिनिधिक संस्था म्हणजेच स्वराज्य होय ही गोष्ट लोकांस पटावयास लागली म्हणजे लोकांत प्रातिनिधिक संस्थांची भूक उत्पन्न होईल; आणि प्रातिनिधिक संस्था उत्पन्न झाल्या म्हणजे राजा जातीनें इंग्रज असला तरीहि हरकत नाहीं असा गेल्या पिढीतील दूरदर्शी राजकारणी मंडळींचा अभिप्राय होता. प्रातिनिधिक संस्थांची आवड उत्पन्न होणें ही त्या प्रकारच्या संस्था चालविण्याची पहिली तयारी होय. प्रातिनिधिक संस्था गेल्या पिढींतील सर्वच लोकांस ध्येयभूत वाटत होत्या असें नाहीं. लोकांस एकतंत्री राज्य माहीत होतें. त्यांस हें ठाऊक होतें कीं, राजा चांगला असला म्हणजे तो सर्वसत्ताधीश असतो आणि लोकांचें बरेंवाईट करूं शकतो. प्रातिनिधिक संस्था म्हणजे बारभाईचा कारभार, त्यांत एकसूत्रता नसावयाची, कोणाचें चांगले करण्यास प्रत्येक मनुष्य दुसऱ्याच्या पक्षपाताच्या आरोपामुळें असमर्थ असावयाचा, अशा तऱ्हेची पुष्कळ लोकांची समजूत होती, आणि ती कांहीं अंशी बरोबरहि आहे. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जी बारभाई कोणासच जबाबदार नाहीं अशा मुत्सद्दी मंडळाच्या हातून होणाऱ्या कारभारासंबंधानें वरील कल्पना लोकांच्या मनांत खिळली आहे. जेव्हां शें दोनशें माणसें प्रधानमंडळानें अमुक गोष्ट कां केली असें विचारण्यास सज्ज असतात त्या प्रसंगी बेजबाबदार बारभाईचे दोष बरेच कमी झालेले असतात. तथापि हेंहि खरें आहे कीं सर्वसत्ताधारी राजा कर्तृत्ववान आणि सर्वप्रजाहितदक्ष असा असला तर त्याच्या हातून थोड्या काळांत फार कामगिरी होते. प्रातिनिधिक संस्थांमुळें समाजाचा मध्यम वर्ग अधिक

सुशिक्षित होत जातो. त्याच्यामध्यें जागृति होते, कर्तव्यकल्पना वाढतात; आणि त्यांचा कांहीं भाग जबाबदार मंत्रिमंडळाच्या डोक्यांत शिरून राज्यकारभारांत सुधारणा होत जाते. ही सुधारणेची क्रिया हुशार राजाच्या हाताखालीं होणाऱ्या सुधारणापेक्षां जरी मंदगतीनें होते तरी या सुधारणापरतेचा प्रवाह अधिक पद्धतशीर व अधिक अखंड वाहतो.

आज आपण हिंदुस्थानची भावी राज्यव्यवस्था कशी पाहिजे या प्रश्नाकडे लक्ष देत आहों आणि स्वराज्य म्हणजे प्रतिनिधींची संस्था मागत आहों. अलीकडे "डोमिनियन स्टेटस" हा शब्द प्रचारांत आल्यापासून डोमिनियन स्टेटस हें मागत आहों. कधीं कधीं साम्राज्याबाहेर स्वराज्य पाहिजे कीं साम्राज्याच्या आंत स्वराज्य पाहिजे या तऱ्हेची मनोरंजक चर्चा गंभीरपणे आजच्या राजकारणाचा विषय म्हणूनच करणारे सन १९२१ च्या अहमदाबाद कॉंग्रेससारखे लोकसमूह दृष्टीस पडतात. आणि कधीं कधीं साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें पूर्ण स्वातंत्र्यापेक्षां उच्चतर ध्येय आहे अशी कल्पनाहि मांडली जात आहे, अनेक माणसांचें, स्वाभाविकपणें उत्पन्न होणाऱ्या सामाजिक गरजांचा पुरवठा व्हावा, व सामाजिक अडचणींस तोड निघावी, म्हणून शासकवर्गाकडे अथवा राज्यव्यवस्थेकडे लक्ष जातें, व त्यामुळें शासनसंस्थेनें प्रजेसाठीं काय करावें यासंबंधीं ज्या प्रजेच्या अपेक्षा असतील त्या अपेक्षांप्रमाणें शासनसंस्थेस रूप येऊं लागते. सरकार हें यंत्र आहे, जसा माल काढावयाचा असेल तशी यंत्रयोजना होणार. समाजासाठी कोणता माल काढावयाचा हें जसजसें ठरेल तसतशी सरकारयंत्राची योग्यायोग्यता ठरेल; सरकारनें लोकांकरितां काय करावें यासंबंधाच्या लोकांच्या अपेक्षा जसजशा वाढत जातात तसतसा शासनयंत्रावर परिणाम होऊं लागतो. लोकांत आज वैयक्तिक आर्थिक आकांक्षा आहेत आणि अस्तित्वांत असलेल्या संधीचा वांटा आपणांसहि मिळावा यासाठीं स्वराज्य पाहिजे एवढी लोकांत जाणीव झाली आहे. स्वराज्य कां मिळविलें पाहिजे याविषयीं सामान्यतः जे हेतु लोकांपुढे असतात त्यांत समाजांतील मध्यमवर्गापुढें मुख्यत्वेंकरून नोकरीचा हेतु असतो. आज जी "ब्राह्मणेतर" जागृति दिसू लागली आहे ती त्याच प्रकारची आहे. ही खरी लोकजागृति नव्हे. लोकजागृति अजून व्हावयाचीच आहे. झालें आहे तें एवढेंच कीं, ब्राह्मणेतरांत उत्पन्न झालेला, अगदीं लहान असलेला मध्यमवर्ग इतर वर्गाबरोबर त्या नोकऱ्यांसाठींच भांडत आहे, कांहीं व्यापारी मंडळी अलीकडे स्वराज्याविषयक चळवळींत लक्ष देऊं लागली आहेत याचें कारण कंत्राटें देण्यांत व व्यापारास सरकारकडून पैशाची मदत करण्यांत सरकार गोऱ्या व काळ्यांमध्यें भेद करतें आणि यासाठीं तसले अन्याय बंद करण्यास स्वराज्य पाहिजे, इतपत कल्पना व्यापारी वर्गाच्या मनांत आतां शिरू लागली आहे. व्यापारी मनुष्य नाहीं तरी राजकारणाकडे दृष्टि न देणारा असाच होता. शेतकऱ्यांची राजकारणाकडे दृष्टि हवी तितकी वळली नाहीं ती वळविण्यासाठीं शेतकरी वर्गास आपल्या कार्याची खरी किंमत कळली पाहिजे; त्यानें

जाणावें कीं जमिनीस किंमत वास्तविक मनुष्यश्रमानें येते, सरकार जो धारा घेते तो सर्वस्वी अन्याय्य आहे, आपण जे पैसे सरकारांत भरतों ते आपल्या श्रमाचाच मुख्य भाग भरतों, आणि ते आपणांस होणाऱ्या प्राप्तीच्या मानानें फार भरतों, इत्यादि गोष्टी त्यांस जितक्या अधिक समजतील तितकी अधिक जागृति होईल.

प्रत्येक मनुष्यानें आपल्या वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें स्वराज्याकडे पहाणें ही दृष्टि कांहीं गैर नाहीं. राष्ट्र हा अत्यंत व्यापक आणि अत्यंत संकीर्ण असा समुच्चय असल्या-मुळें सर्व वर्गाचें हित बरेंचसें पद्धतशीर प्रत्यक्षसंकलन केल्याशिवाय कोणासच सांगतां येणार नाहीं; यासाठीं प्रत्येक वर्गानें आपलें हित रक्षण करण्यासाठी जागृत रहाणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तथापि हें जागृत रहाणें केव्हां होणार ? जागृत राहून कांहीं उपयोग असेल तर ना ? जर गरजांप्रमाणें सरकारकडून सोय करून घेण्याची शक्यता असेल तरच लोकांत जागृति उत्पन्न होते. तर लोकजागृतीस उत्तेजन येण्यासाठीं प्रत्येक वर्गानें संघीभूत होऊन आपलें हित साधण्याची सोय असली पाहिजे. ज्या वर्गाचें हित त्या वर्गानें सांगितलें नाहीं तर काय दुसरे सांगणार आहेत ?

प्रातिधिनिक संस्थाचें महत्त्व आज लोकांस पटवून द्यावयाचें आहे एवढेंच नव्हे तर सरकारासहि तें पटवून द्यावयाचें आहे. या प्रातिनिधिक संस्थांनीं केवळ लोकांसच फायदे होणार आहेत असें नसून खुद्द शासनसंस्थेसहि फायदे होणार आहेत. हिंदुस्थानी लोकांत बंड करून स्वतंत्र होण्याच्या इच्छेपेक्षा प्रातिनिधिक संस्थेनें युक्त अशी राज्यव्यवस्था घडवून आणण्याची इच्छा व्हावी अशी इंग्रज मुत्सद्यांची व हिंदी सुशिक्षितांची इच्छा झाली यास अनेक कारणें आहेत. स्वराज्य पाहिजे याचा अर्थ सर्व लोकांस प्रतिनिधिवर्गामार्फत सरकार जबाबदार असलें पाहिजे हें समाजध्येय जुन्या स्वातंत्र्याच्या कल्पनेपेक्षां कमी योग्यतेचें नाहीं, उलट ही राष्ट्रविकासाची पुढची पायरी आहे. जुनी स्वातंत्र्याची कल्पना म्हणजे स्वजातीचा राजा असणें ही होय. स्वजातीचा राजा असला म्हणजे लोकांस अधिक कार्यक्षेत्र मिळतें व लोकांच्या हिताच्या गोष्टी तो स्वभावतःच करील अशी सामान्य समजूत असते. परंतु ही समजूत सर्वथा खरी असते असें नाहीं. जें राज्य कमी सुशिक्षित लोकांनीं चालविलें आहे त्याच्या लोकहितपर कल्पना नियमितच असणार. उदाहरणार्थ, बेकारी बंद करण्यासारखे प्रश्न घ्या. हिंदुस्थानांतील सर्व संस्थानांस ती बंद करण्यास लागतील ते कायदे पास करण्यास किंवा उद्योगयोजना करण्यास मोकळीक आहे. पण संस्थानिक आणि त्यांचे कारकूनवजा मुत्सद्दी यांचें ज्ञानच बेताचें असलें म्हणजे दळणवळण वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, व्यापार वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, लोकांची उत्पादकशक्ति वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, याविषयींच्या कल्पना त्यांच्या डोक्यांत येणारच नाहींत. केवळ अल्पबुद्धि नोकरशाहीवर चाललेलें देशी संस्थानिकांचें राज्य सर्वलोकहितसाधक ज्ञानाच्या अभावानेंच दुर्बल असतें असें नाहीं, तर शासक-वर्गाच्या सहानुभूतीस देखील त्याच्या वैयक्तिक स्थितीमुळें बऱ्याच मर्यादा उत्पन्न झालेल्या

असतात. राजा विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा असल्यामुळें पुष्कळ प्रसंगी तो सर्व जनतेचे आपण प्रतिनिधि आहों अशी कल्पना न करितां जनतेंतील कांहीं विशिष्ट भागाचेच आपण प्रतिनिधि आहोंत अशी कल्पना त्याच्या मनांत येऊं लागून तो राज्यांतील सर्व जनतेचा विकास या गोष्टीकडे पाहून राज्य न चालवितां कांहीं विशिष्ट लोकांच्या हिता-साठीं सर्व जनतेपासून उत्पन्न होणारा वसूल वापरण्याचीच तयारी करतो, आणि याहूनहि खालच्या दर्जाच्या बऱ्याचशा राजेलोकांची बुद्धि आपल्या उपभोगासाठीं सर्व राज्य वापरावें अशा प्रकारची होते. जर राज्यातल्या सर्व जनतेस आपलें हित पुढें मांडणें, आपलें हित पाहणारें मंत्रिमंडळ उत्पन्न करणें, या सारख्या गोष्टी शक्य झाल्या तर राज्यांतील सर्व वर्ग आत्महिताविषयीं दक्ष होऊं लागतील. जें राजास किंवा मुत्सद्यास सुचणार नाहीं तें निरनिराळ्या वर्गांचे प्रतिनिधि सुचवितील, आणि राज्य खरोखर सर्व लोकहितासाठीं चालेल. स्वराज्याची चळवळ म्हणजे समाजांतील सर्व वर्ग जिवंत करण्या-साठीं, आणि राजास किंवा शासक वर्गास एकांगी न राहूं देतां अनेक अनेकांगी करण्या-साठीं, व सर्व लोकांच्या प्रयत्नास चालना देण्यासाठी होय.

स्वराज्य म्हणजे सर्व लोकांचें रक्षण करणें व आपली सामुच्चयिक पत आहे ती कायम राखून वाढविणें या क्रिया करण्याची जबाबदारी लोकांनीं स्वतःवर घेणें होय. स्वराज्याची चळवळ राष्ट्र एकलकोंडे करण्यासाठीं खास नाहीं. राज्यकारभारांत लोकप्रति-निधींचा हात शिरल्यामुळें, राष्ट्रापुढील अनेक प्रश्नांची जाणीव समाजांतील पुढारी वर्गास होत जाईल, आणि राष्ट्रास, बाहेरच्या राष्ट्रांमध्यें आपला दर्जा वाढला पाहिजे, ही जाणीव अधिक तीव्रतेनें भासूं लागेल. आणि असें झालें म्हणजे हिंदुस्थानांतील लोकांचीं राज्य चालविणारीं माणसें सर्व जगाच्या लोकमतास जबाबदार होणार. आपल्या लोकांस दक्षिण आफ्रिकेंत बहिष्कृतांप्रमाणें वागविण्यांत येऊं नये म्हणून ज्या सरकारास धडपडावें लागेल त्याच सरकारास परकीय मनुष्य आपल्या देशांत आला म्हणजे त्याला आपल्या परकीयांचा विटाळ मानण्याच्या क्रियेविरुद्ध धडपडावें लागेल. राष्ट्र या नात्यानें जगांत प्रवेश करावयाचा म्हणजे सामुच्चयिक जबाबदारीच्या कल्पनांचा लोकांत चोंहोंकडे प्रसार केलाच पाहिजे, आणि असें झाल्यानें हिंदुस्थानांतील लोक जगाचे नागरिक व्हावयास इतर स्वतंत्र देशांइतके योग्य होतील, आणि त्यांच्या मनांतील अनेक विकल्प जाऊन त्यांच्यांत नैतिक सुधारणा वाढेल.

स्वराज्याची चळवळ सरकारचा बोज कमी न करतां वाढविण्यासाठीं आहे. जेव्हां सरकारचें पोलिसखातें लोकांस जबाबदार नसतें आणि जेव्हां त्या खात्याचा उपयोग स्वदेशाभिमानी लोकांस छळण्यास आणि पठाणांपुढें दुर्बलता दाखविण्यास केला जातो, तेव्हां असल्या खात्याची लोकांत प्रतिष्ठा काय असणार, आणि त्या खात्याच्या लोकांस जनतेची सहानुभूति मिळणार तरी कशी ? पोलीस हे लोकांस आपले मित्र न वाटतां शत्रूच वाटणार. पण हें खातें लोकसत्तेस जबाबदार झालें म्हणजे या खात्याची काम

करण्याची पद्धत लोकपीडक न होतां लोकरक्षकच अधिकाधिक होत जाईल, आणि लोकांची सहानुभूति गुन्हेगाराकडे न वळतां पोलीसकडे वळेल आणि पोलीसला काम करण्याला अधिक सौकर्य उत्पन्न होईल; म्हणजे स्वराज्याचा परिणाम कायद्याचें महत्त्व वाढविण्याकडे होईल.

जी गोष्ट पोलिस खात्यासंबंधानें आहे तीच गोष्ट वसुलासंबंधानें व करासंबंधानें आहे. जर करांचा उपयोग लोकांच्याच हितासाठीं केला जातो, अशी लोकांची खात्री नसली तर कर वाढविण्यास लोकांचें मत विरुद्ध असणारच; पण करांचा उपयोग लोककल्याणासाठींच केला जात आहे अशी लोकांची खात्री झाली तर कर वाढविण्यास लोकमत अनुकूल होत जाणार. तथापि जेव्हां एखाद्या विशिष्ट लोकहिताच्या गोष्टीसाठीं पैसा अधिक खर्च न करतां भलत्याच गोष्टीसाठीं खर्च करूं लागतें तेव्हां सरकारविषयीं विश्वास उत्पन्न होत नाहीं. आणि जर लोकप्रतिनिधी त्या करास मंजुरी देऊं लागले तर ते लोकप्रतिनिधी लोकांत अविश्वासार्ह ठरतात. आज या प्रकारच्या गोष्टी पुष्कळ होतात. आज नोकरशाहीच्या हातीं कारभार आहे व प्रतिनिधिवर्ग दुर्बल आहे. तेव्हां अनेक लटपटी चालूच राहणार. कां कीं नोकरशाहीचा सर्व वेळ राज्यव्यवस्थेसाठींच असल्यामुळें लबाड्या करण्यास व त्या कशा कराव्या याविषयीं विचार करण्यास तीस पुष्कळ संधि असते. पण हे अपूर्ण सत्तेचे लोकप्रतिनिधी फावल्या वेळांत राजकारण करणार, त्यांना नोकरशाहीच्या लबाड्या शोधीत रहाण्यास त्या प्रसिद्ध करण्यास आणि त्याविरुद्ध खटाटोप करण्यास संधि नसते. शिवाय कायदेमंडळाचा वेळ असल्यामुळें नोकरशाहीची पूर्ण उजळणी तेथें करण्यास अवकाशहि नसतो. तथापि हा नोकरशाहीचा जय नसून पराभव आहे. लोकांवरील कर न वाढवितां अधिक कर्ज काढून कारभार चालविण्याचें धोरण आज जें सरकार पत्करीत आहे आणि ज्या धोरणांचा परिणाम राष्ट्रीय कर्ज वाढण्यात होत आहे ती गोष्ट सरकारच्या पराभवाची द्योतक नव्हे काय, आणि हें दौर्बल्य लोकप्रतिनिधींस सरकार फेटाळून लावीत असल्यामुळें उत्पन्न झालें नाहीं काय? यासाठीं प्रतिनिधींस जबाबदार अशीं माणसें सर्व नोकरशाहींच्यावर बसविलीं पाहिजेत. असें झालें म्हणजे लोकांचा राज्यकारभारावर विश्वास वाढेल आणि सरकारनें लोकसुधारणेच्या अधिकाधिक योजना कराव्यात आणि त्या योजना पार पाडण्यासाठी लोकांनीं अधिकाधिक कर मंजूर करावेत ही प्रवृत्ति वाढेल. लोकांच्या प्रगतीसाठीं ज्या कांहीं गोष्टी कांहीं संस्था खाजगी प्रयत्नानें आज करीत आहेत त्या उद्यां शासनसंस्थेमार्फत होत जातील. सर्व लोकांचा विमा उतरण्याची राष्ट्रीय योजना, प्रत्येक धंद्याचें शिक्षण, द्रव्योत्पादनास असमर्थ अशा प्रजेचें रक्षण उत्पादनविकासाच्या राष्ट्रीय योजना इत्यादि गोष्टींकडे शासनसत्ता जोपर्यंत लोकांस जबाबदार नाहीं तोंपर्यंत कधींहि चांगल्या तऱ्हेनें लक्ष जाणार नाहीं. आणि येथील सरकार इतर सरकारांपेक्षां कमी योग्यतेचें ठरेल.

अर्थांत स्वराज्याची चळवळ ही सरकारची पत वाढविण्यासाठीं आणि सरकारचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत करण्यासाठींच आहे, व यामुळें या चळवळीकडे इंग्लंडनें त्यांचेंच काम आम्ही करीत आहों या भावनेनें पाहिलें पाहिजे. तसेंच सरकारची कार्यक्षमता लोकजागृतीमुळें, आणि लोकजागृति प्रातिनिधिक संस्थेच्या स्वराज्यानें वाढणार आहे, ही भावना जागृत ठेऊन राष्ट्रशासनाच्या पुनर्घटनेस जोरानें चालना दिली पाहिजे.

[ निःशस्त्रांचे राजकारण पृ. १५–२५ ]

# केतकर-वाङ्मयाची व केतकरविषयक वाङ्मयाची निवडक सूचि


अ) डॉ. केतकरांची मराठी पुस्तके :

१) महाराष्ट्रीय ज्ञानकोश भाग एक ते तेवीस; प्रसिद्धी काल १९२० ते १९२७; पुणे, श्री. व्यं. केतकर.

२) प्राचीन महाराष्ट्र-त्याचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास आणि तदर्थ जागतिक इतिहास-शातवाहन पर्व विभाग १ ला कुरुयुद्धापासून शकारंभापर्यंत पुणे; श्री. व्यं. केतकर १९३५.

३) प्राचीन महाराष्ट्र-आदिपर्व, पुणें; श्री. व्यं. केतकर १९३१.

४) प्राचीन महाराष्ट्र-शातवाहन पर्व, विभाग दुसरा; पुणें १९६३.

५) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए. पी. एच्. डी. यांचे संकीर्ण लेख. मुंबई, नारायण वासुदेव महाजनि; श्रुतिबोध, मुंबई; १९१५.

६) निःशस्त्रांचे राजकारण, पुणे, श्री. व्यं. केतकर १९२६.

७) प्राचीन कहाण्या (निरनिराळ्या देशातील भाषांतरित लोककथा) पुणे; श्री. व्यं. केतकर; १९२९.

८) माझें बारा वर्षांचे काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास; पुणे; श्री. व्यं. केतकर, १९२७.

९) महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण अथवा महाराष्ट्रीय वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासातील एक प्रकरण- विभाग १ ला-ब्रिटिश सत्तेपूर्वीचा काल. पुणे; श्री. व्यं. केतकर १९२८.

१०) भारतीय समाजशास्त्र आणि तदंतर्गत समाजघटनाशास्त्राचें विधान, नागपूर, सुविचार प्रकाशन मंडळ, १९३६.

११) आशावादी अथवा एका प्रवाहपतिताचें चरित्र, पुणे; श्री. व्यं. केतकर १९२७.

१२) गांवसासू, पुणे, अनंत सखाराम गोखले, १९३०.

१३ ) गोंडवनांतील प्रियंवदा आणि घरकुट्टे घराण्याचा इतिहास, पुणे; श्री. व्यं. केतकर, १९२६.

१४ ) परागंदा आणि भारतीय समाजाची सरहद्द, पुणे. श्री. व्यं. केतकर, १९२६.

१५ ) ब्राह्मणकन्या, मुंबई. म. ना. कुलकर्णी; १९३०.

१६ ) विचक्षणा, किर्लोस्कर प्रेस; किर्लोस्करवाडी, १९३७.

१७ ) भटक्या, मुंबई; १९३८.

## ब ) डॉ. केतकरांची इंग्रजी पुस्तके :

1 ) The History of Caste in India, Vol-one, New york, Taylor and Carpenter, 1909.

2 ) An Essay on Hinduism; Its Formation and Future, ( Second Volume of 'History of Caste in India' ) London, Luzac and Co. 1911.

3 ) An Essay on Indian Economics, Calcutta, Thacker, Spink and Co. 1914.

4 ) Hindu Law and the Methods, and Principles of the Historical Study Thereof. Calcutta, S. K. Lahiri and Co. 1914.

5 ) Victorious India, Poona, Maharashtra Jana Kosha Mandal Ltd, 1937

## क ) डॉ. केतकरांचे लेखसंग्रह : ( इतरांनी संपादित केलेले )

१ ) डॉ. केतकर : व्यक्ति आणि विचार, संपादक, श्री. के. क्षीरसागर, पुणे; कॉंटिनेंटल प्रकाशन, प्रथमावृत्ती १९५९.

२ ) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांचे वाङ्मयविषयक लेख, संपादक, गं. दे. खानोलकर; मुंबई, मराठी संशोधन मंडळ १९७४.

## ड ) डॉ. केतकरांचे नियतकालिकातील काही महत्त्वाचे लेख :

**लोकशिक्षण :**

१ ) आपली दुकाने व त्यांची सुधारणा, वर्ष २, अंक ४, पौष शुद्ध १०, १८३५ ( १९१३ )

२ ) टपालविक्रीचा धंदा. वर्ष २, अंक ६, फाल्गुन शुद्ध १०, १८३५, ( १९१३ )

३ ) नगरसंवर्धन आणि नगरसौंदर्य; वर्ष २, अंक ७, चैत्र शुद्ध १०, १८३५ (१९१३ )

**विद्यासेवक :**

१ ) स्त्रियांचें वाङ्मय आणि स्त्रियांच्या चळवळी, वर्ष १, अंक ९, मे १९२५.

२ ) स्त्रियांचा उद्योगात प्रवेश, वर्ष २, अंक ३, नोव्हेंबर १९२५.

३ ) मुलींचा वाढता कौमार्यकाल आणि त्याची निगा. वर्ष २, अंक ६, फेब्रुवारी १९२६.

४ ) सुशिक्षित वर्गाचे औद्योगिक कार्य. वर्ष २, अंक ६, फेब्रुवारी १९२६.

५ ) कायस्थप्रभूंचे सामाजिक स्थान. वर्ष ५, अंक ४, जुलै १९२९.

६ ) कौटुंबिक पहाणीची आवश्यकता. वर्ष ५, अंक ५, ऑगस्ट १९२९.

७ ) वाङ्मयोत्पादनाच्या धंद्याचे आजचे स्वरूप. वर्ष १, अंक १, सप्टेंबर १९२४.

८ ) राजकीय चळवळी आणि वाङ्मयवृद्धी. वर्ष १, अंक १, सप्टेंबर १९२४.

९ ) चरित्रवाङ्मयाविषयी काही विचार. वर्ष १, अंक १०, जून १९२५.

**सत्यकथा :**

१ ) हिंदू समाजाच्या सरहद्दीवर. अंक २, एप्रिल १९३७.

२ ) सावित्रीचे उदाहरण आणि उदात्तभावनांचा दुरुपयोग. अंक १२, फेब्रुवारी १९३७.

३ ) पाश्चात्य वधूपरिणित समाज. अंक ६, ऑगस्ट १९६६ आणि अंक १०, डिसेंबर १९३६.

**प्रतिभा :—( पाक्षिक )**

१ ) माझ्या आयुष्यातील जुन्या बऱ्यावाईट आठवणी ( १४ लेख एकूण ) १४ ऑगस्ट १९३३; २८ ऑगस्ट १९३३; २५ सप्टेंबर १९३३; ९ ऑक्टोबर १९३३; २३ ऑक्टोबर १९३३; ६ नोव्हेंबर १९३३; २० नोव्हेंबर १९३३, ४ डिसेंबर १९३३; ५ जानेवारी १९३४; १९ जानेवारी १९३४; २ फेब्रुवारी १९३४; १२ ऑक्टोबर १९३४; २६ ऑक्टोबर १९३४; २३ नोव्हेंबर १९३४.

**चित्रा :**

१ ) मी हिंदुस्थानचा सर्वाधिकारी झालों तर—१९३६ दिवाळी अंक.

**इ ) डॉ. केतकरांसंबंधींची पुस्तके :**

१ ) मलाच हे सांगितले पाहिजे, शीलवती केतकर, मुंबई, ह. वि. मोटे.

२ ) ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे चरित्र. द. न. गोखले, मुंबई, मौज प्रकाशन गृह; पहिली आवृत्ती : २० सप्टेंबर १९५९.

३ ) केतकरी कादंबरी. दुर्गा भागवत, मुंबई, मौज प्रकाशन गृह; १९६७.

## ई ) डॉ. केतकरांसंबंधीचे नियतकालिकांचे विशेषांक :

१ ) लोकशिक्षण. वर्ष ७, अंक ११-१२, मे, जून १९३७. आणि वर्ष ८, अंक १ जुलै १९३७.

२ ) प्रतिभा— जुलै १९३७.

## उ ) डॉ. केतकरांसंबंधीचे नियतकालिकातील महत्त्वाचे लेख :

१ ) डॉ. केतकर यांचे समाजशास्त्रविषयक लेखन : प्रा. इरावतीबाई कर्वे, लोकशिक्षण. मे, जून १९३७.

२ ) ज्ञानकोशकारांचे हिंदुत्वदर्शन. ग. वि. केतकर, सह्याद्रि, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर १९४७.

३ ) समाजशास्त्रज्ञ डॉ. केतकर. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, सह्याद्रि, जून १९३७.

४ ) एक जगाची कल्पना आणि डॉ. केतकर. दुर्गा भागवत, नवभारत, एप्रिल १९४९.

५ ) डॉ. केतकर यांचें अर्थशास्त्रविषयक लेखन : प्रा. प. म. लिमये. लोकशिक्षण, मे, जून १९३७.

६ ) डॉ. केतकर आणि वैदिक संशोधन, डॉ. प. ल. वैद्य, लोकशिक्षण, जुलै १९२४.

७ ) महाराष्ट्रीय ज्ञानकोश व त्यातील भलतीच विधान परंपरा, नानासाहेब पावगी, केसरी, लेख १ ला, २५ नोव्हेंबर १९२४; लेख २ रा; १६ डिसेंबर १९२४.

८ ) प्राचीन महाराष्ट्र (आदिपर्व) १ ली ८ प्रकरणें व शातवाहन पर्व, १ ले प्रकरण यांचा परामर्श. प्रा. अ. स. अळतेकर; लोकशिक्षण, जुलै १९३१.

९ ) विदर्भ व कालिदास, डॉ. केतकर यांस उत्तर (एकूण लेख ६) प्रा. वा. वि. मिराशी, महाराष्ट्र, लेख १ ला, २ डिसेंबर १९२८; लेख २ रा, ९ डिसेंबर १९२८, ले. ३ रा, १६ डिसेंबर १९२८, लेख ४ था २३ डिसेंबर १९२८, ले. ५ वा, ३० डिसेंबर १९२८, लेख ६ वा, १३ जानेवारी १९२९.

१० ) कालिदास आणि विदर्भ. डॉ. केतकर यांस प्रत्युत्तर— प्रा. वा. वि. मिराशी, महाराष्ट्र, १३ मार्च १९२९.

११ ) डॉ. केतकर यांचा राजकीय विचार व मतप्रचार : प्रा. श्री. मा. दातार, लोकशिक्षण, जुलै १९३७.

१२ ) डॉ. केतकर यांचे राजकारणविषयक विचार : प्रा. श्री. के. क्षीरसागर, नवभारत, एप्रिल १९५०.

१३) डॉ. केतकरांचे विचारविश्व :– यशवंत दिनकर फडके, मौज, दिवाळी अंक १९७३.

१४) महाराष्ट्राचा व्रात्य शकार : श्री. म. वर्दे, महाराष्ट्र सारस्वत, नोव्हें, डिसेंबर १९३३.

१५) रा. वर्दे याचे डॉ. केतकरांना उत्तर : श्री. म. वर्दे, महाराष्ट्र सारस्वत, जाने. फेब्रु. १९३४.

१६) डॉ. केतकरांची मते : दुर्गा भागवत, सत्यकथा, एप्रिल १९४९.

१७) डॉ. केतकरांचे साहित्य दर्शन : दुर्गा भागवत, धनुर्धारी, ९ एप्रिल १९४९.

१८) डॉ. केतकरांचे भाषेचे प्रयोग : दुर्गा भागवत, साहित्य, ऑक्टोबर १९४९.

१९) कादंबरीकार डॉ. केतकर : प्रा. वा. म. जोशी, लोकशिक्षण, मे, जून १९३७.

२०) डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्या : ग. त्र्यं. माडखोलकर, प्रतिभा, जुलै १९३७.

२१) डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यांचें कार्य : डॉ. ग. य. चिटणीस, धनुर्धारी, ९ एप्रिल १९४९.

२२) डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचे टीकाकार : श्री. मा. कुलकर्णी, राष्ट्रशक्ति, १४, २१, २८ डिसेंबर १९५६ व ४, ११, जानेवारी १९५७ (ही लेखमाला 'कादंबरी समीक्षा' श्री. मा. कुलकर्णी, नागपूर. उन्मेष प्रकाशन, १९७२ या पुस्तकातही समाविष्ट करण्यात आलेली आहे.)

२३) मराठी साहित्यांतील एक महान् व्यक्ति, ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर : प्रा. श्री. ना. बनहट्टी, विहंगम, एप्रिल १९३४.

२४) डॉ. केतकर यांचे व्यक्तिमत्त्व : प्रा. द. वा. पोतदार, लोकशिक्षण, जुलै १९३७.

२५) डॉ; केतकर व्यक्तिदर्शन आणि स्मृति : श्रीमती शीलवति केतकर, लोकशिक्षण, मे, जून, १९३७.

२६) अश्रुविमोचन आणि गुण निमज्जन : श्री. के. क्षीरसागर, प्रतिभा, जुलै १९३७.

२७) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर : प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, प्रतिभा, जुलै १९३७.

२८) आमचे दोन महापुरुष : प्रा. द. वा. पोतदार, प्रतिभा, जुलै १९३७.

२९) डॉ. केतकर आणि मिसेस केतकर : प्रा. श्री. के. क्षीरसागर, लोकसत्ता, ८-५-४५.

३०) डॉ. केतकरांच्या आकलनातील अडचणी : प्रा. श्री. के. क्षीरसागर, नवभारत, एप्रिल १९४९.

३१) डॉ. केतकर यांची विविध कार्ये व योजना : य. रा. दाते, प्रतिभा, जुलै, १९३७.

३२ ) डॉ. केतकर यांची नियतकालिके : चिं. ग. कर्वे, लोकशिक्षण, मे, जून, १९३७.

३३ ) डॉ. केतकर आणि सदाशिव पेठ : चिं. वि. जोशी, अभिरुचि, जून १९४५.

३४ ) कै. डॉ. केतकर पुन्हां एकदां : चिं. वि. जोशी, अभिरुचि, ऑगस्ट १९४५.

३५ ) कै. डॉ. श्री. व्यं. केतकर आणि सदाशिव पेठ : संपादक अभिरुचि, द. वा. पोतदार, श्री. के. क्षीरसागर वगैरे, सप्टेंबर १९४५.

३६ ) वाद–संवाद : निषाद आणि शमा, अभिरुचि, मे, १९४५ आणि जून, १९४५.

३७ ) कै. डॉ. श्री. व्यं. केतकर आणि सदाशिव पेठ : वादाचा सारांश व समारोप : अभिरुचि, सप्टेंबर १९४५.

३८ ) डॉ. केतकरांच्या सान्निध्यांत : डॉ. य. खु. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३७.

३९ ) उमरावती हायस्कुलांतील केतकरांच्या आठवणी : बा. सं. गडकरी, प्रतिभा, जुलै १९३७.

४० ) कै. डॉ. श्रीधर व्यं. केतकर यांच्या कांही आठवणी : दुर्गा भागवत, यशवंत, एप्रिल १९५०.

४१ ) डॉ. केतकरांच्या जीवनांतील कोमल छटा : दुर्गा भागवत, युगवाणी, एप्रिल १९५०.

REFBK-0023817

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६९
दा. क्र. २३८९८
निबंध २८।७।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

डॉ. केतकरांना अवघे त्रेपन्न वर्षांचे आयुष्य लाभले, पण तेवढ्यात ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांत त्यांनी अप्रतिहत संचार केला. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, वैदिक संशोधन, महाराष्ट्रेतिहास, साहित्य-शास्त्र, राजकारण वगैरे क्षेत्रांत त्यांनी केलेले लिखाण क्वचित विवाद्य असले तरी एकंदरीने बहुमोल आहे, या विषयी शंका नाही. विशेषतः समाजशास्त्रज्ञ व वैदिक संशोधक म्हणून त्यांनी जी कामगिरी बजावली ती अशा तोलामोलाची झाली की महाराष्ट्राने तिच्याविषयी सदैव अभिमान बाळगावा. त्यांच्या कादंबऱ्या अनेकांना कलादृष्ट्या सदोष वाटल्या असतील, पण त्यांत समाजजीवनाची नि मानवी मनाची जी चित्रे रेखाटली आहेत आणि जीवनविषयक विचारांना जी चालना दिली आहे ती दृष्टीआड करण्यासारखी नाही.

या ग्रंथाचे संपादक डॉ. य. दि. फडके यांनी डॉ. केतकरांच्या समग्र लेखनाचे विहंगम-दर्शन या संग्रहाद्वारे घडविले आहे.

किंमत : १८ रुपये